# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

इतिहास विभाग

तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत
इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

## ''महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा ऐतिहासिक आढावा''

संशोधक

साईनाथ शंकरराव कबाडे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. विलास हरिभाऊ निंबाळकर
इतिहास विभाग प्रमुख,
ए. आर. बुर्ला वरिष्ठ महिला महाविद्यालय, सोलापूर.

नोव्हेंबर - २०१५.

# प्रतिज्ञापत्र

मी साईनाथ शंकरराव कबाडे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, **''महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा ऐतिहासिक आढावा''** या विषयावरील हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत 'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी सादर करीत आहे.

सदर शोधप्रबंध यापूर्वी या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठास कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

**संशोधक**

**साईनाथ शंकरराव कबाडे**

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत 'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी साईनाथ शंकरराव कबाडे यांनी **''महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा ऐतिहासिक आढावा''** या विषयावरील हा शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. यापूर्वी हा शोधप्रबंध या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठास कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

**मार्गदर्शक**

**डॉ. विलास हरिभाऊ निंबाळकर**

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

# ऋणनिर्देश

माझ्या शोधप्रबंधाचा विषय **"महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा ऐतिहासिक आढावा"** हा आहे. यामध्ये जैन धर्माची ओळख, जैन स्थापत्य आणि शिल्पकला, महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रे, पर्यटन विकासातील जैन तीर्थक्षेत्रांचे महत्त्व या प्रकरणांचा समावेश केला आहे. माझ्या या शोधप्रबंधास पूर्णत्त्व येण्यासाठी ब-याच व्यक्तींनी मला प्रोत्साहन दिले त्यांचे ऋण व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे.

माझे मार्गदर्शक मा. प्रा. डॉ. विलास हरिभाऊ निंबाळकर यांचे प्रथम आभार मानले पाहिजेत. या शोधप्रबंधाच्या लिखाणासाठी त्यांनी मला सतत प्रोत्साहन दिले. तसेच अत्यंत आपुलकीने निरपेक्ष वृत्तीने आणि परखडपणे मार्गदर्शन केले. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शन व सहकार्यामुळे मी शोधप्रबंध पूर्ण करू शकलो.

मा. डॉ. सौ. नलिनी वाघमारे (इतिहास विभाग प्रमुख) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे यांनी हा शोधप्रबंध लिहिण्यासाठी मार्गदर्शन केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

डॉ. सोपान जावळे, डॉ. मोहन चौगुले, डॉ. दीपक देशपांडे, डॉ. सौ. पद्मजा पाटील, डॉ. उमेश बगाडे, डॉ. रविकिरण जाधव, प्रा. विजय कुंजीर, प्रा. शिवाजी उकरंडे, प्रा. रेवणसिद्ध प्याटी, प्रा. अमिता नागणे, प्रा. अरूण धुमाळ या प्राध्यापकांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले, याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील ग्रंथालयाचे ग्रंथपाल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथील ग्रंथालयाचे ग्रंथपाल, सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथील ग्रंथालयाचे ग्रंथपाल, श्राविकाश्रम विद्यालय सोलापूर येथील ग्रंथालयाचे ग्रंथपाल, हिराचंद नेमचंद वाचनालय सोलापूर येथील वाचनालयाचे ग्रंथपाल अशा अनेक ग्रंथालयातील ग्रंथपाल यांनी मला बहुमोल सहकार्य केले, त्यांचेही मी आभार मानतो.

तसेच माझे आदरणीय वडील श्री. शंकरराव कबाडे, माझी आई सोजरबाई कबाडे, माझे लहान बंधु व माझ्या मित्रांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले, त्याबद्‌दल मी त्यांचाही आभारी आहे. या शोधप्रबंधाचे टायपिंग श्री. तानाजी वाघ यांनी अचूक व सुबक करून त्यास असे मोहक रूप देऊन या शोधप्रबंधाचे काम वेळेत पूर्ण करून दिल्याबद्‌दल मी त्यांचाही आभारी आहे.

या प्रबंध लेखनासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मदत करणा-या सर्वांचे आभार मानतो.

**साईनाथ शंकरराव कबाडे**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | ०१ - १२ |
| २. | जैन धर्म | १३ - ४६ |
| ३. | जैन तीर्थक्षेत्रे | ४७- १३१ |
| ४. | जैन स्थापत्य आणि शिल्पकला | १३२ - १८३ |
| ५. | उपसंहार | १८४ - १९६ |
| ६. | संदर्भ ग्रंथ सूची | १९७ - २१० |
| ७. | परिशिष्टे | २११ - २५६ |

# परिशिष्टांची यादी


| अ. क्र. | परिशिष्टांचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | नकाशे | २११ - २१३ |
| २. | शिलालेख व मूर्तीलेख | २१४ - २१७ |
| ३. | तीर्थक्षेत्रांची छायाचित्रे | २१८ - २५३ |
| ४. | प्रश्नावली | २५४ - २५५ |
| ५. | मुलाखती घेतलेल्या व्यक्तींची नावे | २५६ - २५७ |

## परिशिष्ट क्रमांक ८

## तीर्थक्षेत्रांच्या छायाचित्रांची यादी


| अ.क्र. | तीर्थक्षेत्राचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | मांगी-तुंगी तीर्थक्षेत्राचे दृश्य | २१८ |
| २. | मांगी-तुंगी येथील पार्श्वनाथ मंदिराचे शिखर | २१९ |
| ३. | मांगी-तुंगी पर्वतावरील गुफा दृश्य | २२० |
| ४. | गजपंथ पहाडावरील पार्श्वनाथाची दहा फुट उंचीची मूर्ती | २२१ |
| ५. | कुंथलगिरीचे विहंगम दृश्य | २२२ |
| ६. | कुंडल येथील कलिकुंड पार्श्वनाथाची, पद्मावतीची मूर्ती | २२३ |
| ७. | मुक्तागिरी मंदिराचे विहंगम दृश्य | २२४ |
| ८. | कुंभोज येथील बाहुबलीची मूर्ती | २२५ |
| ९. | जिंतुर येथे उत्खननात सापडलेल्या मूर्ती | २२६ |
| १०. | जिंतुर येथे उत्खननात सापडलेल्या मूर्ती | २२७ |
| ११. | शिरपूर येथील अंतरिक्ष पार्श्वनाथ, चिंतामणी पार्श्वनाथाची मूर्ती | २२८ |
| १२. | कारंजा येथील सुपार्श्वनाथाची मूर्ती | २२९ |
| १३. | कारंजा येथील शासन देवता पद्मावतीची, अंबिकेची मूर्ती | २३० |
| १४. | कारंजा मंदिराच्या छताचे दृश्य, कारंजा येथील कपड्यावरील ऐरावत हत्तीचे पेटींग | २३१ |
| १५. | रामटेक मंदिराचे दृश्य, शांतिनाथाची तेरा फुट उंचीची भव्य मूर्ती | २३२ |
| १६. | तेर येथील मंदिर, मूर्ती आणि विहिरीचे दृश्य | २३३ |
| १७. | शिरड-शहापूर येथील तीर्थंकर मल्लिनाथाची भव्य मूर्ती | २३४ |
| १८. | नवागड येथील तीर्थंकर नेमिनाथाची मूर्ती व मंदिर परिसर | २३५ |

| अ.क्र. | तीर्थक्षेत्राचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १९. | कचनेर व कोठाळा येथील पार्श्वनाथाची मूर्ती | २३६ |
| २०. | जटवाडा येथील पार्श्वनाथाची मूर्ती व उत्खननात सापडलेल्या मूर्ती | २३७ |
| २१. | पैठण येथील मुनिसुव्रतनाथाची मूर्ती | २३८ |
| २२. | बाढौणा रामनाथ आणि भातुकली येथील तीर्थंकर आदिनाथाची मूर्ती | २३९ |
| २३. | सावरगांव येथील मंदिराचे दृश्य | २४० |
| २४. | सावरगांव येथील मानस्तंभाचे दृश्य | २४१ |
| २५. | आष्टा-कासार व केसापूरी येथील पार्श्वनाथाची मूर्ती | २४२ |
| २६. | पंचालेश्वर व पोदनपूर येथील तीर्थंकरांच्या भव्य मूर्त्या | २४३ |
| २७. | वेरूळ लेणी येथील दृश्य | २४४ |
| २८. | वेरूळ येथील पार्श्वनाथाची सोळा फूट उंचीची भव्य मूर्ती | २४५ |
| २९. | धाराशिव लेणी येथील दृश्य | २४६ |
| ३०. | औरंगाबाद लेणी (निपटरंजन गुफा) येथील तीर्थंकर नेमिनाथाची सहा फूट उंचीची भव्य मूर्ती | २४७ |
| ३१. | अंजनेरी येथील जैन मंदिर समूह | २४८ |
| ३२. | चारठाणा व कुंथलगिरी येथील आकर्षक मानस्तंभ | २४९ |
| ३३. | जैन धर्म ध्वज व जैन धर्म चिन्ह | २५० |
| ३४. | जैन तीर्थक्षेत्रांवर आढळणारी अहिंसेची प्रतिक | २५१ |
| ३५. | जैन तीर्थक्षेत्रांवर आढळणारी चरण चिन्ह | २५२ |
| ३६. | जैन धर्म अभ्यासकांच्या मुलाखती घेतानाचे फोटो | २५३ |

# प्रकरण - पहिले

## प्रास्ताविक

- विषयाची निवड.
- संशोधनाची उद्दिष्ट्ये.
- संशोधनाची व्याप्ती.
- संशोधनाचे महत्त्व.
- संशोधनाची गृहितके
- संशोधन पद्धती.
- तथ्य संकलन.
- साहित्याचे पुनर्विलोकन.
- प्रकरण योजना.
- संदर्भ ग्रंथ.

# प्रकरण - पहिले

## प्रास्ताविक

भारतीयांनी आपली संस्कृती, परंपरा, साहित्यांबरोबरच विविध धर्म, भाषा, प्रांत अशा अनेक गुणांनी वेगळेपण जतन केलेले आहे. या भारतीय संस्कृतीस वेगळेपण प्राप्त करुन देण्यास येथील परंपरा, भाषा, प्रांत आणि धर्माची भूमिका फार महत्त्वाची आहे. कारण भारतात उदयास आलेल्या धर्मांचे तत्वज्ञान सर्व मानवास अधिक प्रगल्भ करतात. भारतात हिंदू, जैन, बौद्‌ध आणि शीख अशा धर्माचा उदय आणि प्रचार, प्रसार झाला आहे. आपणास या धर्माची जाणीव, ओळख, येथील मंदिरे, तीर्थक्षेत्रे, स्तुप, लेण्या, गुरुद्‌वारे करवून देतात. सोबतच भारताबाहेर उदयास आलेल्या परंतु भारतात आढळणा-या ख्रिश्चन, इस्लाम, पारसी धर्माची धार्मिक स्थळे व त्यांची विविध स्थापत्ये भारताच्या इतिहासाची संपन्नता स्पष्ट करतात.

भारतीय समाजास वैदिक काळानंतर जैन व बौद्‌ध धर्माची ओळख झालेली दिसून येते. जैन धर्माच्या अहिंसा, अपरिग्रहवाद, अनेकांतवाद, कर्मवाद, समतावाद आणि वस्तुस्वातंत्र्यवाद या तत्वांमुळे भारतीय तत्वज्ञान व्यापक झाले आहे. इ.स.पू. सहाव्या शतकात जैन धर्माच्या उदयाचा विचार केला जातो. भगवान महावीरांना जैन धर्माचे प्रवर्तक आणि चोवीसावे तीर्थंकर मानले जाते.[१] म्हणजेच महावीरांच्या पूर्वी तेवीस तीर्थंकर होऊन गेले आहेत. या तेवीस तीर्थंकरांमध्ये पहिले वृषभनाथ तर तेवीसावे पार्श्वनाथ तीर्थंकर महत्त्वाचे समजले जाते. वृषभनाथांनी जैन धर्माची स्थापना केली आणि तेव्हापासून महावीरापर्यंतच्या तीर्थंकरांनी जैन धर्माचा प्रसार आणि प्रचार केला असे जैन परंपरा मानते. परंतु तेवीसावे तीर्थंकर पार्श्वनाथ आणि चोवीसावे तीर्थंकर महावीर या तीर्थंकरांचीच ऐतिहासिकता आज स्पष्ट झाली आहे.[२]

भारतीय धर्म परंपरेत जैन धर्माचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कारण या धर्माचे प्राचीनत्व आणि तत्त्वज्ञानामुळे हा धर्म विशेष ठरतो. प्राचीन

भारताच्या इतिहासातून आपणांस जैन धर्माच्या अस्तित्वाची अधिक माहिती मिळते. तसेच प्राचीन काळापासून वेगवेगळ्या राजकर्त्यांनी जैन धर्माचा आपल्या जीवनात स्वीकार केलेला आणि राजाश्रय दिलेला दिसतो. यासाठी वेरुळ, धाराशिव या लेण्यांची उदाहरणे देता येतील.[३]

उत्तर भारतात उदयास आलेला जैन धर्माचा प्रसार भारतभर झालेला दिसून येतो. जैन धर्माच्या उदयापासून या धर्मास कमी अधिक संख्येने अनुयायी मिळाले. आज भारतात जैन धर्मियांची संख्या पन्नास लाख असून जैन धर्माचे अस्तित्त्व दिसून येते.[४] या अस्तित्त्वाची ठळक वैशिष्ट्ये त्यांच्या तीर्थक्षेत्रांवर आपणास पाहावयास मिळतात.

प्रत्येक धर्मात अनेक प्रसिद्धीस आलेली स्थळे असून त्यांना तीर्थक्षेत्रे असे म्हणतात. जैन धर्मात तीर्थक्षेत्रांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण धर्मावरील श्रद्धा शुद्ध राहण्यासाठी तीर्थयात्रा सतत करावी अशी प्रथा जैन आचारशास्त्रातून दिसून येते. अशा तीर्थवंदनेसाठी प्रसिद्ध असलेली जैनांची अनेक तीर्थक्षेत्रे भारतभर पाहावयास मिळतात. जैन श्रावक व साधू यांची तीर्थवंदना करण्याची पद्धत जैन परंपरेत पूर्वीपासूनच आहे. भारतभर दोनशे बत्तीस जैन तीर्थक्षेत्रे आहेत. यापैकी महत्त्वाची समजली जाणारी सम्मेदशिखरजी, पावापुरी, चंपापुरी, गिरनार आदी तीर्थक्षेत्रे पूर्व व उत्तर भारतात बहुसंख्य असली तरी दक्षिण भारतातही त्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.[५]

जैन धर्मियांची तीर्थक्षेत्रे मुख्यतः डोंगरावर अगर अत्यंत निसर्गरम्य, एकांत जागी असतात. या तीर्थक्षेत्राचे रक्षण व तेथे येणा-या यात्रेकरूंना प्रवाशांच्या निवासाच्या सोयी उपलब्ध करुन देणे हे त्या त्या भागातील जैन श्रावकांचे आवश्यक कर्तव्य समजले जाते. प्रत्येक तीर्थक्षेत्रातील स्थानिक कमिटी आपल्या भागातील तीर्थक्षेत्रांची देखभाल व संरक्षण त्या त्या प्रांतातील जैन समाजाच्या, संघटनेच्या सहाय्याने करतात.[६]

महाराष्ट्र राज्यात जैन तीर्थक्षेत्रांची संख्या चौतीस असून त्यात मांगी-तुंगी, कुंथलगिरी, गजपंथ, मुक्तागिरी, बाहुबली, वेरुळ इत्यादी तीर्थक्षेत्रे प्रसिद्ध आहेत. आज महाराष्ट्रात जैन धर्मियांची संख्या पंधरा लाख असून महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रे संपन्न दिसतात.[७] या प्रत्येक तीर्थक्षेत्राचे सिद्धक्षेत्र, कल्याणकक्षेत्र, अतिशयक्षेत्र आणि कलाक्षेत्र अशी वैशिष्ट्ये असल्यामुळे ती जैन व जैनेतरांमध्ये आकर्षणाचे, पर्यटनाचे केंद्रे बनली आहेत.[८]

सिद्धक्षेत्र म्हणजे ज्या ठिकाणी तीर्थंकरांचे, जैन मुनीचे निर्वाण झाले असे ठिकाण होय. कल्याणकक्षेत्र म्हणजे ज्या ठिकाणी तीर्थंकरांचे पाच कल्याणक घडले आहेत असे क्षेत्र होय तर अतिशयक्षेत्र म्हणजे ज्या ठिकाणी जैन धर्माची संस्कृती आणि परंपरा टिकविण्याचा प्रयत्न झाला आहे तेथील मंदिर व मूलनायकाची मूर्ती प्राचीन आहे तेथे जैन मुनींचा सहवास लाभलेला आहे त्या क्षेत्रावर अतिशय (चमत्कार) घडलेले आहेत ते क्षेत्र होय. कलाक्षेत्र म्हणजे ज्या ठिकाणी जैन धर्माच्या परंपरा, संस्कृतीच्या आधारे शिल्प, स्थाप‌त्य उभारलेले क्षेत्र होय.[९]

भारतात एकूण २३२ जैन तीर्थक्षेत्रे आहेत[१०] त्यापैकी एकूण चौतीस जैन तीर्थक्षेत्रे महाराष्ट्रात आहेत. यात सिद्धक्षेत्रे पाच व अतिशयक्षेत्रे चोवीस आहेत तर कलाक्षेत्र पाच आहेत. परंतु महाराष्ट्रात कल्याणकक्षेत्र आढळत नाही.[११] ही तीर्थक्षेत्रे धर्माचा प्रचार व प्रसार करणारी स्थळे आहेत. या सर्व तीर्थक्षेत्रांच्या ऐतिहासिक आढाव्यातून तीर्थक्षेत्रांचा उदय, तीर्थंकरांची तपश्चर्या, चिंतन, मार्गदर्शन यातून या ठिकाणी झालेला धर्मप्रचार व प्रसार, जैन मूर्तीकला, मंदिर कला, स्थापत्यकला, पूजाविधी, उत्सव, विविध राजांनी दिलेला राजाश्रय आणि इतर धर्मीयांनी केलेले सहकार्य याची कल्पना येते.

आज प्रत्येक देशात पर्यटन क्षेत्रांचा शोध घेऊन त्या विषयाची माहिती संकलित करुन त्या क्षेत्रांचा विकास करण्याचे प्रयत्न जोरकसपणे सुरु आहेत.

कारण पर्यटन आता गरजेची बाब आहे. त्यापासून आनंद मिळतो तर ताण दूर होतो त्याशिवाय पर्यटनच आपल्या प्राचीन कला-कौशल्ये व संस्कृतीची संजीवनी आहे. पर्यटनानेच आपल्या देशाच्या सांस्कृतिक ठेव्याला एक नवा अर्थ व कलाकारांना जिद्द दिली आहे. पर्यटक आपला २५ टक्के खर्च हस्तकलेच्या वस्तू खरेदी करण्यासाठी करतात. त्यामुळे हस्तकलेवर आधारित लघु उद्योगांना पाठबळ मिळते. कारागिरांना त्यांचे हस्तकौशल्य दाखविण्यास संधी मिळून बेरोजगारी कमी होते. याचमुळे भारतात सुद्धा पर्यटन विकासाला गती मिळाली आहे. कारण भारतातील धार्मिक, सांस्कृतिक ठिकाणे संपूर्ण जगातील मानवाला आपल्याकडे आकर्षित करत आहे. भारतात अनेक सांस्कृतिक पर्यटन स्थळे आहेत. ज्याचे भ्रमण करुन पर्यटक आनंद घेतात, सोबतच धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक माहिती सुद्धा मिळवतात. ऐतिहासिकतेच्या दृष्टिने भारत विश्वातील प्राचीन देशापैकी एक आहे.

प्राचीन काळापासूनच भारत आपले प्राकृतिक सौंदर्य विभिन्नता सोबतच सांस्कृतिक परंपरा, अनेक धर्म, ऐतिहासिक स्थळे इत्यादीमुळे देशी, विदेशी पर्यटकांचे आकर्षण केंद्र राहिला आहे. भारताच्या उत्तरेला हिमालय तर दक्षिणेला समुद्र आहे. येथे नद्या, वास्तू, लेण्या, मंदिरे, मस्जिद, चर्च, गुरुद्वारा, स्तूप, बागा, तीर्थक्षेत्रे, धर्मपीठे, किल्ले अशी वैशिष्ट्ये आहेत.

म्हणूनच पर्यटन या विषयीची चर्चा भारतीय सामाजिकशास्त्रात सुरु आहे. पर्यटन क्षेत्राचा विकास करुन भारतीय संस्कृती, धर्म, तत्वज्ञान याची जगाला ओळख सांगण्याचा प्रयत्न सुरु आहे. यातूनच महाराष्ट्रातील पर्यटन स्थळांचा विकास करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या पर्यटन विकास महामंडळाने संपूर्ण राज्याच्या पर्यटनाचा विकास आराखडा तयार करण्याचे काम हाती घेतले आहे. महामंडळाने यापूर्वीच समुद्र किना-यावरील बत्तीस जागांची निवड करुन ठेवली आहे. राज्यातील प्रेक्षणिय स्थळे, धार्मिक स्थळे, थंड हवेची स्थळे, वन्यप्राणी असलेली स्थळे इत्यादी पर्यटनाचे आकर्षण होऊ

शकणा-या जागा निश्चित केल्या आहेत. महाराष्ट्रातील अजिंठा, वेरुळ येथील जगप्रसिद्ध लेणी, लोणावळा, माथेरान, पाचगणी, महाबळेश्वर ही थंड हवेची ठिकाणे, वज्रेश्वरी, राजापूर येथील गरम पाण्याचे झरे, खंडाळा-लोणावळा, सौताडा, दादरा व कोपरा, तिवरे, धारेश्वर येथील पाण्याचे धबधबे, किल्ले आणि कुंभोज (बाहुबली), कुंथलगिरी, त्र्यंबकेश्वर, पैठण, पंढरपूर, शिर्डी, तुळजापूर, जेजुरी, निरा-नरसिंगपूर, नेवासा, आळंदी, देहू, अक्कलकोट आदी महत्त्वाची धार्मिक स्थळे यामुळे महाराष्ट्र पर्यटनाच्या दृष्टिने चौफेर समृद्ध असून, आधुनिक पर्यटनांची संख्या वाढत असल्याने आता महाराष्ट्र पर्यटनाच्या क्षेत्रात अव्वल झाला आहे. परंतु महाराष्ट्रात वेरुळ, अजिंठा यासारखी ठिकाणे पर्यटन क्षेत्रे म्हणून पुढे आली. या तुलनेत इतर जैन तीर्थक्षेत्रे दुर्लक्षित झाली. या तीर्थक्षेत्रांची सविस्तर माहिती घेणे, त्यांची वैशिष्ट्ये प्रकाशात आणणे हे माझ्या संशोधनाचे उद्दिष्ट आहे. यामुळे पर्यटन क्षेत्र विकासाला चालना मिळण्यासाठी हा अभ्यास महत्त्वाचा वाटतो.

आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरणांमुळे आजचा मानव यंत्रवत झाला आहे. या प्रगतीमुळे मानवी जीवन मूल्यांचा संकोच सुरु झाला आहे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे शस्त्रास्त्र स्पर्धेतून निर्माण झालेल्या तणाव आणि हिंसेला उत्तर म्हणून जैन धर्माच्या तत्वज्ञानाकडे पाहता येते. यासाठीच ‘अहिंसा परमोधर्म’ अशी मानवी मूल्यांची शिकवण देणा-या जैन धर्माची ओळख या संशोधनातून करणे ही वर्तमानकालीन गरज वाटते.

- **विषयाची निवड :-**

संशोधन प्रक्रियेतील पहिली पायरी म्हणजे विषय निवडणे होय. संशोधकाला कोणत्या विषयाचे संशोधन करावयाचे आहे हे निश्चित करावे लागते. आपल्या अभ्यासाचे क्षेत्र आणि संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या विषय क्षेत्राची वैशिष्ट्ये संशोधनात रुपांतर करावे लागते.

प्रथम दर्शनी संशोधन विषय निवडणे सोपे कार्य वाटते, परंतु प्रत्यक्षात जेंव्हा संशोधक विषय निवडतो, तेव्हा विषयाची निवड हीच संशोधकाला एक आव्हान वाटते. संशोधनासाठी संशोधनकर्त्याने निवडलेले संशोधन क्षेत्र का निवडले हे अर्थातच संशोधन कार्याच्या रुचीच्या अनुषंगानेच समजू शकते.

संशोधनाचा विषय मांडताना संशोधन विषयाच्या कोणत्या पैलूंना महत्त्व द्यायचे हे संशोधकाला निश्चित करावे लागते. आपल्या संशोधनाची दिशा निश्चित करावी लागते. एकदा विषय व दिशा निश्चित झाली की त्यासंबंधी असणा-या उपविषयांवर लक्ष केंद्रीत करावे लागते. संशोधन मांडणी करणे म्हणजे निवडलेल्या विषयाची संशोधनक्षम मांडणी करणे होय.

सदर संशोधन हे महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांच्या संबंधित असल्याने ''महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा ऐतिहासिक आढावा'' असे संशोधन विषयाची निवड करत आहे.

यातून संशोधनातील अध्ययन विश्व, अध्ययन पद्‌धती व अध्ययनांच्या उद्दिष्टांना अभावितपणे स्पर्श होतो.

- **संशोधनाची उद्दिष्ट्ये** :-

प्रत्येक संशोधनाची सुरुवात एखादा प्रश्न सोडविण्यासाठी किंवा एखाद्या समस्येचे निराकरण करण्यासाठी होत असते. का, कसे, कधी, कुठे, कुणी, केंव्हा, कशास यापैकी एका प्रश्नांने संशोधनाची सुरुवात केली जाते व अन्य प्रश्न त्याचे उपप्रश्न बनून विषयवस्तूचे समग्र, सखोल व सूक्ष्म अध्ययन केले जाते.

महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा ऐतिहासिक आढावा घेताना पुढील उद्दिष्ट्ये समोर ठेवली आहेत.

१. जैन धर्माची प्राचीनता व त्याचे स्वरुप समजून घेणे.

२. जैन तीर्थक्षेत्रांची ठळक वैशिष्ट्ये अधोरेखित करणे.

३. धर्मप्रचार व प्रसारातील तीर्थस्थळांचे महत्त्व सांगणे.

४. पर्यटनाची क्षेत्रे म्हणून जैन तीर्थक्षेत्रांचा अभ्यास करणे.

५. पर्यटनाच्या दृष्टीकोनातून जैन तीर्थक्षेत्रांचा सामाजिक जीवनावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

६. जैन तीर्थक्षेत्रांमुळे आर्थिक परिस्थितीत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

- **<u>संशोधनाची व्याप्ती</u>** :-

कोणतेही संशोधन हे विशिष्ट अनुभवाद्वारे समग्र विषयाचे सामान्यीकरण करीत असते. त्यामुळे संशोधक, संशोधन विषय, कालखंड या विषयीच्या मर्यादा संशोधनावर पडत असतात. सत्यान्वेषण हे संशोधनाचे उद्दिष्ट आहे म्हणून संशोधकाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा अभ्यास करताना संशोधनाला अनेक मर्यादा पडतात.

- जैन धर्म आणि धर्मानुयायी हे भारतभर दिसत असले तरी माझा संशोधन विषय फक्त महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांवर प्रकाश टाकतो.
- जैन तीर्थक्षेत्रांच्या कालखंडाविषयी कोणताही ऐतिहासिक पुरावा त्या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी आढळून येत नाही.
- या संशोधनाचे स्वरुप विश्लेषणात्मक नसून ते केवळ वर्णनात्मक आहे.

- **<u>संशोधनाचे महत्त्व</u>** :-

महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा ऐतिहासिक आढावा घेताना या संशोधनाचे महत्त्व पुढील प्रमाणे सांगता येते.

- या संशोधनामुळे महाराष्ट्रामध्ये जैन धर्माचे अस्तित्व प्राचीन काळापासून होते हे सिद्ध होईल.
- येथील कोणकोणत्या राजांनी जैन धर्मास राजाश्रय दिला होता याची माहिती मिळेल.

- महाराष्ट्रातील जैन धर्माचे उपासक यांची माहिती पुढे येईल.
- महाराष्ट्राच्या इतिहास लेखनात या संशोधनातून भर पडेल.
- महाराष्ट्राच्या जैन तीर्थक्षेत्रांसंदर्भात नाविन्यपूर्ण गोष्टी समोर येण्यास मदत होईल.

- **<u>संशोधनाची गृहितके</u> :-**

संशोधनाची गृहितके पुढील प्रमाणे स्पष्ट होते.

१) महाराष्ट्राला धार्मिक वारसा लाभल्याचे दिसून येते.

२) महाराष्ट्रावर इतर धर्माप्रमाणेच जैन धर्माचाही प्रभाव आहे.

३) जैन तीर्थक्षेत्रांमधून जैन संस्कृतीची ओळख पटते.

४) जैन तीर्थक्षेत्रांमधून जैन शिल्पकला, मूर्तीकला, मंदिरकलेची माहिती मिळते.

५) प्रत्येक जैन तीर्थक्षेत्रे आपली विशिष्ट ओळख स्पष्ट करते.

- **<u>संशोधन पद्धती</u> :-**

प्रस्तुत संशोधनाचा हेतु साध्य करण्यासाठी आणि दिलेली गृहितके सिद्ध करण्यासाठी येथे ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. विशेषतः लिखित व अलिखित साधनांचा आधार घेऊन संशोधन केले आहे. प्राथमिक साधनांमध्ये समावेश असलेल्या प्रत्येक घटकाला प्रत्यक्ष भेट देऊन माहितीचे संकलन केले आहे. यामध्ये जैन मंदिरे, तीर्थक्षेत्रे, लेण्या येथील शिलालेख, मंदिरातील, तीर्थक्षेत्रातील प्रमुख व्यक्तींचा समावेश आहे. त्याचबरोबर दुय्यम माहितीच्या साधनांमध्ये समावेश असलेल्या दंतकथा, लोककथा, तीर्थक्षेत्रांचे स्थानिक धार्मिक पुस्तके, मासिके इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

- **<u>तथ्य संकलन</u> :-**

प्रस्तुत संशोधनासाठी या अभ्यास विषयाशी संबंधित प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आला आहे.

(अ) <u>प्राथमिक साधने</u> :-

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, औरंगाबाद, परभणी, बीड, उस्मानाबाद, नागपूर, अमरावती, वर्धा, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, जळगाव, मुंबई इत्यादी जिल्ह्यांचे गॅझेटिअर, प्रत्यक्ष मुलाखतीतून मिळालेली माहिती, तीर्थक्षेत्रांवर आढळलेले शिलालेख, ताम्रपट, लेणी, तीर्थक्षेत्रावरील मंदिरे, जैन मूर्ती, तीर्थक्षेत्राच्या ट्रस्टींकडे असलेली कागदपत्रे इत्यादी.

(ब) <u>दुय्यम साधने</u> :-

तीर्थक्षेत्री प्रकाशित केलेली पुस्तके, साहित्य, अहवाल, लेख, चरित्रे, तीर्थक्षेत्राविषयी असलेली सामाजिक दंतकथा, आख्यायिका इत्यादी.

- **<u>साहित्याचे पुनर्विलोकन</u> :-**

जैन धर्मावर अनेक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. मात्र ब-याचशा ग्रंथातून जैन धर्माच्या कथा, जैन धर्म तत्वज्ञान, जैन धर्माच्या इतिहासाची सविस्तरपणे मांडणी केली आहे.  परंतु काही ग्रंथातून जैन धर्माच्या तीर्थक्षेत्रांचा कमी-अधिक प्रमाणातच माहिती मिळते. त्यातही सर्वच तीर्थक्षेत्रांची माहिती मिळत नाही, महत्त्वाचीच तीर्थक्षेत्रांची माहिती मिळते. यावरुन महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा सविस्तर अभ्यास झालेला नाही, असे दिसून येते. त्यातील काही ग्रंथाचे पुनर्विलोकन प्रस्तुत अभ्यासासाठी करण्यात आले आहे.

पंडिता सुश्री सुमतीभून शहा (१९८५) यांनी आपल्या पूर्णार्घ्य या जैन ज्ञानकोशात जैन धर्माची सखोल माहिती दिलेली आहे. जैन धर्माचा इतिहास, जैन धर्माचे मंत्र, जैन धर्माचे योगदान, जैन कला-स्थापत्याची ओळख, जैन संस्कृतीची सविस्तर माहिती स्पष्ट केलेली आहे. तीर्थक्षेत्राचे वर्णन थोडक्या स्वरुपात दिलेले आहे.

संगवे विलास (१९७३) यांनी आपल्या जैन धर्मावर आधारित बरेच ग्रंथ लिहिले आहेत. त्यातून जैन धर्म, संस्कृती यांचे बारकावे समजतात. जैन परंपरा व जैन धर्माचा प्रभाव समजतो. सोबतच जैन धर्माच्या सामाजिक जीवनाची माहिती सांगितलेली आहे.

मगदूम आप्पाभाऊ (१९४०) यांनी लिहिलेल्या जैन धर्माची ओळख या ग्रंथातून जैन तत्वज्ञान, जैन जीवन पद्धती, जैन इतिहास, जैन धर्माची प्राचीनता सांगितलेली आहे.

अन्नदाते श्रेणिक (२००२) यांनी आपल्या जैन ऐतिहासिक या ग्रंथात जैन वास्तुशिल्प, जैन धर्मस्थळे, जैन समाज, जैन केंद्रस्थाने यांची माहिती सांगितलेले आहे. महाराष्ट्रातील जैन समाजाची वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत.

कुलभूषण (१९६८) यांनी आपल्या जैन स्त्रोत साहित्य के आलोचनात्मक अध्ययन या ग्रंथात जैन स्त्रोत साहित्य, जैन देवता, जैन भक्ती स्पष्ट केली आहे. दक्षिण भारतातील काही तीर्थक्षेत्रांची माहिती यात दिलेली आहे.

पाटील पद्मजा (२०१०) यांच्या Splendour of Jainism in Southern India या ग्रंथात मध्यकालीन जैन धर्म, दक्षिण भारतातील जैन धर्म, जैन धर्माचे प्रमुख व्यक्ती, महाराष्ट्रातील महत्त्वाची स्थळे यांचा अभ्यास आलेला आहे.

अशा प्रकारे वरील ग्रंथात जैन धर्मातील विविध घटकांची माहिती दिली असले तरी महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांची ऐतिहासिक माहिती सांगणारे ग्रंथलेखन झाले नाही. विशेषतः महाराष्ट्रातील जैन तीक्षेत्रावर एकत्रितरित्या संशोधन झाले पाहिजे. यावर सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. म्हणून संशोधनात महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्राचा ऐतिहासिक माहितीचा समावेश केला आहे.

- **<u>प्रकरण योजना</u> :-**

प्रस्तुत अभ्यासासाठी एकूण पाच प्रकरणात विभागणी केलेली आहे. अभ्यासातील मुख्य प्रकरण आणि त्या अंतर्गत केलेल्या संशोधनाचा थोडक्यात आढावा खालील प्रमाणे आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना, संशोधन आराखडा सांगितलेला आहे. त्यात संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधन मर्यादा, संशोधनाचे महत्त्व, तथ्य संकलन, संदर्भीय संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन, प्रकरण नियोजन या टप्प्यांची विस्तृत मांडणी केलेली आहे.

दुस-या प्रकरणामध्ये धर्म संकल्पना, जैन धर्माचा उदय, जैन धर्माचे स्वरुप, जैन धर्माचा विकास, जैन धर्माची प्राचीनता, जैन धर्माचे योगदान इत्यादींची विस्तृत मांडणी केलेली आहे.

तिस-या प्रकरणात महाराष्ट्राची प्रादेशिक माहिती सांगून थोडक्यात इतिहास मांडलेला आहे. त्यानंतर महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांची संपूर्ण माहिती दिलेली आहे. हा संशोधन विषय असल्याने सर्व तीर्थक्षेत्रांच्या छायाचित्रांचीही मदत घेतलेली आहे. एकूण ३४ तीर्थक्षेत्रांचा या प्रकरणात अभ्यास केलेला आहे. प्रत्येक तीर्थक्षेत्राचे भौगोलिक स्थान, ऐतिहासिकता, मंदिराचे व्यवस्थापन, मंदिरातील पूजाविधी व उत्सव, परिसरातील धार्मिक परिस्थिती, मंदिराविषयीच्या दंतकथा या सर्व मुद्यांच्या आधारे माहिती सांगितलेली आहे.

चौथ्या प्रकरणात भारतातील मंदिर निर्मितीची सुरुवात आणि विकास, मंदिर प्रकार, मंदिराचे प्रमुख भाग, मंदिरातील शिल्पकला या मुद्यांच्या आधारे जैन तीर्थक्षेत्रांच्या वैशिष्ट्यांची मांडणी केलेली आहे.

धार्मिक पर्यटन म्हणून जैन तीर्थक्षेत्रांचे स्थान, जैन तीर्थक्षेत्रांचा लोकजीवनावर पडलेला प्रभाव, पर्यटकांची संख्या, निवास व्यवस्था इत्यादी मुद्यांच्या आधारे माहिती संकलित केलेली आहे.

पाचव्या प्रकरणात महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांचा अभ्यास केल्यानंतर महाराष्ट्रातील जैन धर्माची ऐतिहासिकता स्पष्ट केलेली आहे. संशोधकाने प्राप्त केलेल्या विषय संदर्भातील निष्कर्ष उद्दिष्टानुसार या प्रकरणात मांडलेले आहेत.

वरील प्रमाणे या प्रकरणात जैन धर्म, तीर्थक्षेत्रांविषयीचे थोडक्यात प्रास्ताविक करुन महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांच्या ऐतिहासिक आढाव्यासाठी योजिल्या जाणा-या संशोधन प्रक्रियेचे विवेचन केले आहे.

- **संदर्भ सूची**


१) थापर रोमिला, भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन दिल्ली, २००१, पृ. ५६.

२) डांगे सिंधू, जैन धर्म आणि तत्वज्ञान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २०१३, पृ. ३२.

३) शहा सुमतिबाई, पूर्णार्घ्य, जैन ज्ञानकोश, श्राविकाश्रम प्रकाशन सोलापूर, १९७५, पृ. ७७५.

४) दैनिक लोकसत्ता, रविवार दिनांक २६ जानेवारी २०१४, पृ. ६.

५) पाटील पद्मजा, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, दक्षिण भारत जैन सभा सांगली, २००६, पृ. ४६.

६) तत्रैव, पृ. ४७.

७) दैनिक लोकसत्ता, रविवार दिनांक २६ जानेवारी २०१४, पृ. ६.

८) शहा रजनी, भारतातील दिगंबर जैन तीर्थ (भाग-४), जीवराज ग्रंथमाला प्रकाशन सोलापूर, पृ. ९.

९) जैन बलभद्र, भारत के दिगंबर जैन तीर्थ, भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमेटी मुंबई, १९७८, पृ. १०.

१०) जैन अनुपम, दिगंबर जैन तीर्थ निर्देशिका, समिति प्रकाशन, इंदौर, पृ. ४.

११) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. १०.

# प्रकरण - दुसरे

# जैन धर्म

२.१ धर्म संकल्पना.

२.२ जैन धर्माचा उदय

२.३ जैन धर्माची प्राचीनता

२.४ जैन धर्माचे स्वरूप

- २.४.१ तीर्थंकर
- २.४.२ वर्धमान महावीर
- २.४.३ धर्म संकल्पना आणि पंचव्रत
- २.४.४ ईश्वर संकल्पना
- २.४.५ जैन तत्वज्ञान
- २.४.६ पंथ
- २.४.७ जाती व्यवस्था
- २.४.८ धर्मग्रंथ
- २.४.९ संस्कार
- २.४.१० मुनी परंपरा
- २.४.११ भट्टारक परंपरा
- २.४.१२ श्रावक - श्राविका
- २.४.१३ सल्लेखना
- २.४.१४ जैनव्रत आणि उपवास
- २.४.१५ जैन ध्वज

२.५ जैन धर्माचा प्रसार

२.६ जैन धर्माचे योगदान

- २.६.१. जैन तत्वसिद्धांत
- २.६.२. त्रिरत्ने
- २.६.३. मानवाचे पुनर्मूल्यांकन
- २.६.४. आदर्श मूल्याची शिकवण
- २.६.५. जैन धर्माचा आधुनिक दृष्टिकोन

- संदर्भ ग्रंथ

# प्रकरण - दुसरे

## जैन धर्म

या प्रकरणामध्ये धर्म संकल्पना, जैन धर्माचा उदय, जैन धर्माची प्राचीनता आणि जैन धर्माचे स्वरुप या उपघटकांच्या आधारे जैन धर्माची ओळख करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापूर्वी धर्म म्हणजे काय हे जाणून घेणे आवश्यक ठरते. म्हणून या प्रकरणाची सुरुवात धर्म संकल्पनेने करवून दिलेली आहे.

संपूर्ण जगात विविध धर्माचा उदय झाला आहे. या धर्माचा जागतिक समाज जीवनावर प्रभाव दिसून येतो. धर्माने सांगितलेल्या तत्त्वानुसार ते जीवन जगताना दिसतात. म्हणून धर्म हा मानवाच्या जीवनातील अविभाज्य भाग बनला आहे. भारतात विविध धर्म प्रचलित असून, हिंदू, जैन, बौद्‌ध आणि शीख धर्माचा उदय भारतातच झाला आहे. भारतात धार्मिक संकल्पना या इतक्या अधिक प्रमाणात आढळतात की त्यांनी समाज जीवनाचे सर्व अंग व्यापून टाकले आहे, धर्माव्यतिरिक्त भारत काहीच नाही.[१]

### २.१ धर्म संकल्पना :-

मराठीतील ‘धर्म’ हा शब्द मूळ संस्कृत भाषेतून आला आहे. संस्कृत भाषेत धर्म या शब्दाला अनेक अर्थ आहेत. जसे एखाद्या वस्तूचा किंवा व्यक्तीचा स्वभाव हा तिचा धर्म मानला जातो. एखाद्या माणसाने काय करणे योग्य आहे, त्याचे कर्तव्य काय आहे हा त्याचा धर्म आहे. ज्यामुळे समाजाची धारणा होते, सामाजिक स्थैर्य टिकून राहते अशी नियमावली म्हणजे धर्म होय. ज्यामुळे ऐहिक व पारलौकिक कल्याण होते व शेवटी मोक्षही मिळतो असा जीवन मार्ग म्हणजे धर्म होय[२].

धर्मास इंग्रजीमध्ये रिलिजन (Religion) असे म्हणतात. रिलिजन (Religion) हा इंग्रजी शब्द लॅटिन भाषेतील रिलिजिओ या शब्दापासून तयार झाला आहे. रिलिजिओ हा शब्द लेग (Leg) आणि लिग (Lig) या शब्दापासून

बनला आहे. लेग (Leg) चा अर्थ सोबत मानणे किंवा पालन करणे तर लिग (Lig) चा अर्थ बांधणे असा आहे. या दोन्ही शब्दांचा अर्थ असा आहे की, मानव आणि अलौकिक शक्तिंना एकत्र आणणा-या आवश्यक क्रियांचे संपादन करणे म्हणजे धर्म होय.[३] मानव जीवनात धर्मास खूप महत्त्व असले तरी आजपर्यंत कोणतीच व्यक्ती धर्माची स्पष्ट आणि यथार्थ व्याख्या देऊ शकली नाही. कारण धर्माचे स्वरुप एवढे सरळ वाटत असले तरी निश्‍चित एकच व्याख्या करता येत नाही. धर्माची कोणती तरी एकच व्याख्या करणे कठीण आहे.[४] मानवाला धर्माचे प्रत्यक्ष अनुभव होत असले तरी धर्माचे स्वरुप फार विस्तृत आणि जटिल असले तरी पाश्चात्त्य आणि भारतीय विचारवंतांनी धर्माची व्याख्या करण्याचा प्रयत्न केला आहे.

- पाश्चात्त्य विचारवंतांनी धर्माच्या केलेल्या व्याख्या :-

धर्मास अनंत शक्तीचे दर्शन आणि प्राप्ती मानतात.[५] धर्म म्हणजे आध्यात्मिक शक्तीमध्ये विश्वास होय.[६] धर्म हे योगायोगाने नीतीशास्त्र आहे.[७] धर्म म्हणजे व्यक्तीच्या इच्छांवर आधारित क्रियांवर नियंत्रण आहे.[८] धर्माचा संपूर्ण सार ईश्वरावर अवलंबून असलेल्या भावनांवर आधारित असून धर्म पूर्णतः भावनामय आहे, जे बुद्धी किंवा क्रियांपासून निर्मित असून मनुष्य कशाही पद्धतीने सिद्धांताचे व नीतीनियमांचे पालन केले तरी ते धार्मिक होईल.[९]

- भारतीय विचारवंतांनी धर्माच्या केलेल्या व्याख्या :-

प्रजेची धारणा ज्यामुळे घडते तो धर्म, संपूर्ण समाजाची धारणा ज्यामुळे घडते तो धर्म. ज्या प्रक्रियेच्या ठिकाणी संपूर्ण समाजाचे धारण करण्याची आणि समाजाला एकसंघ ठेवण्याची ज्यांच्यामध्ये ही क्षमता असते त्याला धर्म म्हणतात.[१०]

धर्म या शब्दाचा जेंव्हा आपण व्यावहारिकदृष्ट्या उपयोग करतो तेव्हा समाजाचे धारण व पोषण कशाने होते हे आपण पाहत असतो. म्हणून हा धर्म

सुटला म्हणजे समाजाची बंधने तुटली समजावे आणि समाजाची बंधने तुटली म्हणजे आकर्षण शक्तीखेरीज आकाशातील सुर्यादिक ग्रहमालेची किंवा सुकाणू खेरीज समुद्रावर तारवाची जी स्थिती व्हावयाची तीच समाजाची होत असते.[११]

संपूर्ण समाज घटकांना भौतिक सुख-शांती आणि आत्मज्ञान प्राप्ती होते तो धर्म होय.[१२] धर्म म्हणजे काही चमत्कार जादुटोणा व भीतीदायक अंधश्रद्धा नाही. मनुष्याच्या आध्यात्मिक मार्गातील अडथळे बनणा-या कालबाह्य संकल्पना इत्यादींना कोणीही धर्म म्हणू नये.[१३]

धर्म हा अंधःकारात प्रकाश आहे, विपत्तीरुपी विषाचा नाश करणारा मणी आहे. पडलेल्याला हाता देणार आहे, इच्छेने फल देणारा हा कल्पतरु आहे, जगताचा जय करणारा हा रथ आहे. परलोक प्रवासाची शिदोरी, दुःखरुपी व्याधीचे महाऔषध, भवभयाने भ्रांत झालेल्या अंतःकरणाला आश्वासन, दाह झाला असता चंदनवन आहे म्हणून धर्म हा कायमचा मित्र आहे आणि सज्जनांचा बांधव आहे.[१४]

## २.२ जैन धर्माचा उदय :-

जैन धर्माचा उदय केंव्हा झाला ? जैन धर्माचे संस्थापक कोण? याबाबत निश्चित उत्तर मिळाले नसले तरी इतिहास अभ्यासकाकडून जैन धर्माच्या उदयाबाबत व संस्थापकाबाबत इ.स.पू. सहावे शतक व भगवान महावीर यांच्याकडे पाहिले जाते. परंतु आपल्या धर्माची परंपरा फार प्राचीन आहे असे जैन लोक मानतात. सहाव्या शतकात होऊन गेलेले वर्धमान महावीर हे जैन परंपरेप्रमाणे चोवीसावे तीर्थंकर होत. तत्पूर्वी तेवीस तीर्थंकर होऊन गेले असून त्यापैकी ऋषभनाथ आणि पार्श्वनाथ या दोन तीर्थंकरांना जैन धर्मात महत्त्वाचे स्थान आहे. जैन धर्मात ऋषभनाथांना पहिले तीर्थंकर व जैन धर्माचे संस्थापक मानले जाते. भगवान महावीरांना अनेकजण जैन धर्माचे संस्थापक समजतात पण भगवान महावीर हे जैन धर्माचे संस्थापक नसून ते या धर्माचे प्रबल प्रचारक होते.

जैन धर्माच्या उदया संदर्भात विविध मते आढळतात, जसे भारताची प्रारंभिक अवस्था म्हणजे भोगभूमी होती. त्यावेळी मनुष्य हा पशुसमान वागत होता, पाप-पुण्याची भावनाच नव्हती. त्यामुळे धर्म साधनेची कल्पनाही अस्तित्वात नव्हती. नंतर जे युग सुरु झाले ते म्हणजे कर्मभूमी होय. या युगात चौदा महापुरुष निर्माण झाले त्यांना मनू किंवा कुलकर असे म्हणतात. या कुलकरांनी मनुष्यास त्याची कर्तव्ये शिकविली. वाणिज्य, शिल्प इत्यादी उद्योगधंदे उत्पन्न झाले ते याच युगात. या चौदा मनूंच्या किंवा कुलकरांच्या पश्चात मनुष्यांना धर्माचे उपदेश करणारे व आपल्या चारित्र्याच्या द्वारा बरे - वाईट, सत्य-असत्य यातील विवेक स्पष्ट करणारे असे त्रेसष्ट शलाका पुरुष असेही म्हटले जाते. ते असे-चोवीस तीर्थंकर, बारा चक्रवर्ती, नऊ बलभद्र, नऊ वासुदेव आणि नऊ प्रतिवासुदेव होय. यातील तीर्थंकर फार महत्त्वाचे आहेत. जैन परंपरेनुसार ऋषभनाथांपासून जैन धर्माची उत्पत्ती झाली आहे. वरील स्पष्टीकरणाप्रमाणे जैन धर्माची सुरुवात असंख्य शतकापूर्वीची आहे, असे जैन मानतात व आपला धर्म अनादी आहे असे मानतात.[१५]

इ.स.पू. सहाव्या शतकाच्या काळात भारताच्या पूर्व भागात नैऋत्य बिहारात म्हणजे मगधात फार मोठ्या प्रमाणात बौद्धिक चळवळ चालू होती. त्यावेळी वैदिक धर्माचे अनुयायी ब्राह्मण आणि अवैदिक मते प्रतिपादन करणारे श्रमण असे तत्कालीन मतप्रणालींचे दोन ठळक भेद होते. सामञ्चलफलसुत्तात सहा प्रमुख तीर्थंकरांची नावे देऊन त्यांची मते सांगितलेली आहेत तर ब्रम्हजालसुत्तात भिन्नभिन्न बासष्ट दार्शनिक मतांच्या पंथांची नावे न सांगता त्यांचे पृथःकरण केले आहे. अंगुत्तरनिकाय, मिलिंदपन्ह आणि संयुक्तनिकाय या ग्रंथातही अशा निरनिराळ्या पंथाचा उल्लेख येतो. सुत्तनिपात या ग्रंथात त्रेसष्ट पंथ सांगितले आहेत. सुत्रकृतांग या जैन रचनेत तत्कालीन ३६३ पंथांचा निर्देश येतो. 'ठाणंग' या ग्रंथात श्रमणवर्गाचे पाच विभाग दिलेले आहेत ते म्हणजे - निग्गंध, सक्क, तावस, गेरुय आणि अजीव होय.

'औपपतिक' या ग्रंथात अनेक भिक्षुवर्गाचा उल्लेख आलेला आहे. अशाच पंथातील एक पंथ म्हणजे निर्ग्रंथांचा पंथ म्हणून अस्तित्वात होता. याच पंथात होऊन गेलेल्या व पुढे स्वतंत्र महत्त्व प्राप्त झालेल्या महावीरांना 'जिन' ही उपाधी प्राप्त झाली व हा पंथ जैनाचा पंथ म्हणून ओळखला जाऊ लागला.[१६] 'जिन' म्हणजे जिंकणारा त्यापासून जैन शब्द आला असा उल्लेख आढळतो.

जैन मत तेव्हापासून प्रचलित झाले जेंव्हा या संसारात सृष्टीची सुरुवात झाली होती. जैन धर्म वेदांत आदी दर्शन या पूर्वीचे आहे.[१७] आर्याच्या भारत आगमनापूर्वी भारतात जो द्रविड सभ्यतेचा प्रसार होत होती ती वास्तविक जैन सभ्यता होती. जैन समाजामध्ये आज सुद्धा द्रविड संघ या नावाचे एक वेगळे धार्मिक आयाम मिळते.[१८] भगवान महावीर जैन धर्माचे प्रवर्तक होऊन गेले, त्याप्रमाणे भगवान पार्श्वनाथ ही ऐतिहासिक व्यक्ती होऊन गेली. त्यांनी जैन धर्माचा प्रभावी प्रचार-प्रसार केला होता. हे सिद्ध झाल्याने साहजिकच जैन धर्माचा उदय इ. स. पूर्व आठव्या शतकापर्यंत नेण्यास मान्यता मिळाली आहे.[१९]

जैन धर्म अनादी आहे, चोवीस तीर्थंकरांमध्ये महावीर हे अंतिम तीर्थंकर होते. यांनी जैन धर्मास पुन्हा प्रकाशमान केले आणि अहिंसा धर्म व्यापक झाला. यातूनही जैन धर्माचा उदय केंव्हा झाला असेल हे समजण्यास मदत होते.[२०]

फार मोठ्या सन्माननीय अतिप्राचीनतेचा जैन दावा करीत असले तरी तेवीसावे तीर्थंकरांच्या अगोदरच्या तीर्थंकरांबाबत निःसंशय स्वरुपाच्या ऐतिहासिक पुरावा प्रतिपादन केलेला नाही. पार्श्वनाथ आणि महावीर हे तेवीसावे आणि चोवीसावे तीर्थंकर मात्र ऐतिहासिक व्यक्ती असल्याचे सिद्ध झाले आहे.[२१]

## २.३ <u>जैन धर्माची प्राचीनता</u> :-

जैन धर्म हा भारतातील प्राचीन धर्मापैकी एक आहे. सर्वांची समजूत अशी होती की, जैन धर्म हा इ.स.पू. सहाव्या शतकात वर्धमान महावीरांनी स्थापन केलेला असून तेव्हापासून आजपर्यंत तो कमी-अधिक प्रमाणात भारतात

अस्तित्वात आहे. परंतु वर्धमान महावीरांच्या पूर्वीही जैन धर्म प्रचलित होता ही वस्तुस्थिती सर्वांना माहीत नव्हती. कारण या वस्तुस्थितीचा पूरक असा सबळ ऐतिहासिक पुरावा त्यावेळी उपलब्ध नव्हता. कालांतराने विद्वान, प्राच्यविद्या संशोधकाकडून व इतिहासकारांकडून जैन धर्माचा सखोल अभ्यास होऊ लागला आहे. यामुळे जैन धर्माच्या प्राचीन इतिहासाबद्दल वेगवेगळी माहिती उपलब्ध होऊ लागली. जैन धर्माची तत्त्वप्रणाली व आचार-परंपरा काही प्रमाणात बौद्ध धर्माशी जुळणारी असल्याने जैन धर्म हा बौद्ध धर्माचीच एक शाखा आहे, अशी जी सर्वांची कल्पना होती ती या नवीन संशोधनाने दूर केली गेली. ज्याप्रमाणे जैन धर्म हा बौद्ध धर्माचा भाग नाही त्याप्रमाणे तो हिंदू धर्माचाही भाग नाही, हे या संशोधकांनी साधार दाखवून दिले आहे.

हडप्पा आणि मोहोंजोदडो येथील उत्खननात असे आढळून येते की, पुरुष देवतांच्या केलेल्या मातीच्या मूर्ती फारच कमी व ज्या आहेत त्या संपूर्ण नग्न आहेत. काहींच्या गळयात माळा व हातात कंकणे दिसतात. पण या वस्तू असतातच असे नाही असे का असावे याचे कारण समजण्यास कठीण आहे.[२२]

सर जॉन मार्शल यांनी लिहिलेल्या ''Mohenjo daro and the indus civilazation'' या ग्रंथात तिस-या खंडातील ११८ व्या चित्रपृष्ठावर दिलेली बी. ४२६ या नंबरच्या मुद्रेचे चित्र पाहिले तर त्यात सहा नग्न पुरुषांच्या उभ्या आकृत्या कोरलेल्या आहेत. यातील प्रत्येक आकृती दोन्ही पाय जवळ ठेवून दोन्ही हात अंगाजवळ ताठ ठेवून नग्न अवस्थेत ध्यानमग्न स्थितीत उभी असलेली आहे आणि हे सर्वश्रुत आहे की, वरील प्रमाणे उभे राहून ध्यान करण्याची पद्धत जैनांचीच असून तिला कायोत्सर्ग स्थिती असे म्हणतात. म्हणजेच या मूर्ती जैन तीर्थंकरांच्याच आकृती असाव्यात. तसेच इ.स.पू. तीन हजार वर्षे देखील जैन धर्माचे अस्तित्व होते असे मानण्यास हरकत नाही.[२३]

सिंधू खो-यातील अनेक शिक्क्यांवर कोरलेल्या योग मुद्रेतील देवमूर्ती व उभ्या देवमूर्ती कायोत्सर्ग मुद्रा प्रदर्शित करतात. कायोत्सर्ग मुद्रा खास करुन जैन

मुद्रा आहे, ही मुद्रा बसलेली नसून उभी आहे. 'आदिपुराण' च्या अठराव्या अध्यायात जिनांमध्ये प्रथम जिन ऋषभ किंवा वृषभ यांच्या तपश्चर्येच्या संबंधी कायोत्सर्ग मुद्रेचे वर्णन केले आहे.

मथुरा येथील कर्झन म्युझियम ऑफ ऑर्कियॉलॉजीमध्ये सुरक्षित अशा एका दगडी फलकावर कोरलेल्या चार मूर्तीपैकी एक ऋषभ जिनाची उभी मूर्ती कायोत्सर्ग मुद्रेत आहे. ही इ.स.च्या दुस-या शतकातील आहे. इजिप्त व ग्रीसमधील सुरुवातीच्या राजवंशाच्या काळातील शिल्पाकृतीमध्ये सुद्धा दोन्ही बाजूंना हात खाली जोडून उभ्या अशा काही मूर्ती सापडल्या आहेत. जरी या त्याच मुद्रेत असल्या तरी सिंधू खो-यातील कायोत्सर्ग मुद्रेत आढळणारी देहोत्सर्गता त्यात आढळत नाही.[२४]

जैन धर्माचा सिंधू संस्कृतीशी लावलेला संबंध या मताप्रमाणे मोहो-जो-दाडो येथील उत्खननात सापडलेल्या विविध मृतिका मुद्रा जैन लोकांनीच निर्माण केल्या होत्या. तेथील काही मृतिका मुद्रांत आढळणारी योगासनची स्थिती जैन धर्मीयांच्या कल्पनेवरुन घेतली गेली. तेथील काही मृतिका मुद्रांत आढळणारे स्वस्तिक हे चिन्ह जैनामध्ये सापडते. हे चिन्ह जैन तीर्थंकर सुपार्श्व यांचे चिन्ह आहे तर स्वस्तिकाचा मधला भाग आठव्या तीर्थंकरांचे चिन्ह होते असे आचार्य तुलसी यांनी मत मांडले आहे. तसेच सी. आर. जैन आणि डॉ. विलास संगवे यांनी सुद्धा मोहो-जो-दाडो येथील मृतिका मुद्रिकेत आढळणारा नग्न योगी हे आद्य तीर्थंकर ऋषभनाथ होत, असे मत मांडले आहे. परंतु आतापर्यंत मोहोंजोदडो येथील मृतिका मुद्रांचीच योग्य छाननी विषयी, चित्रांविषयी, लिपीविषयी विद्वानांमध्ये एकमत झाले नाही. तसेच तेथील काही मृतिका मुद्रांचाच विचार आचार्य तुलसी यांनी केला. इतर (उदा. बलिचित्र, मुद्रा क्रमांक ४३०) मुद्रांचा उल्लेख केला नाही. स्वस्तिक किंवा अधिक चिन्ह ही सुर्य प्रतिके असून ती इतर देशातही आढळतात. तेव्हा थोड्याशा साम्यावरुन असे निष्कर्ष काढणे योग्य वाटत नाही.[२५]

श्रमण संस्कृती अत्यंत प्राचीन आहे, यती व श्रमण हे शब्द ऋग्वेदात सुद्धा आढळतात. जैनांचे प्राचीन नाव श्रमणच आहे, तैतरिय अरण्यकात सुद्धा श्रमणांचा उल्लेख आहे, भागवत पुराणात देखील यांचा उल्लेख आहे. मुख्यतः 'मुनी' हा शब्द जरी वैदिक साहित्यात 'ऋषी' शब्दाचा पर्यायवाची मानला गेला असला तरी मुख्यतः तो जैन श्रमणासाठी वापरला जाणारा शब्द आहे. विद्वानांत एक गोष्ट सर्वमान्य आहे की, वेद बनत असतानाच वेदाशी असहमत विचारधारा आपले अस्तित्व टिकवून होती. ज्यांचा वेदवाङ्मयात ओझरता उल्लेख सापडतो अशी बरीच जैन तत्त्वेही आहेत. त्याबरोबरच ऋग्वेदात मुनीना 'आर्हण' संज्ञा आहे आणि अथर्ववेदात ती 'अर्हत' संज्ञा झाली, हाच शब्द जैनांच्या धर्मोपदेशकाची जाणीव करुन देणारा आहे. जैनांनी अरिहंत शब्द वापरला आहे तो याच 'अर्हत' शब्दाचे रुपांतर असावा. अथर्ववेदातील व्रात्यखंडात तपोनिष्ठ विद्वान व्रात्य जो ब्राह्मणेत्तर विद्वान होता तो वैदिक देवतांपेक्षा श्रेष्ठ होता अशी चर्चा आली आहे. त्याने जगातील चार देश निस्तेज करुन टाकले होते. या अद्भूत कथेत आर्येत्तर व्यक्तीचे श्रेष्ठत्व मान्य केलेले आहे.[२६] या चर्चेतून जैन धर्माच्या प्राचीनतेविषयी विविध संदर्भ मिळतात. याआधारे जैन धर्माचे प्राचीनत्व सिध्द करण्यास मदत होते, तर जैन धर्माच्या अभ्यासकाला या सर्व संदर्भाच्या आधारे जैन धर्माच्या प्राचीनतेविषयी संशोधना करण्यास हे निश्चितच महत्त्वपूर्ण घटक ठरतील.

भागवत, हरिवंश, वायु, शिव, प्रभास या पुराणामध्ये आणि अथर्ववेद, मनुस्मृती आणि महाभारत यातील श्लोकात आणि जैन ग्रंथातील आदिनाथांचे वर्णन मिळते-जुळते आहे, यासाठी काही संदर्भ अशी घेता येतील.

नभिरसों ऋषभ आप्त सुदेव सुनू : ।
या वै चचार समद्ग योगचर्याम् यत्पारहस्यमृषय : पद्मामनयति
स्वस्थः प्रकाशान्तकरण परित्यक्रसङ् : ।।

योग मार्गाचे आदिप्रवर्तक आणि धर्माचे आदि उपदेशक भगवान आदिनाथ होते, त्यांनीच जैन धर्माची सुरुवात केली.[२७]

दर्शयन् वर्त्म वीराणां, सुरा सुरनमस्कृत ।
नीतित्रयस्य कर्ता यो, युगादो प्रथमो.. जिन ।।

वीर पुरुषांना धर्म, अर्थ, काम या पुरुषार्थाचे मार्ग दाखविणारे सुर-असुरांना पूजनीय युगाच्या सुरुवातीस प्रथम जिन होते.[२८]

नाभिसत्व - जन यत्पुत्रं मरुदेया महाधूतिम ।
ऋषभ पार्थिव श्रेष्ठ सर्वसत्रयस्य पूर्वजम् ।।

नाभिराज यांनी मरुदेवी यांच्यापासून महाकांतीमान पुत्र वृषभ उत्पन्न केले. वृषभ सर्व क्षत्रियांचे पूर्वज होते.[२९]

इत्थ प्रभव क्रभव ऋषभे .. वतार शिवस्य मे ।
सतांगतिर्दीन बन्धुर्नवाय : कभितस्त्व : ।।

शिव म्हणतात की, ऋषभ माझेच अवतार आहेत, ते दीनांचे बंधू आहेत आणि सत्पुरुषांची सार्थकता त्यांच्याकडून होते.[३०]

कैलाशे विपुल रम्ये वृषभ्ये .... यं जिनेश्वर : ।
चकार स्वावतारचं सर्वज्ञ : सर्वग : शिव : ।।

विशाल रमणीय कैलास पर्वतावर सर्वज्ञ सर्वव्यापी शिवरुप भगवान ऋषभ जिनेश्वर अवतरले.[३१]

अंहोमचं ऋषभं यज्ञियाना, विराजतं, प्रथम मघ्वराणाम् ।
अपांनपातमश्विना हु वे धिय इन्द्रिय इंन्द्रिय दत्तामोज ।।

सर्व पापांपासून मुक्त, व्रतामध्ये सामावलेले, आदित्यस्वरुप ऋषभनाथ आहेत.[३२]

अष्टषहितु तीर्थषु यात्रायां सत्फलं भवेत ।
श्री आदिनाथ देवस्य स्मरणेनपि तद्‌भवेत् ।।

अडसष्ट तीर्थयात्रेने जे फळ मिळते तेवढे आदिनाथांच्या स्मरणाने मिळेल. आदिनाथ हे ऋषभनाथाचेच दुसरे नाव आहे.[३३]

पुनस्तत्रैव सर्वज्ञ सर्वदेवनमस्कृत ।

छत्रयातिसंयुक्त : पुज्यमूर्तिरसो वहन्

परसमात्मानयात्मानं लसत्केतल निर्मलम्

निरुजनं निरकारं वृषभं तु महेद वृषभ ।।

ऋषभनाथ सर्वज्ञ होते, सर्व देवांपेक्षा नमस्कृत होते, तीन छत्र यांनी ते शोभायमान होते, निर्मल, केवल ज्ञान यांनी शोभणारे परमात्मा निरजत, निराकार श्रेष्ठ वृषभ यांची पूजा करायला पाहिजे.[३४]

प्राचीन भारताच्या इतिहासातील चंद्रगुप्त मौर्य, सम्प्रती, सम्राट अशोक, अजातशत्रु, नंदिवर्धन, खारवेल, कनिष्क, हुविष्क, सेऊणचंद्र II, भोज II, रट्टराज, कार्तवीर्य, गण्डरादित्य, राष्ट्रकुट राजे, सातवाहन राजे यांनी जैन धर्मास सहकार्य दिले असे दिसून येते.[३५]

'सरमनाई' हा शब्द मॅगेस्थनिजच्या प्रवास वर्णनात येतो, तो लिहितो, भारतीयांचे दोन संप्रदाय आहेत-एक सरमनाई (SARMANAI) म्हणून ओळखला जातो आणि दुसरा ब्राचमनाई (BRACHMANAI) या नावाने ओळखला जातो. सरमनाईच्या अंतर्गत 'हाइलोब्योह' म्हणविणा-या तत्वज्ञाचा समावेश होतो. ते नगरात व घरात राहत नाहीत ते झाडांच्या सालीपासून आपला बिछाना तयार करतात आणि पाणी आपल्या हातांनी तोंडापर्यंत नेऊन पितात ते ना विवाह करतात ना संतानोत्पत्ती.[३६]

अशा विविध प्राचीन ग्रंथातील संदर्भाच्या आधारे जैन धर्माची प्राचीनता सिद्ध करण्याचा प्रयत्न अनेक संशोधक करतात. या संदर्भातील काही शब्द जैन धर्माच्या जवळील असल्याने संशोधक ती जैन धर्माच्या प्राचीनतेशी त्याचा संबंध लावताना दिसतात, ती काही प्रमाणात योग्यही वाटतात. तसेच

भविष्यातील जैन धर्माच्या संशोधकाला या संदर्भाचा आधार घेऊन संशोधनात पुढे जाण्यास निश्चितच मदत यातून होऊ शकते.

या सर्व निष्कर्षावरुन असे वाटते की, जैन धर्म प्राचीन म्हणजे वैदिक काळाच्या शेवटी इ.स.पू. एक हजारच्या आसपास ऋषभनाथ यांनी प्रवर्तविलेला धर्म दिसतो. हा धर्म वैदिककालीन किंवा सिंधू संस्कृती इतका प्राचीन होता हे मानणे मात्र आणखी पुरावे देऊन सिद्ध करावे लागेल.[३७]

## २.४ **जैन धर्माचे स्वरुप** :-

(१) तीर्थंकर :-

जैन धर्माला तीर्थंकर धर्म, रत्नत्रय धर्म, श्रमण धर्म, अनेकांतवादी, नयवादी, स्यादवादी धर्म असेही म्हणतात. जैन धर्म म्हणजेच जिन धर्म होय, जैन या शब्दाची उत्पत्ती 'जिन' या संस्कृत शब्दापासून झालेली आहे. जिन म्हणजे जेता, विजेता, श्रेष्ठ, संपादन कर्ता होय. जिनांने स्थापित केलेल्या धर्माला जैन धर्म म्हणतात.[३८]

तीर्थंकर, अर्हत, सिद्‌ध, सर्वज्ञ, केवल यांचा अर्थही सामान्यतः जिन असाच आहे. तीर्थंकर या संकल्पनेला जैन धर्मात विशेष स्थान प्राप्त झालेले आहे. तीर्थ म्हणजे 'धर्म', तीर्थचे (धर्म) प्रकटीकरण करणारे, समर्थन करणारे ते तीर्थंकर होत. श्रमण संस्कृतीचे आद्यप्रवर्तक तीर्थंकर वृषभनाथ होत. महावीर यांनी जैन धर्माची स्थापना केली असा ही एक समज सर्वत्र रुढ आहे. तथापि जैन मत प्रतिपादन करणारे एकूण चोवीस तीर्थंकर झालेले आहेत.[३९] तेवीसावे पार्श्वनाथ आणि चोवीसावे महावीर या दोन तीर्थंकरांसंबंधी प्रमाणित, विश्वसनीय माहिती उपलब्ध आहे. तीर्थंकरांची १००८ शुभलक्षणे, चोवीस प्रतीके, णमोकार मंत्र यांचा संक्षिप्त विचार करु.

(अ) जैन धर्मामध्ये तीर्थंकरांच्या नावाअगोदर १००८ हा आकडा लिहिलेला असतो. १००८ या आकड्यास तीर्थंकरांची १००८

'शुभलक्षणे' म्हणून विशेष महत्त्व दिले जाते. हा पावित्र्याचा संकेत आहे म्हणून तीर्थंकरांचे नांव लिहिण्या, उच्चारण्या अगोदर १००८ लिहितात. जसे वृषभ, शंख, चक्र, सिंह, बाण, कमल, स्वस्तिक, तोरण, चामर, सिंहासन, कुंभ, चंद्र, सूर्य, वीणा, मृदंग, कुडल इत्यादी.[४०]

(ब) चोवीस प्रतीके :-

वृषभ म्हणजे बैल हे पहिल्या वृषभनाथांचे चिन्ह होय तर हत्ती, घोडा, वानर, चकवा पक्षी, कमळ, स्वस्तिक, चंद्र, मगर, कल्पवृक्ष, गेंडा, म्हैस, डुक्कर, सायाळ, वज्रदंड, हरिण, बकरा, मासा, कुंभ, कासव, नील कमल, शंख, सर्प व सिंह ही अनुक्रमे इतर तीर्थंकरांची चिन्हे होत. या प्रतिकांवरुन विशिष्ट तीर्थकरांना ओळखणे शक्य व सुलभ झाले आहे.[४१]

(क) णमोकार मंत्र :-

. णमो अरिहंताणं ।

. णमो सिद्धाणं ।।

. णमो आइरियाणं ।।

. णमो उवज्झायाणं ।।

. णमो लोए सव्वासाहुणं ।।

अरिहतांना अभिवादन असो, सिद्धांना अभिवादन असो, आचार्यांना अभिवादन असो. उपाध्यांना अभिवादन असो व जगातील सर्वच साधूंना अभिवादन असो, जैन धर्मातल्या या महत् मंत्रामध्ये अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय व साधू अशा पाच परमश्रेष्ठींना केलेले अभिवादन आहे.[४२]

(२) वर्धमान महावीर :-

महावीर हे जैन धर्माचे चोवीसावे तीर्थकर, श्रमणोद्धारक ठरले. इ.स.पू. ५९९ ते ५२७ हा त्यांचा कालखंड होय. चैत्र शुद्ध बारा हा महावीर जयंती दिन होय. साधारणतः एकोणतीसाव्या वर्षी महावीरांनी सर्वस्वाचा त्याग करुन वैराग्याची दिक्षा घेतली आणि बारा वर्षे तपश्चर्या केली. वैशाख शुद्ध दशमी दिनी वयाच्या बहात्तराव्या वर्षी महावीर 'तीर्थंकर' बनले. कार्तिक शुद्ध तीस या अमावस्या दिनी त्यांचे महानिर्वाण झाले. म्हणजेच कार्तिक अमावस्या हा महावीरांचा महानिर्वाण दिन होय. महावीर यांच्या विशेष प्रयत्नामुळे जैन धर्माला आजचे स्वरुप, स्थैर्य, वैभव आणि प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे.[४३]

(३) धर्म संकल्पना आणि पंचव्रत :-

जैन धर्मात अहिंसा म्हणजे राग व द्वेषभावनेचा अभाव व दया-भावनेचा सद्भाव यासच धर्म म्हटले आहे. जैन धर्मात जीवात्म्याचे क्षमा, मार्दव, आर्जव, शौच, सत्य, संयम, तप, त्याग, अकिंचन्य व ब्रह्मचर्य यांना 'दशधर्मरुप' धर्म म्हटले आहे. धर्म हे सुख प्राप्तीचे साधन आहे, मोक्ष हे त्याचे फळ आहे, मोक्ष मार्गालाच व्यवहारात धर्म म्हणतात.[४४]

पंचव्रत :- जैन मुनींसाठी तसेच उपासक अथवा श्रावक यांच्यासाठी अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह आणि ब्रह्मचर्य असे पंचव्रत सांगितलेले आहेत.

(४) ईश्वर संकल्पना :-

जैन धर्माने ईश्वर संकल्पना मानलेली नाही, जैन हा निरिश्वरवादी धर्म होय. जैन धर्म हा आस्तिक की नास्तिक या बाबतही मतभिन्नता आहे. जैन दृष्टिकोनानुसार ईश्वर म्हणजे सृष्टीचा निर्माता, संहारकर्ता असा कोणी वेगळा नसून सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान व

सम्यक् चरित्र्य या रत्नत्रयीच्या साधनाने क्रमशः उन्नत होत होत निर्वाणपदी पोहचलेला जीवच ईश्वररुप होत असतो. अशा प्रकरच्या ईश्वराचे अस्तित्व जैन दर्शनात मानलेले असल्याने त्यांना ईश्वरवादाच्या दृष्टीने नास्तिक मानता येणार नाही. जैन मताला नित्य मुक्त व सनातन असा एक ईश्वर संमत नाही. कर्मक्षय झाला म्हणजे जीवालाच ईश्वरत्व प्राप्त होते, असा जैन सिद्धांत आहे.[४५]

(५) जैन तत्त्वज्ञान :-

जैन तत्त्वज्ञान स्वतंत्र आहे, जैन तत्त्वज्ञानाची जैनशासन, स्याद्वाद, अनेकांतवाद अशी विविध नावे आहेत. जैन तत्त्वज्ञानामध्ये जीव, अजीव, पुण्य, पाप, आश्रव, संवर, निर्जरा, बन्ध व मोक्ष अशी नऊ तत्त्वे अंतर्भूत झालेली आहेत. या नऊ तत्त्वांवर ज्याची श्रद्धा असते त्याला या तत्त्वांच्या सम्यक्त्वामुळे आणि त्यांच्या ज्ञानामुळे सम्यक् चारित्र्याची योग्यता लाभते. दर्शन आणि ज्ञान यांचा लाभ झाल्याशिवाय चारित्र्यामध्ये सम्यक्त्व निर्माण होत नाही. सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान व सम्यक् चारित्र्य यालाच जैन त्रिरत्ने म्हणतात. ज्याला ही त्रिरत्ने प्राप्त होतात तो निर्वाण पदप्राप्तीस पात्र होतो. केवळ दर्शनाने, ज्ञानाने अथवा चारित्र्याने निर्वाण प्राप्ती होत नाही. यासाठी अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व परिग्रह या पंचव्रताचे आचरण जैन धर्माने पुरस्कारलेले आहे.

महावीरांनी प्रतिपादन केल्यामुळे कोणतीही घटना सामान्यतः काळ, कर्म, कर्तृत्व, गुणधर्म व निकाचित या पाच कारणांमुळे घडत असते. म्हणजेच विश्वातील क्रिया आणि प्रतिक्रिया या पाच मार्गांनी किंवा कारणांनी व्यक्त होत असतात. क्रिया-प्रतिक्रिया मानवाला बंधनामध्ये गुरफटून टाकतात. तसेच ते बंधनमुक्त देखील करु शकतात. सुख आणि दुःख, यश आणि अपयश, मान आणि अपमान या

अनुषंगिक कर्म प्रतिक्रिया आहेत. त्यामुळे जीवनातील सुखात अतिलीन होऊ नये. तसेच जीवनातल दु:खामुळे अतिदीन होऊ नये, हा जैन धर्माचा जीवनविषयक दृष्टिकोन आहे.[४६]

(६) पंथ :-

जैन धर्मियांमध्ये महावीरांच्या पूर्व काळातही पंथ होते. तीर्थंकरांची मूर्तीपूजा करावी की करु नये ?, मूर्तीपूजेचे स्वरुप काय असावे ? इत्यादी संबंधी मतभेद होऊन काही पंथ आणि उपपंथ निर्माण झाले असे म्हटले जाते. महावीरांच्या पूर्वी स्थविरकल्प व जिनकल्प या नावाचे दोन जैन पंथ अस्तित्वात होते. स्थविरकल्प पंथाचे लोक वस्त्रे वापरित असत व जिनकल्प पंथात एका शाखेचे लोक वस्त्रे धारण करीत नसत. महावीरांनी या दोन्ही पंथातील लोकांचे एकीकरण करण्याचा प्रयत्न केला.

महावीरांच्या निर्वाणानंतर पुढे चंद्रगुप्त मौर्याच्या कारकीर्दीत दुष्काळ पडला असता सुमारे बारा हजार तरुण जैन साधू भद्रबाहूच्या नेतृत्त्वाखाली जीविकेसाठी दक्षिण देशाकडे निघाले. त्यांच्यात जे काही वृद्ध होते त्यांना श्वेत वस्त्र धारण करण्यास परवानगी होती. या प्रसंगामुळे श्वेतांबर पंथ निर्माण झाला असे एक मत प्रचलित आहे.[४७]

श्वेतांबर = श्वेत (पांढरे) अंबर (वस्त्र)

पांढरे वस्त्र धारण करणारे ते श्वेतांबर

दिगंबर = दिक् (दिशा) अंबर (वस्त्र)

दिशा हेच ज्याचे वस्त्र आहे ते दिगंबर (हे दोन मुख्य पंथ आहेत).

(७) जातीव्यवस्था :-

जैन समाज हा अनेक जातीसमुदायात विभागलेला आढळतो. भारतातील विविध राज्यातील प्रमुख चौ-याऐंशी जैन जातींचा

तपशीलवार उल्लेख मिळतो. पुरोहित वर्ग आढळतो, गच्छ, गण, शाखा असे पोटभेद आहेत. विश आणि दास हे दोन विभाग ही निर्माण झाले आहेत.[४८]

(८) धर्मग्रंथ :-

जैन धर्माच्या मूळ ग्रंथाना 'सिद्धांत' किंवा 'आगम' असे म्हणतात, आगमांना 'जैनागम' असे म्हटले जाते. या मुळ धर्मग्रंथातील पहिला महत्त्वाचा भाग म्हणजे बारा अंगे होत. परंतु श्वेतांबर पंथीयांचेच सिद्धांत ग्रंथ उपलब्ध असून त्यामध्ये 'सुत्त' ग्रंथाचा समावेश होतो. ही अर्धमागधी, प्राकृतभाषा असून महावीरांनी याच भाषेमध्ये उपदेश केल्याचे सांगितले जाते. काळाच्या ओघात बारावे अंग पूर्णतया नव्याने झाल्याने पहिल्या अकरा अंगांना श्वेतांबरांनी मान्यता दर्शविली आहे. अकरा अंगे, बारा उपांगे, दहा प्रकिर्ण, सहा छेदसुत्रे, दोन चूलिका सूत्रे अशीच मिळून आगमांची संख्या पंचेचाळीस असल्याचे मानलो जाते.

'आगम' हे जैनांचे मूळ धर्मग्रंथ होत, अर्थातच आगम हा ग्रंथ नसून ४५ ग्रंथांचे ते सामुहिक नाव आहे. कांतिलाल चोरडिया यांनी नमूद केल्याप्रमाणे आगम हे मूळ ग्रंथ भगवान महावीरांनी जो उपदेश दिला त्याच्या आधारे त्यांच्या काळापासून मौखिक परंपरेने चालत आले. गणधरांकडून त्याच्या शिष्याकडे अशा प्रकारे एका पिढीकडून दुस-या पिढीकडे वाटचाल करीत आले नंतर झालेल्या आचार्यांनी इतर अनेक ग्रंथांची रचना केली. या आगम ग्रंथाचे संकलन दीड हजार वर्षापूर्वी वल्लभीपूर (सौराष्ट्र) गावी झाले. त्यानंतर विसाव्या शतकात त्यांचे संशोधन करण्याचे कार्य काही विद्वानांनी केले.

याशिवाय जैन आचार्यांनी संस्कृत व प्राकृत या दोन्ही भाषेत उपासनेसाठी उपयोगी असलेले स्त्रोतवाङ्मय निर्माण केले आहे. कुंदकुंदाचार्य यांच्या या ग्रंथांना श्वेतांबर व दिगंबर या दोन्ही पंथांनी

प्रमाणभूत स्वरुपात मान्यता दिली असल्याचे आढळते. सध्या तर विविध भारतीय भाषांमध्ये जैन धर्म वाङ्मय मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे.[४९]

(९) संस्कार :-

जैन धर्मात संस्काराचे महत्त्व आहे. जैन उपासकाचे आध्यात्मिक सामर्थ्य वाढविण्यासाठी संस्काराचा स्वीकार केला आहे. गर्भाधान, पुंसवन, जन्म सुर्येनुदर्शन, क्षीराशरण, षष्ठी, शुचिकर्म, नामकर्म, अन्नप्राशन, कर्णवेध, चुडाकर्म, उपनयन, विद्यारंभ, विवाह, द्रतारोप व अंत्यकर्म हे जैन धर्मीयांचे प्रमुख संस्कार मानले जातात.

दिगंबर आणि श्वेतांबर आपल्या अनुयायासाठी भिन्न संस्कार विधींचा पुरस्कार करतात. दिगंबराच्या दृष्टीने श्रावकाला 'आदिपुराण' या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे त्रेपन्न संस्कारातून जीवन व्यतित करावे लागते. श्वेतांबरांनी त्यांचे स्वतंत्र संस्कर विकसित केलेले आहेत. 'आचार दिनकर' या ग्रंथात श्वेतांबरासाठी सोळा संस्कार पुरस्कारले आहेत.[५०]

(१०) मुनी परंपरा :-

जैन धर्मामध्ये मुनींचे तीन वर्ग आहेत, त्यांना अणुव्रत, महाव्रत आणि निर्वाण असे म्हणतात. जैन धर्मात त्यागी मुनींना महत्त्व आहे, मुलींच्या मार्गदर्शनाचे पालन श्रावक करतात. त्यामुळे मुनींप्रमाणे छोटे छोटे दल पडतात व त्यांची परंपरा पुढे रुढ होते. अशा दलातील मोठ्या दलांना संघ म्हणतात आणि छोट्या दलांना गण, गच्छ आणि शाखा म्हणतात.[५१]

(११) भट्टारक परंपरा :-

उत्तरेकडील जैन धर्मीयात विशेषतः दिगंबर पंथात भट्टारकांची परंपरा चालू झाली व ती पुढे दक्षिणेकडे पसरली. पुढे अनेक शतकात जैन समाजाचे संपूर्ण नेतृत्त्व भट्टारकांच्या हाती आले. यासाठी

लहानपणीच दीक्षा घेऊन तरुण बुद्‌धिमान मुनीपरंपरा निर्माण केली गेली.[५२]

(१२) श्रावक - श्राविका :-

हे श्रमण-श्रमणी इतकेच जैन संघाचे महत्त्वाचे अंग आहे. श्रावक संस्था फार प्राचीन आहे. जे गृहस्थ धर्म पालन करुन मुनिजनाकडून सदाचाराचे उपदेश ऐकतात ते श्रावक. श्रावक हा शब्द श्रृ या धातूपासून बनलेला आहे. श्रृ चा अर्थ होतो ऐकणारा. जैन पुरुष उपासकास श्रावक तर स्त्री उपासकास श्राविका म्हटले जाते.[५३]

(१३) सल्लेखना :-

सल्लेखना ही केवळ मुनीनीच स्वीकारावी असा दंडक आहे. सल्लेखना स्वीकारताना हळूहळू अन्न-पाणी सोडून क्षीण होत होत शरीर सोडण्याची कल्पना आहे. यात मृत्यूला शरण जाण्याची भावना नसून जीवनातील मोह, वासना सोडीत शेवटी देहाची इच्छा सोडण्याची कल्पना आहे. त्यात आत्महत्या, आत्मघात नसून शरीर सोडून आत्म्याची मुक्ती मार्गावरील प्रगती करण्याची भावना आहे.[५४]

(१४) जैन व्रत आणि उपवास :-

व्रत, उपवासांना जैन समाजात फार महत्त्व दिले जाते. जल यात्रा, महावीर जयंती, जिन पंचमी, श्रुत पंचमी, वीर शासन जयंती ही व्रते पाळली जातात. पर्युषण पर्व, चार पोर्णिमांचे उपवास व प्रत्येक महिन्याची चतुर्थी, अष्टमी आणि द्‌वादशीचा उपवास असे मुख्य उपवास पाळले जातात. दिगंबराचे पर्युषण पर्व भाद्रपद शुक्ल पंचमी ते भाद्रपद शुक्ल पोर्णिमेपर्यंत दहा दिवसांचे असते तर श्वेतांबरामध्ये श्रावण वद्य द्‌वादशी ते भाद्रपद शुक्ल पंचमी असे दहा दिवसांचे असून 'अष्टाहिक' वर्षातून तीन वेळा पाळावयाचा उपवास आहे. वरील व्रत,

उपवासांबरोबर दिवाळी, रक्षाबंधन, गणेश चतुर्थी, अनंत चतुर्थी हे हिंदुंमधील उत्सव साजरे केले जातात.[५५]

(१५) जैनध्वज :-

प्रतिष्ठातिलक इत्यादी प्राचीन जैन शास्त्राधारे जैनध्वज केशरी रंगाचा, स्वस्तिक चिन्हांकित असा त्रिकोणाकृती मानला जातो. तसेच उपाध्याय श्री विद्यानंदजी यांनी भगवान महावीरांच्या २५०० व्या निर्वाण महोत्सवाच्या वेळी संशोधन करुन जैन संप्रदायाप्रमाणे पंचरंगी ध्वज पंचपरमेष्ठी द्योतक असल्याचे साधार दाखवून दिले आहे.

जैन शासनाचा ध्वज पाच रंगाचा आहे, त्यात क्रमशः समान प्रमाणात अरुणाभ, पीताभ, श्वेताभ, हरिताथ आणि गडद नीलाभ रंगाच्या आडव्या पट्ट्या असतात. श्वेतपट्टीवर मधोमध स्वस्तिक चिन्ह सुवर्णाक्षरात अंकित केलेले असते. स्वस्तिकाची उंची श्वेतपट्टीच्या उंची एवढी असते. म्हणून इतर पट्ट्यापेक्षा पांढ-या रंगाची पट्टी जरा अधिक रूंद असते.

हा पाच रंगाचा ध्वज पंचपरमेष्ठीचे प्रतीक तर आहेच, पण त्याचबरोबर श्लेषार्थाने याला पंच अणुव्रत व पंच महाव्रतांचेही प्रतीक मानले जाते. अणुव्रत श्रावकांसाठी व महाव्रत श्रमणासाठी असते. धवल रंग अहिंसेचा, अरुणाभ रंग सत्याचा, पीताभ रंग अचौर्याचा, हरिताभ रंग ब्रह्मचर्याचा व नीलाभ रंग अपरिग्रहाचा द्योतक मानला जातो, ही संगती देखील फार उपयुक्त मानली जाते. पंचपरमेष्ठीमध्यो अरिहंत व पंच व्रतामध्ये अहिंसेचे महत्त्व यात केंद्रिभूत असल्याने पांढ-या (धवल) रंगास ध्वजाचे केंद्रभूत स्थान दिले जाते.[५६]

## २.५ जैन धर्माचा प्रसार :-

जैन धर्माचा प्रसार संपूर्ण भारतात झालेला दिसतो. तेवीसावे तीर्थंकर पार्श्वनाथ आणि चोवीसावे तीर्थंकर महावीर यांनी जैन धर्माचा प्रसार केला असे जैन परंपरा सांगते. बनारसचा राजा अश्वसेन हे पार्श्वनाथांचे वडील होते. वयाच्या तेवीसाव्या वर्षी त्यांनी वैराग्य घेतले. चौ-याऐंशी दिवसाच्या साधनेनंतर पार्श्वनाथांना परमज्ञान मिळाले आणखी ते सत्तर वर्षे जगले. मौर्य राजा चंद्रगुप्ताच्या काळी होऊन गेलेल्या भद्रबाहु या जैन भिक्षुने पार्श्वनाथांचे चरित्र लिहिले आहे. महावीरांच्या पूर्वी दोनशे पन्नास वर्षे हा पार्श्वनाथांचा काळ होय. उत्तर प्रदेश, बिहार आणि बंगाल या प्रदेशात त्यांनी आपल्या धर्माचा प्रसार केला.[५७] तसेच जर्मन विद्‌वान याकोबी यांनी बौद्‌ध व जैन साहित्याचे सूक्ष्म अवलोकन करुन निर्ग्रंथ धर्माचे अस्तित्व महावीर पूर्वीही असल्याचे सिद्‌ध केले. तेव्हापासून पार्श्वनाथांना हे ऐतिहासिक व्यक्ती म्हणून मान्यता मिळाली. पार्श्वनाथाच्या संघात दहा गणधर असून, स्वयंभू हा प्रमुख गणधर होता. त्यांच्या संघात अडोतीस हजार आर्यिका, एक लाख श्रावक व तीन लाख श्राविका होत्या. सुलोका ही प्रमुख आर्यिका होती. यावेळी महासेन हा मुख्य श्रोता होता, शेवटी सम्मेद शिखरावर त्यांना मोक्ष प्राप्त झाला[५८] अशीही माहिती मिळते.

भगवान महावीरांनी उत्तरेतील कोसल, विदेह, मगध, अंग आणि मथुरा, शूरसेन येथे जैन धर्माचा प्रसार केला. भगवान महावीरांना पाच लाख अनुयायी होते[५९] असेही संदर्भ मिळतात. भगवान महावीरांच्या काळी जैन धर्मास चेटक, सिंहभद्र महाराणी मृगावती, चन्दना, चण्डप्रद्योत, राजा उदयीन, राणी प्रभावती, श्रेणिक बिंबिसार, अजातशत्रू यांनी राजाश्रय दिला होता. नंद, मौर्य, गंग, कदम्ब, पल्लव, चालुक्य, राष्ट्रकुट, चोल, चेर, होयसल, शिलाहार, वाकाटक, गुप्त, हुण, यादव, सातवाहन, मोगल, विजयनगर, मेवाड, म्हैसूर इत्यादी राज्यघराण्यांनी जैन धर्मास राजाश्रय दिलेला होता[६०] असे दिसते. म्हणजेच

प्राचीन भारताच्या इतिहासाच्या कालखंडातील ब-याच राजे व राज्यांनी जैन धर्मास कमी-अधिक संरक्षण दिले, सहकार्य केलेले दिसते.

तसेच साधू साधन प्रसाद नावाचे जैन शेठ यांचा मोगल बादशहा बाबरावर त्यांचा प्रभाव होता. बाबराच्या आज्ञेने त्यांनी एक जैन मंदिर बांधल्याची माहिती मिळते.[६१] मोगल बादशहा हुमायूनच्या काळामध्ये जैनांच्या धार्मिक कार्यांना कोणतीही आडकाठी नव्हती. पुष्कळशी जैन मंदिरे या काळात बांधली गेली. नग्न दिगंबर साधूच्या विहाराला कोणतीही बाधा नव्हती, मोठ्या उत्साहात येथे रथयात्रा होत असे.[६२] मोगल बादशहा अकबराच्या समकालीन जैन धर्मगुरु हरिविजयसूरी होते. अकबरांनी त्यांना बोलावणे पाठविले होते, आग्रा येथे त्यांचे थाटात स्वागत करुन त्यांना जगद्‌गुरु अशी पदवी दिली होती.[६३]

शांतिचंद्र या जैन मुनींचाही मोगल बादशहा अकबरावर प्रभाव होता. ईदच्या एक दिवस अगोदर त्यांनी आज मी येथून जाणार आहे, असे अकबराला सांगितले. तेव्हा अकबराने त्याचे कारण विचारले, तेव्हा ईदच्या दिवशी होणारी प्राणी हत्या हे त्यांनी कारण सांगितले. सोबतच त्यांनी कुराणातील संदर्भ दिला की, 'बळी दिलेल्या प्राण्यांचे मांस अल्लाहला पोहचत नाही, भाजी भाकरी खाल्ल्यानेही रोजा घडतो'. अकबराने मौलवींना या विषयी विचारणा केली असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. म्हणून अकबराने ईदच्या दिवशी माझ्या राज्यात कोणत्याही प्राण्यांची हत्या केली जाऊ नये, असे आदेश दिले. इ.स. १५८७ मध्ये जीव हिंसा बंदी केल्याचे त्यांनी शांतिचंद्रांना कळविले.[६४]

जैन संस्कारामुळेच अकबराच्या हातून जैन धर्माची प्रभावना घडून आली आणि अकबर जैन बनला असे लोक समजू लागले. पोर्तुगीज पादरी Pinheiro हा अकबर बादशहाच्या कारकिर्दीत भारतात आला होता. अकबराचे वागणे आणि त्याचे हुकूम पाहून त्याने आपल्या मायदेशी इ.स. १५९५ मध्ये एक पत्र

लिहून कळविले की, अकबर जैन धर्मानुयायी होता[६५] तर मोगल बादशहा जहाँगिरने जैन तीर्थक्षेत्र आणि त्याच्या आसपास कोणीही जीव हिंसा करु नये असा सार्वजनिक हुकूम काढलेला होता.[६६]

शहाजहानने अकबर आणि जहाँगीर पेक्षा अधिक उपयोगी असे जीव हिंसा रोखण्याविषयी व जैन धर्माची प्रभावना घडण्यास उपयुक्त असे हुकूम जाहीर केले होते.[६७]

जैन धर्माची परंपरा सांगते की, भगवान महावीरानंतर दोनशे वर्षांनी मगध देशात बारा वर्षांचा भयंकर दुष्काळ पडला. तेव्हा जैन मुनी भद्रबाहु हा आपला शिष्य चंद्रगुप्त मौर्य यास सोबत घेऊन दक्षिण भारताकडे कर्नाटकपर्यंत जैन धर्माचा प्रसार केला.[६८] जैन धर्माचा प्रचार व प्रसार भारतातील बिहार, उत्तर प्रदेश, बंगाल, ओरिसा, दिल्ली, राजस्थान, गुजरात, माळवा, सिंध, महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश, तामिळनाडू, म्हैसूर या भूप्रदेशात झाला होता. यावरुन असे म्हणता येईल की, जैन धर्माचा प्रसार हा भारताचा पूर्व-पश्चिम, दक्षिण-उत्तर असा प्रसार झाला होता.[६९]

कश्मिरमधील जैन धर्माच्या संबंधाविषयी कल्हण कवीच्या 'राजतरंगिणी' मध्ये विशेष वर्णन दिले गेले आहे.[७०] तक्षशिलेत ऋषभनाथ तीर्थंकरांचा विहार झाला होता. बाहुबलीनी तेथेच प्रचंड धर्मचक्र उभारले होते. यासंबंधीची कथा आठव्या शतकातही प्रचलित होती, तक्षशिला हे जैन धर्माचे केंद्र होते.[७१] म्हणजेच भारताच्या ब-याचशा भूभागात जैन धर्माचा प्रसार झालेला दिसून येतो. तेथील राजे व राज्यकर्त्यांनी जैन धर्मास स्विकारलेले दिसते तर तेथील समाजामध्ये जैन धर्मास मोठ्या संख्येने अनुयायीही मिळालेले दिसते आणि भारतात मोठ्या प्रमाणात जैन धर्म पोहचला.

## २.६ जैन धर्माचे योगदान :-

भारतीय संस्कृतीमध्ये जैन धर्माने आपले वेगळेपण टिकविलेले आहे. भारतीय समाजाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक जडण-घडणीमध्ये जैन धर्माचे योगदान आहे. यात पार्श्वनाथ, महावीर, जैन आचार्य, मुनी, विद्वानांनी सांगितलेल्या तत्त्वांचा समावेश होतो. या जैन तत्त्वज्ञानाचा भारतीय जीवन पद्धतीवर प्रभाव दिसून येतो. यामुळे भारतीय जीवनशैली समृद्ध बनलेली दिसते. पंचमहाव्रते, त्रिरत्ने या सोबतच कर्म सिद्धांत, मोक्ष मार्ग, अनेकांतवाद, व्यक्तिस्वातंत्र्यवाद, वस्तुस्वातंत्र्यवाद अशा अमूल्य तत्त्वांमुळे मानवी जीवनाचा दर्जा उंचावला आहे.

जैन पदार्थ विज्ञान, मानव विज्ञान, वनस्पती विज्ञान, ज्योतिष विज्ञान आणि जैन भूगोल, जैन गणितशास्त्र, जैन आयुर्वेदशास्त्र, जैन राज्यशास्त्र, जैन व्याकरण अशा विषयज्ञानातून मानवाची वैज्ञानिक दृष्टी समृद्ध केली आहे.

अनुयोग, आगम साहित्य, पुराण साहित्य, कथा, नाटके, लोकगीते, निबंध अशा साहित्यातून हिंदी, मराठी, तमिळ, तेलुगू, कन्नड या भाषेच्या आधारे मानवी जीवनाच्या सांस्कृतिक, सामाजिक अंगाची मांडणी केलेली आहे. जैन संगीत, नृत्य, मूर्ती, वास्तू, चित्र यांच्या वैशिष्ट्यपूर्ण ज्ञानामुळे भारतीय ज्ञानकोशात भर पडून, भारतीय ज्ञानकोशाची कक्षा व्यापक झाली.[७२] तर जैन तत्त्वसिद्धांतानी मानव जीवनास अर्थ प्राप्त करुन दिला.

### २.६.१ जैन तत्त्व सिद्धांत :-

जैन तत्त्व सिद्धांत जैन धर्माच्या तत्त्वज्ञानाचे केंद्रबिंदू आहेत. त्यात अहिंसावाद, अपरिग्रहवाद, अनेकांतवाद, कर्मवाद, समतावाद इत्यादींचा समावेश होतो.

(१) अहिंसावाद :-

प्रत्येक प्राणी स्वतंत्र आहे, प्रत्येक प्राण्याचे अस्तित्व स्वतंत्र आहे. प्रत्येक प्राणी आपले स्वतंत्र अस्तित्व असलेले जीवन जगत

असतो. परंतु आपल्या गैरसमजूतीने आपण दुस-याच्या स्वतंत्र जीवनावर आक्रमण करत आहोत. महावीरांच्या समकालात मानव आपला हेतु साध्य करण्यासाठी यज्ञात वेगवेगळ्या बळी देत होता. अशा वेळी महावीरांनी अहिंसातत्त्व सिद्धांताचे महत्त्व सांगितले.

प्राणा यशात्मना .... भीष्टा : भूतानामपि ते तथा

जसे आपणांस आपले प्राण इष्ट तसे सर्व प्राणिमात्रांना आपले प्राण इष्ट असते. प्राण्यांची हत्या करताना किती दुःख होत असेल याची कल्पना आपण आपल्या दुःखावरुन करुन घ्यावी.

तेसि अच्छणाजो एव, निच्चं होयत्वयं सिया ।
मणासा कायवक्केण, एव हवदू संजय ।।

म्हणजेच मन, वचन, आणि काया याद्वारे कोणत्याही प्रकारची जीवांची हिंसा होऊ नये. असा व्यवहारच संयमी जीवन आहे आणि याचे निरंतर पालनच अहिंसा आहे. अहिंसा व्यक्तिगतच नाही तर तो सामाजिक धर्म असावा असे जैन तत्त्वज्ञान सांगते.

महात्मा गांधींचे प्रेरणास्त्रोत म्हणून अहिंसावादाकडे पाहिले जाते. गांधी म्हणत की, अहिंसेशिवाय मानवाची प्रगती अशक्य आहे. असंयम, आक्रमण, संग्रहवृत्ती, भ्रष्टाचार हे सुद्धा हिंसेचेच प्रकार आहेत. सामाजिक जीवन, राष्ट्रजीवन, विश्वातील मानव जीवन, सुसंघटित होण्यासाठी 'अहिंसा' महत्त्वपूर्ण आहे असे जैन धर्माने सांगितलेले आहे. यासाठी अणुव्रते, महाव्रते याचे पालन करावे.[७३]

(२) अपरिग्रहवाद :-

परिग्रह म्हणजे वस्तूंविषयी ममत्त्वबुद्धी होय. कोणत्याही प्रकारची अतिरेकी संग्रह प्रवृत्ती नसणे, व्यक्तीच्या संचय प्रवृत्तीवर मर्यादा घालणे, लोभी व स्वार्थी प्रवृत्ती रोखणे हा या व्रताचा मुख्य

उद्देश आहे. परिग्रह हा विषमता निर्माण करणारा आहे, तेच दुःख निर्माण करते म्हणून जैन तत्त्वाने अपरिग्रहाचा पुरस्कार केला आहे.[७४]

(३) अनेकांतवाद :-

प्रत्येक वस्तू अनेकांतात्मक, परस्पर विरुद्ध, उभयधर्मात्मक, सामान्य विशेषात्मक आहे हे सिद्ध करणे म्हणजे अनेकांतवाद होय. तर प्रत्येक वस्तूला अंर्तरंग आणि बर्हिरंग स्वरुप असे दोन बाजू असतात.

वस्तूचे अंर्तरंग हे मूळ स्वरुपात सदासर्वदा एकरुप, व्यापक, नित्यशुद्ध असते तर बर्हिरंग स्वरुप हे वस्तूचे खरे स्वरुप नसते. ते वस्तूचे तत्काळ धारण केलेले बाह्यरुप असते, त्यात विविधता असते ते कधी अंर्तरंगासारखे असते तर कधी अंर्तरंगाविरुद्ध असते. एकाच वस्तूला निरनिराळे भिन्न दृष्टिकोन असतात. सामान्य व विशेष हे दोन्ही अस्तित्व सहज, मान्य करणे हा अनेकांतवाद होय. अनेकांतवादाला 'स्याद्वाद' किंवा 'सप्तांगी' ही म्हटले गेले आहे. कारण प्रत्येक वस्तूकडे वेगवेगळ्या सात दृष्टीने पाहता येते. या जैन तत्त्व सिद्धांतामुळे मानवाला या जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळाली आहे.[७५]

(४) कर्मवाद :-

जैन तत्त्व सिद्धांताप्रमाणे आत्मा शरीराच्या बंधनात असतो. या बंधनाचे स्वरुप बदलत असते, आत्मा शरीरकर्माने बांधलेला असतो. यामुळे या आत्म्यास शरीराच्या कर्मानुसार पुन्हा-पुन्हा जन्म घ्यावे लागते. कर्म सिद्धांत हा जीवाचा मागील, पुढील, वर्तमान जीवनाचा चित्रपट आहे. प्रत्येक जीव स्वयं कर्माच्या वश होऊन विविध दुःख भोगतो, स्वभावाविरुद्ध विविध क्रिया करतो. त्यामुळे कर्माचे महत्त्व सांगताना कर्मच जीवाला विविध गतीमध्ये, विविध योनीमध्ये भ्रमण करविते. कर्म जीवाला झोप आणते, कर्मच जीवाला गमन करविते असे

म्हटले आहे. परंतु कर्म हे जड आहे जीव हे चेतन आहे, जीवाला जेंव्हा शुद्ध ज्ञानातून आपली चैतन्यशक्ती पणास लावता येते, तेव्हा ज्ञानी जीव पूर्वी केलेले कर्म एका क्षणात नष्ट करु शकतो. याप्रमाणे तो कर्मनाश घडवून आणू शकतो. कर्माचे मुख्य आठ प्रकार व एकशे अठ्ठेचाळीस उपप्रकार सांगितलेले आहेत[७६].

(५) समतावाद :-

प्रत्येक जीव समान आहे, प्रत्येकामध्ये परमात्मा बनण्याचे सामर्थ्य आहे. या शरीराच्या संयोगाने आपण उच्च-नीच असा भेद मानतो. यापासून विषमतेचे जे विष निर्माण होते ते उत्पन्न होऊ न देण्याची दक्षता ठेवली पाहिजे असे जैन तत्त्वसिद्धांत सांगते.

'' नदीस ई जाइ विसेस कोई ''

या उत्तराध्ययन सूत्रातील संदर्भानुसार स्त्री-पुरुष-शुद्र-सजीव-सर्व समान, महत्त्वपूर्ण आहेत. इष्ट-अनिष्ट बुद्धी, द्वेषरुपी बुद्धी, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, लहान-मोठा, असा भेद मानणे विषमवाद आहे. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असतात परंतु त्या सर्वात एकत्व सामावलेले असते.[७७]

२.६.२ त्रिरत्ने :-

सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान, सम्यक् चरित्र असे त्रिरत्ने आहेत.

सम्यक् ज्ञान व सम्यक् चरित्र या दोन्हींचा आधार म्हणजे 'सम्यक् दर्शन' होय. जैन तत्त्वज्ञानात जी मुख्य तत्त्वे मानलेली आहेत त्यावर अढळ विश्वास असणे ही सम्यक् श्रद्धा होय. तीर्थंकर हे खरे ईश्वर होत, जैन आगम ग्रंथ हेच खरे धर्मग्रंथ आहेत, जैन धर्मीय संत हेच खरे धर्मोपदेशक आहेत असे मानणे हे सम्यक् दर्शन होय, या व्यतिरिक्त सम्यक् दर्शनाची आठ अंगे आहेत.

सम्यक् दर्शनानंतर 'सम्यक् ज्ञान' प्राप्त होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. मिथ्या ज्ञान हे दूर झाल्यावरच सम्यक् ज्ञान प्राप्त होऊ शकते हे ज्ञान

पाच प्रकारचे असते. यात मतिज्ञान, श्रृतज्ञान, अवधिज्ञान, मनःपर्यायज्ञान आणि केवलज्ञान यांचा समावेश होतो.

इंद्रिय व मन यांच्या साह्याने जीवन-अजीव याबद्दल झालेले ज्ञान म्हणजे मतिज्ञान, ग्रंथाच्या वाचनाने वा श्रवणाने प्राप्त झालेले ज्ञान म्हणजे श्रृतज्ञान, दूरचा काळ अथवा स्थान याबद्दलचे ज्ञान म्हणजे अवधिज्ञान, दुस-यांचे विचार व भावना याबद्दलचे ज्ञान म्हणजे मनःपर्यायज्ञान तर स्थल, कालाच्या अतीत असे परमज्ञान म्हणजे 'केवलज्ञान' होय. सम्यक् ज्ञानाच्या बाबतीत या व्यतिरिक्त आणखी तत्त्वे आवश्यक मानले आहेत. वाणी, शरीर व मन यांच्या संदर्भात सर्व निंद्य क्रियांचे नियमन करणारे जे विनयाचे नियम आहेत ते सर्व 'सम्यक् चरित्र्यात' अंतःभूत होतात. सम्यक् चरित्र सकल परमोच्च आणि विकल या दोन प्रकारचे असते. या त्रिरत्नामुळे मानवजातीस आपले जीवन ध्येय समजण्यास मदत होते.[७८]

२.६.३ मानवाचे पुनर्मूल्यांकन :-

भगवान महावीरांनी मानवाचे पुनर्मूल्यांकन करुन त्याला महत्त्व प्राप्त करुन दिले आहे. मानवाने ईश्वराच्या नावावर आपली भूतकाल, वर्तमानकाल आणि भविष्यकालातील परिस्थिती निश्चित करु नये. मानव हा पुतळा नाही, काही ईश्वराचे प्रतिनिधिंनी मानवाला पुतळा बनविले आहे, यावर त्यांनी टिका केली आहे.

" अप्पा कत्ता विकताय दुहाए य सुहाएय "

या उत्तराध्यन सूत्रातील संदर्भानुसार मानव सेवक नाही तो स्वतःचा स्वामी आहे. सुख-दुःखाचे कारण तो स्वतः आहे. सुख-दुःख, स्वर्ग-नरक यातून सुटण्याची चावी स्वतःकडेच आहे. यातून जैन तत्त्वसिद्धांतानी मानवाची महानता स्पष्ट केली आहे.[७९]

२.६.४ आदर्श मूल्याची शिकवण :-

विनय, वैराग्य, इन्द्रिय निग्रह, मनोनिग्रह, क्षमा, ब्राह्मण, कौण, क्रोध, राग, द्वेष, लोभ, सदाचार, मृत्युकला, मनुष्यजन्म, रात्री भोजन त्याग, विषयभोग मुक्ती, अपमाद, तृष्णा यज्ञ, परलोक, बोध सूत्र, भिक्षाचारी, मोक्ष, आत्मा, लेश्या, स्वरुप भावना, साधना या सारखे आदर्श तत्त्वांची शिकवण जैन तत्त्वज्ञानात आढळून येते.[८०]

२.६.५ जैन धर्माचे आधुनिक दृष्टिकोन :-

आधुनिकता हे आजच्या जीवनाचे तत्त्वज्ञान आहे, ते नव्या मानवी जीवनशैलीची गरज आहे. या तत्त्वज्ञानाच्या रुपाने मानवाने आपल्या जीवनात चैतन्य निर्माण केले आहे. यामुळे नवी सांस्कृतिक क्रांती जन्माला येत आहे. परंतु याचाच परिणाम म्हणून साम्राज्यवाद, औद्योगिकीकरण, भौतिक तंत्राचा विकास, शस्त्रास्त्रवाढ, दहशतवाद, भ्रष्टाचार, नक्षलवाद, लैंगिक स्वातंत्र्यता व स्वैराचार पुढे येत आहेत. केवळ मानसिक व शारीरिक सुख प्राप्त करणे हेच जीवनाचे ध्येय बनले आहे, आज इंद्रिय तृप्तीचे दुसरे नाव सुख आहे.

थोडक्यात ही आधुनिक म्हणविणारी पण मानवाला अहितकारी घातक परिस्थिती आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी जैन धर्म तत्त्वसिद्धांतानी पर्याय दिले आहेत. आधुनिक जीवनाच्या चुकीच्या पद्धतीत जैन धर्म सांगतो की, सुवर्णमध्य साधले पाहिजे,आधुनिकतेचे धार्मिक स्वरुपात बदल केले पाहिजेत. पंचमहाव्रते, स्यादवाद, त्रिरत्ने, कर्म सिद्धांत, अहिंसा तत्त्व सिद्धांत, संयम या तत्त्वांचे पालन करुन मानव आपले जीवन सुखी-समृद्ध बनवू शकतो. विज्ञानाचा स्वीकार मानव कल्याणासाठी केला पाहिजे असे जैन धर्माचा आधुनिक दृष्टिकोन आहे. आदर्श परिवार, अनैतिक निवारण, शिक्षा - शिक्षक - विद्यार्थी, नवीन समाज रचना, मानवाची महानता आणि व्यक्तीस्वातंत्र्य या मूल्यांच्या आचरणातून मानवाचे जीवन यशस्वी होताना दिसते[८१].

या प्रकरणातून जैन धर्माचा उदय आणि प्राचीनतेविषयी अनेक संशोधकाच्या मताची माहिती मिळते. यातून जैन धर्माच्या प्राचीनतेचा अंदाज येतो तर जैन धर्मातील तीर्थंकर, पंचव्रत, ईश्वर संकल्पना, तत्त्वज्ञान, पंथ, ग्रंथ, संस्कार, मुनी परंपरा, भट्टारक परंपरा, श्रावक-श्राविका, सल्लेखना, जैन व्रत या घटकाच्या अभ्यासातून जैन धर्माचे स्वरुप समजण्यास मदत होते. या प्राचीन व वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या जैन धर्माचा प्रसार भारतभर झाला याची माहिती ही मिळते. या धर्माचा प्रसार होण्याची महत्त्वाची कारणे म्हणजे या धर्मातील तत्त्वज्ञानाच्या आचरणामुळे मानवी जीवन संपन्न होते, याचीही सविस्तर माहिती आपणास जैन धर्माच्या योगदान या घटकाच्या चर्चेतून समजते. खरोखरच जैन धर्माच्या तत्त्वज्ञानामुळे भारतीय समाजास खूप फायदे झाले आहेत. तसेच ती सर्व मानव कल्याणासाठी उपयुक्त आहेत असे वाटतात. जैन धर्माचे तत्वसिद्धांत, त्रिरत्ने, जैन धर्माने केलेले मानवाचे पूर्नमूल्यांकन, आदर्श मूल्यांची शिकवण आणि जैन धर्माचा आधुनिक दृष्टिकोन या घटकांच्या चर्चेतून जैन धर्म एका वेगळ्याच उंचीपर्यंत पोहचलेला दिसतो, त्याचे तत्वज्ञान अधिक श्रेष्ठ-संपन्न बनलेला दिसते.

- **<u>संदर्भ सूची</u>**


१ घुगरे सुर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, राजहंस प्रेस कोल्हापूर, २०००, पृ. १०.

२ तत्रैव, पृ. ३.

३ भट्ट सिद्धेश्वर, मानवी की सेवा में विश्व के प्रमुख धर्म, विद्यानिधी प्रकाशन दिल्ली, २००४, पृ. २०.

४ आंबेडकर बाबासाहेब, बुद्ध आणि त्यांचा धम्म, सद्धम्मादित्य प्रकाशन वर्धा, २००६, पृ. २.

५ भट्ट सिद्धेश्वर, उपरोक्त पृ. १९६.

६ तत्रैव, पृ. १९७.

७ तत्रैव, पृ. १९४.

८ तत्रैव, पृ. १९८.

९ शय शंकरमुनी, भारतीय धर्म दर्शन, पंकज बुक्स् प्रकाशन दिल्ली, २००७, पृ. ४१.

१० सराटे श्याम, हिंदू ऐक्यासाठी धर्ममंथन, हर्षल प्रकाशन औरंगाबाद, २००६, पृ. २३.

११ तत्रैव, पृ. २५.

१२ तत्रैव, पृ. ७.

१३ संगवे विलास, जैन धर्माची रुपरेखा, गुलाबचंद वालचंद डुडो प्रकाशन फलटण, १९७३, पृ. ६०.

१४ कोसंबी धर्मानंद, बुद्ध आणि संघ, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, २००३, पृ. २७.

१५ डांगे सिन्धू, जैन धर्म आणि तत्त्वज्ञान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २०१३, पृ. १२.

१६ तत्रैव, पृ. १.

१७ क्षुल्लकश्री किर्ती पार्श्व, विश्वधर्म की रुपरेखा, राजस्थान जैन सभा प्रकाशन जयपूर, १९३५, पृ. ६३.

१८ तत्रैव, पृ. ६४.

१९ अन्नदाते श्रेणिक, जैन ऐतिहासिक, सुमेरु प्रकाशन सोलापूर, २००२, पृ. ११३.

२० क्षुल्लकश्री किर्ती पार्श्व, उपरोक्त पृ. ६६.

२१ घुगरे सुर्यकांत, उपरोक्त पृ. ९२.

२२ भिडे, पाटील, प्राचीन भारत, फडके प्रकाशन सोलापूर, २००६, पृ. ६३.

२३ संगवे विलास, जैन संस्कृती-परंपरा व प्रभाव, अनेकांत शोधपीठ प्रकाशन कोल्हापूर, १९९१, पृ. ६५.

२४ नथमल, ध्यान और कायोत्सर्ग, भारत जैन महामंडळ प्रकाशन मुंबई, १९७४, पृ. ११.

२५ डांगे सिन्धू, उपरोक्त पृ. १९.

२६ नतालिया गुसेवा (मराठी अनुवादक) कुलकर्णी जी. पी. जैन धर्म उगम व विकास, शब्दपीठ प्रकाशन कल्याण, १९७६, पृ. ३२.

२७ क्षुल्लकश्री कीर्ती पार्श्व, उपरोक्त पृ. ११.

२८ तत्रैव, पृ. १२.

२९ तत्रैव, पृ. १३.

३० तत्रैव, पृ. १४.

३१ मगदूम आप्पा भाऊ, जैन धर्माची ओळख, श्री वीर ग्रंथमाला प्रकाशन सांगली, १९४०, पृ. ४८.

३२ क्षुल्लकश्री कीर्ती पार्श्व, उपरोक्त पृ. १५.

३३ तत्रैव, पृ. ५८.

३४ मगदूम आप्पा भाऊ, उपरोक्त पृ. ४८.

३५ जैन ज्योतिप्रसाद, प्रमुख ऐतिहासिक जैन पुरुष और महिलाएँ, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन दिल्ली, १९७५, पृ. ९७.

३६ रामचंद्र शुक्ल, मॅगेस्थनीज का भारतवर्षीय वर्णन, इतिहास प्रकाशन समिती काशी, १९०५, पृ. ५०६.

३७ डांगे सिन्धू, उपरोक्त पृ. २१.

३८ घुगरे सुर्यकांत, उपरोक्त पृ. ९६.

३९ तत्रैव, पृ. ९७.

४० तत्रैव, पृ. ९८.

४१ जैन धरमचंद, प्रागैतिहासिक जैन परंपरा, भारत जैन महामंडळ प्रकाशन मुंबई, १९७५, पृ. १२.

४२ भारिल्ल हुकमचन्द, जैन बोध, टोडरमल स्मारक ट्रस्ट प्रकाशन जयपूर, १९९५, पृ. १३.

४३ मुनिश्री रुपचन्द्र, महावीर, मार्क्स और गांधी, भारत जैन महामण्डल प्रकाशन मुंबई, १९७५, पृ. १४ - १७.

४४ डांगे सिन्धू, उपरोक्त पृ. १४८.

४५ तत्रैव, पृ. २०१.

४६ तत्रैव, पृ. २०३.

४७ तत्रैव, पृ. ४७.

४८ संगवे विलास, जैन कम्युनिटी, अनेकांत शोधपीठ प्रकाशन (बाहुबली) कोल्हापूर, १९९१, पृ. ४७.

४९ नतालिया गुसेवा, उपरोक्त पृ. २७ - ३०.

५० डांगे सिन्धू, उपरोक्त पृ. १४८.

५१ तत्रैव, पृ. ९५.

५२ तत्रैव, पृ. ८७.

५३ शास्त्री देवेंद्रमुनी, जैन धर्म श्रावक धर्म, भारत जैन महामण्ल प्रकाशन मुंबई, १९७५, पृ. १४.

५४ नतालिया गुसेवा, उपरोक्त पृ. ८३.

५५ शास्त्री देवेंद्रमुनी, उपरोक्त पृ. १७.

५६ शहा सुमतिबाई, पूर्ण्यार्घ्य, जैन ज्ञानकोश श्राविकाश्रम प्रकाशन सोलापूर, १९९९, पृ. १४.

५७ शहा सुमतिबाई, उपरोक्त पृ. ७१.

५८ तत्रैव, पृ. ७२.

५९ तत्रैव, पृ. ७३.

६० जैन ज्योतिप्रसाद, उपरोक्त पृ. १ - ३.

६१ शहा सुमतिबाई, उपरोक्त पृ. १००.

६२ तत्रैव, पृ. १०३.

६३ तत्रैव, पृ. १०४.

६४ तत्रैव, पृ. १०५.

६५ तत्रैव, पृ. १०७.

६६ तत्रैव, पृ. १०८.

६७ तत्रैव, पृ. १०९.

६८ सुतार अ. मा., दक्षिण भारत जैन सभा, ग्रंथ प्रकाशन मंडळ सांगली, १९९०, पृ. ३.

६९ शहा रजनी विजयकुमार, भारतातील दिगंबर जैन तीर्थ, जीवराज जैन ग्रंथमाल प्रकाशन सोलापूर, खंड - १, २, ३, ४.

७० बाहुबलिस्स रायहाणी तक्खसिला, आचार्य श्री विद्यानंतद महाराजा, अहिंसा प्रसारक ट्रस्ट मुंबई, २००६, पृ. ७२.

७१ तत्रैव, पृ. ६१.

७२ शहा सुमतिबाई, उपरोक्त पृ. २३८.

७३ नरेन्द्र भागवत, भगवान महावीर आधुनिक सन्दर्भ में, श्री अखिल भारतवर्षीय साधू मार्गी जैन संघ प्रकाशन बीकानेर (राजस्थान), १९७४, पृ. १८७.

७४ शहा सुमतिबाई, उपरोक्त पृ. ५६४.

७५ डांगे सिन्धू, उपरोक्त पृ. १७३.

७६ शहा सुमतिबाई, उपरोक्त पृ. २६५.

७७ नरेन्द्र भागवत, उपरोक्त पृ. ३०.

७८ जैन हिरालाल, जैन धर्मामृत, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन कलकत्ता, १९६५, पृ. २९.

७९ नरेन्द्र भागवत, उपरोक्त पृ. ३०.

८० शास्त्री गणेशमुनी, भगवान महावीर के हजार उपदेश, अमर जैन साहित्य प्रकाशन राजस्थान, १९७३, पृ. १.

८१ शहा सुमतिबाई, उपरोक्त पृ. २०.

# प्रकरण - तिसरे

# जैन तीर्थक्षेत्रे

३.१ तीर्थक्षेत्रांची ओळख

३.२ महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रे

३.३ जैन तीर्थक्षेत्रांवर होणारी नित्यपूजाविधी

३.४ जैन तीर्थक्षेत्रांवर होणारे वर्षभरातील विविध कार्यक्रम

३.५ जैन तीर्थक्षेत्रांचा लोकजीवनावर पडलेला प्रभाव

३.६ धार्मिक पर्यटन म्हणून जैन तीर्थक्षेत्रांचे स्थान

- संदर्भ ग्रंथ

# प्रकरण - तिसरे

## जैन तीर्थक्षेत्रे

### ३.१ तीर्थक्षेत्रांची ओळख :-

प्रत्येक धर्मात आणि प्रत्येक संप्रदायात तीर्थक्षेत्राचे महत्त्व मान्य असून प्रत्येक संप्रदायाची आपली तीर्थक्षेत्रे त्यांच्या महापुरुषांच्या विशिष्ट घटनांमुळे स्मारक म्हणून उभी आहेत. प्रत्येक धर्मातील अनुयायी आपल्या तीर्थाची यात्रा व वंदना खूप भक्तीभावाने करतात आणि मनशांती मिळवतात. ही तीर्थस्थाने पावित्र्य, शांती व मार्गदर्शनाचे केंद्र मानली जातात. याप्रमाणे जैन धर्मात सुद्‌धा तीर्थक्षेत्राचे महत्त्व दिसते. जैन धर्मी दरवर्षी मोठ्या श्रद्‌धेने व भक्तीने आपल्या तीर्थक्षेत्राची यात्रा करतात. त्यांचा विश्वास आहे की तीर्थयात्रा केल्यामुळे पुण्यसंचय होऊन अध्यात्मिक ज्ञानामुळे संसारिक ताण-तणावातून मुक्ती मिळते.[१]

जैन मतानुसार संसार समुद्र पार करण्यासाठी मार्गदर्शन करणा-या महापुरुषांची जन्मापासुन निर्वाणापर्यंतची स्थाने म्हणजे तीर्थ होय. या दृष्टीने ज्या ठिकाणी तीर्थंकरांची जन्मादिक पाच कल्याणके झाली असतील किंवा तीर्थंकर, मुनी आदिनी ज्या ठिकाणी निर्वाण प्राप्ती करुन घेतलेली असेल त्या ठिकाणांना ‘तीर्थक्षेत्र’ मानण्यात येते. ‘तीर्थ’ शब्दाचा अर्थ ‘घाट’ होय म्हणजेच स्नान करण्याची जागा. तथापि अशा प्रकारचे तीर्थस्थान जैन मतानुसार अमान्य आहे. जैन धर्माचे तीर्थक्षेत्र निर्माण होण्याची कारणे वेगळी असून जी दिगंबर आणि श्वेतांबर या दोन्ही संप्रदायात मान्य असलेली आहेत. तर काही केवळ दिगंबराना मान्य तर काही केवळ श्वेतांबरानाच मान्य आहेत.[२] तीर्थयात्रा करण्याविषयी सर्वप्रथम उल्लेख विष्णुस्मृतिमध्ये सापडतो[३] तर तीर्थ शब्द तृ धातू यातून निष्पन्न झाला आहे. व्याकरणानुसार तीर्यन्ते अनेन अस्मिन् वा । तृ प्लवन - तरणयो : पातृतुदि इति थक् ।

म्हणजे तृ धातूसोबत थक् प्रत्यय लावून तीर्थ शब्दाची निर्मिती होते. याचा अर्थ असा होतो की, ज्याच्याद्वारे तरले जाईल.

तीर्थ शास्त्रघ्वरक्षेत्रोपायनारीरजः सु च ।

अवतारर्षिजुष्टाम्बुपात्रोपाध्याय मन्त्रिषु ।।

यानुसार तीर्थ शब्द जलावतरण, आगम, ऋषी, जुष्ट, जल, गुरु, क्षेत्र, उपाय, स्त्री-रज, अवतार, पात्र, उपाध्याय आणि मंत्री या विभिन्न अर्थाने मिळतो.[४]

'' सर्वान्तवत्तद्गुणमुख्यकल्पं सर्वान्तशुन्यं च मिथोनपेक्षम् ।

सर्वापदामन्तकरं निरन्तं सर्वोदयं तीर्थमिदं तवैव ।। ''

आपले हे तीर्थ सर्वांचे कल्याण करणारे आहे, ज्यात सामान्य विशेष, द्रव्यार्थिक-पर्यायार्थिक, अस्ति-नास्ति रुप सर्व धर्मात गौण किंवा मुख्य रुपात रहात असतातच, सर्व धर्म परस्परपूरक आहेत नाही तर द्रव्यात कोणताच धर्म राहणार नाही. तरी हे सर्व आपत्तींना दूर करणारा आहे. कोणत्याही मिथ्येमुळे याचे खंडन होणार नाही. म्हणूनच तुमचे हे तीर्थ सर्वांचे कल्याण करणारे आहे. हे तीर्थ परमागम रुप आहे, ज्याला धर्म ही म्हटले जाते. काही विद्वानांनी तीर्थ शब्दाऐवजी क्षेत्रमंगल या शब्दाचा वापर केला आहे.[५]

''तत्र क्षेत्रमंगलं गुणपरिणतासन - परिनिष्क्रमण - केवलज्ञानोत्पत्ति - परिनिर्वाणक्षेत्रादिः । तस्योदाहरणम् - ऊर्जयन्त - चम्पा - पावानगरादिः। अर्धाष्टारत्न्यादि - पञ्चविशंत्युत्तरपञ्च - धनुः शत प्रमाण शरीर स्थित कैवल्याद्यवष्टाब्धाकाशदेशा वा, लोकमात्रात्मप्रदेशैलौकपूरणापरितविश्वलोकप्रदेशा वा।''

म्हणजेच योगासन, वीरासन अनेक आसनाना अनुकूल, अनेक योगाभ्यास, जितेन्द्रिया हे गुण जिथे प्राप्त झाले आहे असे क्षेत्र, परिनिष्क्रमण क्षेत्र, केवलज्ञानोत्पत्ति क्षेत्र आणि निर्वाण क्षेत्र यांना क्षेत्रमंगल म्हटले आहे.

तीर्थक्षेत्र असे न म्हणता फक्त तीर्थ शब्द बोलला तरी सुद्धा त्यातून नेहमीच तीर्थक्षेत्र किंवा तीर्थस्थान हाच आशय दिसतो. ज्या स्थानांवर तीर्थंकरांचे गर्भ, जन्म, तप, केवलज्ञान व निर्वाण कल्याणक यातील एखादे जरी कल्याणक झाले असेल किंवा एखाद्या मुनीचे केवलज्ञान व निर्वाण झाले तरी ते स्थान पूज्य होते. तीर्थ म्हणजेच व्यापक अर्थाने धर्म किंवा मोक्षमार्ग, स्वतः मुक्त असलेले व लोककल्याणासाठी हा मोक्षमार्ग स्वतःच्या जीवनात प्रकट करणारे महामानव तीर्थंकर म्हटले जातात. अशा तीर्थंकराची प्रदीर्घ परपंरा जैन धर्माला लाभली आहे.[६]

दिगंबर जैन परंपरेमध्ये प्राकृत निर्वाण भक्तीकांड व संस्कृत निर्वाण भक्तीकांड मान्य आहेत. प्राकृत निर्वाण भक्तीकांड ही आचार्य कुंदकुंदाचार्यांची रचना आहे तर संस्कृत निर्वाण भक्तीकांड आचार्य पूज्यपादांची रचना आहे असे जैन धर्मिय मानतात. प्राकृत निर्वाण भक्तीकांडाचे दोन खंड आहेत. एक निर्वाण खंड आणि दुसरे निर्वाणेत्तर खंड होय. या निर्वाणखंडात निर्वाण क्षेत्राचे वर्णन असून त्यात एकोणिस निर्वाण क्षेत्रांचा (तीर्थक्षेत्रे) उल्लेख आहे. दुस-या निर्वाणेत्तर खंडामध्ये मुनिजनांचे ज्या क्षेत्रावरुन निर्वाण झाले त्यांचा नामोल्लेख न करता त्या सर्वांना वंदना केली आहे. यावरुन असे समजते की, प्राकृत निर्वाण भक्तीकांडामध्ये तीर्थ भूमीच्या कल्पनेत दिगंबर समाजात चार प्रकारचे तीर्थभेद आहेत.[७] (१) सिद्धक्षेत्र (निर्वाणक्षेत्र) (२) कल्याणकक्षेत्र (३) अतिशयक्षेत्र (४) कलाक्षेत्र

१) **<u>सिद्धक्षेत्र</u> :-**

सिद्धक्षेत्रांना निर्वाण क्षेत्र ही म्हणतात. ज्या ठिकाणी जैन तीर्थंकर, मुनी यांना सिद्धत्व (निर्वाण) प्राप्त झाले अशा ठिकाणांना सिद्धक्षेत्र असे म्हणतात.

भारतात कैलास, चंपापूर, पावापूर, गिरनार आणि सम्मेद शिखर ही पाच प्रमुख सिद्धक्षेत्रे आहेत. कैलास पर्वतावरुन ऋषभनाथ तर चंपापूर क्षेत्रावरुन वासुपूज्य, गिरनार क्षेत्रावरुन नेमिनाथ आणि पावापूर क्षेत्रावरुन महावीरांना

सिद्धत्त्व प्राप्त झाले आणि राहिलेल्या वीस तीर्थंकरांना सम्मेद शिखर या क्षेत्रावरुन सिद्धत्त्व प्राप्त झाले, अशी मान्यता जैन परंपरेत दिसून येते. यासाठी शास्त्राभ्यास, वृत, चरित्र्यतप करुन सिद्धत्त्व प्राप्त करायचे असते. इतर तीर्थक्षेत्रापेक्षा सिद्धक्षेत्राचे महत्व अधिक आहे. म्हणून या ठिकाणी स्वस्तिक आणि चरणचिन्ह स्थापित करतात.[८]

२) **कल्याणकक्षेत्र** :-

ज्या ठिकाणी तीर्थंकरांचा जन्म झाला किंवा त्यांना जेथे केवलज्ञान प्राप्त झाले असे ठिकाण म्हणजे कल्याणकक्षेत्र होय. जैन पुराण आणि साहित्यामधून हा निष्कर्ष निघतो की अठरा तीर्थंकरांचे जन्मदीक्षा आणि ज्ञानप्राप्ती उत्तर प्रदेशामध्ये झाली. तसेच आयोध्येमध्ये वृषभनाथ, अजितनाथ, अभिनंदननाथ, सुमतिनाथ, अनंतनाथ यांचा जन्म झाला आणि रतनपुरामध्ये धर्मनाथ तर देवरीयामध्ये पुष्पदंत यांचा जन्म झाला. काशीमध्ये सुमतिनाथ व पार्श्वनाथ जन्मले. चंद्रपुरीमध्ये चंद्रप्रभ व सिंहपुरीमध्ये श्रेयांसनाथ, कौशंबी येथे पद्मप्रभू जन्मले. तसेच हस्तिनापुरामध्ये शांतिनाथ, कुंथुनाथ, अरहनाथ आणि कपिलामध्ये विमलनाथ, शौरीपूरमध्ये नेमिनाथ, कुंडलपूरमध्ये महावीर जन्मले अशी मान्यता जैन परंपरेत आहे. ही सर्व क्षेत्रे उत्तर प्रदेशातच आहेत. त्यामुळे जैन धर्मात या भूमिला अधिक महत्त्वाचे स्थान आहे.[९]

३) **अतिशयक्षेत्र** :-

ज्या मंदिर आणि मूर्तीला प्राचीन इतिहास असून मंदिरातील मूर्तीमध्ये विशेषता आहे तेथे जैन मुनीचा सहवास लाभला आहे आणि तेथे काही अतिशय (चमत्कार) दिसून येतात, अशा ठिकाणाला अतिशय क्षेत्र म्हणतात.

भारतात महावीरजी, देवगढ, हुमच पद्मावती, श्रवणबेळगोळ, वैशाली, सुर्यप्रहाड इत्यादी अतिशयक्षेत्रे म्हणून ओळखली जातात.

या क्षेत्रांच्या अतिशयाच्या अनेक कथा आहेत. त्या फारच रोमांचक आहेत. विशेष ठिकाणी गाईचे दुध झरणे, विशेष ठिकाणी दृष्टांतानुसार

उत्खननात तेथे मूर्ती सापडणे, मूर्ती हवेत तरंगणे, पाहिजे ती भांड्यांची नावे लिहून कागद विहिरीत टाकणे आणि विहिरीतून ती भांडी मिळणे तसेच बैलगाडीत मूर्ती ठेवून घेऊन जाताना मागे वळून पाहिल्यामुळे मूर्तीचे तेथेच अचल होणे. काही क्षेत्रांवर नवस बोलले तर त्याचे फल मिळणे, काही मंदिरात रात्री नृत्य-गायनाचे आवाज येणे, तीर्थक्षेत्र परिसरातील घनदाट जंगलात वन्यपशुंचा उपद्रव न होणे अशा अनेक अद्‌भुत चमत्कारांमुळे अतिशय क्षेत्रे प्रसिद्‌धीस आली आहेत.[१०]

४) **<u>कलाक्षेत्र</u> :-**

संपूर्ण भारतातच अनेक जैन स्थापत्य, लयन स्थापत्य, शिल्पकला आढळते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे देवगढचे मंदिर, अबू येथील मंदिर, बहोड, वेणूर, धर्मस्थल, शंखबसदी, श्रवणबेळगोळ, अंजनेरी ही क्षेत्रे सांगता येतात तर चित्तोडचे कीर्तीस्तंभ, वेरुळची लेणी, विजापूरचे सहस्त्रफणा पार्श्वनाथ हे आपल्या अनुपम रचनाशैली, सुक्ष्मता, कलापूर्ण आणि उत्तुंगतेमुळे जैन शिल्पकलेची वैशिष्ट्ये ठरली आहेत. यासोबतच भारतात अनेक स्थांनावर गुहामंदिरे आणि गुंफा आहेत. पर्वतांना खोदून बनविलेल्या या गुंफा आणि त्यात कोरलेल्या मूर्ती यामधून जैन कलावैभव दिसून येते. म्हणून अशा स्थानांना उत्कृष्ठ जैन कला तीर्थक्षेत्र समजले जाते.[११]

यावरुन असे म्हणता येईल की, तीर्थ आणि देव यांचा आपण समजतो त्याहून फार मोठा व्यापक अर्थ आहे. केवळ कुंड किंवा जलप्रवाह म्हणजे तीर्थ नव्हे. केवळ मूर्ती म्हणजे देव नव्हे. ऋषि-मुनींनी जिथे तप आणि व्रत आचरले संत-महंतांनी जिथे राहून असंख्य जनांना कर्म, भक्तीज्ञान उपदेश केले ते क्षेत्र म्हणजेच तीर्थ होय.[१२]

जे पूज्य पुरुषांनी वसवले तेच तीर्थ होय. याप्रमाणे पूज्य पुरुषांच्या सहवासामुळे विशेष ठिकाणी शुद्‌धता, शांती आणि निर्भयता असे गुणतरंग अधिक प्रमाणात असतात अशी मान्यता आहे. अशा प्रकारचे वर्णन जिनसेन आचार्यांनी आदिपुराणातही केले आहे. अशा या तपोभूमीत मानव येतो तेव्हा

सर्व आकुलता, व्याकुळता विसरुन निर्मळ होतो. येथे शांतीचा अनुभव येऊ लागतो. चिंता, व्याधीतून मुक्त होतो. चरित्र संवर्धनास मदत होते. तीर्थयात्रेमुळे निसर्ग चक्र, जीवन चक्र, आत्मस्थिरता समजण्यास निश्चितच मदत होते.[१३]

## ३.२ <u>महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रे</u> :-

महाराष्ट्रात विविध धर्म व पंथीयांची विविध धार्मिक स्थळे पाहावयास मिळतात. त्यामध्ये हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, पारशी, शिख इत्यादी धार्मिक स्थळांचा समावेश होतो. यामध्ये जैन तीर्थक्षेत्रे ही तितकीच महत्त्वाची आहेत. भारतात अशा प्रकारची जैन तीर्थक्षेत्रे मोठ्या संख्येने आढळून येतात.

संपूर्ण भारतामध्ये एकूण २३२ जैन तीर्थक्षेत्रे आहेत. यामध्ये एकूण सिद्धक्षेत्रे ३४, कल्याणक्षेत्र २०, अतिशयक्षेत्रे १६४ तर कलाक्षेत्र १४ असे एकूण २३२ जैन तीर्थक्षेत्रे आहेत. ही तीर्थक्षेत्रे भारतातील उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यात अधिक संख्येने आहेत. भारतातील विविध जैन तीर्थक्षेत्राप्रमाणे महाराष्ट्रातही जैन तीर्थक्षेत्रे दिसून येतात.[१४]

महाराष्ट्रात एकूण चौतीस जैन तीर्थक्षेत्रे आहेत. यात पाच सिद्धक्षेत्रे, चोवीस अतिशयक्षेत्रे, पाच कलाक्षेत्रे इत्यादींचा समावेश होतो. परंतु महाराष्ट्रात कल्याणकक्षेत्रे नाहीत. महाराष्ट्रात एकूण सिद्धक्षेत्रे पाच असून सव्विस अतिशय क्षेत्रे आणि पाच कला क्षेत्रे आहेत.[१५] ही तीर्थक्षेत्रे दिगंबर आणि श्वेतांबर पंथीयांना मान्य आहेत. परंतु महाराष्ट्रात स्वतंत्र श्वेतांबर पंथीयांची तीर्थक्षेत्रे पाहावयास मिळत नाहीत.

### ३.२.१ <u>सिद्धक्षेत्रे</u> :-

ज्याठिकाणी जैन तीर्थंकर, मूनींनी सिद्धत्त्व प्राप्त केले आहे अशी अनेक सिद्धक्षेत्रे महाराष्ट्रात आहेत. त्यामध्ये मांगी-तुंगी, गजपंथ, कुंथलगिरी, कुंडल, मुक्तागिरी ही सिद्धक्षेत्रांचा समावेश होतो.[१६]

(१) **<u>मांगी-तुंगी</u> :-**

मांगी-तुंगी हे सिद्धक्षेत्र नाशिक जिल्ह्यात असून या क्षेत्रावर राम, हनुमान, सुग्रीव, गवय, गवाक्ष, नील, महानील आणि नव्व्यानव कोटी मुनींनी सिद्धत्त्व प्राप्त केले म्हणून हे क्षेत्र सिद्धक्षेत्र मानले जाते.[१७] मांगी-तुंगी हे एकाच पहाडाचे दोन भाग असून पहाडाच्या पायथ्यावर असलेल्या मंदिरापासून पहाडावर जाण्यासाठी २९६० पाय-या आहेत. तीर्थंकर मूर्ती व पाण्याचा कुंड असलेल्या शुद्धबुद्ध गुहेपासून पुढे डाव्या व उजव्या बाजूस जाणारे दोन मार्ग आहेत. डाव्या बाजूचा रस्ता हा मांगी पहाडाकडे (शिखर) जातो तर उजव्या बाजूचा रस्ता तुंगी पहाडाकडे (शिखर) जातो.

मांगी शिखरावर एकूण नऊ गुहा आहेत. पहिल्या गुफेत महावीरांची श्वेतवर्ण पाषाणाची पद्मासनस्थ ध्यानमुद्रेतील मूर्ती असून भिंतीवर अनेक तीर्थंकरांच्या  मूर्ती कोरलेल्या आहेत. त्यांनतर गुंफा नंबर दोन, तीन, चार आणि पाच या खूप छोट्या आहेत. गुंफा नंबर सहा, सात, आठ, नऊ इतर गुफांपेक्षा मोठ्या आहेत. येथे आदिनाथांची आणि पार्श्वनाथांची पद्मासनस्थ मूर्ती असून भिंतीवर खड्गासन, पद्मासनातील जिन प्रतिमा, कमण्डलु, पिंच्छी प्रतिमा, चरणचिन्ह आणि क्षेत्रपालाची मूर्ती कोरलेल्या आहेत.

तुंगी शिखरावर चंद्रप्रभु गुहा आणि रामचंद्र गुहा असून त्यात चंद्रप्रभू, नील, गवाक्ष, सुग्रीव, गव यांच्या पद्मासनस्थ ध्यानमुद्रेतील मूर्ती आहेत.

या गुहेचे बाहेर वस्त्रालंकार केलेल्या यक्षी कोरलेल्या आहेत. या प्रमाणे दोन्ही शिखरावर या गुफा व मूर्ती दिसतात. या दोन्ही शिखरावरील मूर्ती खूप जून्या असून मूर्तीमध्ये सुडौलता, छातीवर श्रीवत्स चिन्ह आणि पादपीठावर लेख किंवा लांछन नाही. या मूर्ती सातव्या आठव्या शतकातील असाव्यात. येथील गुफा नैसर्गिक असून ब-याच गुंफाना सुशोभित केले आहे त्यामुळे नैसर्गिकता कमी झाली आहे.

पहाडाच्या पायथ्यास तीन मंदिरे दिसतात, त्यात पार्श्वनाथांची दोन मंदिरे आणि आदिनाथाचे एक मंदिर आहे. या मंदिरात पार्श्वनाथ, आदिनाथाच्या मूर्तीसोबत चंद्रप्रभु, ऋषभनाथ, विमलनाथ यांच्या मूर्ती दिसतात. इ.स. १९२७ मध्ये पार्श्वनाथाच्या मूर्तीची स्थापना भट्टारक रत्नकीर्तीच्या हस्ते झाली आहे तर बाकीच्या मूर्तींची स्थापना भट्टारक विजयकीर्ती यांनी इ.स. १९७६ मध्ये केली आहे, मंदिरासमोर क्षेत्रपालाची मूर्ती आहे. हे क्षेत्र बरेच प्राचीन दिसते असे पुरावे जैन साहित्यात आढळतात. सोबतच या क्षेत्रावर अनेक ऐतिहासिक घटना घडून गेल्याचे संदर्भ मिळतात. या क्षेत्राचे वर्णन प्राकृत निर्वाण काण्डमध्ये ही मिळते.[१८]

'' राम हणू सुग्गीवोवय यगवक्खो य नील महनीलो

णव णवदी कीडीओ तुंगीगिरी णिव्वुदे वंदे ''

म्हणजेच राम, हनुमान, सुग्रीव, गवय, गवाक्ष, नील आणि महानील आणि नव्यान्नव कोटी मुनीनी तुंगगिरी येथून सिद्धत्व मिळविले, त्यांना माझे वंदन असो. तसेच या क्षेत्राचे संस्कृत निर्वाण भक्तीकांडामध्ये वर्णन मिळते.

' तुंग्यां तु संगरहितो बलभद्र नामा '

म्हणजेच तुंगगिरीहून बलभद्र याने सिद्धत्व मिळविले. याप्रमाणे जैन कवी उदयकिर्ति, श्रृतसागर, अभयचन्द्र, गुणकीर्ती, मेघराज, ज्ञानसागर, जयसागर, चिमणा पंडित, देवेन्द्रकीर्ती, पंडित दिलमुख यांनी आपल्या काव्य रचनेत मांगी क्षेत्राचे वर्णन केले आहे.[१९]

गंगादास, कमल, मेरुचंद्र, गुणकीर्ती आणि अभयचंद्र कवींनी तुंगी पर्वतावर बलराम द्वारे आपला भाऊ श्रीकृष्णास अग्नी संस्कार देऊन तेथेच वैराग्य पत्करल्याचा उल्लेख त्यांच्या काव्यरचनेत मिळतो.[२०]

जैन आचार्य भद्रबाहूचे समवशरण येथे आले होते असे येथे सांगितले जाते, याची स्मृती म्हणून भद्रबाहूची मूर्ती मांगी गुफेत स्थापन केली आहे.[२१]

मांगी-तुंगी पहाडाच्या पायथ्यालगत मुल्हेड नगर होते अशी येथे कथा सांगितली जाते. या नगरात अनेक जैन मंदिरे होती. हे नगर जैन धर्मियांचे होते. या नगरात भट्टारक ब्रम्ह जिनदास राहत असून हे ईडर येथील भट्टारक सकलकिर्ति यांचे शिष्य होते आणि ब्रम्ह जिनदास यांचे शिष्य ब्रम्ह शांतीदास हे शिष्य होते. या सर्वांनी विविध साहित्याची रचना केली आहे. याच्या समकालीन सुरतमधील भट्टारक गादीवर लक्ष्मीचंद आणि दयालचंद हे मुल्हेड येथे राहत होते. याच काळात वेटावद या गावचे वेणीदास यांच्या प्रेरणेने वेटावद येथील निवासी संघवी यांनी इ. स. १८२२ मध्ये मांगी-तुंगी साठी संघ काढून मुल्हेड नगरात जिन मूर्ती स्थापन केल्या होत्या. या संदर्भात अमलनेर जिनालयात माहिती मिळते. मांगी-तुंगी पहाडालगत असलेल्या मंदिराची व्यवस्था ईडरच्या भट्टारक सुरेन्द्रकीर्तीनी इ.स. १८७० मध्ये पंडित रिखवदास यांना येथे पाठवून सुरु केली. इ.स. १९०४-०५ मध्ये कारंजा येथील देवेन्द्रकीर्ती आणि त्यांचे शिष्य रतनसागर यांचे येथे आगमन झाले होते. यांच्या प्रेरणेमुळे सोलापूरचे रहीवासी गांधी आणि देवकरण कुटुंबियांनी येथे मंदिर बांधले आणि त्यात इ.स. १९१५ मध्ये पार्श्वनाथाची मूर्ती स्थापन केली आहे. याचप्रमाणे इ.स. १९२७ मध्ये बार्शी येथील शेठ तुलजाराम बडजाते यांनीही येथे मंदिर स्थापना केली आहे.[२२]

यासोबतच या क्षेत्रावर काही ऐतिहासिक घटनाही घडून गेल्या आहेत. जसे ऑगस्ट १९३० मध्ये सविनय कायदेभंगाच्या चळवळीत मांगी-तुंगी या सिद्धक्षेत्रावर सुमारे एक लाख लोकांनी जमून 'जंगल सत्याग्रह' करुन भारतीय स्वातंत्र्य चळवळीस समर्थन दिले. तसेच मांगी-तुंगीला येथील आदिवास देवडोंगरही म्हणतात. म्हणजेच हे क्षेत्र जैनेतरांमध्येही आदरणीय आहे.[२३]

इ.स. १९०४ ते इ.स. १९४६ पर्यत येथील व्यवस्थापन कारंजा येथील भट्टारक देवेन्द्रकीर्ती यांचे शिष्य रतनसागर यांच्याकडे होती. इ.स. १९४७ पासून या क्षेत्राची स्वतंत्र कमिटी स्थापन झाली. भट्टारक देवेंद्रकीर्तीजी यांचे शिष्य क्षुल्लक धर्मदास यांच्या अध्यक्षतेखाली या कमिटीची स्थापना झाली आहे.

इ.स. १९९७ मध्ये मानस्तंभ स्थापने वेळी मुनी वीरसागर आणि आचार्य शांतीसागर उपस्थित होते.[२४]

या क्षेत्रावर वार्षिक उत्सव कार्तिक शुक्ल तेरा ते पंधरा या काळात साजरा केला जातो. कार्तिक शुक्ल चौदाला पंचामृत अभिषेक होतो. याचवेळी रथयात्रा असते. या सर्व रथयात्रा मिरवणूकीची व्यवस्था तेथील ग्रामपंचायतीकडून केली जाते. या रथ मिरवणूकीत जैनेत्तरांचाही मोठ्या संख्येने सहभाग असतो. सध्या याच पहाडावर १०८ फूट उंचीची भगवान वृषभदेवांची अखंड दगडाची विशालकाय मूर्ती उभारण्याचे काम सुरु आहे. काम अंतिम टप्प्यात आले असून येत्या फेब्रुवारीमत त्याचे पंचकल्याणक होत आहे[२५]

**(२) <u>गजपंथ</u> :-**

गजपंथ हे सिद्धक्षेत्र नाशिक जिल्ह्यात असून येथे सात बलभद्र आणि आठ कोटी मुनीनी सिद्धत्व प्राप्त केले म्हणून हे सिद्धक्षेत्र समजले जाते.[२६] जैन वाड्मयात या क्षेत्राला गजपंथगिरी असे म्हटले गेले आहे. या पहाडाची रचना बसलेल्या हत्तीप्रमाणे दिसत असल्यामुळे या पहाडाला गजपंथ म्हटले जाते.[२७] या क्षेत्रावर एकूण सात मंदिरे आहेत. मुख्य मंदिराच्या गर्भगृहात वेदीवर दोन फूट उंचीची श्वेत पाषाणाची मूलनायक महावीरांची पद्मासनस्थ ध्यानमुद्रेतील मूर्ती आहे. डाव्या बाजूस आदिनाथाची दोन फूटाची मूर्ती दिसते आणि समवशरणात एकतीस, त्यात सात बलभद्र आणि एक गजकुमार असून शिखरावर सात मूर्ती पाहावयास मिळतात. मंदिरासमोर मानस्तंभ आहे जो विक्रम संवत्[A] २४६० मध्ये कुंकूबाई यांच्याकडून स्थापन केला आहे.

नागौर येथील भट्टारक क्षेमेन्द्रकीर्ती यांनी या क्षेत्राचे विकास कार्य केले. पहाडाच्या पायथ्याजवळ भट्टारक क्षेमेंद्रकीर्तीची समाधी आहे. तेथेच जिनालय आहे त्यात बारा-बारा चारी दिशेस जिन मूर्ती आहेत. सोलापूरचे शेठ नानचंद फतेरचंद यांनी म्हसरुळ या क्षेत्रावरील जमीन खरेदी करुन मंदिर

निर्मितीसाठी दिली, या मंदिराच्या वेदीवर पार्श्वनाथाची श्वेत पाषाणाची मूर्ती आहे. या मंदिराजवळूनच पहाडावर चढण्यासाठी पाय-या आहेत. पहाडाची उंची ४०० फूट आहे. पर्वतावर सुदर्शन, नंदी, नंदीमित्र, सूप्रभ, गजकुमार, अचल आणि विजय या बलीभद्रांचे चरणचिन्ह आहेत.

येथे शेठ शोभाराम भगवानदासांकडून जिर्णोद्धार केलेले मंदिर असून येथे दहा फूट उंच नऊ नागफणा छत्र असलेली पद्मासनस्थ पार्श्वनाथाची पाषाण मूर्ती दिसते. आचार्य शांतीसागरजीच्या सांगण्याने ही मूर्ती इ. स. १९९४ मध्ये स्थापन करण्यात आली आहे. येथील दुसरे मंदिर विक्रम संवत्[A] २४६० मध्ये स्थापन केले असून पद्मप्रभू आणि वासूपूज्य यांचे मंदिर आहे याच्या जवळच दोन गुफा आहेत.

या सर्व परिसरात जिनप्रतिमा, शिलाफलकावर चमरेन्द्र, कीचक, यक्ष-यक्षी पुष्पहार घेतलेले देव-देवता, द्विभूज गजारुढ पद्मावती, चमरेंद्र, पार्श्वनाथ यांच्या मूर्ती दिसतात.

कवी असंग याने आपल्या शांतिनाथ चरित्रात गजध्वज पर्वताचा उल्लेख केला आहे. हा गजध्वज पर्वत नाशिक जिल्ह्याजवळ असल्याचे त्याने सांगितले आहे.[२८] यावरुन गजपंथगिरीलाच गजध्वज म्हणत असावे असे वाटते. सोळाव्या शतकातील आचार्य श्रृतसागर याने आपल्या ‘पल्यविधानव्रतकथेत’ स्वतः गजपंथगिरी यात्रा केल्याचे लिहिले आहे.[२९]

या पहाडाच्या वायव्येला लेणी असून याला ‘चामरलेणी’ म्हटले जाते. शांतिनाथ पुराणामध्ये याचा उल्लेख आहे. इ.स.पू. नवव्या शतकात म्हैसूरच्या चामर राजाने ही लेणी स्थापन केली असे जैन परंपरा सांगते.[३०] चामरलेणे म्हणून ओळखल्या जाणा-या या लेण्यांमध्ये सर्वानूभूति यक्ष आणि अंबिका यांच्या मूर्ती शिल्पांव्यतिरिक्त अनेक जिनमूर्ती आहेत. त्यामुळे शिल्पाकृतींना चतुर्विशति पट्टांचे स्वरुप प्राप्त झाले आहे. येथे प्रस्तरात कोरलेली

पार्श्वनाथाची महाकाय मूर्तीही आहे. येथील शिल्पशैली लक्षात घेता ही लेणी यादव काळात खोदली गेली असावीत असे दिसते.[३१]

याठिकाणचे दुसरे ऐतिहासिक महत्त्व म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील चले जाव आंदोलनात खानदेशामधील क्रांतिकारक जी. डी. लाड, नागनाथ नाईकवडी यांनी साता-यातील क्रांतीकारकाशी संपर्क साधून ४ एप्रिल १९४४ रोजी साडे पाच लाख रुपयांचा सरकारी खजिना लुटला. ही घटना संपूर्ण भारतात 'चिमठाणे लुट' म्हणून प्रसिद्ध आहे. या लुटीची रक्कम सुरक्षिततेसाठी गजपंथ येथे आणण्यात आली. पोलीस यंत्रणा जागृत होती अशा परिस्थितीत पत्री सरकारमधील राजुलमती या जैन तरुणीने ही रक्कम या तीर्थभूमीवर काही दिवस सुरक्षित ठेवून पत्री सरकारच्या हद्दीत हलविले.[३२]

गजपंथ पासून सोळा किलोमीटर अंतरावर अंजनेरी क्षेत्र आहे. येथील एका गुफेत मल्लिनाथाची तीन फूट उंचीची पद्मासनस्थ मूर्ती आहे. दुस-या गुफेत पाच जिन मूर्ती आहेत. या पहाडाच्या पायथ्यालगत मंदिर समूह आहे. काही मंदिरात शिलालेख आहेत. गजपंथ क्षेत्रावर इ.स. १९३६ आणि इ.स. १९५० मध्ये आचार्य शांतिसागरजी यांचे चार्तुमास झाले होते. जैन आचार्य महावीरकीर्तीजी येथे आलेले होते. या क्षेत्रावर इ.स. १९४३ मध्ये धर्मशाळेची स्थापना झाली असून या क्षेत्राचे व्यवस्थापन श्री दिगंबर जैन तीर्थक्षेत्र म्हसरुळ या ट्रस्टी मार्फत केले जाते. दरवर्षी माघ शुक्ल चौदाला वार्षिक उत्सव साजरा केला जातो.[३३]

### (३) <u>कुंथलगिरी</u> :-

कुंथलगिरी हे सिद्धक्षेत्र उस्मानाबाद जिल्ह्यात असून या क्षेत्राचे मूलनायक कुलभूषण-देशभूषण या मुनीनी येथे सिद्धत्त्व प्राप्त केले म्हणून हे सिद्धक्षेत्र मानले जाते.[३४] या क्षेत्रावर एकूण अकरा मंदिरे असून कुंथलगिरी पहाडावर जाण्यासाठी दोनशे पन्नास पक्क्या पाय-या आहेत. हा पहाड दक्षिण-उत्तर असून येथील मुख्य मंदिराचा जीर्णोद्धार १९३१ मध्ये झाले आहे.[३५]

या क्षेत्रावरील कुलभूषण-देशभूषण मंदिर हे मुख्य मंदिर असून गर्भगृहातील वेदीवर या दोन्ही मुनीचे चरणचिन्ह आहेत. हे चरणचिन्ह बाबावड या गावातील मेटाशाह हुमड यांनी शोधले. इ.स. १९३२ मध्ये शेठ हरिभाई देवकरण यांनी भट्टारक कनककीर्ती यांच्या हस्ते येथे मंदिर स्थापना आणि चरण चिन्ह स्थापन केले. वेदीवर चरण चिन्हांसोबत कुलभूषण-देशभूषण यांची तीन फूट उंचीची श्वेतपाषाणाची मूर्ती असून या मूर्ती खड्गासनात दिसतात. डावीकडे मुनिसुवृतनाथ आणि शांतिनाथाची पाषाण मूर्ती आहेत. कुलभूषण-देशभूषण हे मुनिसुवृतनाथ यांच्या समकालीन होते असे जैन परंपरा सांगते.[३६]

या मंदिराव्यतिरिक्त येथे शांतिनाथ मंदिर, बाहुबली मंदिर, आदिनाथ मंदिर, अजितनाथ मंदिर, नंदीश्वर मंदिर, नेमिनाथ मंदिर, रत्नत्रय मंदिर आणि समवशरण मंदिरे पाहावयास मिळतात. या मंदिरांमध्ये मूलनायकांच्या दिडशे वर्षापूर्वीच्या मूर्ती स्थापन केलेल्या आहेत. सोबतच या मंदिरामध्ये जैन परंपरा विशेष प्रतिमा, शासन देवता आणि लहान-मोठ्या पाषाणापासून व धातूपासून बनविलेल्या मूर्ती दिसतात. तसेच येथे त्रेपन्न फूट उंचीचे मानस्तंभ असून मानस्तंभासमोर चैत्य स्वरुपातील प्रतिमा दिसते.

आचार्य शांतिसागरजींची येथे समाधी असून त्यांचे चरणचिन्ह येथे आहेत. त्यांनी १४ ऑगस्ट १९५५ मध्ये सल्लेखना घेतली होती. छत्तीस दिवस त्यांनी उपवास केला तर १८ सप्टेंबर १९५५ मध्ये त्यांना सिधत्त्व प्राप्त झाले होते.[३७] पूज्य १०८ वृषभसागर महाराजांनीही येथे सल्लेखना घेतली, त्यांच्याही चरणपादुका येथे आहे.

जैन परंपरेत सिद्धक्षेत्र कुंथलगिरी क्षेत्राचे प्राचीन काळापासून महत्त्वाचे स्थान होते. या क्षेत्राचा उल्लेख निर्वाणकांड यामध्ये सापडतो.[३८]

‘‘ वसत्थलवरणियडे पच्छिमभायम्मि कुंथुगिरि सिहरे

कुलदेशभूषणमुणी णिव्वाणगया णमो तेसि ’’

तसेच सोळाव्या शतकातील भट्टारक मेघराज यांनी प्राकृत निर्वाणकांड मराठीत भाषातंरीत केले आहे.

" कुंथलागिरीवरसार वेसभूषण कुलभूषणए
उपसंर्ग टाले राम सिद्‌ध हवा जगमंडणए "

याप्रमाणे ज्ञानसागर, गुणकीर्ती, सोमसेन, जयसागर, चिमणा पंडित, सुमतिसागर, दिलसुख इत्यादी आपल्या काव्यरचनेत कुंथलगिरी क्षेत्राचे वर्णन केले आहे. परंतु यांनी कुंथलगिरी नाव वापरण्याऐवजी वांसिनयर, वंशगिरी, वंशाचल अशा नावाचा वापर केला आहे.[३९]

कुलभूषण-देशभूषण यांची माहिती आचार्य रविषेण लिखित पद्‌मपुराणाच्या एकोणचाळीसाव्या पर्वामध्ये पाहावयास मिळते. यानुसार हे दोघे मगध देशातील सिध्दार्थ नगराच्या क्षेमंकर राजा व विमला राणी याचे कुलभूषण-देशभूषण हे दोन पुत्र होते. या दोघांना सागरघोष या विद्‌वान गुरुकडे शिक्षणासाठी गुरुकूलात पाठविलेले होते.

विद्याग्रहण पूर्ण करुन ते आपल्या घरी परतल्यानंतर एका प्रसंगामुळे त्यांच्या जीवनाला वेगळे वळण मिळाले. विद्या ग्रहणानंतर ते जेव्हा घरी परतले तेव्हा त्यांना राजदरबारात दिसलेल्या सुंदर कन्येची इच्छा होते, तिच्याशी विवाह करण्याचे ठरवितात परंतु जेव्हा या दोघांना ती कन्या आपलीच लहान बहिण आहे असे समजताच त्यांना स्वतःबद्‌दल घृणा निर्माण होते. आपल्या मनाचा विकार ते ओळखतात हा विकार म्हणजेच हा संसार होय. म्हणून ते गृहप्रवेश, राज्याचा त्याग करतात व मुनीव्रत धारण करतात. ते भ्रमण करीत कुंथलगिरी पहाडावर पोहचून तपश्चर्या करतात. जैन पंरपरा असे ही सांगते की, या दोन मुनीचे उपसर्ग वनवास काळात भ्रमण करणा-या राम, लक्ष्मणाने सोडविले. म्हणूनच जवळच असलेल्या गावाचे नाव रामकुंड असे आहे. रामाने येथे

जिनालय ही उभारले होते असे येथे सांगितले जाते. याप्रमाणे या क्षेत्राची प्राचीन माहिती मिळते.[४०]

हे क्षेत्र सर्व धर्म मान्य आहे याचे उदाहरण म्हणजे निजाम सरकारने या क्षेत्र परिसरास 'अहिंसाभूमी' म्हणून घोषित केलेले होते. हा प्रदेश निजाम सरकारच्या नियंत्रणात होता. निजामाचे आदेश लिखित असलेले दगडी फलक येथे आजही पाहावयास मिळतात.[४१] हे क्षेत्र निसर्ग सौंदर्याने नटलेले आहे म्हणून जैन व जैनेतर दररोज मोठ्या संख्येने येथे येतात. प्रतिवर्षी येथे आचार्य शांतिसागर महाराजांची, पूज्य वृषभसागर व आर्यनंदी महाराजांची पुण्यतिथी साजरी केली जाते. या क्षेत्राचे व्यवस्थापन पाहण्यासाठी श्री दिगंबर जैन सिद्धक्षेत्र कुंथलगिरी या ट्रस्टीची स्थापना झाली आहे, या ट्रस्टी अंतर्गत कुलभूषण-देशभूषण ब्रम्हचर्याश्रम आणि गुरुकुल चालविले जाते. याच क्षेत्रावर देशभूषण कुलभूषण माध्यमिक शाळा आहे. सोलापूरातील ऐ. प. दि. जैन पाठशाळा संस्थेमार्फत शाळेचे व्यवस्थापन चालविले जाते.

या क्षेत्रावर वार्षिक उत्सव मार्गशीर्ष शुक्ल अकरा ते पंधरापर्यंत साजरा केला जातो यावेळी रथयात्रा निघते. भाद्रपद शुक्ल द्वितीया यावेळी शांतिसागरजीची पुण्यतिथी साजरी केली जाते. या उत्सवात तीन ते पाच हजार लोक सहभागी होतात. इ.स. २००५ मध्ये पंचकल्याणकाची स्थापना येथे झाली आहे. यावेळी दहा ते बारा हजार लोक त्यात सहभागी होते.

**(४) कुंडल :-**

कुंडल हे सिद्ध आणि अतिशयक्षेत्र सांगली जिल्ह्यात असून कुंडल या गावी कलिकुंड पार्श्वनाथाचे मंदिर आहे. कुंडलपासून तीन कि.मी. अंतरावरील पहाडावर झरी पार्श्वनाथ व गिरीपार्श्वनाथ गुफा मंदिरे आहेत. या क्षेत्रावर श्रीधर मुनीनी सिद्धत्व मिळवले म्हणून हे सिद्धक्षेत्र समजले जाते तर येथील कलिकुंड पार्श्वनाथाच्या आराधनेमूळे पद्मश्री राणीने आपला पती सत्येश्वरास आजारातून मुक्त केले होते म्हणून हे क्षेत्र अतिशयक्षेत्र समजले जाते.[४२]

कुंडल येथे जिर्णोद्धार केलेले तटबंदीयुक्त हेमाडपंती मंदिर आहे. हे कलिकुंड पार्श्वनाथ मंदिर म्हणून ओळखले जाते. या मंदिराच्या गर्भगृहातील वेदीवर पाच फूट चार इंच उंचीची भगवान पार्श्वनाथाची कृष्णवर्णीय पद्मासन ध्यानमुद्रेतील वाळूची मूर्ती आहे. डोक्यावर सप्तफणा नागाचे छत्र आणि दोन्ही बाजूस हाथ जोडलेल्या देवी दाखविलेल्या आहेत.

या मूर्तीच्या समोरच छोटी पार्श्वनाथाची मूर्ती असून मूर्तीवर वीर संवत् ९६४ असा उल्लेख आहे. मूलनायकाची दिवसातून तीन वेळा पूजा होते. सभा मंडपात डाव्या बाजूस मुकुट, गळाहार, कडा, भुजबंद युक्त धरणेन्द्र आहे तर पद्मावती मुकुट आणि हार धारण केले आहे. मंदिराच्या प्रांगणात जैनवीरास मिळालेले वीरगळ आणि इ.स. १९७८ मध्ये सापडलेली पार्श्वनाथाची मूर्ती असून मध्य ठिकाणी मानस्तंभ पाहावयास मिळते.

कुंडल गावापासून दोन किलोमीटर अंतरावर झरी पार्श्वनाथ पहाडावर गुंफा आहेत. या गुफांची लांबी सव्वीस फूट तर रुंदी तेरा फूट असून या गुफांच्या दोन भागात तीन फूट उंचीची पार्श्वनाथाची कृष्णवर्ण पद्मासनस्थ नऊ नागफणा छत्र असलेली प्रतिमा आहे. डाव्या बाजूस पद्मावतीची दोन फूट उंचीची कृष्णवर्णाची चतुर्भुजी मूर्ती आहे. हातामध्ये कमळ आणि त्रिशुल, डोक्यावर सप्तफणा छत्र, कानामध्ये कर्णफूल, गळाहार, भूजबंद आणि हातात कंकणे दिसतात. हे गुंफा मंडप सहा स्तंभयुक्त आहे या गुफेत, मंडपात आणि मूर्तीवर सतत पाणी पडते (झिरपते) म्हणून याला झरी पार्श्वनाथ म्हणतात. या गुफेच्या डाव्या बाजूस आणखी एक छोटी गुफा आहे. त्यात राम-लक्ष्मण-सीता आणि हनुमान मूर्ती आहे. या गुफेच्या ठिकाणी पाण्याने भरलेला कुंड पाहावयास मिळतो.

याच पहाडापासून वर चार किलोमीटर अंतरावर दुसरे पहाड असून याला गिरी पार्श्वनाथ टेकडी म्हणतात. येथे सपाट मैदानावर चरणचिन्ह दिसतात. याठिकाणी भगवान महावीरांचे समवशरण आले होते असे सांगितले

जाते. थोड्या अंतरावर जुने मंदिर असून वेदीवर तीन फूट उंचीचे पार्श्वनाथाची पद्मासनस्थ सप्तफणा नागाचे छत्रयुक्त, खांद्यावर चमरेंद्र असलेली मूर्ती दिसते. हे मंदिर डोंगराच्या माथ्यावर असल्याने या मंदिरास गिरी पार्श्वनाथ मंदिर म्हटले जाते, मंदिराच्या जवळ क्षेत्रपाल ही आढळतो.

कुंडल येथील मूर्तीपूजेसाठी ज्या गावातून दही पाठविले जात त्याचे नाव दह्यारी आहे. ज्या गावातून दूध पाठविले जात त्याचे नाव दुधारी आहे. ज्या गावातून फळे येत असत त्याचे नाव पलूस आहे. ही गावे आजही येथे पाहावयास मिळतात.[४३]

कुंडलचे प्राचीन नाव कौडिण्यपूर होते हा प्रदेश करहाटक (वर्तमान क-हाड) राज्याच्या अंर्तगत येत होते.[४४] क-हाड हे शस्त्रविद्या आणि शास्त्रविद्येचे केंद्र होते. या विद्याकेद्रांवर भरपूर विद्वान येत असत. यात जैन आचार्य समंतभद्र यांचा हि समावेश होता. येथे झालेल्या विवादात ते श्रेष्ठ ठरत.

कुंडल येथील दसलाड यांच्या बांधकामावेळी तीन ताम्रपट मिळाले आहेत. याचे वाचन इतिहास तज्ञ ग. ह. खरे यांनी केले आहे. यानुसार पहिले ताम्रपट राष्ट्रकूट नरेश गोविंद तृतीय (शक ७१७), तर दुसरे ताम्रपट पुलकेशिन विजयादित्य (शक ६१२), आणि तिसरे ताम्रपट कदंबवंशी मयूरवर्मन (शक १२१०) मध्ये दान दिलेल्या संदर्भात आहेत. या ताम्रपटावरुन बरीच माहिती समोर आली आहे. यातील सुरुवातीच्या पाच श्लोकांनंतर असे वर्णन आले आहे की, कंदबराजा कृतवर्मास आरशामध्ये स्वतःस पाहत असता डोक्यातील केस पांढरे झालेले पाहून त्यास वैराग्य आले त्यामूळे त्याने आपला पूत्र मयूरवर्मा यास राज्य सोपवून जैन मुनिदिक्षा घेतली.

यानंतर अम्बिका देवीची कथा असून, त्यात क-हाड राज्याचा, हैयवनवंशी हरिशचंद्र राजा आणि मयूरवर्मा राजाचा उल्लेख मिळतो. या ताम्रपत्रात जैन धर्मातील यापनीय संघाच्या उत्पत्तीची कथा मिळते. या संदर्भानुसार यापनीय संघाची स्थापना कल्याणी नगरामध्ये दुस-या शतकात

झाली. जैन धर्मामधून दिगंबर, श्वेतांबर पंथाची निर्मिती झाली. यामुळे काही समन्वयवादी जैनांनी यापनीय संघ स्थापित केले. या ताम्रपत्रात असा ही उल्लेख आहे की चालुक्य नरेश विजयादित्याने सातव्या शतकात कुंडल येथील विद्यापीठास काही गावे दान दिले होते. या ताम्रपटाच्या आधारे असे निष्कर्ष समोर येतात की कुंडल क्षेत्राशी चालुक्य, राष्ट्रकुट, कंदब या राजघराण्याचा संबंध होता.[४५]

कुंडल या क्षेत्राचा उल्लेख लिलोयपण्णति (इ.स. ४७८) निर्वाण भक्तीकांड, प्राकृत निर्वाण भक्तीकांड या प्राचीन साहित्यात ही सापडतो.[४६]

तेराव्या शतकात आचार्य श्रीमल आणि सोळाव्या शतकात आचार्य रत्ननंदी आपल्या जैन मुनिसंघासोबत येथे आले होते. इ.स. १९६३ मध्ये जैन आचार्य श्री देशभूषण आपल्या मुनी संघासह येथे आले होते.[४७]

बारामतीच्या शेठ शिवलालभाई प्रेमचंद लेंगरेकर यांनी १९५२ मध्ये श्री कलिकुंड पार्श्वनाथ दिगंबर क्षेत्र कुंडल ट्रस्ट स्थापन केले. कुंडल गावात आपले घर होते ते धर्मशाळेसाठी क्षेत्राला दान केले आहे.

बरीच वर्षे या क्षेत्रावर वार्षिक उत्सव, मिरवणूक होत नव्हती तेव्हा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सहकार्याने त्याची पुन्हा सुरुवात केली गेली ती आजपर्यंत चालू आहे.[४८] प्रतिवर्ष श्रावण महिन्यात शेवटच्या सोमवारी जलयात्रा असते. यात महिलांचा सहभाग अधिक असतो. या वेळी यात्रा भरते. या प्रमाणे वार्षिक उत्सव साजरा केला जातो.

### (५) <u>मुक्तागिरी</u> :-

मुक्तागिरी हे सिद्धक्षेत्र अमरावती जिल्ह्यात असून या क्षेत्रावरुन साडेतीन करोड मुनीनी सिद्धत्त्व प्राप्त केले म्हणून हे सिद्धक्षेत्र मानले जाते.[४९] या पहाडावर मंदिर समूह आहे येथे एकूण बावन्न मंदिरे आहेत. मुक्तागिरी पर्वतावर असलेली ही बावन्न मंदिरे एका विशिष्ट तीर्थंकरांची नसून ती वेगवेगळ्या तीर्थंकरांची असलेली दिसतात. त्यात पार्श्वनाथ मंदिर, आदिनाथ

मंदिर, चंद्रप्रभु मंदिर, रत्नत्रय मंदिर, महावीर मंदिर, पद्मप्रभु मंदिर, नेमिनाथ मंदिर, शांतिनाथ मंदिर, सुपार्श्वनाथ मंदिर, वासुपूज्य मंदिर, बाहुबली मंदिर, अजितनाथ मंदिर, कुंथुनाथ मंदिर, मेंढागिरी मंदिर, ऋषभनाथ मंदिर पाहावयास मिळतात. यापैकी पार्श्वनाथाची आठ, आदिनाथाची सहा, चंद्रप्रभुची आठ मंदिरे आहेत. ही सर्व मंदिरे यक्ष-यक्षी, चमरेंद्र, दुंदुभिवादक, चरणचिन्हे, शासन देवता आणि क्षेत्रपाल यांनी सजवलेली आहेत.

या प्राचीन मंदिरात मूलनायकांच्या प्राचीन मूर्ती आहेत. त्यात पार्श्वनाथाची संवत् १५४८, संवत् १९२०, संवत् १९४६, संवत् १९६७. आदिनाथाची संवत् १५४८, संवत् १९१०, संवत् १९४९, संवत् १९१९, संवत् १९६०. चंद्रप्रभुची संवत् १५४८, संवत् १६९६, संवत् १५३७, संवत् २४६९. नेमिनाथाची संवत् ९०४, शांतिनाथाची संवत् १५४८, सुपार्श्वनाथाची संवत् १९७०, महावीराची संवत् १९४७, अजितनाथाची संवत् १९६८, बाहुबलीची संवत् २४६९. म्हणजेच या सर्व मूर्ती विक्रम सवत् १५४५ ते विक्रम सवत् १९५० या काळात स्थापन केलेल्या दिसून येतात.

या मूर्ती पद्मासनस्थ, खड्गासनस्थ ध्यानमुद्रेत दिसतात. काही मूर्ती लांच्छनयुक्त, छातीवर श्रीवत्सयुक्त आणि मूर्तीलेखासोबत आढळतात. यापैकी ब-याच मूर्ती तत्कालिन जैन आचार्य मुनी यांच्याकडून स्थापन झालेल्या आहेत. शांतिनाथ मंदिर हे प्रतिक या क्षेत्रावर शांतिनाथाचे समवशरण आले होते असे सांगते. मेंढागिरी मंदिराच्या कथेनुसार या पहाडावर चरत असताना एक मेंढा खाली पडला तो जेथे पडला त्याजवळच जैन मुनी तपश्चर्या करीत होते. त्यांनी तो मेंढा पाहिला आणि त्याच्या कानात णमोकार मंत्र म्हटले त्यामुळे तो शांतपणे मरण पावला व त्याची मुक्ती झाली म्हणून या क्षेत्राला मेंढागिरीही म्हटले जाते.[५०]

या मुक्तागिरी सिद्धक्षेत्राचे वर्णन संस्कृत निर्वाण भक्तीकांड, प्राकृत निर्वाण भक्तीकांड यात आलेले आहे.

" अच्चललपूरवरणयरे णिव्वणगया णमो तेसि "

अचलपूर नगराच्या ईशान्येस असलेल्या मेढांगिरी पर्वतावरुन साडे तीन करोड मुनींनी सिद्धत्व मिळवलेले आहे.[५१]

भट्टारक गुणकीर्तीनी ही आपल्या मराठी भाषेतील तीर्थ वंदनेत "मेढांगिरी आहूढ कोडि मुनी सिद्धी पावले त्या सिद्धासि नमस्कारु माझा" असा उल्लेख केला आहे.[५२]

ज्ञानसागर, सुमतिसागर, चिमणा पंडित, सोमसेन जयसागर यांनी ही आपल्या रचनेत या क्षेत्रात उल्लेख केला आहे. [५३]

सतराव्या शतकातील भट्टारक ज्ञानसागर यांनी या क्षेत्राचे वर्णन असे केले आहे. [५४]

" मुक्तागिरी माहंत सिद्धक्षेत्र अतिसंतर
चैत्यतणी दो पंक्ति पूज स्वे गुणवंतर
धमसाल गुमाल मध्य जलधार वहंति
यात्रा करवा काज पंच रात्रि निबसंति
विविध चैत्य देखि करी हर्ष घणो मन ऊपजे
ब्रम्ह ज्ञानसागर वदति क्रम क्रम शिवपुरी संचरे "

चिमणा पंडिताने आपल्या तीर्थवंदनेत या क्षेत्राचे वर्णन करताना म्हटले आहे. "मेंढा उद्धरीला मुगता गिरीसा" चिमणा पंडित यांचा काळ सतरावे शतक आहे. या सोबतच अठराव्या शतकातील कवी राघव, एकोणिसाव्या शतकातील कवीन्द्रसेवक यांनी सुद्धा या घटनेचा उल्लेख आपल्या रचनेत केला आहे.[५५]

सतराव्या शतकातील काष्ठ संघाचे भट्टारक सुरेंद्रकीर्ती यांचे शिष्य भट्टारक धवजी यांनीही मुक्तागिरी रचना केली आहे.

राघव कवीच्या रचनेत सुद्धा मुक्तागिरी क्षेत्राचा उल्लेख आला आहे. साहित्यांचा आधार घेतला तर कुंदकुदाचार्यापर्यंत या क्षेत्राची प्राचीनता जाते.

ज्यांनी प्राकृत निर्वाण भक्तीकांड रचना केली होती या रचनेत ही या क्षेत्राचा उल्लेख येतो.[५६]

परंतु अचलपूर येथे मिळालेल्या ताम्रपटावरुन या क्षेत्राची प्राचीनता सिद्‌ध होते. या ताम्रपटाच्या आधारे या पर्वतावरील गुहा मंदिर मगध सम्राट श्रेणिक बिंबिसार यांनी निर्माण केले होते असे म्हणता येईल. मगध सम्राट श्रेणिक यांचा काळ अडीच हजार वर्षापूर्वीचा आहे. आणि ते भगवान महावीराच्या समकालीन होते. यानंतर ऐलिचपूरचा राजा ऐल याने या क्षेत्रास प्रसिद्‌धी मिळवून दिली.[५७] ही ताम्रपट आजही ताम्रपट ओडिसा येथील जैन मंदिरात आहेत. अशी माहिती येथील तीर्थक्षेत्रांवर मिळाली. सम्राट खारवेलच्या खंदारगिरी-मंदारगिरी येथे ताम्रपटातही यांचा उल्लेख मिळतो, असे येथे सांगितले जाते. येथील मंदिरातील भिंतीवर मजकुर मोडी लिपीत बेत्तुल जिल्ह्याच्या गॅझेटमध्येही या तीर्थक्षेत्रासंबंधी बरीच माहिती मिळते.

तवारिख-ए-अमजदिया या ग्रंथात मुक्तागिरीविषयी उल्लेख सापडतो की, ऐल राजाने धर्म सभेत एका मुस्लिम फकीरास चर्चेत पराभूत केले. तेव्हा या फकीराने गझनीच्या मुस्लिम राजास ऐल राजावर आक्रमण करण्यास सांगितले. तेव्हां गझनीहून अब्दुल रहमान यांनी आपल्या विवाह समारंभातून बाहेर पडून तात्काळ ऐलिचपूरवर आक्रमण करण्यास निघाला. या आक्रमणाची पूर्व कल्पना राजा ऐल यास आली त्यामुळे त्याने आपला सर्व खजिना या मुक्तागिरी पहाडात लपविला.

राजा ऐल हा राष्ट्रकुट राजा इंद्र तृतीय याचा सामंत होता. तर अब्दुल रहमान हा गझनीचा भाचा होता. गझनीने अब्दुल रहमान यास विदर्भ किंवा ऐल राज्यावर आक्रमणासाठी पाठविले होते. परंतु या युद्‌धात दोघांचाही मृत्यु झाला. अल्लाउद्‌दीन खिलजीने ही या ऐलिचपूरवर हल्ला केला होता. याप्रमाणे या क्षेत्रांशी संबंधित ऐतिहासिक घटना सांगितल्या जातात. ही लढाई झालेल्या प्रदेशावर आज बहरम नाव असलेले गाव वसले आहे.[५८]

या क्षेत्रावर भट्टारक परमनंदी, मुनी महेंद्रसागर यांनी या क्षेत्राला भेट दिली होती. इ.स. १९६९ मध्ये पंचकल्याणक प्रतिष्ठा केली गेली. येथील व्यवस्थापन श्री दिगंबर जैन सिद्धक्षेत्र मुक्तागिरी ट्रस्टीमार्फत पाहिले जाते. येथे एकशे तीस खोल्या असलेली धर्मशाळा आहे. येथे कार्तिक शुक्ल तेरा ते पंधरा या दरम्यान वार्षिक उत्सव साजरा केला जातो.

- **<u>अतिशयक्षेत्रे</u> :-**

प्राचीन इतिहास असलेली जैन मंदिर आणि मूर्ती जैन मुनींचा सहवास लाभलेल्या, त्या क्षेत्रावर चमत्कार (अतिशय) असणारी अतिशयक्षेत्रे महाराष्ट्रात कुम्भोज (बाहुबली), जिंतुर (नेमगिरी), शिरपूर, कारंजा, रामटेक, तेर, शिरड-शहापूर, नवागढ (उखळद), कचनेर, जटवाडा, पैठण, भातुकली जैन, काटी सावरगाव, आष्टा-कासार, दहिगाव, कौडण्यपूर, बाढौणा रामनाथ, पंचालेश्वर (नंदीश्वर), विजयगोपाल, कोठाळा, आसेगाव, मांडल, केसापूरी, कुन्थुगिरी ही आहेत.[५९]

**१) <u>कुम्भोज (बाहुबली)</u> :-**

बाहुबली हे अतिशयक्षेत्र कोल्हापूर जिल्ह्यात असून हे क्षेत्र निसर्ग सौंदर्याने संपन्न आहे, या क्षेत्रास पर्यटन क्षेत्राचा दर्जाही मिळाला आहे. या क्षेत्रावरील मुख्य मंदिर पहाडावर असून वर जाण्यासाठी तीनशे पन्नास पाय-या आहेत.

दोन हत्ती प्रतिमांनीयुक्त असलेल्या पन्नास पाय-या चढल्यानंतर डाव्या बाजूस बाहुबलीची अठ्ठावीस फूट उंचीची आठ फूट रूंद, चार फूट जाड, तीस टन वजनाची श्वेत पाषाणाची खड्गासनातील मूर्ती आहे. या मूर्तीची स्थापना इ.स. १९६३ मध्ये केली आहे. या मूर्तीस महामस्तकाभिषेक केला जातो आणि येथे चाळीस फूट उंचीचा मनोरा आहे.[६०]

पहिला महामस्तकाभिषेक इ.स. १९६३ मध्ये, दुसरा महामस्तकाभिषेक इ.स. १९७० मध्ये, तिसरा रौप्यमहोत्सव महामस्तकाभिषेक इ.स. १९८९ मध्ये, चौथा महामस्तकाभिषेक इ.स. २००१ मध्ये, पाचवा नैमैत्तिक महामस्तकाभिषेक इ.स. २००९ मध्ये तर सहावा सुवर्ण महोत्सवी महामस्तकाभिषेक इ.स. २०१५ मध्ये झाला.

जवळच सहा वेदी बनविलेल्या असून ज्यात मांगी-तुंगी, मुक्तागिरी, गजपंथा, तारंगा, सोनगिरी आणि पावागिरी या सिद्‌धक्षेत्राची पाषाण प्रतिकृती बनविलेली दिसते. पंधरा फूट उंचीचे कैलास पर्वत प्रतिमा बनविलेल्या असून ज्यावर बहात्तर मंदिराकृती दिसतात. ज्यात गिरनार, समेद्‌दशिखर, छत्री, श्रृतस्कंध, रत्नत्रय मंदिर, काचेचे समवशरण, ऋषभदेव मंदिर यांची रचना आहे. या सर्व प्रतिमांची रचना इ.स. १९७० मध्ये केली आहे. जवळच बत्तीस फूट उंचीचे मानस्तंभ आणि सभा मंडप आहे.

येथून पुढे वर जाण्यासाठी पाय-या आहेत, ह्या घडविलेल्या दगडी पाय-या आहेत, ज्यांची उंची आठ ते दहा फूट आहे. या पाय-यावरुन वर चढल्यानंतर पहाडावरील मंदिरापर्यंत पोहोचतो. पहाडावर बाहुबली स्वामीचे मंदिर असून त्यात बाहुबलीचे चरणचिन्ह आहेत, यामुळेच हे क्षेत्र बाहुबली क्षेत्र म्हणून ओळखले जाते.

मंदिरात चारभुजा पद्‌मावती, सरस्वती आणि षोडषभूजा ज्वालामालिनीच्या मूर्ती, यक्ष-यक्षीयुक्त असून येथे पाषाणाच्या एकोणीस आणि चार धातूच्या मूर्ती आहेत येथे समोर मानस्तंभ आहे. मागील प्रांगणात या क्षेत्रावरील महत्त्वपूर्ण असलेली सात फूट उंचीचे काळ्या पाषाणाची बाहुबलीची मूर्ती आहे. यावर 'शके १०७८ नलगाम संवस्तरे वैशाख सुदी १० बुधवार' असे कोरलेले आहे. म्हणजेच ही मूर्ती अकराव्या शतकातील आहे.[६१]

येथे बाहुबली मंदिर इ.स. १९४९, महावीर समवशरण व श्री कुंदकुंद जिनागम मंदिर इ.स. १९५७, पंच निर्वाण भूमी पंचकल्याणक इ.स. १९७०, श्री

जिनबिंब विराजमान वेदी प्रतिष्ठा इ.स. १९७१, गंधकुटी वेदि प्रतिष्ठा आणि कीर्तीस्तंभ इ.स. १९७५, स्वयंभू मंदिर वेदि प्रतिष्ठा इ.स. १९७६, श्री गणधर आचार्य पादुका स्थापना इ.स. १९७९ मध्ये झाली तर सिद्धक्षेत्र प्रतिकृती प्रतिष्ठापना इ. स. १९८२, आचार्य श्री शांतिसागर प्रतिमा अनावरण इ.स. १९८४, पार्श्वनाथ प्राचीन मूर्ती प्रतिष्ठापना इ.स. १९८७, आचार्य संमतभद्र चरण पादुका प्रतिष्ठापना इ.स. १९९० मध्ये झाली आहे. सोबतच क्षुल्लिका पार्श्वमती आणि वर्धमानसागर, संमतभद्र, शांतिसागर यांचे चरण चिन्ह आहेत.

आळते गावात जैन मंदिरात मिळालेल्या दानपत्रामध्ये या क्षेत्राविषयी उल्लेख मिळतो.

'' जयत्सनन्तसंसार पारावारैकसेतव :

महावीराहेतं : पूतारचरणाम्बुजरेणाव : ''

हे दानपत्र शके ४११ म्हणजे इ.स. ४८८ सालचे आहे यात चालुक्य राजा जयसिंह यांचा सामियार हा जैन सामंत होता. हा कुहुण्डी या जिल्ह्यावर शासन करीत असून ह्या जिल्ह्यात सुमारे सातशे गावे होती, त्यापैकी आळते हे एक प्रधान गाव होते, म्हणून त्याने तेथे एक जैन मंदिर बांधले आणि काही गावे त्याकरिता दान दिली. पाचव्या शतकातील या दानपत्रात परिसरातील गावांचा नामोल्लेख असा आला आहे.

'' दावनवल्लिनामग्रामे पश्चिमस्यां दिशि अलक्तकनगर

कुम्बयिजनामग्रामार्ग्गमध्ये बिम्बालय पिशाचारामात्पश्चिमे

राजमाणेन चत्वारिंशन्निवर्तनं क्षेत्रम् ''

दावनवल्ली (दानोळी) या गावाच्या पश्चिम दिशेला अलक्तक (आळते) हे गाव आहे आणि या दोन गावाच्यामध्ये कुम्बजिय (कुंभोज) हे गाव आहे.[६२]

भारतातील दिगंबर जैन समाजाची प्रथम डिरेक्टरी म्हणून लोकप्रिय असणारी 'दिगंबर जैन डिरेक्टरी' १९१४ साली प्रकाशित करण्यात आली.

तत्कालिन प्रांत रचनेनुसार ‘श्री अतिशयक्षेत्र बाहुबली’ हे तीर्थक्षेत्र मुंबई प्रांतात येत असल्याने ‘बम्बई अहाता’ या प्रकरणात या क्षेत्राचे वर्णन पृष्ठ क्रमांक ७५० वर पुढील प्रमाणे आले आहे. कुंभोज गावात दिगंबर जैन लोकांची ३१३ घरे आणि सुमारे १०१९ जैनांची लोकसंख्या असून शिखरबद्ध आठ जिन मंदिर आणि एक चैत्यालय आहे. गावाजवळील पहाडावर पाच जैन मंदिरे असून पहाडावर जाण्यास पाय-या आहेत. त्याच्या वरच्या बाजूला दक्षिणेकडे सोळा खांबी कलापूर्ण मंदिर असून बाहुबली स्वामींच्या चरण पादुका असणारे मंदिर आहे. पाच हजार लोक राहतील अशी धर्मशाळा आहे. त्याच्या पश्चिमेस तीन शिखरबद्ध पाषाणाचे मंदिर आहे. अनुक्रमे आदिनाथ, वर्धमान आणि शांतिनाथ यांच्या जिन प्रतिमा आहेत, याच्या दक्षिणेस जलकुंड आहे, त्याच्या दक्षिणेस जीर्ण अवस्थेतील पंडित निवास आहे, जवळच एक जिन मंदिर आहे. तसेच श्री बाहुबलीची खंडित प्रतिमा आहे, त्यावर ‘‘शके १०७८ नलनाम संवत्सरे वैशाख सुदी १० बुधवार श्रुतसागर’’ असा उल्लेख केला आहे.[६३]

बाहुबली क्षेत्रावरील मूर्त्यांमध्ये काही मूर्ती या वैशिष्ट्यपूर्ण आणि प्राचीन दिसून येतात. पुरावशेष खात्याने त्याचे प्राचीनत्त्व स्पष्ट करणारे प्रमाणपत्र दिले आहे. पुरावशेष व मूल्यवान कलाकृती नियमानुसार संबंधित खात्याने बावीस प्रमाणपत्रे बाहुबली दिगंबर जैन कमिटीला दिली आहेत, त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.[६४]

**तक्ता क्रमांक - १**

**२२ जैन मूर्ती व त्यांचा काळ**

| अ.क्र. | मूर्तीचे नाव | पाषाण प्रकार | कालनिर्णय |
|---|---|---|---|
| १. | चंद्रप्रभु | काळ्या दगडात | १४ - १५ वे शतक |
| २. | शांतिनाथ | काळ्या दगडात | १४ - १५ वे शतक |
| ३. | पद्‍मावती देवी | काळ्या दगडात | १४ - १५ वे शतक |
| ४. | पद्‍मावती देवी | काळ्या दगडात | १४ - १५ वे शतक |
| ५. | ज्वालामालिनी देवी | काळ्या दगडात | १४ - १५ वे शतक |
| ६. | ज्वालामालिनी देवी | ब्रांझ | १०० वर्षे |
| ७. | पादुका मंदिर | दगडी | १२० वर्षे |
| ८. | आदिनाथ | मार्बल | १२० वर्षे |
| ९. | शीतलनाथ | मार्बल | १२० वर्षे |
| १०. | शीतलनाथ | मार्बल | १२० वर्षे |
| ११. | चंद्रप्रभु | मार्बल | २०० वर्षे |
| १२. | चौबीसी | मार्बल | १५ - १६ वे शतक |
| १३. | चौबीसी | मार्बल | १५ - १६ वे शतक |
| १४. | पार्श्वनाथ | मार्बल | १७ वे शतक |
| १५. | पंचपरमेष्ठी | मार्बल | १५ - १६ वे शतक |
| १६. | महावीर | मार्बल | १५ - १६ वे शतक |
| १७. | पद्‍मप्रभु | मार्बल | १५ - १६ वे शतक |
| १८. | चंद्रप्रभु | मार्बल | १७ वे शतक |
| १९. | पादुका | मार्बल | २२० वर्षे |
| २०. | बाहुबली | दगडी | १५ - १६ वे शतक |
| २१. | सहस्त्रकुट चतुर्मख | दगडी | १५ - १६ वे शतक |
| २२. | आदिनाथ | दगडी | १४ - १५ वे शतक |

संदर्भ :- पुरावशेष खाते, कोल्हापूर, सर्टिफिकेट नंबर KOL / 129 / TO / KOL / MH /१५०.

इ.स. १८४५ च्या सरकारी मोजणीत या डोंगराचीही मोजणी घेऊन त्याचा डागवार नंबर ५७९ असा पडल्याचा उल्लेख डागवार मोजणीच्या सरकार दप्तरात सापडतो. त्या मोजणीच्या कागदात 'डोंगर खडकी निरवान बाबाचा' असा उल्लेख असून 'निर्वाण बाबा जैन स्वामी मठ नांदणी' याने डोंगराच्या माथ्यास झाडे लावण केली असा ही उल्लेख मिळतो. इ.स. १८४५ पूर्वी या डोंगरावरील देवळांची व्यवस्था जैन गुरु जिनसेन भट्टारक पट्टाचार्य महास्वामी मठ नांदणी यांच्याकडून होत होती.

या क्षेत्रास बाहुबली असे नामकरण तीनशे वर्षापूर्वी झाले, कारण सांगली जिल्ह्यातील मौजे नांद्रे येथील गृहस्थाश्रमातील बाळगोंडा पाटील की ज्यांना अकरा प्रतिमापूर्वक मुनिधर्म स्वीकारल्यानंतर 'बाहुबली महाराज' हे नामाभिधान प्राप्त झाले. या बाहुबली महाराजांच्या वास्तव्यामुळे व या डोंगरावरील त्यांच्या सल्लेखनापूर्वक समाधीमरणामुळे पावन झालेल्या या डोंगरास 'बाहुबलीचा डोंगर' अशी संज्ञा प्राप्त झाली आहे.[६५]

या क्षेत्रावर यानंतर अनेक मुनींचा आश्रय होता, परंतु त्याचे उल्लेख मिळत नाहीत. परंतु इ.स. १८५० च्या सुमारास कर्नाटकातील मुडबिद्री येथील कमलाकर नावाचे दिगंबर मुनी येथे राहिले होते असे संदर्भ मिळतात. त्यानंतर कर्नाटकातील म्हहिसवाड येथील सिद्धसागर महामुनींनी येथे इ.स. १९०६ मध्ये समाधी साधली त्यांचे येथे चरणचिन्ह आहेत.

यानंतर समंतभद्र, विद्यानंद, महाबल, वीरभद्र, सुमेरु सागरजी, विजयभद्र, विद्याभूषण, चारुकीर्ती, लक्ष्मीसेन, श्रीभद्र, ज्ञानमती माताजी, सुप्रभमती माताजी, रविंद्रकीर्ती भट्टारक यांचा या क्षेत्रास सहवास आणि मार्गदर्शन लाभले.

या क्षेत्र विकासात अनेक व्यक्तींची नावे येतात, त्यात प्रामुख्याने कल्लाप्पा निटवे, दादा घोदे, भाऊराव कुदळे, चंद्रसागर, देवचंदजी, अनंतराव औरवाडे यांचा उल्लेख होतो यांच्या कार्याचे परिणाम म्हणजे या क्षेत्रावर १३

जुलै १९३४ रोजी श्री बाहुबली ब्रम्हचर्याश्रमाची स्थापना झाली. या गुरुकुलास श्री जिनसेन भट्टारक यांनी डोंगर पायथ्याशी असलेली अठ्ठावीस एकर जमिन दिली. या शैक्षणिक कार्यासाठी जैन मुनी शांतिसागर, पद्मसागर, आदिसागर, वर्धमानसागर, देशभूषण, विद्यानंद, अनंतकीर्ती, महाबल, आर्यनंदी यांनी मार्गदर्शन व मदत केली आहे.[६६]

जैन मुनी समंतभद्र यांनी या क्षेत्राची विशेष प्रगती केली आहे. समंतभद्र महाराजांच्या जीवनावर स्वामी विवेकानंद यांचा प्रभाव होता. त्यांनी लोकमान्य टिळकांच्या सोबत स्वातंत्र्य लढ्यातील विविध कार्यातही सहभाग घेतला होता. स्वातंत्र्य लढ्याकरिता नवयुवकांची संघटना स्थापन केली होती. तसेच या क्षेत्रावर शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यास मार्गदर्शन केले.

या क्षेत्रावरील प्रमुख आकर्षण असलेल्या बाहुबली मूर्ती स्थापनेस दोन वर्षाचा कालावधी लागला, तशी ही भव्य मूर्ती इ.स. १९६० मध्येच मकरानहून येथे आणली होती परंतु त्याची स्थापना झालेली नव्हती. त्यातच इ.स. १९६२ मध्ये भारतावर चीनने आक्रमण केले, यामुळे संपूर्ण भारतभर चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या वातावरणाचा परिणाम या बाहुबली मूर्ती स्थापनेवर ही झाला. आपल्या देशावर आलेल्या अशा परिस्थितीत उत्सव-समारंभ साजरा करणे योग्य ठरणार नाही, म्हणून या मूर्तीची स्थापना दोन वर्षे उशीरा म्हणजे इ.स. १९६३ मध्ये झाली.[६७]

या क्षेत्रावर काही महत्त्वाच्या व्यक्ती आलेल्या होत्या, त्यात इ.स. १९५६ मध्ये या क्षेत्रावर शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे 'जैन धर्मातील अपरिग्रह' या विषयावर भाषण झाले. त्यावेळी त्यांनी जीवनाचे ध्येय आत्मशुद्धी हेच आहे व ही विशुद्धी अपरिग्रह तत्त्वाच्या अवलंबनाशिवाय शक्य नाही, असे सांगून त्यांनी प्रत्यक्षकृती म्हणून यापुढे आजीवन दोन धोतर व दोन अंगरखे याशिवाय अधिक परिग्रह जवळ न बाळगण्याचा आपला कृतनिश्चिय जाहीर केला.

५ फेब्रुवारी १९६३ मध्ये गुरुकुलाचा रौप्य महोत्सवावेळी तत्कालिन मुख्यमंत्री दादासाहेब कन्नमवार उपस्थित होते तर इ.स. १९८३ मध्ये तत्कालिन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी या क्षेत्रावरील दिगंबर-श्वेतांबर वाद आणि नेज डोंगरावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्थापनेच्या वादावरुन जैन मुनी ऐलाचार्य यांची या क्षेत्रावर भेट घेण्यास आले होते.[६८]

तसेच इ.स. २००१ मध्ये भगवान महावीरांचे २६०० वे जन्मकल्याणक महोत्सवामुळे भारताचे तत्कालिन पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावर भगवान महावीर यांचा जन्मकल्याणक महोत्सव साजरा करण्यात आले. त्यावेळी केंद्रीय पर्यटनमंत्री व सांस्कृतिक मंत्री श्री अनंतकुमार यांनी अधिकृतपणे घोषणा केली होती की, दिनांक ०६ एप्रिल २००१ पासून सुरु होणारा भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव संपूर्ण वर्षभर चालावा तसेच हे 'अहिंसावर्ष' म्हणून समजले जावे. यानुसार या क्षेत्रावर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

इ.स. २००१ मध्ये बाहुबलीच्या महामस्तकाभिषेका वेळी तत्कालिन मुख्यमंत्री विलासराव देशमुख या समारंभात उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात या क्षेत्राची स्तुती करुन लवकरच हे क्षेत्र 'अहिंसाभूमी' म्हणून जाहीर करणार असे वचन दिले होते.[६९]

या क्षेत्रावर शैक्षणिक कार्य करणारी बाहुबली ब्रम्हचर्याश्रम आणि गुरुकुल संस्था इ.स. १९३४ मध्ये स्थापन झाली आहे तर बाहुबली विद्यापीठ इ.स. १९५७ तर संशोधनात्मक कार्य करणारी संस्था अनेकांत शोधपीठ इ.स. १९८९ मध्ये झाली. कन्नड, मराठी, इंग्रजी भाषेतून 'सन्मती' नावाचे मासिक प्रकाशित होते. इ.स. २००० मध्ये यांनी सुवर्ण महोत्सव वर्ष साजरा केला.

या क्षेत्रावर दरवर्षी कार्तिक शुक्ल पोर्णिमेला आणि मार्गशीर्ष कृष्ण एक मध्ये यात्रा भरते. पहिल्या दिवशी गुरुकुलाचा उत्सव असतो तर दुस-या दिवशी रथयात्रा निघते.

## २) <u>जिंतुर (नेमगिरी)</u> :-

जिंतुर - नेमगिरी हे अतिशयक्षेत्र परभणी जिल्ह्यात असून जिंतुर येथे दोन जैन मंदिरे आहेत. तेथून तीन किलोमीटर अंतरावर नेमगिरी पहाडावर गुफा मंदिर आहे. गावामधील साहुका महावीर मंदिर आणि जुने महावीर मंदिर ही दोन्ही मंदिरे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

साहुका महावीर मंदिरात एक हजार पेक्षा जास्त जिन मूर्ती असून जिंतुरमधील आज नष्ट झालेल्या जैन मंदिरातील मूलनायकांच्या मूर्ती येथे सुरक्षित ठेवल्या आहेत. या मूर्तीवर मिळालेल्या लेखानुसार शक संवत्[B] १५४१ मध्ये काष्ठसंघ भट्टारक नरेन्द्रकीर्ती त्यांचे शिष्य हेमेन्द्रकीर्ती त्यांचे शिष्य प्रतापकीर्ती यांनी यांची स्थापना केली आहे.

या मंदिराच्या इतिहासातील आणखीन एक घटना महत्त्वाची आहे, हे मंदिर निजामाच्या रझाकारांनी आपल्या ताब्यात घेतले होते, त्याचे परिवर्तन मस्जिदीमध्ये करण्यात आले. परंतु हैद्राबाद संस्थान भारतात विलिन झाल्यानंतर भारत सरकारने हे मंदिर जैन समाजाच्या ताब्यात दिल्यानंतर या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला.[७०]

जुने महावीर मंदिरात अंगावर वेली चढलेली खड्गासनातील पार्श्वनाथाची मूर्ती आणि पद्मावतीची चतुर्भुज अलंकृत केलेली शक संवत् १५१४ मधील मूर्ती आहे. जिंतुरपासून तीन किलोमीटर अंतरावरील नेमगिरी पहाडावर वैशिष्ट्यपूर्ण गुहेत अतिशय आकर्षक व भव्य अशा जैन मूर्ती सुरक्षित ठेवलेल्या दिसतात. या सहा गुहा एका मंदिरात असून मंदिरास तटबंदी असून त्यात प्रवेश करण्यासाठी मार्ग आहे. गुहेत काही पाय-या उतरुन गेल्यास आदिनाथाची दोन फूट उंचीची श्याम वर्ण पद्मासनस्थ मूर्तीच्या खांद्यावर वाढलेले जटा असून या मूर्तीस लांच्छन नाही, परंतु वाढलेल्या जटेवरुन ही आदिनाथाची मूर्ती समजली जाते.[७१]

पुढे चार पाय-या उतरल्यानंतर गुहेत पाच फूट उंच आणि चार फूट लांबीची शांतिनाथाची पद्‌मासनस्थ मूर्ती असून मूर्तीच्या छातीवर श्रीवत्स नाही, कान खांद्यांना चिटकलेले आहेत. यापुढे गेल्यानंतर नेमिनाथाची सात फूट उंचीची पाच फूट लांबीची श्याम वर्ण पद्‌मासनस्थ मूर्ती आहे. या मूर्तीच्या छातीवर श्रीवत्स, कान खांद्यांना चिटकलेले, जटा खांद्यापर्यंत वाढलेल्या आहेत. मूर्तीच्या बाजूस तीन स्त्री, तीन पुरुष भक्ताची रचना, सिंह प्रतिमा आणि राष्ट्रकुटांचे राजचिन्ह दिसते.

याच्या मागील गुहेत पद्‌मासनस्थ पार्श्वनाथाची नऊ नागफणा छत्र असलेली पाच फूट उंचीची आणि चार फूट लांबीची पाषाणाची मूर्ती असून पाठीवर सर्पवलय बनलेले आहे, छातीवर श्रीवत्स चिन्ह दिसते. ही भव्य मूर्ती केवळ तीन इंचाच्या पाषाणावर आधारलेली आहे, म्हणून या मूर्तीस अंतरिक्ष पार्श्वनाथ म्हणतात.[७२]

या गुहेतून वर चढल्यास चैत्यस्तंभ आणि बाहुबलीची खड्‌गासन मूर्ती पाहावयास मिळते. ही मूर्ती चार फूट उंच असून मूर्तीवर वेली, सर्प चढलेल्या, डाव्या व उजव्या खांद्यावर नागफणा दाखविल्या आहेत. या गुहेच्या आत प्रवेश केलेल्या मार्गाने आपण परत बाहेर येतो.

या मंदिराच्या समोरील बाजूस पहाड असून या पहाडावर चरणपादुका आणि राजुलमतीचे मंदिर असलेले चंद्रगुहा आहे. या पहाडावरील मूर्तीलेखानुसार हे मंदिर नांदगाव निवासी जस्सू संघवी परिवाराने मंदिराचा सोळाव्या शतकात जीर्णोद्‌धार केला. या मूर्तीची स्थापना भट्टारक कुंदकुंदाचार्य यांच्याकडून झाली आहे.

या मूर्ती लेखावरुन या मूर्तीची स्थापना शक १५३० फाल्गुन शुद्‌ध पाच मध्ये करण्यात आलेली आहे. हा मूर्तीलेख परिशिष्ठ क्र. ६ मध्ये दिलेला आहे.

तेराव्या शतकात जिंतुर येथील तेरा जैन मंदिरे नष्ट झाली. जिनपूर नावाने ओळखले जाणारे हे शहर जिंतुर या नावाने ओळखले जाऊ लागले. या

गुफा या मूर्ती सुरक्षित राहाव्या म्हणून निर्माण केल्या आहेत असे येथे सांगितले जाते.

जिंतुरच्या मस्जिदीत तेराव्या शतकातील जिंतुर संदर्भात काही कागदपत्रे सापडली त्यानुसार सैदुल कादरी अफगाणिस्तानातून दिल्ली येथे आला. तो दिल्लीतून अजमेर येथे ख्वाजासाहब यांच्या दरबारी पोहचला. तेथे अजमेरच्या वलीने आदेश दिला की, तुम्ही जैनपूर येथे जा तेथे मजबूत किल्ला असून जैन मंदिर आहेत ती नष्ट करा.

वलीच्या आदेशानुसार कादरी अजमेरहून खुलताबाद मार्गे जिंतुर येथे आला. तेथे यमराज आणि नेमिराज हे राज्य करीत होते. कादरीने गुलबर्ग्यातील आलमगिर सैन्याच्या सहाय्याने हा प्रदेश ताब्यात घेतले आणि तेथील मंदिरे नष्ट केली.[७३]

परंतु आज या नेमगिरी पहाडावर आकर्षक व भव्य मूर्ती सुरक्षित आहेत. पहाडावरील हे क्षेत्र निसर्गसंपन्न असून तेथे शांतता व पावित्र्याचा अनुभव घेता येतो. म्हणून या पहाड क्षेत्रावर जैन व जैनेत्तर मोठ्या संख्येने येतात. या क्षेत्रावर वार्षिक उत्सव भाद्रपद शुद्ध पाचमध्ये साजरा केला जातो. यावेळी यात्रा भरते, पालखी मिरवणूक काढली जाते, श्रावण सुदी सहा या नेमिनाथाची तपकल्याणक दिना वेळी या क्षेत्रावर विशेष पूजा असते.

**३) <u>शिरपूर</u> :-**

शिरपूर हे अतिशयक्षेत्र वासिम जिल्ह्यात असून शिरपूर येथे हेमाडपंथी मंदिर आहे. या मंदिरातील विहिरीच्या पाण्याने स्नान केल्यामुळे ऐल राजा श्रीपाल याचा कुष्ठरोग बरा झाला होता आणि या मंदिरातील मूलनायक पार्श्वनाथाची मूर्ती हवेत तरंगत होती म्हणून हे क्षेत्र अतिशय समजले जाते.[७४]

येथील जुने मंदिर श्रीपाल राजाने बनविले होते असे येथे सांगितले जाते. परंतु काळानुरुप आज या मंदिराचे जिर्णोद्धार करण्यात आले आहे.

या मंदिराला पोबली मंदिर म्हटले जात असून पोबली हा शब्द मराठी पोल शब्दापासून बनलेला आहे, 'पोल' याचा अर्थ माती व खडीचा वापर न करता बनविलेले मंदिर होय या पोल शब्दाचा 'पोबली' असा अपभ्रंश झाला असावा.

मंदिरास पूर्व, उत्तर, दक्षिण दिशेस प्रवेशद्वार असून या प्रवेशद्वारावर खड्गासन, पद्मासनातील जिन दाखविले आहेत. दक्षिण द्वारावर तीर्थंकरांचे जीवन कोरलेले असून पूर्वेकडील द्वारावर दोन शिलालेख पाहावयास मिळतात. शिलालेखावरील मजकूर परिशिष्टामध्ये दिलेला आहे.

मंदिरात गर्भगृह, सभा मंडप असून गर्भगृहातील वेदीवर तीन फूट सहा इंच उंचीची पद्मासनस्थ पार्श्वनाथाची पाषाण मूर्ती आहे, डोक्यावर नऊ नागफणा छत्र, छातीवर श्रीवत्स, कान खांद्याला चिटकलेले दिसतात. ही मूर्ती संवत् १४५७ मध्ये स्थापन केली आहे. या मूलनायकाची दररोज तीन वेळा पूजा केली जाते. मूर्ती सोबतच येथे बत्तीस पाषाणाच्या मूर्ती आणि चार धातूच्या मूर्ती आहेत.

गर्भगृहाच्या द्वारावर जिन आणि देव-देवता कोरलेल्या असून सोबतच सुंदर नक्षीकाम केले आहे. अंतराळात महावीर, चंद्रप्रभु आणि जिन मूर्ती दिसतात. संवत् १५४५ मध्ये स्थापन केलेली पार्श्वनाथ मूर्ती आहे. याच मूर्तीच्या मागे हत्तीवर बसलेला इंद्र, यक्ष-यक्षी, धरणेन्द्र आणि पद्मावती दाखविली आहे. चरणाखाली ऐरावत हत्ती, धरणेन्द्र, दोन चैत्यस्तंभ, सर्वतोभद्र प्रतिमा, भट्टारक शांतिसेन, जिनसेन आणि भट्टारक शिष्यांच्या समाध्या ही पाहावयास मिळते.

शिरपूर गावामध्ये पार्श्वनाथाचे मंदिर असून वेदीवर तीन फूट आठ इंच उंच आणि दोन फूट आठ इंच लांबीची पद्मासन अवस्थेतील कृष्णवर्ण मूर्ती अतिशय संपन्न अशी आहे. मूर्तीच्या डोक्यावर नागफणा सुशोभित केला आहे. या मंदिराची निर्मिती ऐल राजा श्रीपाल यांनी केली असे मत जैन परंपरेचे

आहे.[७५] परंतु या मूर्तीबाबत ब-याच जैन साहित्यात उल्लेख मिळतो की, ही मूर्ती राजा खरदुषण यांनी स्थापन केली आहे.[७६]

जैन पुराण चारुदत्त चरित्रात या क्षेत्राचे वर्णन मिळते. तसेच सोळाव्या शतकात लक्ष्मण नावाच्या कवीने आपल्या 'श्रीपूर पार्श्वनाथ विनती' रचनेत या घटनेचा उल्लेख केला आहे.

''लंकानयरी रावण करे राज्य । चन्द्रनखा भगिनी भर तार ।।
खरदुषण विद्याधर धीर । जिनमुख अवलोकनव्रत धरेधीर ।।
वसंत मास आयो तिह काल । क्रीडा करन चाल्यो भूपाल ।।
लागी तृषा प्रतिमा नहि संग । बालुतनु निर्मायो बिंब ।।
पूजि प्रतिमा जल लियो विश्राम । राख्यो बिंब कुपनि ठाम ।।''

या रचनेला आचार्य लावण्यविजय हे श्वेतांबर आचार्यांनीही मान्यता दिली आहे.[७७]

प्राकृत निर्वाण भक्तीकांडमध्येही या क्षेत्राचे वर्णन आले आहे.

' पासं सिरपूरि वंदमि' म्हणजेच - मी सिरपूर पार्श्वनाथास वंदन करितो.

भट्टारक उदयकीर्तीनी रचलेली अपभ्रंश निर्वाण भक्तीकांडातही या क्षेत्राचे वर्णन आले आहे.

' अरु वंद उँ सिरपरि पासणाहु ।
जो अंतरिक्ख थिड णाणलाहु ।। '

म्हणजेच यात पार्श्वनाथाची मूर्ती अधर आहे असा उल्लेख केला आहे.

गुणकिर्ती, मेघराज, सुमतिसागर, ज्ञानसागर, जयसागर, चिमणा पंडित, सोमसेन, हर्ष या कविनींही आपल्या तीर्थवंदना रचनेत अंतरिक्ष पार्श्वनाथाचा उल्लेख केला आहे.

या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे कान खांद्यांना चिटकलेले असून छातीवर श्रीवत्स चिन्ह, डोक्याच्या मागे प्रकाश मंडल दिसते तर ही मूर्ती जमिनीपासून

अधर आहे, म्हणून या मूर्तीस अंतरिक्ष पार्श्वनाथ म्हणतात. या मूर्ती खालून कापड सहज आरपार निघते, थोड्या बाजूस मात्र ही मूर्ती जमिनीस स्पर्श केलेली दिसते.[७८]

यासोबतच शांतिनाथ संवत् १५४८, संवत् १५६४ मध्ये नेमिनाथ, संवत् १५४८ मुनिसुव्रतनाथ, संवत् १५४८ मध्ये आदिनाथ, संवत् १५४८ अरहनाथ, संवत् १५६१ मध्ये ऋषभनाथ आणि संवत् १५४८, संवत् १९४६ मध्ये आदिनाथाची, संवत् १८०८ मध्ये नेमिसागर याचे चरणचिन्ह स्थापना केलेल्या मूर्ती आहेत. या मूर्तीवर ब्राम्ही लिपीतील मजकूर आढळतो. शासनदेवता पद्मावतीची मूर्ती असून पाच तीर्थंकर, चमरवाहक, भैरव आणि संवत् १९३० चा लेख दिसतो.

या क्षेत्रावर भट्टारक देवेंद्रकीर्ती, भट्टारक वीरसेन, भट्टारक विशालकीर्ती यांची गादी आहे. यावरुन मूलनायक प्रतिमा, शासनदेवता, गुरुगादी, क्षेत्रपाल, सिद्धांतशास्त्र इत्यादी वैशिष्ट्ये मंदिरात दिसून येतात.

तेराव्या शतकातील मदनकीर्ती आणि सतराव्या शतकातील श्वेतांबर मुनी शीलविजय यांनी सतराव्या शतकात दक्षिण भारताची तीर्थयात्रा केल्यानंतर 'तीर्थमाला' नावाने यात्रेचे विवरण केले असून त्यात या क्षेत्राचे वर्णन येते की, शिरपूर हे अंतरिक्ष दिगंबर क्षेत्र असून या क्षेत्रापासून जवळच असलेल्या समुद्रापर्यंत जैन लोक राहतात.[७९]

मदनकीर्ती यांनी 'शासन चतुस्त्रिंशिका' रचनेत या क्षेत्राचे वर्णन केले आहे.

> '' पत्रं यत्र विहायसि प्रविपुले स्थातुं क्षणं न क्षमं ।
> तत्रास्ते गुण रत्नरोहणगिरियो देवदेवो महान ।
> चित्रंनात्र करोति कस्य मनसो दुष्ट : पुरे श्रीपुरे ।
> स श्रीपार्श्व जिनेश्वरे विजयते दिग्वाससां शासनम् ।। ''

म्हणजेच ज्या उंच आकाशामध्ये एक झाडाचे पान सुद्धा क्षणभर थांबण्यास समर्थ नाही, तरी त्या आकाशात जिनेश्वर, गुणरत्न, पर्वतरुप भारी जिनबिंब स्थिर आहे. श्रीपूर नगरातील पार्श्वनाथाचे दर्शन घेतल्यानंतर कोण चकीत होणार नाही. आठव्या शतकातील आचार्य जिनसेन यांच्या हरिवंश पुराणात श्रीपूरचा उल्लेख आला आहे. बृहत जैन शब्दार्णव, पृ. ३१७ यानुसार या मूर्तीची स्थापना विक्रम संवत् ५५५ मध्ये झाली होती.[८०]

या क्षेत्रास चालुक्य राजा जयसिंहाने (इ.स. ४८८) भूमीदान केल्याचा संदर्भ येथे मिळालेल्या ताम्रपटामध्ये मिळतो.[८१]

येथे मिळालेल्या शिलालेखानुसार मुनी श्री विमलचंद्र यांच्या उपदेशामुळे इ.स. ७७६ मध्ये पृथ्वी निर्गुंदराजाची पत्नी कुंदाच्चीने श्रीपूरच्या उत्तरेस 'लाक तिलक' नावाचे मंदिर बनविलेले होते. म्हणून मुनी विमलचंद्रांनी स्थापन केलेल्या मूर्ती येथे उपलब्ध होतात.[८२]

आज जिथे मूर्ती आहे, त्याच भूयारात ही मूर्ती संवत् ५५५ (इ. स. ४९८) वैशाख सुदी ११ मध्ये स्थापन केली गेली आहे.[८३]

या क्षेत्रावर पुरातत्त्व विभागाने इ.स. १९२८ मध्ये केलेल्या उत्खननात चार ते पाच फूटापर्यंत मातीच्या आवरणाखाली दहा फूट लांबी रुंदीच्या दबलेल्या पाय-या, सर्वतोभद्रिका, शिलालेखयुक्त स्तंभ आणि काही जिनमूर्ती मिळाल्या. गर्भगृहाबाहेर जुन्या भिंतीचे अवशेष मिळाले, ज्यात दोन फूट तीन इंचाच्या विटा वापरलेल्या होत्या.

इ. स. १९६७ मध्ये गर्भगृहासमोर दुस-यांदा उत्खनन केले गेले. त्यात अकरा अखंड जैन मूर्ती मिळाल्या. सर्व मूर्त्यांवर लेख असून या लेखात आचार्य समसेन, मलधारी पद्मप्रभ, नेमिचंद्र यांचा उल्लेख आहे. या स्तंभावरील लेख परिशिष्टामध्ये देण्यात आले आहेत.[८४]

मंदिराचे व्यवस्थापन येथील श्री अंतरिक्ष पार्श्वनाथ अतिशयक्षेत्र शिरपूर या ट्रस्टी मार्फत केले जाते. येथील वार्षिक उत्सव कार्तिक शुक्ल तेरा ते पंधरा

या तीन दिवसात साजरा केला जातो. यावेळी यात्रा भरते, रथ मिरवणूक काढली जाते.

## ४) <u>कारंजा</u> :-

कारंजा हे अतिशयक्षेत्र वासिम जिल्ह्यात असून येथे सेनगण, बलात्कारगण, काष्ठसंघ या तीन भट्टारक पीठांच्या गाद्या असल्यामुळे जैन धर्मीयांत या क्षेत्रास महत्त्वाचे स्थान दिसून येते.

येथे श्री पार्श्वनाथ दिगंबर सेनगण मंदिर, श्री चंद्रनाथ स्वामी काष्ठासंघ दिगंबर जैन मंदिर, श्री मूलसंघ चंद्रनाथ स्वामी बलात्कारगण दिगंबर जैन मंदिर अशी तीन मंदिरे आहेत. ही मंदिरे भट्टारकांच्या[C] परंपरेशी संबंधित असून पंधराव्या-सोळाव्या शतकापासून ही पीठे येथे कार्यरत होती. हे भट्टारक विविध सामाजिक कार्यातून सक्रीय असत. विदर्भातील जैन समाजास याच ठिकाणाहून मार्गदर्शन केले जात.[८५]

श्री पार्श्वनाथ दिगंबर सेनगण मंदिराच्या वेदीवर मूलनायक पार्श्वनाथाची एक फूट श्वेत वर्ण पाषाणाची पद्मासनस्थ मूर्ती असून डोक्यावर सप्तफणा नागाचे छत्र, डोक्यावरील केस खांद्यापर्यंत वाढलेले, छातीवर श्रीवत्स चिन्ह, चरणचौकीवर स्वस्तिक चिन्ह, यक्ष-यक्षी कोरलेल्या दिसतात.

या सोबतच येथे सुपार्श्वनाथाची दोन फूट श्यामवर्णाची पद्मासनस्थ मूर्ती असून डोक्यावर पाचफणा नागाचे छत्र, डोक्यावरील केस खांद्यापर्यंत वाढलेले, छातीवर श्रीवत्स चिन्ह, यक्ष-यक्षी दिसतात. ही मूर्ती वाळूची असून ही मूर्ती चंद्रतलावाजवळ एका धोब्यास सापडली असे सांगितले जाते. या मंदिरात पाषाण व धातूच्या शंभरपेक्षा जास्त मूर्ती पाहावयास मिळतात.

या मंदिरात सभामंडप गर्भगृह असून गर्भगृहासमोर वीरसेन भट्टारकांची गादी आहे. भट्टारक वीरसेन यांचा पट्टाभिषेक संवत् १९३५ मध्ये झालेले असून संवत् १९९५ पर्यंत तेच या गादीवरचे शेवटचे भट्टारक होते. यांनी नागपूर, कमलेश्वर, कारंजा, पिंपरी, भातुकली येथे मूर्ती स्थापना केल्या आहे.

याच भट्टारक परंपरेचे सोमसेन यांनी संवत् १५६१ मध्ये संमभवनाथ, भट्टारक जिनसेन यांनी संवत् १५८० मध्ये पद्मावती, भट्टारक शांतिसेन यांनी संवत् १६७५ मध्ये चंद्रप्रभुची, भट्टारक सिद्धसेन यांनी संवत् १६९२ मध्ये पार्श्वनाथ मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. या व्यतिरिक्त या परंपरेच्या भट्टारकांनी कारंजा येथे अनेक ग्रंथ, काव्याची रचना केली आहे.

कारंजाचे भट्टारक सोमसेन यांच्या उपदेशामुळे त्यांचे शिष्य कारंजा निवासी बघेरवाल ज्ञातीय, शाह जीजा आणि त्यांचा मुलगा पुनसिंह यांनी चित्तोड येथील चित्रकुट नगरात चंद्रप्रभु मंदिरासमोर कीर्तीस्तंभ निर्माण केले आहे. शाह जीजाने एकशे आठ जैन मंदिरांचे जीर्णोद्धार आणि एकशे आठ जैन मंदिरे स्थापन केली असून जैन शास्त्र भांडार निर्मितीसाठी कार्य केले होते.

या पीठाशी सोमसेन, गुणभद्र, वीरसेन, श्रुतवीर, माणिकसेन, गुणसेन, लक्ष्मीसेन, सोमसेन, माणिक्यसेन, गुणभद्र यांचा सहवास लाभला तर सोमसेन, जिनसेन, संमतभद्र, छत्रसेन, नरेंद्रसेन, शांतिसेन, सिद्धसेन, लक्ष्मीसेन आणि वीरसेन या पीठावर आसनस्थ होते.

सेनगणच्या या मंदिरात चारशे वर्षापूर्वीचे प्राचीन पंचकल्याणकाचे चित्र आहे जे कपड्यावर सोन्याचा रंगातून साकारलेले असून हे कापड तीन फूट दोन इंच रूंद तर एक्केचाळीस फूट लांबीचे आहे. मंदिरासमोरील मानस्तंभा जवळ छत्र्यामध्ये संवत् १९२२ मध्ये स्थापन केलेले सात चरण चिन्ह दिसतात. येथे चैत्र कृष्णा प्रतिपदेस रथयात्रा काढली जाते, पद्मावती देवीची यात्रा भरते, पर्यूषणानंतर येथे जलयात्रा काढली जाते. कवी ब्रम्हहर्षाने ‘नयर कारंजे नवनिधि पासं’ या मंदिरातील पार्श्वनाथाची स्तुती केली आहे.[८६]

श्री चंद्रनाथ स्वामी काष्ठासंघ दिगंबर जैन मंदिर काष्ठासंघी भट्टारकाशी संबंधित असून या मंदिरात चंद्रप्रभुची लालवर्णाची पद्मासनस्थ मूर्ती दिसते. येथे सत्तरपेक्षा अधिक पाषाण आणि धातूच्या मूर्ती असून त्यात चौबीसी, पंचमेरु, चैत्यस्तुप आणि देवीची मूर्तीचा समावेशा होतो. डाव्या बाजूस

असलेल्या पद्मावतीची मूर्तीची स्थापना संवत् १७१७ मध्ये लेकुर सिंघई कस्तुरीवाले यांनी केलेली आहे. पद्मावतीची चैत्र शुद्ध पंधराला यात्रा भरते, यावेळी रथयात्रा काढली जाते. गर्भगृहासमोर बेचाळीस स्तंभमंडप असून स्तंभावर कोरीव काम केलेले दिसते, लाकडांवर सुक्ष्म नक्षीकाम आकर्षक असून त्यात वेली, फुले, पशु, पक्षी, ऐरावत हत्ती, शिशु घेतलेले इंद्र आणि तीर्थंकर कोरलेले पाहावयास मिळते.

येथे पाषाणाच्या सव्वीस मूर्त्यांचा समूह मिळतो, त्यात अकरा मूर्ती संवत् १२७२ मधील असून चार मूर्ती संवत् १५८० मधील आहेत. येथे तीन फूट उंचीची मूलनायक पार्श्वनाथाची मूर्ती असून डोक्यावर सप्तफणायुक्त नागाचे छत्र, छातीवर श्रीवत्स दिसते. या मूर्तीची स्थापना काष्ठासंघ भट्टारक प्रतापकीर्ती, राजकीर्ती आणि त्यांचे शिष्य भट्टारक लक्ष्मीसेन, इंद्रभूषण यांनी संवत् १७१५ मध्ये केली आहे.

काष्ठसंघाच्या लक्ष्मीसेन यांनी येथे संवत् १७०३ मध्ये बाहुबलीची मूर्ती स्थापन केली आहे. या परंपरेचे शेवटचे भट्टारक विजयकीर्ती असून ब्रम्हसागर यांनी 'सकलतीर्थ वंदना' या रचनेत या मंदिरचा उल्लेख केलेला दिसतो.[८७]

श्री मूलसंघ चंद्रनाथ स्वामी बलात्कारगण दिगंबर जैन मंदिरचा गर्भगृह सात स्तंभावर उभारले आहे. वेदीवर अर्धचंद्र कोरलेले मूलनायक चंद्रप्रभुची एक फूट उंचीची पद्मासनस्थ मूर्ती दिसते. मागील वेदीवर साठ पाषाणाच्या व धातूच्या मूर्ती पाहावयास मिळतात. येथे सहस्त्रकुट जिनालय असून चैत्यालयात एक हजार आठ मूर्ती आहेत तर दुस-या चैत्यालयात एक हजार सातशे अठ्ठावीस मूर्ती दिसतात.

येथे बलात्कारगण भट्टारकांची गादी असून देवेंद्रकीर्ती हे शेवटचे भट्टारक होते, येथे या पीठाची स्थापना धर्मभूषण यांनी केली होती. हे भट्टारक धर्मचंद्र यांचे शिष्य होते, यांनी शक संवत् १५७२ मध्ये पार्श्वनाथ, शक संवत् १५८० मध्ये नेमिनाथ यांची मूर्ती स्थापन केली होती. येथे भट्टारक

देवेंद्रकीर्ती यांचे चरण चिन्ह आहेत, यांचे निर्वाण संवत् १८५० मध्ये शिरड-शहापूर येथे झाले होते.

येथे हस्तलिखित भांडार असून येथे एक हजारहून अधिक हस्तलिखित ग्रंथ पाहावयास मिळतात. त्यात ताडपत्र ग्रंथांची संख्या पंचवीस आहे. याप्रमाणे या तिन्ही भट्टारक पीठांचे येथे एक-एक मंदिर असून या मंदिराची आपापली स्वतंत्र ओळख आहे.

सेनगण मंदिरात पंचकल्याणक चित्रावली, काष्ठसंघ मंदिरात लाकडावरील कलापूर्ण शिल्प आणि बलात्कारगण मंदिरात हस्तलिखित शास्त्र भांडार आहे. ही तिन्ही मंदिरे जैन समाजाच्या मालकीची आहेत. येथे आचार्य समंतभद्र महाराजांच्या मार्गदर्शनातून श्री महावीर ब्रम्हचर्याश्रम आणि सरस्वती शिक्षा मंदिर स्थापन झाले आहे.

येथे महावीर मंदिर असून या मंदिरात संवत् १९९१ मध्ये महावीर, चंद्रप्रभु, शांतिनाथांच्या मूर्तीसोबत अंबिका देवीची मूर्ती असून देवीच्या कानात कुंडल, गळ्यात हार, बाहुत भूजाबंद, हातात कंकण, कमरेला पट्टा, डाव्या हातात बालक शुभंकर, बालक आम्रफल घेतलेले, देवीच्या डाव्या हातात आम्रगुच्छ, मागील बाजूस दुसरा बालक प्रितींकर उभ्या असलेल्या दिसतात. भगवान नेमिनाथ यांचे यक्ष गोमेद सिंहावर आरुढ असून दोन चामरवाहक देवी उभी आणि यक्षांच्या डोक्यावर आम्र आहेत तर मध्यभागी तीर्थंकर नेमिनाथ पद्मासनस्थ बसलेले दाखविलेले आहे.

बारा फूटाच्या एका शिलाफलकावर चोविस तीर्थंकर कोरलेले असून मध्यभागी ऋषभदेवांची चार फूट दोन इंच उंचीची खड्गासनस्थ मूर्ती आहे. बाकी तेवीस तीर्थंकरांत एक्केवीस पद्मासनस्थ दोन खड्गासनस्थ मुद्रेत यक्ष-यक्षीसह दिसतात. एक अन्य फलक तीन फूट पाच इंच उंचीची असून यात पद्मासनस्थ ऋषभदेव दिसतात. त्यांच्या डोक्याच्या मागे प्रकाश मंडल, डोक्यावर छत्र आणि दुन्दुभिवादक, दोन्ही कोप-यावर पुष्पहार घेऊन गंधर्व,

चमरेन्द्र दाखविले आहेत, जवळच ऋषभदेवाचे यक्ष-यक्षी, गोमुख आणि चक्रेश्वरी असून चरण पीठावर वृषभ लांच्छन दाखविलेले आहे.

या मूर्ती नागपूरजवळील कुण्डलेश्वर या मंदिरातून आणल्या असून या सातव्या-आठव्या शतकातील आहेत, मंदिरावरील खोलीत वीस प्राचीन मूर्ती असून यात नवदेवतेची मूर्ती आकर्षक आहे. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात मुनिवर्य शोलविजयानी गुजराती भाषेत 'तीर्थमाला' रचनेत या क्षेत्राचे वर्णन आढळते.[८८]

५) **<u>रामटेक</u> :-**

रामटेक हे अतिशयक्षेत्र नागपूर जिल्ह्यात असून येथील मंदिर पहाडावर वसलेले दिसते. रामटेक या अतिशयक्षेत्रामध्ये एकूण नऊ मंदिरे असून शांतिनाथाचे मुख्य मंदिर हे तेथील महत्त्वाचे आकर्षण आहे. या मंदिरात मूलनायक शांतिनाथाची मूर्ती तेरा फूट उंच केसरी रंगाची खड्गासनातील असून मूर्तीच्या मागे प्रकाश मंडल, डोक्यावर छत्री, छातीवर श्रीवत्स चिन्ह, कान खांद्यास चिटकलेले आहेत. मूर्तीच्या शेजारी पाच फूट दोन इंच उंचीची शांतिनाथाची पाषाण मूर्ती असून त्यावर हरिणाचे लांच्छन कोरलेले आहेत.[८९] ही मूर्ती बाराव्या शतकातील असली तरी अहार, थैबूनजी, बजरंगढ येथील शांतिनाथाच्या मूर्तीशी या मूर्तीचे साम्य जुळते. येथे दोन क्षेत्रपालाच्या मूर्ती असून गर्भगृहासमोरील बारा स्तंभावर आधारलेला मंडप पाहावयास मिळतो. यासोबतच पार्श्वनाथाचे तीन आणि अजितनाथ, अरहनाथ, सुपार्श्वनाथ, नेमिनाथ आणि मेरु मंदिरे आहेत. या मंदिरात संवत् १५४८, संवत् १७६१, संवत् १७६९, संवत् १७९०, संवत् १८०२, संवत् १८८९, संवत् १८९९, संवत् १९०२, संवत् १९०४, संवत् १९६८, संवत् १९२५, संवत् १९२६, संवत् १९४७, संवत् १९५२ मधील पार्श्नाथ, महावीर, चंद्रप्रभु, सुपार्श्वनाथ, नेमिनाथाच्या मूर्ती स्थापन केलेल्या आहेत.

जैन पुराणानुसार रामटेक क्षेत्राचा इतिहास मुनिसुव्रतनाथ यांच्या काळापर्यंत जातो तर आचार्य रविषेणच्या पद्‌मपुराणमध्ये रामाद्‌वारे वंशगिरी

येथे असंख्य जैन मंदिर निर्माण केले गेले असे संदर्भ मिळतात. वंशगिरी म्हणजे आजचे रामगिरी किंवा रामटेक होय.

> '' तत्र वंशगिरी राजन् रामेण जगदिन्दुना ।
> निर्मापितानि चैत्याने जिनेशाना सहस्त्रशः ।।
> महावष्टम्भसुस्तम्भा युक्त विस्तारतुङ्गताः
> गवाक्षहर्म्यवलभी प्रभृत्याकारशोभिता
> सतोरणमाद्वाराः सशालाः परिखान्विताः ।
> सितचारुपताकाढ्या बृहदघण्टाखाच्चिताः ।
> मृदङ्गवंशमुरजसंगोतोत्तमतिनस्वनाः ।
> झर्झरैरानकैः शङ्खभेरीभिश्च महाखाः
> सततारध्वनिः शेषरम्यवस्तुमहोत्सवाः ।
> विरेजुस्तत्र रामीया जिनप्रासादपङ्क्तयः ।।''

वंशागिरी वर रामचंद्राने जिनेन्द्रदेव याची मंदिरे बनविली, त्यात उंच-लांब स्तंभ होती, यात गवाक्ष तोरण, प्रवेशद्वार, शिखर होते. श्वेतध्वज होती, तेथे घंटानाद होत असत, मृदंग, वंशी, मुरज, शंख, भेरी, झांझ यांचे ध्वनी घुमत असे. यासोबत गाण, वाद्य, संगीत यांच्या साहाय्याने उत्सव साजरे केले जात.[१०]

आचार्य रविषेण यांनी या पर्वताचे नाव वंशधर म्हटले आहे कारण तेथे वेळूचे घनदाट जंगल होते. याच ठिकाणी रामाने जिनालयाची स्थापना केली, त्यामुळे या वंशधरचे नाव रामगिरी झाले.[११]

> '' रामेण यस्मात्परमाणि तस्मिन् जैनानि वेश्मानि विद्यापितानि ।
> तिर्नष्टवंशाद्रिवचः स तस्माद्रविप्रभो रामगिरीः प्रसिद्ध : ।। ''

आचार्य रविषेण यांच्या ही पूर्वी विमलसुरिनी रचलेल्या 'परमचरित्र' मध्ये या क्षेत्राचे वर्णन आहे. या रचनेत असा संदर्भ मिळतो की, वंशपूर येथे राम गेल्यानंतर तेथील राजाने त्यांचे स्वागत केले, रामाने पहाडावरच

राहण्यासाठी सांगितले. रामाच्या सांगण्यावरुन या पहाडावर जैन मंदिरे बांधली गेली. यात दण्डकारण्याचे वर्णनही येते, रामाने वंशगिरी पहाडवर स्थापन केलेले मंदिर पांडव काळात ही होते, या संबंधी हरिवंश पुराणात वर्णन मिळतात.

'' विश्रम्य तत्र ते सौम्या दिनानि कतिचित् सुखम् ।
याताः क्रमेण पुंनागा विषयं कोशलभिधम् ।। १७ ।।
स्थित्वा तत्रापि सौख्येन मासान् कतिपयानपि ।
प्राप्ता रामगिरि प्राग् यो राम - लक्ष्मण सेवित : ।। १८ ।।
चैत्यालया जिनेन्द्राणां यत्र चन्द्रार्कभासुराः ।
कारिता रामदेवेन संभान्ति शतशो गिरौ ।। १९ ।।
नानादेशातगतैर्भव्यैर्वन्धन्ते या दिने दिने ।
वन्दितास्ता जिनेन्द्राणां प्रतिमाः पाण्डुनन्दनैः ।। २० ।। ''

म्हणजेच पांडव काही दिवस येथे थांबून कोशल नगराकडे गेले. राम-लक्ष्मण जेथे राहिले होते तेथे पांडव राहिले, जिथे जिनालय होते. रामांनी बनविलेले जिन मंदिर पांडव काळातही होते. या मंदिरामुळे रामगिरी एक तीर्थ बनले होते. रामगिरीचे पूर्वीचे नाव वंशगिरी होते. परंतु येथील मंदिरे किती काळ सुरक्षित राहिली, याबाबत माहिती मिळत नाही. परंतु सोळाव्या-सतराव्या शतकातील भट्टारकांनी आपल्या ग्रंथात या क्षेत्रांचा उल्लेख केला आहे.[९२]

कारंजा येथील सेनगण भट्टारक जिनसेन यांचे इ.स. १६५५ ते इ.स. १६८५ काळातील हस्तलिखितामध्ये असा संदर्भ मिळतो की, त्यांनी गिरनार, सम्मेदशिखर, रामटेक आणि माणिक्य स्वामी या क्षेत्राची यात्रा केलेली होती. यांच्याद्वारे सौयरासह, निवासह, माधव, गनवा आणि कान्हा या पाच व्यक्तींना संघपति हे पद दिले होते. यात कान्हा संगवी यांना रामटेक येथील संघपति बनविण्यात आले होते.[९३]

सोळाव्या शतकातील शेवटच्या काळात भट्टारक ज्ञानसागर यांनी आपली रचना 'सर्वतीर्थ वंदन' यात शांतिनाथ मूर्तीची प्रशंसा केलेली दिसते. भट्टारक हेमकीर्तीचे शिष्य मकरंदन यांनी मराठी भाषेत 'रामटेक छन्द' लिहिले आहे.

नागपूरचे राजे आप्पासाहेब भोसले हे वर्धमान सावजीसोबत रामटेक येथे आले होते. तेव्हा रामाने बांधलेल्या जिनालय शोधण्याचे कार्य झाले, तेव्हा त्यांना दुर्लक्षित अवस्थेत येथे मंदिरे मिळाली, त्यांची दुरुस्ती करुन ते पुन्हा दर्शनासाठी खुली करण्यात आली. यामुळे हे क्षेत्र प्रकाशात आले असे येथे सांगितले जाते.[१४]

संस्कृत कवी कालिदास यांच्या 'मेघदूतम्' या काव्यात सुद्धा या पहाडाचे वर्णन आले आहे.[१५] नागपूर, रामटेक परिसरात जैन धर्मिय दिगंबर, श्वेतांबर आणि तेरापंथी आढळतात.[१६] या क्षेत्राचे व्यवस्थापन श्री दिगंबर जैन परवार मंदिर ट्रस्ट नागपूर या ट्रस्टीमार्फत केले जाते, येथे धर्मशाळा आणि नवीन बांधलेले भव्य मंदिर आहे. येथील वार्षिक उत्सव कार्तिक शुद्ध तेरा ते पंधरा या काळात साजरा केला जातो, यावेळी जलयात्रा काढली जाते.

६) <u>तेर</u> :-

तेर हे प्राचीन अतिशयक्षेत्र उस्मानाबाद जिल्ह्यात असून येथे महावीरांचे समवशरण आले होते असे जैन परंपरा सांगते. या मंदिरास दोन तटबंदी असून येथे हेमाडपंथी मंदिर आहे. गर्भगृहातील वेदीवर पद्मासनस्थ भगवान महावीरांची पाच फूट उंच आणि पाच फूट लांब असलेली कृष्णवर्णीय पाषाणापासून बनविलेली मूर्ती, छातीवर श्रीवत्स चिन्ह, खांद्यावर जटा वाढलेल्या दिसतात, मूर्तीला वज्रलेप दिलेले आहे.[१७] या मूर्तीच्या समोर पाषाण आणि धातूच्या मूर्ती आहेत. मूलनायकाची दिवसातून तीन वेळा पूजा केली जाते, पुजेसाठी पुजारी नेमले आहेत.

या सोबतच पार्श्वनाथाच्या पाच मूर्ती आणि ऋषभनाथ, सर्वतोभद्र मूर्ती, चोवीस तीर्थंकरांचे चरणचिन्ह, पस्तीसपेक्षा अधिक सर्पमूर्ती, जैन मुनीच्या समाधी आणि विटांनी बांधलेली प्राचीन विहिर पाहावयास मिळतात. या विहिरीबद्दल आख्यायिका प्रसिद्ध आहेत.

तेर हे तेरणा नदीच्या काठावर वसलेले आहे. तेरणा धरणाची दुरुस्ती सुरु असताना येथे पुराणवस्तु सापडलेल्या आहेत, त्याचे येथे संग्रहालय बनवले गेले आहे. तेर येथे वैशिष्ट्यपूर्ण वीटा सापडल्या आहेत. या प्रकारच्या वीटा रोममध्ये ही सापडतात, तेर आणि रोमचा व्यापारी संबंध होता असा इतिहास अभ्यासकांचा दावा आहे.

दक्षिणेतील एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र म्हणून तेरचा उल्लेख 'पेरिप्लस ऑफ एरिथ्रियन सी' या ग्रीक ग्रंथात सापडतो. इ.स. च्या दुस-या शतकात आलेल्या टॉलेमी यांनी ही तेरचे वर्णन तगरपूर असे केले आहे.[९८]

या ठिकाणी हिंदू, जैन धर्माची प्राचीन मंदिरे असून तेर येथील जैन मंदिर हेमाडपंथी प्रकारातील आहे, हे क्षेत्र अडीच हजार वर्षापूर्वीचे आहे असे येथे सांगितले जाते. तेर संग्रहालयात या मंदिराविषयीचा शिलालेख आहे. 'हरिषेण कथाकोष' आणि 'करकण्डु चरित्र' या ग्रंथातील माहितीनुसार नल आणि नील या राजांनी तेर नगरास भेट दिली होती. यांनी या परिसरात पार्श्वनाथ मूर्ती असलेले स्तंभयुक्त लयन स्थापत्य बनविले होते. या नंतरच्या काळात करकण्डु राजा भूप्रदेश जिंकत या प्रदेशापर्यंत आला होता.[९९]

इ.स. दहाव्या शतकात शिलाहार राजानी या नगरास महत्त्व दिले. शिलाहाराचे वर्चस्व कराड, कोल्हापूर, मिरज या भूप्रदेशात होते. शिलाहार राजे 'तगरपूरवराधीश्वर' अशी उपाधी धारण करीत होते.[१००]

राष्ट्रकुट राजांचे सुद्धा तेर वर वर्चस्व होते. राजा जतिग नंतर गण्डरादित्य आणि विजयादित्य हे प्रभावी राजे होते, या वंशाचे सोन्याचे गरुड हे ध्वज चिन्ह होते. हे राजकर्ते स्वतःस राजा जीमूतकेत (ज्याने गरुडांना आपल्या

शरीराचे संपूर्ण मांस खाऊ घातले होते) चे वंशज समजत, यांच्या कालखंडात तेर हे समृद्ध व्यापारी केंद्र होते. या राज्यकर्त्यांनी आपल्या राज्यात हिंदू, जैन, बौद्ध मंदिर व लेण्या उभारल्या होत्या.[१०१]

तेरचा उल्लेख भट्टारक साहित्यात ही आढळतो. सोळाव्या शतकातील मेघराज यांनी 'तेर पुरे वढम्माण' या गुजराती भाषेतील तीर्थवंदनेत तेरचे वर्णन केले आहे. सोळाव्या शतकातील उत्तरार्धात ब्रम्हज्ञानसागर यांनी आपल्या 'सर्वतीर्थ वंदन' या रचनेते तेरचे वर्णन केले आहे.

तेरनपूर सुप्रसिद्ध स्वर्गपूरी सम जाणो ।

वर्धमान जिनदेव तास तिहॉ चैत्य बखाणो ।

पाप हरत सुख करत अतिशय श्रीजिनकेरो ।

भाविक लोक भयहरत दूर करत भव फेरो ।

समवसरण जिनवीर को तेर थकी पाछयो वल्यो ।

ब्रम्हज्ञान जग उद्धरण पावापूर सर शिव मल्यो ।। ३४ ।।

काष्ठसंघाचे भट्टारक रत्नभूषण यांचे शिष्य जयसागर यांनी 'तीर्थ जयमाला' या रचनेत तेरचे वर्णन केले आहे, ही रचना सतराव्या शतकातील आहे.[१०२] या क्षेत्राचे व्यवस्थापन श्री वर्धमान दिगंबर अतिशयक्षेत्र तेर या ट्रस्टीमार्फत केले जाते. या क्षेत्रावर वार्षिक उत्सव माघ शुक्ल पाच आणि सहा वेळी साजरा केला जातो, यावेळी पालखी मिरवणूक काढली जाते.

**७) <u>शिरड - शहापूर</u> :-**

शिरड - शहापूर हे अतिशयक्षेत्र परभणी जिल्ह्यात असून या क्षेत्रावरील मूलनायक मल्लिनाथ आहेत. या क्षेत्रावरील मंदिरास तटबंदी असून पूर्वाभिमुखी गर्भगृहाच्या वेदीवर मल्लिनाथाची अर्धपद्मासनातील चार फूट उंचीची श्यामवर्ण पाषाण मूर्ती असून मूर्तीचे कान खांद्यास चिटकलेले, मूर्तीच्या खांद्यावर डोक्यावरही केस पसरलेले, छातीवर श्रीवत्स चिन्ह दिसून येते तर मूर्तीवर लांच्छन चिन्ह नाही. परंतु मूर्तीलेखात मल्लिनाथ असा उल्लेख आहे.

मूर्तीलेखानुसार संवत् १६३१ मध्ये मूलसंघ बलात्कारगण भट्टारक सुरेन्द्रकीर्तीने ही मूर्ती स्थापन केली आहे. समोर सभामंडप असून सभामंडपात शक संवत् १५३५ मध्ये स्थापन केलेली शांतिनाथाची श्वेत पाषाणाची मूर्ती आहे. ब्रम्ह जिनसागर, ब्रम्ह नेमिसागर यांच्या रचनेत या मूर्तीचे वर्णन आले आहे. सभा मंडपात देव - देवींच्या मूर्ती कोरलेल्या असून येथे सव्वीस जिन मूर्ती आहेत.

हे कारंजा भट्टारक शाखेचे घटक असून भट्टारक देवेन्द्रकीर्ती हे या क्षेत्रावर काही काळ थांबले होते. याच परिसरात त्यांनी तपस्या केली संवत् १८५० मध्ये त्यांचे निर्वाण झाले असून त्यांची समाधी येथेच नदीच्या काठावर आहे. भट्टारक देवेन्द्रकीर्ती यांचे शिष्य भट्टारक जिनसागर यांनी याच क्षेत्रावर लवकुंश कथा, अनन्त कथा आणि सुगंधदशमी कथेची रचना केली आहे.[१०३]

या मंदिरातील मूलनायक मल्लिनाथाची मूर्ती नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर येथून आणली. कारंजा येथील भट्टारक पद्मनंदी या परिसरातून जात असताना त्यांनी अर्धापूर येथे दुर्लक्षित अनेक जिन मूर्ती आणि मल्लिनाथाची मूर्ती पाहिली. या मूर्ती कारंजा येथे नेण्यासाठी त्यांनी हैद्राबादच्या निजामाकडून परवानगी घेऊन त्यातील मल्लिनाथाची मूर्ती त्यांनी शिरड-शहापूर येथे स्थापन केली, निजामांनी यांना सहकार्य केले असे दिसून येते.[१०४]

या क्षेत्रावर इ.स. १९६४ मध्ये कल्याणक प्रतिष्ठा साजरी झाली, त्यावेळी जैन जैनत्तरांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. येथील मंदिर व्यवस्थापन श्री १००८ मल्लिनाथ दिगंबर जैन अतिशयक्षेत्र शिरड-शहापूर या ट्रस्टीमार्फत केले जाते, येथे धर्मशाळा आहे. वार्षिक उत्सव मार्गशीर्ष शुद्ध अकरामध्ये साजरा केला जातो. ही तिथी मल्लिनाथाची जन्मकल्याणक तिथी आहे, यावेळी यात्रा भरते, रथयात्रा काढली जाते.

८) **<u>नवागढ (उखळद)</u>** :-

नवागढ हे अतिशयक्षेत्र परभणी जिल्ह्यात असून येथील मूलनायक नेमिनाथाची मूर्ती प्राचीन असून या मूर्तीस जडविण्यात आलेल्या पारसमणी मुळे हे अतिशय क्षेत्र वैशिष्ट्यपूर्ण समजले जाते.[१०५]

हे क्षेत्र खूपच भव्य असून भव्य तटबंदी, प्रवेशद्वार आणि त्यात मंदिर अशी रचना आहे. गर्भगृहाच्या वेदीवर पद्मासनस्थ नेमिनाथाची श्यामवर्ण पाषाण मूर्ती असून या मूर्तीची उंची पाच फूट आहे. ही मूर्ती एक शिलाफलकात कोरलेली दिसते, डोक्यावर तीन छत्री, डोक्यामागे प्रकाश मंडल, वर पुष्पहार घेतलेल्या देवता, मध्यभागी चमरेन्द्र दाखविले आहेत, मूर्तीच्या छातीवर श्रीवत्स चिन्ह असून चरण चौकनात शंख लांच्छन पाहावयास मिळते. मूलनायकाच्या पायातील अंगठ्यात पारस मणी जडविलेले होते, असे येथे सांगितले जाते. परंतु आज तेथे ही मणी नाही, मणी जडविण्यासाठी केलेली जागा पाहावयास मिळते.

सोबतच वेदीवर तीन पाषाण आणि दहा धातूच्या प्रतिमा आहेत. गर्भगृहाच्या बाहेर डाव्या आणि उजव्या बाजूस वेदीवर बेचाळीस पाषाण मूर्ती असून समोरील बाजूस पाषाण फलकावर पद्मावती देवीची प्रतिमा आहे. यातील ब-याच मूर्ती परभणीहून आणलेल्या आहेत. शिखरावर पार्श्वनाथ प्रतिमा असून मंदिराच्या बाजूस मोठे प्रांगण आहे, प्रांगणात दोन विहिरी आहेत, धर्मशाळा आहे, मागील बाजूस जैन मुनीची राहण्याची व्यवस्था केलेली आहे.

येथील जुने मंदिर पूर्णा नदीच्या काठावर स्थापन केलेले होते. परंतु नदीस सतत येणा-या महापूरामुळे हे पाषाण मंदिर नष्ट झाले, याचे अवशेष तेथे आहेत. या मंदिरातील मूलनायकाची मूर्ती नवीन मंदिरात स्थापन केली गेली.[१०६] या नवीन मंदिर स्थापनेस निजाम राजाने दहा एकर जमीन दान दिली आहे.[१०७]

ब्रम्हज्ञानसागर यांनी आपल्या 'सर्वतीर्थ वंदन' या रचनेत पूर्णा नदीच्या तीरावर प्राचीन उखलद क्षेत्रावरती मिरवणूकाच्या अंगठ्यात पारस मणी जडविलेले आहेत, या मूर्तीची महिमा प्रसिद्ध आहे, यांना माझे नमन असो असे या क्षेत्राचे वर्णन केले आहे.[१०८] याच ठिकाणी पूज्य आर्यनंदी महाराजांनी आपले समाधी मरण साधले, त्यांचे ही स्मारक येथे आहे. अत्याधुनिक पद्धतीने शिक्षण देणारी गुरुकुल प्रशाला येथे आहे.

या मंदिराचे व्यवस्थापन श्री नेमिनाथ अतिशयक्षेत्र उखलद या ट्रस्टीमार्फत केली जाते. या क्षेत्रावर वार्षिक उत्सव माघ शुद्ध पाच ते सात या काळात साजरा केला जातो, यावेळी रथ यात्रा काढली जाते.

९) **कचनेर** :-

कचनेर हे अतिशयक्षेत्र औरंगाबाद जिल्ह्यात असून सह्याद्रीच्या पर्वत रांगामध्ये वसलेले हे क्षेत्र नैसर्गिक सुंदरतेने नटलेले आहे. या तीर्थक्षेत्राची तुलना उत्तर भारतातील श्री महावीरजी या क्षेत्राशी केली जाते. हे क्षेत्र दोनशे पन्नास वर्षापूर्वीचे आहे असे येथे सांगितले जाते. येथे पार्श्वनाथाचे पूर्वाभिमुखी अप्रतिम मंदिर असून मंदिरास पंधरा पाय-या आहेत, गर्भगृहात मूलनायक पार्श्वनाथाची श्वेतवर्णीय पाषाणापासून बनविलेली तीन फूट उंचीची पद्मासनस्थ ध्यानमुद्रेतील मूर्ती असून मस्तकावर सातफणा नागाचे छत्र दिसते. ही मूलनायकाची मूर्ती श्री चिंतामणि पार्श्वनाथ या नावाने ओळखली जाते.[१०९]

गर्भगृहाच्या डाव्या बाजूस महावीरांची श्यामवर्णीय पाषाणापासून बनविलेली प्राचीन मूर्ती असून ही मूर्ती जिंतुर येथून आणलेली आहे, या सोबत येथे पाषाणाच्या अनेक जैन मूर्ती पाहावयास मिळतात. कचनेर गावच्या वस्तीमध्ये जीर्ण अवस्थेतील एक हेमाडपंथी मंदिर असून या मंदिरात पार्श्वनाथाची मूर्ती होती. परंतु हे सुरक्षिततेसाठी झाकलेले मंदिर व मूर्ती या गावातील संपतराव पाटील यांच्या बहिणीला प्रथमतः आढळले, तेव्हा येथे खोदकाम केले गेले आणि त्या मूर्तीची येथेच स्थापना करण्यात आली.[११०]

पुढे काही वर्षानंतर मूर्तीच्या गळ्यापासून वरचा भाग वेगळा झाला. लच्छीराम कासलीवाल यांनी ही मूर्ती काही दिवस तूप - साखरेत ठेवली आणि आश्चर्यकारकपणे ती मूर्ती जुळली, ही मूर्ती नवीन मंदिरात स्थापन करण्यात आली.[१११] या मंदिराचे व्यवस्थापन 'श्री चिंतामणी पार्श्वनाथ मंदिर ट्रस्ट, कचनेर' या ट्रस्टीमार्फत चालविले जाते, या ट्रस्टीमार्फत माध्यमिक शाळा चालविली जाते. या क्षेत्रावर वार्षिक उत्सव कार्तिक शुक्ल पंधराला साजरा केला जातो. अनेक ठिकाणाहून भक्तगणा येथे पायी येऊन यात्रा करतात.

## १०) <u>जटवाडा</u> :-

जटवाडा हे अतिशयक्षेत्र औरंगाबाद जिल्ह्यामध्ये असून येथे एकूण पाच मंदिरे आहेत. यातील दोन मंदिरे पहाडावर आहेत, पहाडावर अठरा फूट उंच बाहुबलीची मूर्ती आहे. मुख्य मंदिरास तटबंदी असून येथे हेमाडपंथी मंदिर आहे. मंदिराचे शिखर नक्षीकामाने सजविलेले आढळते. येथील मूलनायक श्री संकटहर पार्श्वनाथ या नावाने ओळखले जातात. मूलनायकाची मूर्ती श्यामवर्णीय पाषाणापासून बनविलेली, पद्मासनातील ध्यान मुद्रेतील, डोक्यावर सप्तफणा नागाचे छत्र असून चार फूट उंचीची आहे. मूलनायकाच्या डाव्या व उजव्या बाजूस श्वेत, श्याम, केशरी रंगाच्या चाळीसपेक्षा जास्त मूर्ती असून मंदिराच्या मागील बाजूस प्रांगण, प्रांगणाशेजारी मंदिर आणि त्यावर भव्य चोवीस तीर्थंकरांच्या प्रतिमा उभ्या आहेत.

हे क्षेत्र स्थापने मागील पार्श्वभूमी अशी आहे की, इ.स. चौदाव्या शतकात दिल्लीमध्ये सुलतान महमंद तुघलकाने सुरक्षा व प्रशासन व्यवस्थेच्या दृष्टीने यादवांद्वारे निर्मित देवगिरी किल्ला योग्य ठरवून त्याने आपली राजधानी दिल्लीहून देवगिरी येथे आणली. त्याच्या सैन्यासोबत धनिक व्यापारी आले होते. या व्यापारी लोकांमध्ये दिल्ली, आग्रा या परिसरातील जैन लोक होते. देवगिरी येथे महमंद तुघलकाचे सैन्य राहिले तर जैन व्यापारी आपल्या निवासासाठी देवगिरीच्या पूर्व दिशेस जाऊन राहिले. या ठिकाणी जैन लोक राहत असल्याने या वस्तीला जैनवाडा म्हटले जाऊ लागले, येथे शीतलनाथ मंदिर बांधले, या काळातील मंदिरातील वापरात असलेली काही भांडी औरंगाबाद येथील अग्रवाल दिगंबर जैन मंदिरामध्ये आहेत. ज्यावर शीतलनाथ मंदिर, जैनवाडा अशा नावाचा उल्लेख आहे.[११२]

जटवाडा, जोगवाडा ही दोन्ही क्षेत्र पर्वतांनी घेरलेली असल्याने साधूंसाठी तपस्या योग्य आहेत. हिंदू साधू जेथे राहतात त्या ठिकाणास जोगीवाडा किंवा जोगवाडा म्हटले जाते तर जैनवाडा येथे जैन यति राहत. त्यामुळे या ठिकाणास

जतिवाडा किंवा यतिवाडा म्हटले जात, याच नावाचे नामांतर जटवाडा झाले. या ठिकाणाहून चार किलोमीटर अंतरावर जोगवाडा हे क्षेत्र आहे. ही दोन्ही क्षेत्र आपले ऐतिहासिक व सांस्कृतिक दर्शन घडवितात.

काही वर्षांनंतर महमंद तुघलकाने आपली राजधानी परत दिल्ली येथे स्थलांतरीत केली. परंतु जैन व्यापारी येथे रुजलेला होता, त्यांनी परत न जाता तेथेच आपला व्यापार उद्योग वाढविला. कालांतराने जैन वाड्याचेही परिवर्तन होऊन त्याचे जटवाड्यात परिवर्तन झाले. सुरक्षिततेच्या कारणाने येथील जैन कुटुंबांनी स्थलांतर सुरु केले. यातून येथील मंदिराच्या तळघरात मूर्ती ठेवण्यात आल्या, मंदिर ढाचा पाडला गेला.[११३]

पुढे २१ आगॅस्ट १९८७ मध्ये शेखनूर नावाची व्यक्ती आपले घर बांधकाम करीत असताना तेथे भूयार आढळले व त्यात एकविस जैन प्रतिमा आढळल्या. त्या प्रतिमा पुरातत्त्व विभागाने आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. यात पद्मप्रभु, पार्श्वनाथ, महावीर यांच्या प्रतिमा आहेत.[११४]

राष्ट्रकुट राजाची राजधानी व आचार्य जिनसेन यांचे कर्मस्थळ शुलीभंजन होते. राष्ट्रकुट राजा कोणालाही फाशीची शिक्षा देत नसे. त्याच्या राज्यात फाशी देण्यास बंदी होती. त्यासाठी आपल्या राजधानीचे नाव शुलिभंजन ठेवलेले होते. पापी व्यक्तीचे वध किंवा हत्या करणे सुद्धा पाप समजून त्याचाही त्याग केला जात. जटवाडा हे क्षेत्र जैन आचार्य आर्यनंदीचे कर्मभूमी आहे. तसेच इ.स. १९९७ मध्ये जैन आचार्य देवनंदीची येथे सभा झाली होती.

या मंदिराचे व्यवस्थापन श्री संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशयक्षेत्र जटवाडा या ट्रस्टीकडून केली जाते. येथे पार्श्वनाथ जयंती वेळी वार्षिक उत्सव साजरा केला जातो.

## ११) <u>पैठण</u> :-

पैठण हे अतिशयक्षेत्र औरंगाबाद जिल्ह्यात असून मंदिरास तटबंदी आहे. या क्षेत्राचे मूलनायक मुनिसुव्रतनाथ आहेत. येथे गुहा मंदिर असून हे मंदिर

दोन मजली आहे. भूगर्भातील मंदिराचे रुपांतर काच मंदिरात केल्यामुळे या प्राचीनत्त्व समजून येत नाही.

अर्धपद्मासनातील मूलनायक मुनिसुव्रतनाथाची मूर्ती श्यामवर्ण आहे. ही मूर्ती तीन फूट सात इंच उंचीची असून कान खांद्यांना चिटकलेले, छातीवर श्रीवत्स, डोक्यावरील वाढलेले केस, चरणचिन्हावर लाछंन चिन्ह दाखविलेले आहे. या मूर्ती समोर संवत् २४८० स्थापन केलेली मुनिसुव्रतनाथाची लहान मूर्ती स्थापन केली आहे. मूलनायकाची दररोज तीन वेळा पूजा होते.

या मंदिरात अडुसष्ठ लहान-मोठ्या जिनमूर्ती असून त्यातील मूर्ती विक्रम संवत् १५१४, १५४८, १५०६, १६७४, १८०९ कालीन आहेत. या मूर्तीमध्ये पार्श्वनाथ, मल्लिनाथ, महावीर, नेमिनाथ, अरहनाथ, चंद्रप्रभु, शांतिनाथ, मुनिसुव्रतनाथ, आदिनाथ यांचा समावेश होतो. मंदिरात एक मानस्तंभ असून या मंदिरापासून काही अंतरावर गोदावरी नदीचे पात्र आहे.

सतराव्या शतकातील भट्टारक अजितकीर्ती यांचे शिष्य चिमणा पंडित येथे राहत असत. त्यांनी मराठी भाषेत अनेक काव्यरचना केल्या असून त्यात अनेक जैन तीर्थक्षेत्रांचे उल्लेख मिळतात. या क्षेत्राचा उल्लेख पद्मपुराणात ही आलेला आहे, यात पैठण क्षेत्र वर्णन आले आहे.[११५]

पैठणचे प्राचीन नाव प्रतिष्ठान होते. प्रतिष्ठान हे सातवाहन सत्तेचे केंद्र होते.[११६] काही सातवाहन राजे जैन धर्माचे पालन करीत होते असे जैन परंपरा सांगते. सातवाहन राजांनी जैन धर्मीस मदत केली आणि त्याच्या दरबारी पन्नास जैन वीर होते, त्यांनी सुद्धा जिनालय बांधली होती असे सांगितले जाते.

पैठण येथील मूलनायकाची प्रतिमा खरदुषण राजाने स्थापन केली. खरदूषण हा रावणाच्या बहिणीचा पती असून हा भगवान मुनिसुव्रतनाथाचा भक्त होता, तो दररोज त्यांची पूजा केल्याशिवाय अन्नग्रहण करीत नसे. परंतु जंगलात गेला असता त्याला पूजेची अडचण निर्माण झाली म्हणून त्याने वाळूपासून

मुनिसुव्रतनाथाची मूर्ती बनविली, पूजेनंतर अन्नग्रहण केले. तेथून जात असताना त्याने तेथे त्या मूर्तीची स्थापना केली असे येथे सांगितले जाते.[११७]

इ.स. तिस-या शतकात जेंव्हा भद्रबाहू दक्षिण यात्रेस आले, तेव्हा त्यांच्या सोबत मौर्य सम्राट चंद्रगुप्त, कालकाचार्य आणि विशाखाचार्य ही या दक्षिण यात्रेत सहभागी होते. या कालकाचार्याचा पैठण या क्षेत्राशी संबंध आला होता अशी माहिती मिळते.[११८]

सतराव्या शतकात या क्षेत्रावर होऊन गेलेले जैन कवी अजितकीर्ती आणि मराठी संत एकनाथ हे समकालीन होते.[११९] इ.स. १९७४ मध्ये येथे पंचकल्याणक झाले आहे. या मंदिराचे व्यवस्थापन श्री मुनिसुव्रतनाथ दिगंबर अतिशयक्षेत्र पैठण या ट्रस्टीमार्फत केले जाते. येथील वार्षिक उत्सव चैत्र शुक्ल पंधरामध्ये केले जाते येथे यात्रा भरते व पालखी मिरवणूक ही काढली जाते.

१२) **भातुकली जैन** :-

भातुकली हे अतिशयक्षेत्र अमरावती जिल्ह्यामध्ये असून या मंदिरात मूलनायक आदिनाथाची श्यामवर्ण तीन फूट चार इंच उंचीची शक संवत् ११५३ मध्ये स्थापन केलेली पद्मासनस्थ मूर्ती आहे. मूर्तीस डोक्यावर प्रकाश मंडल, केस खांद्यापर्यंत वाढलेले, छातीवर श्रीवत्स चिन्ह, हात आणि पायांची बोटे परस्पर चिटकलेली, बोटांची नखे वाढलेली आणि आदिनाथाचे लांच्छन बैल ही दाखविले आहे. आदिनाथाची ही मूर्ती बॅस्लटिक पाषाणापासून बनविलेली आहे.[१२०] ही मूर्ती चारशे वर्षापूर्वी जैन पंडित नेमसागर यांनी शोधून काढली. या मूर्तीची दररोज दोन वेळा पूजा केली जाते. येथे संवत् १९२५, संवत् १५४८, संवत् १९९९ मध्ये आणि संवत् १७६० मध्ये स्थापन केलेल्या पार्श्वनाथाच्या पाषाण मूर्ती आहेत तर सभामंडपाजवळ संवत् १९२४ मध्ये स्थापन केलेली पुष्पदंत भगवानाची आणि संवत् १९३४ मध्ये चंद्रप्रभुची स्थापन केलेली पाषाण मूर्ती आहे. या व्यतिरिक्त सहा पाषाणाच्या अन्य जिन मूर्ती आहेत. मंदिरासमोर तीस स्तंभाचे सभामंडप असून प्रांगणात प्राचीन विहिर दिसून येते. भातुकलीचे

प्राचीन नाव भोजकट होते. या भोजकट नगराची स्थापना महाभारतात उल्लेख आलेल्या रुक्मिणीचा भाऊ रुक्मी याने केले होते, याच भोजकटचा अपभ्रंश भातुकली झाले.[१२१]

या मंदिराचे व्यवस्थापन श्री आदिनाथ स्वामी दिगंबर जैन संस्था भातुकली या ट्रस्टीमार्फत केले जाते. या क्षेत्रावर वार्षिक उत्सव मार्गशीर्ष शुद्ध पाच ते सहा या काळात साजरा केला जातो. यावेळी यात्रा भरते, रथ मिरवणूक काढली जाते. इ. स. १९५२ मध्ये या क्षेत्रावर पंचकल्याणकाची स्थापना केली होती.

**१३) काटी सावरगाव :-**

सावरगाव हे अतिशयक्षेत्र उस्मानाबाद जिल्ह्यात असून येथे हेमाडपंथी मंदिर आहे. हे मंदिर गावच्या मध्यभागी असून मंदिरास उंच तटबंदी आणि भव्य प्रवेशद्वार असून प्रवेशद्वारावर नगारखाना दिसून येतो. अकराशे वर्ष प्राचीन असलेले हे क्षेत्र प्रसिद्ध आहे.[१२२]

मंदिराचे गर्भगृह, अंतराळ, सभामंडप असे भाग असून गर्भगृहाच्या वेदीवर मूलनायक पार्श्वनाथाची पद्मासनस्थ चार फूट उंचीची कृष्णवर्णीय पाषाण मूर्ती, डोक्यावर नागाचे सप्तफणा छत्र, पाठीवर सर्पवलय असून मूर्तीचे कान खांद्यास चिटकलेले आहेत. या मूर्तीच्या स्थापने वेळी आचार्य शांतिसागर आपल्या संघासोबत आलेले होते.

वेदीवर मूलनायक मूर्तीशिवाय संवत् १९९० मध्ये स्थापन केलेली पार्श्वनाथाची पाषाण मूर्ती आहे. मूलनायकाची दररोज तीन वेळा पूजा केली जाते. गर्भगृहाची चौकट दगडी असून त्यावर तीर्थंकर मूर्ती, नक्षीदार शिल्प कोरलेले आढळून येतात. डाव्या बाजूस सर्वतोभद्र प्रतिमा असून सुपार्श्वनाथ, अरहनाथ, चंद्रप्रभु, शांतिनाथ, आदिनाथ, पार्श्वनाथ यांच्याही मूर्ती आहेत. सभामंडपासमोर दोन मानस्तंभ दिसतात[१२३], मानस्तंभाजवळ सर्वतोभद्र आणि क्षेत्रपालाची प्रतिमा आहे. हे क्षेत्र दोनशे वर्षांपूर्वी पंडित बापूदास यांनी शोधून

काढले. तेव्हापासून या क्षेत्राची प्रगती झाली. सावरगाव येथे साप, विंचू, पाल हे नागपंचमीस एकत्र येतात, म्हणून जैन धर्मीय याला अहिंसेचे प्रतिक मानतात.

या क्षेत्राचे व्यवस्थापन श्री पार्श्वनाथ दिगंबर अतिशयक्षेत्र सावरगाव या ट्रस्टीमार्फत केले जाते. या क्षेत्रावर वार्षिक उत्सव मार्गशिर्ष वद्य दहा आणि अकरा या दोन दिवसात साजरा केला जातो. यावेळी गावातून पालखी मिरवणूक काढली जाते. मंदिर आणि परिसर अद्ययावत करण्यासाठी येथील विश्वस्त कार्यरत आहेत. नवीन पद्धतीचे बांधकाम सुरु आहे.

१४) **आष्टा कासार :-**

आष्टा कासार हे अतिशयक्षेत्र उस्मानाबाद जिल्ह्यात असून या क्षेत्रावर असणारी पार्श्वनाथची मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण आहे. येथे होणारे अतिशय यामुळे या क्षेत्रास अतिशय क्षेत्र समजले जाते. येथील जुने मंदिर हेमाडपंथी असून आवश्यक त्या ठिकाणी जीर्णोद्धार केला आहे. गर्भगृहात वेदीवर मूलनायक पार्श्वनाथाची पद्मास्थनस्थ एक फूट पाच इंचाची कृष्णवर्ण पाषाणापासून बनविलेली मूर्ती आहे. या पार्श्वनाथ मूर्तीच्या डोक्यावर नागफणा नसून तो पादपीठवर असून छातीवर श्रीवत्स आहे. मूर्तीचे कान खांद्यास चिटकलेले आहेत. मूलनायकाची दिवसातून तीन वेळा पूजा केली जाते, या मूर्तीवर संवत् १४७२ असा उल्लेख आहे.

डाव्या बाजूस इ.स. १९२९ मध्ये स्थापन केलेली पार्श्वनाथाची मूर्ती असून सोबतच चंद्रप्रभु आणि अन्य तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत. इ.स. १९२९ मध्ये स्थापन केलेली एकत्र चोवीस तीर्थंकरांची मूर्ती आहे. येथे पद्मावती देवी आणि क्षेत्रपालाची प्रतिमा आहे. या मंदिरातील मूलनायकाची मूर्ती आष्टा येथील जैन पाटील यांनी स्थापन केली आणि कालांतराने येथे मंदिर उभारले गेले.[१२४]

या क्षेत्रावर चैत्र वद्य चारमध्ये वार्षिक उत्सव साजरा केला जातो. यावेळी गावातून पालखी मिरवणूक काढली जाते.

१५) **<u>दहीगाव</u>** :-

दहीगाव हे अतिशयक्षेत्र सोलापूर जिल्ह्यात असून या क्षेत्रावर महावीराचे दोनशे वर्षापूर्वीचे मंदिर आहे. हे मंदिर गर्भगृह, सभामंडपांनीयुक्त आहे. गर्भगृहात वेदीवर पद्मासनातील पाच फूट पाच इंच उंचीची महावीरांची श्यामवर्ण पाषाण मूर्ती असून या मूर्तीची स्थापना संवत् १९९० केली आहे.

डाव्या बाजूस आदिनाथ, पार्श्वनाथाची मूर्ती असून पन्नासपेक्षा अधिक विविध धातुच्या व पाषाणाच्या मूर्ती आहेत. बाहेरील सभामंडपात महावीरांची मूर्ती आणि महतीसागर यांचे चरणचिन्ह आहेत. सप्तफणा असलेली पार्श्वनाथाची मूर्ती, दोन्ही बाजूस यक्ष-यक्षिणी दाखविल्या असून ही मूर्ती येथील शेतक-यास जमीन नांगरताना सापडली होती. सभामंडपात शांतीसागराच्या मार्गदर्शनामुळे वीस तीर्थंकरांच्या मूर्ती स्थापन केल्या आहेत.

मंदिर शिखरावर जिन प्रतिमा आहेत. हे जिनालय संवत् १६६५ मध्ये स्थापन केलेले आहे. मंदिराच्या बाजूस आदिनाथाची संवत् १९२१, १९३९, पार्श्वनाथाची संवत् १९१९, १९२९, १९३९, १९४९, महावीराची संवत् १९१९, रत्नत्रय मंदिर संवत् १९२९ मध्ये स्थापन केलेल्या कृष्ण व श्वेत पाषाणातील मूर्ती असून मंदिरात यक्ष-यक्षी, भाममंडलात छत्र, गजलक्ष्मी, चमरेन्द्रे दाखविले आहेत.

मुख्य गर्भगृहासमोर चोवीस स्तंभावर आधारलेले सभामंडप असून प्रांगणात त्रेपन्न फूट उंचीचा मानस्तंभ आहे. येथील ग्रंथालयात पाण्डु लिपीतील साहित्य संग्रह जपून ठेवलेला आहे.

या क्षेत्राच्या काही अंतरावर आचार्य धर्मसागर यांची समाधी आहे. दोनशे वर्षापूर्वी या क्षेत्रावर मंदिर नव्हते, परंतु आचार्य महतीसागर यांनी जैन धर्मियात जागृती निर्माण केली, त्यातूनच येथे मंदिर बांधले गेले. परंतु संवत् १८८९ मध्ये त्यांना निर्वाण प्राप्त झाले. त्यांच्यानंतर त्यांचे शिष्य गुणचंद्र यांनी

त्यांचे उत्तरदायित्त्व सांभाळले. विक्रम संवत् १८९३ मध्ये फलटणचे शेठ जयचंद गांधी यांनी या क्षेत्राच्या विकासासाठी मदत केली आहे.[१२५]

या मंदिराचे व्यवस्थापन श्री महावीर दिगंबर अतिशयक्षेत्र दहीगाव या ट्रस्टीमार्फत केले जाते. या क्षेत्रावरील वार्षिक उत्सव कार्तिक वद्य पाचा ते सात या काळात साजरा केला जातो. यावेळी येथे यात्रा भरते आणि रथमिरवणूक काढली जाते.

१६) **कौडण्यपूर** :-

कौडण्यपूर हे अतिशयक्षेत्र अमरावती जिल्ह्यामध्ये असून येथील मूलनायक सुपार्श्वनाथाची मूर्ती कृष्णवर्ण पाषाणापासून बनविलेली असून ही मूर्ती चतुर्थकालीन समजली जाते. या मूलनायकाची दररोज तीन वेळा पूजा केली जाते.

वर्धा नदीजवळ हे क्षेत्र असून या क्षेत्राचे कुंडलपूर, कुंदनपूर अशीही नांवे आहेत. याचे प्राचीन नांव कौडिल्यपूर होते. विदर्भ देशांचा राजा भीष्मक याची ही राजधानी होय. येथून श्रीकृष्णाने रुक्मिणीचे हरण केले असे सांगितले जाते. हे प्राचीन काळी मोठे शहर होते, आज हे एक लहानसे खेडे आहे, येथे मंदिराशिवाय आणि धर्मशाळेशिवाय जैन वस्ती नाही. जवळच हिंदू मंदिर समूहाच्या मध्यभागी दिगंबर जैनांचे एक लहानसे मंदिर आहे. त्या मंदिरात मूलनायक महावीरांची लाल वर्णाची पद्मासनस्थ दीड फूट उंचीची मूर्ती सिंहासनावर विराजित आहे, त्यावर लेख नाही. या मंदिराच्या खाली भूयार असून त्यातून मुक्तागिरीला जाण्याचा मार्ग होता असे सांगतात. इतर तीर्थंकरांच्या ही मूर्ती या मंदिरात दिसतात. मंदिराभोवतीच एक लहानशी धर्मशाळा आहे.

या मंदिराच्या बाजूला विठोबाचे मंदिर आहे, ते पूर्वी जिन मंदिर होते असे सांगतात. हे मंदिर कोणी आणि केंव्हा बांधले याचा इतिहास मिळत नाही. मंदिरातील विठोबाची मूर्ती नेमिनाथाची असून ती खड्गासनस्थ आहे, त्याच्या

बाजूला रुक्मिणीची म्हणजे राजूलमतीची मूर्ती आहे, आज या मंदिरावर हिंदूंची मालकी आहे. या क्षेत्रावर पुष्पदंत सागर, देवनंदी, आर्यनंदी, चिण्मय सागर, सुधासागर, तरुणसागर या जैन मुनी व आचार्य यांनी भेटी दिल्या. इ.स. २००० मध्ये पंचकल्याणक महोत्सव समारंभ झाले, त्यावेळी आचार्य देवनंदीजी महाराज या समारंभास उपस्थित होते.[१२६]

या मंदिराचे व्यवस्थापन श्री पार्श्वनाथ दिगंबर अतिशयक्षेत्र आर्वी यांच्याकडून केले जाते.

**१७) <u>बाढौणा रामनाथ</u> :-**

बाढौणा रामनाथ हे अतिशयक्षेत्र अमरावती जिल्ह्यात असून या क्षेत्रावरील मंदिरात प्रवेश करताच सभामंडप, गर्भगृह दिसते. गर्भगृहातील वेदीवर आदिनाथाची तीन फूट आठ इंच उंचीची पाषाण मूर्ती असून ही मूर्ती संवत् १५४८ मध्ये स्थापन केलेली आहे.

मागील बाजूस पद्मप्रभुची संवत् १४५७ मध्ये स्थापन केलेली पद्मासनस्थ मूर्ती असून याशिवाय येथे वीस पाषाणाच्या आणि सहा धातूच्या मूर्ती आहेत.

या सोबतच बाजूच्या गुहा मंदिरात अकराव्या-बाराव्या शतकातील चौबिसी पाषाण फलक आहे. येथे महावीर जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.[१२७]

**१८) <u>पांचालेश्वर (नंदीश्वर)</u> :-**

पांचालेश्वर हे अतिशयक्षेत्र बीड जिल्ह्यात असून या क्षेत्रावर दोन प्राचीन मंदिरे आहेत, हे क्षेत्र नंदीश्वराचे आहे. नंदिश्वर मंदिर अन्य ठिकाणी आढळत नाही. येथे पंधरा फूटी पद्मप्रभू व सतरा फूटी सुव्रतनाथाची खड्गासनस्थ मूर्ती आहे, येथे बावन्न जिनालय दर्शन आहे, येथे वेदीवर चौमुखी सर्वतोभद्र मूर्ती आहे. येथे हेमाडपंती मंदिर होते परंतु त्याचे जिर्णोद्धार करण्यात आले आहे,

येथे एकतीस जिन मूर्ती आहेत. जैन धर्मातील आदिनाथ पुराण व हरिवंश पुराण यात या क्षेत्राचे वर्णन मिळते.[१२८]

या क्षेत्रावर प्रथम पंचम पट्टाचार्य श्रेयांस सागर मुनी व आचार्य कीर्ती विमलसागर, सुबलसागर महाराज संघासमवेत आले होते. येथील जीर्णोद्धार १९८५ पासून सुरु झाले आहे, येथील बांधकामात लाल दगडाचा अधिक वापर केलेला दिसतो.

१९) **विजयगोपाल** :-

विजयगोपाल हे अतिशयक्षेत्र वर्धा जिल्ह्यामध्ये आहे. हे क्षेत्र सहाशे वर्षापूर्वीचे आहे असे येथे सांगितले जाते. या क्षेत्रावर एकच मंदिर आहे, मंदिराचे जीर्णोद्धार केले असून या क्षेत्राचे मूलनायक आदिनाथ आहेत, मूलनायकाची मूर्ती चार फूटाची आहे.

मंदिराचे व्यवस्थापन श्री आदिनाथ दिगंबर जैन अतिशयक्षेत्र या ट्रस्टीमार्फत केले जाते.[१२९]

२०) **कोठाळा** :-

कोठाळा हे अतिशयक्षेत्र जालना जिल्ह्यामध्ये असून द्रोणगिरी नदीच्या काठावर हे क्षेत्र वसले आहे. येथील मूलनायक पार्श्वनाथाचे हेमाडपंती मंदिर आहे. मंदिरास तटबंदी असून मंदिरात मानस्तंभ आहे. मूलनायकाची मूर्ती वाळूपासून बनविलेली आहे. पद्मासन ध्यान मुद्रेतील ही मूर्ती असून येथील वार्षिक उत्सव मार्गशीर्ष वद्य चौदामध्ये साजरा केले जाते.[१३०]

२१) **आसेगाव** :-

आसेगाव हे अतिशयक्षेत्र हिंगोली जिल्ह्यामध्ये आहे. आसना नदीच्या पश्चिम तटावर हे क्षेत्र वसलेले असून या क्षेत्रावर दोन मंदिरे दिसतात. येथे हेमाडपंती मंदिर होते ते जीर्ण झाल्याने या मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला आहे. या क्षेत्राचे मूलनायक चिंतामणी पार्श्वनाथ या नावाने प्रसिद्ध आहेत. पार्श्वनाथाची ध्यान मुद्रेतील मूर्ती श्यामवर्णीय पाषाणापासून बनविलेली आहे.

मंदिरात गर्भगृह, सभामंडप, मानस्तंभ आहे. मूर्ती लेखावरुन ही मूर्ती एक हजार वर्षापूर्वीची आहे. ही मूर्ती सापडली म्हणून येथेच स्थापना करण्यात आली. आचार्य देवनंदी महाराजाच्या संघ उपस्थितीत इ.स. २००३ मध्ये पंचकल्याणक आणि वेदीप्रतिष्ठा समारंभ झाले. वार्षिक उत्सव मार्गशीर्ष वद्य अकरा ते तेरा पार्श्वनाथ जयंती वेळी साजरी केली जाते.

येथील व्यवस्थापन श्री १००८ चिंतामणी पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र आसेगाव या ट्रस्टीमार्फत केले जाते.[१३१]

**२२) मांडल :-**

मांडल हे अतिशयक्षेत्र जळगाव जिल्ह्यामध्ये आहे. हे क्षेत्र एक हजार वर्षापूर्वीचे असून येथील मूलनायक चंद्रप्रभु आहेत. मूलनायकाची पद्मासन ध्यान मुद्रेतील पाषाण मूर्ती आहे. या क्षेत्रावर क्षेत्रपालाची पंचमुखी मूर्ती दिसते, येथे क्षेत्रपालाचे विशेष महत्त्वाचे स्थान आहे.

यासोबतच येथे अजितनाथ आणि मुनिसुव्रतनाथाची पंधराशे वर्षे प्राचीन मूर्ती पाहावयास मिळतात. या मंदिराचे व्यवस्थापन श्री चंद्रप्रभु दिगंबर जैन अतिशयक्षेत्र मांडल या ट्रस्टीमार्फत पाहिले जाते. प्रत्येक अमावस्येला क्षेत्रपालाच्या मूर्तीचा अभिषेक केला जातो. पौष वद्य अकरा वेळी येथे वार्षिक यात्रा भरते.[१३२]

**२३) केसापुरी :-**

केसापुरी हे अतिशयक्षेत्र बीड जिल्ह्यामध्ये असून येथील मूलनायक पार्श्वनाथ आहेत. याची कल्पतरु पार्श्वनाथ या नावाने प्रसिद्धी आहे. श्यामवर्ण पाषाणापासून बनविलेल्या या मूर्तीची उंची पाच फूट असून डोक्यावर नागफणा छत्र आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूस सिंह दाखविलेले धर्मचक्र आहे. ही मूर्ती वेरुळ येथील पार्श्वनाथाच्या मूर्तीशी साम्य दाखविते. या मूर्तीची दररोज दोन वेळा पूजा केली जाते.

येथे हेमाडपंती मंदिर असून गरजेनुसार याचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे. मंदिराचे छत, स्तंभ नक्षीकामाने सुशोभित दिसते. हे मंदिर अकराशे वर्षापूर्वीचे असून मनुभवती या राजाने स्थापन केले असे सांगितले जाते.[१३३]

या मंदिरास तटबंदी व प्रवेशद्वार असून मंदिरासमोर लाल दगडापासून बनविलेला मानस्तंभ दिसतो. या क्षेत्राची दोन एकर जमीन आहे. तसेच या क्षेत्र परिसरात मुनीची समाधी, दगडी फुलकावर पिंच्छी, कमंडलु अशा चिन्हांची जैन अवशेष मोठ्या प्रमाणात मिळतात. येथून जवळच असलेल्या माजलगावात पस्तीस जैन मूर्ती मिळालेल्या असून बीड येथील किल्ला चंपावती या जैन राणीने बांधला आहे.[१३४]

केसापुरी या क्षेत्रावर इ.स. १९६७ साली आर्यनंदी मुनीच्या सांगण्यावरुन मंदिराचे जिर्णोद्धार करण्यात आले. त्यानंतर बलभद्र, जयभद्र या मुनीचा या क्षेत्रास सहवास लाभला. इ.स. १९९२ मध्ये पंचकल्याण, इ.स. २००२ मानस्तंभ अभिषेक, इ.स. २०१२ मध्ये महामस्तकाभिषेक असा मोठा समारंभ येथे साजरा झाला.

येथे श्री १००८ कल्पतरु पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशयक्षेत्र केसापुरी ही ट्रस्ट इ.स. १९६० मध्ये झाली आहे. या ट्रस्टीमार्फत मंदिराचे व्यवस्थापन केले जाते. या क्षेत्रावर माघ शुद्ध पंधराला वार्षिक यात्रा भरते, पालखी मिरवणूक काढली जाते.

## २४) <u>कुंथुगिरी</u> :-

कुंथुगिरी हे अतिशयक्षेत्र कोल्हापूर जिल्ह्यात असून हे पहाडी क्षेत्र आहे. येथील मंदिरे नवीन आहेत, या क्षेत्राचे मूलनायक पार्श्वनाथ असून त्यांची नऊ फूटी पाषाण मूर्ती आहे. पार्श्वनाथांना एकशे आठ नागफण्याने सुशोभित केले आहे. मंदिराचे गर्भगृह, सभामंडप, स्तंभ नक्षीकामाने सुशोभित केलेले दिसते.

जैन मुनी कुंथुसागरजीच्या प्रेरणेने या क्षेत्राचा विकास झाला आहे. येथे चाळीस जैन गुरुंच्या प्रतिमा, आगम मंदिर, प्राचीन भाषेतील जैन साहित्य संग्रह येथे पाहावयास मिळते. येथे पार्श्वनाथ जयंतीस वार्षिक उत्सव साजरा केला जातो.[१३५]

- **कलातीर्थ** :-

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जैन गुहा मंदिरे आणि गुफा आहेत. पर्वतांना खोदून बनविलेल्या या गुफा आणि त्यात कोरलेल्या मूर्ती यामधून जैन स्थापत्य कलावैभव दिसून येते. अशा ठिकाणांना उत्कृष्ट जैन कलाक्षेत्रे समजली जातात. याठिकाणच्या स्थापत्य, शिल्पकला यातून जैन संस्कृती परंपरेचा बोध होण्यास मदत होते. वेरुळ लेणी, धाराशिव लेणी, औरंगाबाद लेणी, चांदवड लेणी आणि अंजनेरी लेणी ही जैन कलातीर्थे समजली जातात.[१३६]

(१) **वेरुळ लेणी** :-

औरंगाबाद जिल्ह्यातील वेरुळ येथे हिंदू, बौद्ध, जैन धर्मीय लेण्या आहेत. जैन धर्मानुसार येथील लेणी क्रमांक ३१, ३२, ३३, ३४ या जैन कलातीर्थ समजल्या जातात.

ऐलोरा आपल्या शिल्प वैभव आणि स्थापत्य कलेमुळे संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे. कठीण पाषाणामध्ये लावण्य, मनोज्ञ, विरक्तता, कोमलता ही वैशिष्ट्ये निर्माण केली आहेत. येथील जैन मूर्त्यांमध्ये सर्वसमावेशकता उच्च दर्जाची आहे. येथे पार्श्वनाथ आणि बाहुबलींच्या मूर्त्यांमध्ये विविधता आढळून येते. पार्श्वनाथाच्या काही मूर्ती पद्मासनस्थ आहेत तर काही कायोत्सर्गासनात आहेत तर काही मूर्ती केवलज्ञानापूर्वीच्या कमठासुराद्वारे केलेल्या विविध उपसर्गाचे सजीव चित्रण करणारे आहेत. येथे अशा ही मूर्ती आहेत की, पार्श्वनाथास कैवलज्ञान प्राप्त झाल्यानंतर देव-देवता पुष्पवृष्टी करीत वाद्य वाजवित आहेत.

बाहुबलीच्या सर्व मूर्ती त्यांनी केलेल्या खडतर तपस्येचे सूचक आहेत. तपस्यारत बाहुबलीच्या मांड्यावर बाहुवर वेली चढलेल्या आहेत. वारुळातून सर्प बाहेर येऊन बाहुबलीस एक टक पाहत आहेत, गंधर्व बाहुबलीच्या अंगावर चढलेल्या वेली, मुंग्या काढत आहेत. बाहुबलीच्या काही मूर्त्यांसोबत चक्रवती भरतास ही दर्शविलेले आहे. त्यांची बहिण ब्राम्ही आणि सुंदरी यांच्या समोर उभ्या दाखविलेल्या आहेत.

तीर्थंकरांमध्ये पार्श्वनाथ व्यतिरिक्त ऋषभदेव, नेमिनाथ, चंद्रप्रभु, शांतिनाथ आणि महावीरांच्या ही मूर्ती आहेत. या सर्व मूर्ती पद्मासनस्थ आहेत. शासनदेवता चक्रेश्वरी, पद्मावती, अंबिका आणि सिद्धायिका सोबतच गोमेद, मातंग, धरणेंद्रांच्या उल्लेखनिय मूर्ती आहेत.

नीलांजना आणि इंद्राची नृत्य मुद्रेतील मूर्ती आकर्षक आहे. स्तंभ, तोरण, देव-देवतांच्या मूर्ती, अलंकार, भाव, सौंदर्याने युक्त आहेत. येथील बहुतेक लेण्या दोन मजली आहेत, स्तंभ कोरीव कामाने सुशोभित आहेत.[१३७]

- **<u>पार्श्वनाथ मंदिर</u>** :-

लेणी क्रमांक ३० च्या उत्तरेस एक कच्चा मार्ग वर पहाडावर जातो जो या पार्श्वनाथ मंदिरापर्यंत जातो. हे मंदिर आधुनिक आहे, परंतु जुन्या मंदिरांचे अवशेष येथे आहेत. या मंदिराच्या गर्भगृहात पार्श्वनाथाची सोळा फूट उंचीची श्याम वर्णाची अर्धपद्मासनस्थ मूर्ती असून डोक्यावर नागाचे नऊ फणा असलेले छत्र आहे. छातीवर श्रीवत्स चिन्ह नाही, कान खांद्यापर्यंत नाहीत, पीठासनावर सिंह आणि हत्ती कोरलेले आहे. जवळच दम्पती हात जोडून दाखविलेले आहे, मूर्तीच्या पाठीवर सर्पवलय दाखविलेले आहे. डाव्या बाजूस भक्त उभे आहेत तर उजव्या बाजूस पद्मावतीची मूर्ती आहे. गर्भगृहाच्या बाहेरच्या बाजूस मंगल कलश घेतलेले दोन भक्त उभे असलेले दाखविले आहे.

हे मंदिर लेण्यापासून थोड्या अंतरावर स्वतंत्र आहे. या पर्वताला चारणाद्रि किंवा कनकाद्रि म्हणतात. या पहाडावर चारण ऋद्धिधारी मुनि

तपस्या करीत होते, म्हणून या पर्वतास ''चारणाद्रि'' नावाने ओळखले जाते असे येथे सांगितले जाते.

मूर्तीच्या चरणचिन्हांवर लेख कोरलेला आहे, त्यावर निर्माता, निर्माणकाल याची माहिती मिळते. हा लेख परिशिष्टात दिलेला आहे.

शक संवत् ११५६ (इ. स. १०७८) फाल्गुन सुदी ३ बुधवार श्रीधनापूरच्या राणुंगीच्या चार पुत्रामधील ज्येष्ठ पुत्र चक्रेश्वराने चारणाद्रि पर्वतावर पार्श्वनाथाच्या मूर्तीची स्थापना केली. त्यांनी अनेक जिन मूर्ती बनविल्या. पार्श्वनाथाच्या या मंदिरापासून ऐंशी पाय-या खाली उतरल्यानंतर काही अर्धवट लेणी आहेत. यात मंडप आणि गर्भगृह आहे. भिंतीवर यक्ष-यक्षी कोरलेल्या आहेत, जवळच जलकुंड आहे.

वेरुळचे प्राचीन नाव एलापूर सांगितले जाते. या नगराच्या स्थापने विषयी अनेक मते आहेत. काही विद्वानांच्या मते, या ठिकाणाचे नाव सुप्रसिद्ध जैनाचार्य एलाचार्य यांच्या नावावरुन केले आहे, असे सांगितले जाते. ऐलाचार्य वीरसेन मुनीचे गुरु होय. वीरसेन मुनीनी जयधवलामध्ये 'एलाइरयवस्सजस्सणिच्छओ' या प्रमाणे ऐलाचार्यांचे स्मरण केले आहे. हे ऐलाचार्यांचे बिहार प्रदेशात अधिक वास्तव्य होते, ते विद्वान चरित्रनिष्ठ आणि प्रभावी जैन आचार्य होते. त्यांच्या नावावरुन या नगरास ऐलापूर ही संज्ञा प्राप्त झाली असे जैन परंपरा मानते.

ऐलापूर जवळ शुलिभंजन नगर होते, ती राष्ट्रकुटांची उपराजधानी होती. राष्ट्रकुट राजा अमोघवर्ष (इ.स. ८१४-८७७) येथे वास्तव्यास होता. त्यावेळी जैन आचार्य जिनसेन ऐलापूर येथे आपले गुरु वीरसेनद्वारे आपले कार्य पूर्ण करीत होते. याप्रमाणे जैन परंपरा वेरुळ किंवा ऐलोरा विषयी माहिती सांगते.

वेरुळ येथील लेण्यांची व्यवस्था भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाकडून केली जाते. परंतु येथील पार्श्वनाथ मंदिरावर जैन समाजाचा अधिकार आहे. येथे श्री भगवान पार्श्वनाथ ट्रस्ट स्थापन झालेली असून या

मार्फत या क्षेत्राचे व्यवस्थापन केले जाते. या ट्रस्टी अंतर्गत या क्षेत्रावर श्री पार्श्वनाथ ब्रम्हचर्याश्रम गुरुकुल स्थापन केले आहे. या गुरुकुलाची स्थापना आचार्य समंतभद्र, आर्यनंदी मुनींच्या प्रेरणेतून झाली आहे. या गुरुकुलात दहावीपर्यंतचे शिक्षण दिले जाते, येथे धर्मशाळा ही आहे.

श्री पार्श्वनाथ मंदिर चारणाद्रिका क्षेत्रावर वार्षिक उत्सव फाल्गुन कृष्ण चौदा या वेळी साजरा केले जाते.[१३८]

(२) **<u>धाराशिव लेणी</u> :-**

हे जैन कलातीर्थ उस्मानाबाद जिल्ह्यात असून उस्मानाबादचे जुने नाव 'धाराशिव' होय. या नावावरुनच आणि पुरातत्वीय भाषेत तेथील लेणी धाराशिव लेणी या नावाने ओळखली जाते. उस्मानाबाद शहराच्या ईशान्येस सुमारे आठ किलोमीटर अंतरावर बालाघाटच्या डोंगरामध्ये ही लेणी आहेत. एका बाजूला चार आणि दुस-या बाजूला तीन अशा एकूण सात लेण्या आहेत.

प्राचीन धाराशिव 'प्राचीन महिषक' राज्यात मोडत होता. बीदर, गुलबर्गा, मेडक, रायचूर हे जिल्हे महिषक राज्यात मोडत. उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर हे सातवाहन कालीन मोठी बाजारपेठ होती. तेर (तगर) सोबतच धाराशिव नगरीची भरभराट झाली असावी. उस्मानाबाद शहराचा आणि धाराशिव लेण्याचा सर्वात प्राचीन उल्लेख मुनी कानकामर लिखित करकंड चरिऊ आणि बृहतकथाकोश या ग्रंथात आहे. करकंड चरिऊ ग्रंथ जैन धर्मासंबंधी असून त्यात करकंड राजाची माहिती दिली आहे.[१३९]

धाराशिव लेण्याचा अभ्यास बर्जेस आणि फर्ग्यूसन या दोन संशोधकांनी प्रथम केला. त्यानंतर डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. एम. के. ढवळीकर यांनी ही लेणी अभ्यासली. वीस वर्षापूर्वी डॉ. अमर सुतार आणि प्रा. डॉ. सोमनाथ रोडे यांनी या लेण्यावर पुस्तक लिहिले आहे. येथे सात लेणी आहेत, चार लेणी एका बाजूला असून तीन लेणी त्यांना काटकोन करणा-या डोंगरात आहेत. पहिल्या चार लेण्या जैन धर्मीयांच्या आहेत. बाकी तीन पैकी पहिल्या दोन लेण्या काही

संशोधकाच्या मते जैन धर्मीयांच्या आहेत. परंतु काहीच्या मते तीनही हिंदू लेण्या आहेत, त्यापैकी एकावर कृष्णलीलांची शिल्पे कोरली आहेत. धाराशिव लेण्यात मूर्ती कोरल्या आहेत, रंगकाम ही आढळते. प्राचीन काळाच्या छताच्या काही भागात रंगकाम केलेले दिसते. गर्भगृहातील मूर्ती अत्यंत आकर्षक अशा नैसर्गिक रंगात रंगवलेल्या आहेत, रंगाचा ताजेपणा आणि चकाकी आजही टिकून आहे. पहिल्या चार लेण्यात पूर्व-पश्चिम असलेल्या डोंगरात कोरली आहेत. पहिली लेणी अत्यंत साध्या पद्धतीची आहे. समोर लहान व्हरंडा असून सभामंडपात जाण्यास तीन दरवाजे आहेत. सभामंडपाच्या आत गाभारा आहे.[१४०]

येथील लेण्यात सर्वात उत्कृष्ठ लेणी म्हणजे क्रमांक दोनची लेणी होय. समोरच्या प्रांगणासाठी एक प्रवेशद्वार असून द्वारशाखाही कोरली आहे. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला द्वारपाल रक्षणासाठी सुसज्ज आहेत. स्तंभावरील नक्षीकाम लुप्त झाला आहे, लेण्यात सर्वत्र पांढरा रंग आवला आहे. पाय-याच्या दोन्ही बाजूला जोत्यावर यक्षाच्या प्रतिमा कोरल्या आहेत. लेण्यामध्ये एकूण छत्तीस स्तंभ असावेत, बावीस खोल्या आहेत, गर्भगृहात पार्श्वनाथांची एक अत्यंत देखणी व भव्य प्रतिमा आहे. एका सिंहासनावर पार्श्वनाथ पद्मासनात आहेत, मूर्तीला वज्रलेप दिला आहे. चेह-यावर सौम्य, शांतभाव आहेत, पार्श्वनाथाच्या मस्तकामागे सात फणा असलेला सर्प असून यक्ष, विद्याधर, व्याले, चामरधारी सेवकांच्या मूर्ती आहेत. या सर्व मूर्ती रंगीत आहेत, त्यांच्या आभूषणात रंगीत काचांचा वापर करुन आकर्षकता निर्माण केली आहे. मूर्ती कोरुन त्यावर रंगकाम करण्याचा अनोखा प्रयत्न या लेण्यांमध्ये झाला आहे. गाभा-याच्या उजवीकडील खोलीमध्ये स्थानक रुपातील एक जिनमूर्ती आहे, ती नेमिनाथांची आहे असे मानतात. मूर्ती लेण्यातच कोरली आहे, ही मूर्ती समभंग, समपद्स्थानक असून ह्या अवस्थेस खड्गासन असे म्हटले जाते. दोन नंबरच्या लेण्यात बाहेरुन काही मूर्ती आणून ठेवल्या आहेत. यामध्ये सर्वतोभद्र प्रतिमा आहे, म्हणजे एका चौकोनी स्तंभासारख्या भागावर चार दिशेला तोंड करुन

असलेल्या चार मूर्तीमध्ये आदिनाथ, पार्श्वनाथ, नेमिनाथ आणि भगवान महावीर अशा प्रतिमा आहेत.

लेणी क्रमांक तीन समोर पाय-या चढून गेल्यावर मुखमंडप असून मुखमंडपातील सहा स्तंभावर नव्याने आवरण चढवलेले आहे. मुख्य द्वारशाखे भोवती नक्षीकाम केले आहे, या लेण्याच्या मुख्यद्वाराच्या दोन्ही बाजूस दोन खिडक्या आहेत. गर्भगृह, सभामंडप, लहान खोल्या आणि मुखमंडप असे या लेण्याचे भाग पडतात. सभामंडपात वीस स्तंभ आहेत, यापैकी चार स्तंभ गोलाकार तर सोळा स्तंभ चौकोनी आहेत. गर्भगृहात पार्श्वनाथाची सिंहासनस्थ पद्मासनात मूर्ती आहेत. दुस-या क्रमांकाच्या लेणीप्रमाणेच येथे सुद्धा पार्श्वनाथाच्या मूर्तीभोवती यक्ष, विद्याधर, चामरधारीपुरुष दिसतात.

चौथ्या क्रमांकाची लेणी लहान आहे, मुखमंडप, द्वारशाखा, स्तंभ, खोल्या आहेत. गर्भगृहात पार्श्वनाथाची मूर्ती आहे. पाचव्या क्रमांकाच्या लेणीमध्ये पाण्याचा झरा असून तेथे नेहमी पाणी साठवलेले असते. लेणी क्रमांक सहा सुद्धा अर्धवट आहे, येथे जिनमूर्ती कोरलेली आहे. लेणी क्रमांक सातच्या मुखमंडपाच्या स्तंभावर बाहेरच्या बाजूने श्रीकृष्ण लीलेमधील काही प्रसंग कोरले आहेत. मकर तोरणेसुद्धा आढळतात, म्हणजे ही हिंदू लेणी होय.

धाराशिव लेण्याच्या कालखंडासंसंबंधी चर्चा करताना सर्वच लेणी एका कालखंडात तयार झाली नाहीत असे वाटते. सर्वात प्राचीन लेणी म्हणजे क्रमांक दोन आणि त्यानंतर क्रमांक तीन आणि त्यानंतर क्रमांक १, ४, ५, ६, ७ ही लेणी कोरली गेली असावीत.[१४१]

## (३) <u>औरंगाबाद लेणी</u> :-

औरंगाबाद शहर महाराष्ट्रातील ऐतिहासिक शहर म्हणून महत्त्वाचे असून शहराजवळील वेरुळ आणि अजिंठा या लेण्यांसोबत औरंगाबाद शहरातील लेणी सुद्धा महत्त्वाची आहे ही जैन कलातीर्थ म्हणून प्रसिद्ध आहे.

या शहरातील बेगमपुरा मुहल्ला किंवा मकबरेच्या उत्तर दिशेस या लेणी आहेत. मकबरेच्या पुढे गेल्यानंतर या मार्गावर निपट निरंजन महादेवाचे मंदिर आहे, याच नावाने या लेण्या ओळखल्या जातात. या दहा लेण्यांपैकी पाच लेण्यांचा समूह उत्तरेस आहे तर पाच लेणी दक्षिणेस आहेत. डाव्या बाजूची पहिली लेणी सात फूट लांब आणि सात फूट रूंद आहे. यात सहा फूट आठ इंच उंचीची आणि पाच फूट रूंद भगवान अरहनाथाची पद्मासनस्थ मूर्ती आहे. मूर्तीच्या दोन्ही कोप-यात पुष्पहार घेऊन देवता, चमरेंद्र दाखविले आहेत. या ठिकाणी केवळ एक जैन मूर्ती आहे तर इतर मूर्ती बौद्ध धर्मीय आहेत. या सर्व मूर्ती भिंतीवर कोरलेल्या आहेत.

जवळच्या दोन लेण्यात बौद्ध मूर्ती असून चौथ्या गुफेत भिंतीवर बौद्ध आणि एक पद्मासनस्थ जिन मूर्ती असून त्याच्या बाजूस चामरधारक इंद्र दिसतात. सर्वात शेवटच्या लेणीत स्तंभाच्या वरच्या बाजूवर अंबिका, पद्मावती आणि जैन देवता कोरलेल्या आहेत. या लेणी जैन आणि बौद्ध कलेचा अद्भूत संगम दिसून येतो, हे तत्कालीन धर्मसहिष्णुतेचे प्रतिकच आहे. औरंगाबाद शहरामध्ये सुद्धा चार जैन मंदिरे आहेत.

शांतिनाथ मंदिरात काष्ठासंघी भट्टारक पीठ होते, दुस-या जैन मंदिरात संवत् १२७२ ते १३४५ मध्ये स्थापन केलेली मूर्ती आहे तर खंडेलवाल जैन मंदिरात संवत् १५४८ मध्ये स्थापन केलेली मूर्ती आहे. सैतवाल जैन मंदिरात संवत् १५४८ मध्ये स्थापन केलेली चंद्रप्रभुची मूर्ती आहे. या मंदिरात एकशे एकोणसत्तर मूर्ती आहेत, त्यात संवत् १२७२, संवत् १३४५, संवत् १५४८ मध्ये स्थापन केलेल्या मूर्ती आहेत. येथे सहस्त्रकुट जिनालय असून त्यात सात गंधकुटी असून याच्या चारही दिशेस दोनशे शहाहत्तर मूर्ती ठेवलेल्या आहेत.[१४२]

**(४) <u>चांदवड</u> :-**

चांदवड हे जैन कलातीर्थ नाशिक जिल्ह्यात असून चांदवड गावच्या पूर्वेकडे पर्वतावर श्री चंद्रप्रभु जैन लेणी आहेत. यात जैन मूर्ती कोरलेल्या असून

मूलनायक भगवान चंद्रप्रभु आहेत. चंद्रप्रभुची मूर्ती पद्मासनस्थ श्याम वर्ण पाषाणाची असून साडे तीन फूट उंचीची आहे. चरणचौकीमध्ये लेख नाही, या मूर्तीच्या डाव्या बाजूस भगवान पार्श्वनाथाची नागफणा छत्र असलेली श्यामवर्ण पद्मासनस्थ दीड फूट उंचीची मूर्ती आणि चार फूटी दोन खड्गासन मुद्रेतील तीर्थंकर मूर्ती, पार्श्वनाथाची मूर्ती दिसते. मूलनायकाच्या डाव्या बाजूस तीर्थंकर मूर्ती, शिलाफलकावर दोन चौबीसी आणि पस्तिस लहान-मोठ्या मूर्ती पाहावयास मिळतात. यात यक्ष-यक्षींच्या मूर्ती, एक चरणचिन्ह असून या मूर्ती श्यामवर्णीय आहेत, या मूर्त्यांवर लेख नाही. परंतु यांच्या रचनाशैलीवरुन या आठव्या शतकातील आहेत असे दिसते.

गावामध्ये ही जैन मंदिर स्थापन केलेले असून या मंदिरात वृषभनाथाची ही मूर्ती दीड फूट उंचीची श्वेत वर्ण पाषाणापासून बनविलेली आहे. या मूर्तीलेखानुसार या मूर्तीची स्थापना विक्रम संवत् १९९२ मध्ये देवेंद्रकीर्ती आणि विशालकीर्ती यांनी स्थापन केलेली दिसते.

मूलनायक मूर्तीसोबत येथे पार्श्वनाथाच्या दोन, ऋषभनाथाची एक, महावीरांची दोन, नंदीश्वराची एक, चौबीसी आणि शासन देवता पद्मावतीची प्रतिमा पाहावसास मिळतात. या पहाड मंदिरावर आणि पहाडावर येथील दिगंबर जैन समाजाची मालकी आहे. या गावामध्ये चंद्रनाथ, नेमिनाथ भगवान श्वेतांबर जैन मंदिरे ही आहेत. या ठिकाणी भाद्रपद शुक्ल चौदा वेळी सर्व जैन समुदाय एकत्र येऊन उत्सव साजरा करतो.[१४३]

(५) **<u>अंजनेरी</u> :-**

हे जैन कलातीर्थ नाशिक जिल्ह्यात असून नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्त्यावर नाशिकपासून २० कि.मी. अंतरावर अंजनेरी हे गाव आहे. जवळ असलेल्या टेकडीच्या नावावरुन या गावाला अंजनेरी हे नाव पडले आहे. येथे प्राचीन मंदिरचे अवशेष आहेत. याठिकाणी आढळलेल्या दुस-या सेऊणचंद्राच्या काळातील इ.स. च्या अकराव्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थकालातील

शिलालेखामध्ये जैन मंदिराला दान दिल्याचा उल्लेख आहे. या परिसरातील मंदिराची ओळख पुढील प्रमाणे करता येते.[१४४]

अंजनेरी टेकडीच्या खोबणीत एक लेणे असून त्यात मुख्य दैवत म्हणून पार्श्वनाथाची मूर्ती आहे. लेणे चौरसाकृती असून त्यात फक्त मंडपाचा समावेश होतो. मंडपाच्या मागील भिंतीत पार्श्वनाथाची पंचतीर्थी मूर्ती आहे. पार्श्वनाथाच्या दुतर्फा प्रतयेक बाजूस एक असे एकूण दोन तीर्थंकर दाखविले आहेत. बाहेरुन लेण्यात शिरताना प्रवेशद्‌वाराला उजव्या बाजूस पार्श्वनाथाची उभी मूर्ती आहे. जैन लेण्यांमध्ये नेहमी आढळणारे अंबिका, यक्षी आणि सर्वानुभूती यक्ष मंडपाच्या मागील भिंतीत असलेल्या तीर्थंकरयुक्त पार्श्वनाथाच्या दुतर्फा दाखविले आहेत. या लेण्यांतील स्तंभाच्या स्तंभ घटकक्रम हे गुजरातध्ये आढळणा-या पश्चिम भारतीय शिल्पशैलीशी ब-यापैकी साधर्म्य असलेल्या मनुष्यकृती आणि शिल्पशैलीशी इतर वैशिष्ट्ये लक्षात घेता हे लेणे आणि त्यातील कोरीव काम इ.स. च्या तेराव्या शतकाच्या अखेरीस झाले असे दिसते.

अंजनेरी येथे सोळा मंदिराचा समूह आणि त्याच काळात बांधलेली पण आज अत्यंत वाईट अवस्थेत असलेली पुष्करिणी आहे. या मंदिरापैकी चार मंदिरे हिंदूची आहेत आणि उरलेली जैन मंदिरे आहेत. या मंदिराना भूषविणा-या शिखर प्रकारांमुळे हा मंदिर समूह उल्लेखनीय बनला आहे. या ठिकाणी नागर, भूमिज आणि फासनाकार असे तीन शिखर प्रकार आढळतात. ही सर्व मंदिरे सर्वसाधारणपणे मध्यम आकाराची असली तरी ती काही शतकांमध्ये बांधली गेली असल्यामुळे त्यांना विशेष महत्त्व आहे.

याठिकाणी सापडलेल्या महासामंत सेऊणचंद्र यादवाच्या (इ.स. ११२०-इ.स. ११४५) शिलालेखामुळे या मंदिराचा काळ ठरविणे सुलभ झाले. तीर्थंकर चंद्रप्रभु मंदिराच्या व्यवस्थेसाठी घरे आणि दुकाने दान केल्याचे या शिलालेखात नमूद केलेला आहे. शिलालेखावरुन या ठिकाणी असलेली मंदिरे इ.स. च्या अकराव्या आणि बाराव्या शतकात बांधली गेली असे दिसते. या मंदिर समूहाचे

आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या मंदिरापैकी तीन मंदिरे आणि दोन मठ जवळजवळ असून या पाच वास्तूभोवती एकच सीमाभिंत आहे. त्यांचा तलविन्यास आडवा लांबट मुखमंडप, तेवढ्याच रुंदीचा चौरस मंडप, अंतराल आणि गर्भगृह यांचा समावेश होतो. गर्भगृह आणि मंडप यांचे आकार वेगवेगळी असले तरी या दोहोंचा तलविन्यास मात्र पंचरथ आहे. या ठिकाणी असलेल्या इतर मंदिराशी विशेषतः वैष्णव आणि शैव मंदिरांशी फारकत घेणारे आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या मंदिराच्या मुखमंडपाची रुंदी मंडपाच्या रुंदी इतकीच आहे. याउलट इतर मंदिराच्या मुखमंडपाची रुंदी मंडपापेक्षा बरीच कमी असून यांनी अर्धमंडप या संज्ञेला सार्थकता आणली आहे. सध्या ज्यांचे विवेचन सुरु आहे त्या तीन नागर मंदिराचे मुखमंडप दोन स्तंभ आणि अर्धस्तंभावर उभे आहेत. ते मंडपाच्या रुंदी इतकेच रूंद आहेत. गर्भगृहावरील शिखरावर कोणतेही अलंकरण नाही, मध्यभागी मूलमंजरी आणि चार बाजूच्या चार कोप-यावर मूलमंजरीच्या प्रतिकृती आहेत. म्हणूनच ही नागर मंदिरे पंचाण्डक प्रकारची आहेत असे म्हणता येईल.

गर्भगृहावरील अंगे आणि प्रत्यंगे मूलमंजरीवरील आमलका खाली एकत्र आली आहेत. आमलकावर शिखर शिर्ष आहे. कझिन्सकृत ''मिडिवल टेम्पल्स ऑफ द डेक्कन'' या ग्रंथामध्ये (प्लेट नंबर ५९) अशा प्रकारच्या नागर मंदिराचे छायाचित्र आहे. या मंदिराला मूलमंजरीच्या मंडपावर फासनाकार शिखर आहे.[१४५]

- **<u>जैन तीर्थक्षेत्रांवर होणारी नित्यपूजाविधी</u> :-**

महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्र ठिकाणी मूलनायकाची तीन वेळा पूजाविधी केली जाते. सकाळी ०७.००, दुपारी ०१.३०, रात्री ०४.३० वा. या पूजाविधीचे स्वरुप पक्षालन, मध्य आणि संध्या असे आहे.

ही नित्य पूजाविधी तेथे नेमलेल्या पुजारी (पंडित) मार्फत केली जाते. या पुजा-याची नेमणूक व वेतन तेथील ट्रस्ट करते.

- **<u>जैन तीर्थक्षेत्रांवर होणारे वर्षभरातील विविध कार्यक्रम</u>** :-

जैन तीर्थक्षेत्र ठिकाणी निरनिराळे धार्मिक उत्सव व पर्व मानले जातात. जैन धर्मात या उत्सवांना, समारंभाना वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. पर्युषण पर्व, महावीर निर्वाण महोत्सव, विविध विधाने, पूजा इत्यादी उत्सवांना विशेष महत्त्व आहे.

- **<u>महावीर जयंती</u>** :-

  चैत्र शुद्ध त्रयोदशी ही भगवान महावीरांची जयंती आहे. या दिवशी संपूर्ण भारतातील जैन धर्मीय ही जयंती साजरी करतात. प्रातःकाळी मिरवणूक निघते, रात्री सार्वजनिक सभेचे आयोजन केले जाते.

- **<u>वीरशासन जयंती</u>** :-

  जैन धर्मियांचे चोवीसावे तीर्थंकर भगवान महावीर यांना केवलज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्यांनी पहिला धर्मोपदेश दिला, त्याची स्मृती म्हणून दरवर्षी आषाढ वद्य प्रतिपदेला 'वीरशासन जयंती' साजरी केली जाते.

- **<u>श्रुतपंचमी</u>** :-

  ज्येष्ठ शुद्ध पंचमीच्या दिवशी जैनशास्त्र ग्रंथाची पूजा केली जाते. श्वेतांबरामध्ये कार्तिक शुद्ध पंचमीला ज्ञानपंचमी मानतात. जैन धर्मात श्रुतपंचमीला विशेष महत्त्व आहे.

- **<u>दशलक्षण किंवा पर्युषण पर्व</u>** :-

  जैन धर्मियांचे सर्वात पवित्र पर्व म्हणजे दशलक्षण पर्व होय. दिगंबर पंथीयामध्ये हा पर्व दरवर्षी भाद्रपद शुद्ध पंचमीपासून चतुर्दशीपर्यंत तर श्वेतांबर संप्रदायात श्रावण वद्य द्वादशीपासून भाद्रपद शुद्ध चतुर्थीपर्यंत मानतात. या दिवसात जैन मंदिरात सर्वत्र मंगलमय

वातावरण असते. दररोज सकाळपासूनच स्त्री-पुरुष स्नान करुन मंदिरात जातात व भगवंताची पूजा करतात. पूजन संपल्यानंतर दररोज तत्वार्थसूत्राच्या दहा अध्यायापैकी एका-एका अध्यायावर प्रवचन केले जाते. क्षमा, मार्दव, आर्जव, शौच, सत्य, तप, त्याग, आकिंचन्या व ब्रह्मचर्य या दहा धर्माच्या अपेक्षेने या पर्वाला 'दशलक्षण पर्व' म्हणतात. या काळात प्रवचन, व्याख्याने आयोजित केलेली असतात. श्वेतांबर पंथीयामध्ये या पर्वाला 'पर्युषण' म्हणतात. या सोबतच अष्टाहिक पर्व, दीपावली, रक्षाबंधन, मकरसंक्रात ही सुद्‌धा उत्सव साजरी केली जातात. याप्रमाणेच मूलनायकाचा जन्म दिवस, पंचकल्याणक, तीर्थक्षेत्राची यात्रा, रथयात्रा मोठ्या उत्साहाने साजरा केली जाते.

- **<u>जैन तीर्थक्षेत्रांचा लोकजीवनावर पडलेला प्रभाव</u>** :-

तीर्थक्षेत्रे भारताचे वैभव आहेत, तीर्थक्षेत्रांना आध्यात्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व आहे.

अलौकिक कार्याचे स्मरण ठेवण्याकरिता, विजयोत्सवासाठी तेथील प्रेरणा, शक्ति लोकोपयोगी करण्यासाठी मंदिर व तीर्थक्षेत्रे सुरक्षित केली पाहिजेत. तीर्थक्षेत्रे भारतीय संस्कृती, इतिहासाला संपन्नता प्रदान करतात. तत्कालीन समाजदर्शन घडवितात, यातून जीवनातील अनन्तता शांती, सत्य दर्शन, रहस्यवाद, अलौकिकता झळकते. तीर्थक्षेत्रांच्या माध्यमातून मानवास आपले जीवन समृद्‌ध, श्रेष्ठ बनविण्यासाठी वेगवेगळे संदेश देतात येतात.

याप्रमाणे जैन तीर्थक्षेत्रांचा प्रभाव तेथील लोकजीवनावर आणि त्या तीर्थक्षेत्रांना भेटी देणा-या यात्रेकरुंवर दिसून येतो. जैन तीर्थक्षेत्रेवरील पूजाविधी या शुद्‌धता, पवित्र आणि अहिंसा तत्त्वावर आधारित आहेत. प्रत्येक जैन तीर्थक्षेत्रे अहिंसेचे प्रतिक आहेत. तीर्थक्षेत्र परिसरातील लोकजीवनावर हा नकळत परिणाम दिसून येतो. तेथील समाजमनावर अहिंसेचा प्रभाव पाहावयास मिळतो. म्हणून जैनेतर सुद्‌धा त्या परिसरात हिंसा, मांसाहार करणे टाळतात.

जैन तीर्थक्षेत्रांच्या उत्सव, समारंभ, यात्रा, रथयात्रा, पालखी मिरवणूक यात जैनेतरांचा समावेश दिसून येतो. यातून धार्मिक ऐक्य होण्यास निश्चितच मदत होताना दिसते. बहुतेक जैन तीर्थक्षेत्रांवर जैन तत्त्वज्ञानाचे श्लोक फलक लावलेले आहेत, त्यातून लोकांचा जीवन स्तर उंचावण्यास मदत होते.

जैन तीर्थक्षेत्राकच्या ठिकाणी होणा-या उत्सव, समारंभात स्त्रीयांचा सहभाग मोठ्या संख्येने दिसून येतो. त्यातून स्त्री-पुरुष समानतेचे मूल्य जपण्यासाठी मदत होते. पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून जैन तीर्थक्षेत्रे पाहिले असता ही तीर्थक्षेत्रे पर्यावरण रक्षक म्हणून ओळखता येतील. या तीर्थक्षेत्रांवर मोठ्या प्रमाणात वृक्ष सुरक्षित ठेवली गेली आहेत, त्यातून निसर्ग संवर्धन होण्यास मदत होताना दिसते.

जैन तीर्थक्षेत्रांवर मोठ्या प्रमाणात प्राचीन जैन साहित्य सुरक्षित ठेवण्यात आली आहेत. कन्नड, मराठी, अर्धमागधी, प्राकृत, संस्कृत अशा भाषेतून असलेले साहित्य तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी पाहावयास मिळते. यामुळे प्राचीन भारताच्या संस्कृतीचे तत्त्वज्ञानाचे भाषेचे संरक्षण होताना दिसते.

सोबतच शिक्षणाचे महत्त्व ओळखून काही जैन तीर्थक्षेत्रांवर शैक्षणिक संस्था कार्य करताना दिसतात. महत्त्वाचे म्हणजे ही शैक्षणिक संस्था प्राचीन भारताचे वैशिष्ट्ये असलेल्या गुरुकुल पद्धतीवर आधारित आहेत. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना मोफत राहण्याची व शिक्षणाची सोय केली आहे.

- **धार्मिक पर्यटन म्हणून जैन तीर्थक्षेत्रांचे स्थान** :-

पर्यटन आणि धार्मिक स्थळ याचे खूप जवळचे नाते आहे. तीर्थक्षेत्रे स्थानिक व बाहेरील पर्यटकांचे आकर्षण बिंदु राहिले आहे. तीर्थक्षेत्रांवर सुविधा प्राप्त व्हाव्यात म्हणून स्थानिक संघटना सरकारकडे मागण्या करताना दिसते. हे क्षेत्र आर्थिक दृष्टिने सुद्धा लाभकारी आहेत. यातून पर्यटन उद्योगास प्रोत्साहन मिळून रोजगार निर्मिती होऊ शकते. सोबतच भारतीय सांस्कृतिक आणि

धार्मिक सुंदरता परकीय पर्यटकांसमोर सादर करुन परदेशी चलनाचा ओघ भारताकडे वळविता येते.

आज शंभर पर्यटकांपैकी सत्तर पर्यटक धार्मिक पर्यटक आहेत. भारतीय तीर्थक्षेत्रे हे नदी, संगम, वने, पहाडे या सोबतच जुळली आहेत. काही पर्यटन स्थळे ही तेथे तीर्थस्थान आहे म्हणूनच प्रसिद्ध आहेत व तेथे हजारो पर्यटक येतात. भारतीय समाजात तीर्थक्षेत्र मन आणि विचारांच्या पवित्रतेशी जुडलेला आहे. पापाचे प्रायश्चित आणि निर्वाणासाठी तीर्थयात्रा केली जाते. सोबतच शांती, सुख शोधण्यासाठी तीर्थयात्रा केली जाते. सर्वच धर्मात काही ठिकाणे पवित्र समजली जातात. जैन धर्मात सुद्धा तीर्थक्षेत्रांना खूप महत्त्व दिले गेले आहे. जैन धर्मात तीर्थयात्रेचे महत्त्व सांगितले आहे. जैन धर्मात तीर्थक्षेत्रे धर्मसंरक्षक, धर्मप्रसार करणारी पवित्र ठिकाणे समजली जातात. तीर्थक्षेत्रांना जाणे जैन धर्मियांच्या जीवनाचे महत्त्वपूर्ण अंग आहे. त्यामुळे जैन धर्मिय मोठ्या प्रमाणात तीर्थक्षेत्राचे संरक्षण करतात व तीर्थयात्रा ही करतात.

धार्मिक पर्यटन म्हणून महाराष्ट्रात जैन तीर्थक्षेत्रांकडे ही पाहता येईल. कारण महाराष्ट्रातील एकूण जैन तीर्थक्षेत्रांपैकी काही तीर्थक्षेत्र निसर्गसंपन्न आहेत. ऐतिहासिक व धार्मिक पार्श्वभूमी असलेली आहेत. महाराष्ट्रात जी जैन सिद्धक्षेत्र आहेत, त्यात मांगी-तुंगी, कुंथलगिरी, कुंडल, गजपंथा, मुक्तागिरी यांचा समावेश होतो. ही सिद्धक्षेत्र जैन धर्मात अति महत्त्वाची आहेत. या तीर्थक्षेत्र स्थानी असलेले पहाड, वने, गुंफा ही उत्तम सौंदर्याची उदाहरणे आहेत.

ही तीर्थक्षेत्रे सिद्धक्षेत्रे होण्यासाठी जी कारणे आहेत ती निश्चितच जैन व इतर धर्मियांना आकर्षण ठरत आहेत. त्यामुळे या सिद्धक्षेत्रास भेट देण्यासाठी मोठा जनसमुदाय येत आहे. जैन व्यतिरिक्त इतर धर्मियांना सुद्धा ही क्षेत्रे संपन्न व आकर्षक वाटतात. तेथे ऐकण्यात येणा-या कथा, पूजाविधी, धार्मिक उत्सव, यात्रा, मूर्तीकला, शिल्पकला आकर्षण ठरत आहेत.

या प्रकरणात जैन तीर्थक्षेत्रांचे सखोल ज्ञान होते, जैन धर्मात तीर्थक्षेत्रांचे महत्त्व समजते. जैन तीर्थक्षेत्रांमधील प्रकार समजतात, त्यामुळे ती आणखीनच

रंजक, रहस्यपूर्ण आणि आकर्षक बनतात. महाराष्ट्रात ही सर्व वैशिष्ट्ये असलेली जैन धर्मातील तीर्थक्षेत्र मोठ्या संख्येने असलेली दिसतात. ती तीर्थक्षेत्रे विशिष्ट कारणामुळे उभारली आहेत, प्रत्येक तीर्थक्षेत्रात ऐतिहासिकता दिसून येते. तेथे पर्यावरण रक्षण, मानवी नितीमूल्यांचे रक्षण होताना दिसते, ही सर्व तीर्थक्षेत्र प्राचीन आहेत. सुमारे एक ते दान हजार वर्षापूर्वी या तीर्थक्षेत्राची स्थापना झालेली दिसते. तीर्थक्षेत्रावरील मंदिरे, मानस्तंभ ही वास्तु स्थापत्य आपली जैन स्थापत्याची वैशिष्ट्ये जपतात. आज ही स्थापत्ये ऐतिहासिक स्थापत्य संशोधकांना संशोधनाची संधी देतात. या स्थापत्यातून ती मानवाला शांती, अहिंसेसारखी कल्याणकारी मूल्ये सांगताना दिसतात.

महाराष्ट्राच्या जैन तीर्थक्षेत्रावर पूजाविधी होताना दिसते, त्यात नित्यपूजा व विशेष पूजा यांचा समावेश होतो. वार्षिक उत्सव होतात, वर्षभर विविध धार्मिक विधी होतात. जैन धर्मगुरुंची प्रवचने आयोजित केली जातात. वर्षभरातील धार्मिक विधी, वार्षिक उत्सव यातून त्या तीर्थक्षेत्रावर सामाजिक, धार्मिक ऐक्य घडून येताना दिसते. सर्व धर्मियांचा सहभागातून ती विधी व उत्सव साजरी होताना दिसते.

तीर्थक्षेत्रावरील स्वच्छता, शांतता, पर्यावरण रक्षण, नियोजन यामुळे तेथे येणा-या मानवावर या मूल्यांचा प्रभाव पडताना दिसतो. ही तीर्थक्षेत्र प्राचीन, स्थापत्यपूर्ण, ऐतिहासिक, निसर्गसंपन्न असल्याने ती आता पर्यटन क्षेत्रे म्हणून ही पुढे येत आहेत. त्यामुळे त्या परिसरातील लोकांना रोजगार उपलब्ध होऊन त्या तीर्थक्षेत्र परिसरात मोठी आर्थिक उलाढाल होताना दिसते. तेथे शैक्षणिक योजनाही व प्राचीन भारतीय शिक्षणाचे वैशिष्ट्य असलेले गुरुकुलही आज पाहावयास मिळतात. म्हणून असे म्हणता येईल की, या तीर्थक्षेत्रांमुळे येथे धार्मिक, वैचारिक, सामाजिक, राष्ट्रीय एकात्मता, शैक्षणिक आणि आर्थिक अभिसरण घडून येत असल्याचे दिसते.

- **संदर्भ सूची**

१) शहा सुमतिबाई, पूर्ण्यार्घ्य, जैन ज्ञानकोश, पूर्ण्यार्घ्य प्रकाशन सोलापूर, १९७०, पृ. ७७५.

२) तत्रैव, पृ. ७७६.

३) नंदी रमेंद्रनाथ, प्राचीन भारत में धर्म के सामाजिक आधार, ग्रंथशिल्पी दिल्ली, २००८, पृ. ४४.

४) जैन बलभद्र, भारत के दिगंबर जैनतीर्थ (भाग-४), भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमेटी मुंबई, १९७८, पृ.  .

५) तत्रैव, पृ. १०.

६) तत्रैव, पृ. १०.

७) जैन अनुपम, दिगंबर जैनतीर्थ निर्देशिका, समिती प्रकाशन इंदौर, पृ. २.

   - जैन बलभद्र, भारत के दिगंबर जैनतीर्थ (भाग-४), भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमेटी मुंबई, १९७८, पृ. १२.
   - शहा रजनी, भारतातील दिगंबर जैनतीर्थ, जीवराज जैन ग्रंथमाला प्रकाशन सोलापूर, २०००, पृ. १४.

८) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. १२.

९) तत्रैव, पृ. १२.

१०) तत्रैव, पृ. १२.

११) शहा रजनी, भारतातील दिगंबर जैनतीर्थ, जीवराज जैन ग्रंथमाला प्रकाशन सोलापूर, २०००, पृ. १४.

१२) जोशी महादेवशास्त्री, तीर्थरुप महाराष्ट्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९७५, पृ. १७.

१३) तत्रैव, पृ. ८.

१४) जैन अनुपम, उपरोक्त पृ. २.

- जैन बलभद्र, उपरोक्त पृ. २०३.
- शहा रजनी, उपरोक्त पृ. १२.

१५) तत्रैव, पृ. २.

१६) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. १२.

१७) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. २०८.

१८) तत्रैव, पृ. २०८.

१९) तत्रैव, पृ. २०९.

२०) तत्रैव, पृ. २०९.

२१) तत्रैव, पृ. २०९.

२२) तत्रैव, पृ. २१०.

२३) अन्नदाते श्रेणिक, जैन ऐतिहासिक, सुमेरु प्रकाशन डोंबिवली, २००२, पृ. ५.

२४) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. २१०.

२५) तत्रैव, पृ. २११.

२६) जोशी महादेवशास्त्री, भारतीय संस्कृती कोष (भाग-२), अनमोल प्रकाशन पुणे, १९२१, पृ. ४४८.

२७) तत्रैव, पृ. ४४८.

२८) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. २०३.

A) विक्रम संवत् ही कालगणना इ.स.पूर्व ६८ मध्ये सुरु झाली व ते आजही प्रचारात आहे. सध्याचे चालू विक्रम संवत् २०७१ असून उपलब्ध मूर्तीवर दिसणारी विक्रम संवत् ही कालगणना वजा केली असता येणा-या संख्येवरुन त्या मूर्तीची प्राचीनता समजून घेता येते.

२९) तत्रैव, पृ. २०३.

३०) तत्रैव, पृ. २०४.

३१) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Nasik District, Bombay, 1975, P. 876.

३२) अन्नदाते श्रेणिक, उपरोक्त पृ. ५.

३३) शहा सुमतिबाई, पूर्ण्यार्घ्य, जैन ज्ञानकोश, पूर्ण्यार्घ्य प्रकाशन सोलापूर, १९९५, पृ. ७७९.

३४) तत्रैव, पृ. ७७९.

३५) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Osmanabad District, Bombay, 1977, P. 773.

३६) शहा मयुरा, कथा कुंथलगिरीची, मॉडर्न ऑफसेट सोलापूर, २००५, पृ. ६.

३७) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Osmanabad District, Bombay, 1977, P. 773.

३८) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. २३७.

३९) तत्रैव, पृ. २३८.

४०) कंडारकर महावीर, गाथा - कुलभूषण देशभूषण, दिगंबर जैन समिती प्रकाशन कुंथलगिरी, २००५, पृ. ३.

४१) शहा मयुरा, उपरोक्त पृ. ९.

४२) शहा रजनी, तीर्थराज कुंडल, क्षेत्र प्रकाशन कुंडल, २०१२, पृ. ११.

४३) तत्रैव, पृ. १२.

४४) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Sangli District, Bombay, 1968, P. 698.

४५) Patil Padmja, Splender of Jainism in Sourthern India, Shivaji University Press, 2010, P. 191.

- दैनिक सकाळ, पुणे, ३ एप्रिल, १९५५.

४६) उपाध्ये महावीर, अतिशयक्षेत्र कुंडल, नांद्रेकर प्रकाशन किर्लोस्करवाडी, १९९०, पृ. २.

४७) तत्रैव, पृ. ४.

४८) तत्रैव, पृ. ५.

४९) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. ३१९.

५०) तत्रैव, पृ. ३१९.

५१) तत्रैव, पृ. ३१९.

५२) तत्रैव, पृ. ३२०.

५३) तत्रैव, पृ. ३३०.

५४) तत्रैव, पृ. ३३०.

५५) तत्रैव, पृ. ३३१.

५६) तत्रैव, पृ. ३३२.

५७) तत्रैव, पृ. ३३२.

५८) तत्रैव, पृ. ३३३.

५९) शास्त्री नेमिनाथ, अतिशयक्षेत्र बाहुबली परिचय, अनेकांत शोधपीठ, बाहुबली, २०१४, पृ. ७०.

६०) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Kolhapur District, Bombay, 1960, P. 883.

६१) तत्रैव, पृ. ७२.

६२) तत्रैव, पृ. ७२.

६३) तत्रैव, पृ. ७३.

६४) तत्रैव, पृ. ७३.

६५) तत्रैव, पृ. ७४.

६६) तत्रैव, पृ. ७४.

६७) तत्रैव, पृ. ७५.

६८) तत्रैव, पृ. ७५.

६९) तत्रैव, पृ. ७६.

B) शक संवत् ही कालगणना इ.स. ७८ मध्ये सुरु झाली. सध्याचे शक संवत् १९३७ असून मूर्तीवरील शक संवत् ही कालगणना यात मिसळली असता येणा-या संख्येवरुन त्या मूर्तीची प्राचीनता समजून घेता येते.

७०) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. १०४.

७१) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Parbhani District, Bombay, 1967, P. 560.

७२) Idib, 561.

७३) श्री अंतरिक्ष पार्श्वनाथ अतिशयक्षेत्र जिंतुर, माहिती पुस्तिका जिंतुर, २००६, पृ. ४.

७४) डोणगावकर नेमचंद, श्री अंतरिक्ष पार्श्वनाथ शिरपूर संक्षिप्त इतिहास, नयन प्रकाशन नागपूर, १९६७, पृ. २.

७५) तत्रैव, पृ. ४.

७६) तत्रैव, पृ. ५.

७७) अंतरिक्ष पार्श्वनाथ स्वामी, दिगंबर क्षेत्र शिरपूर माहिती पुस्तिका, दिगंबर जैन महासमिती वासिम, १९९०, पृ. १०.

७८) तत्रैव, पृ. १२.

७९) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. २८८.

८०) तत्रैव, पृ. २८९.

८१) तत्रैव, पृ. २८९.

८२) तत्रैव, पृ. २९०.

८३) तत्रैव, पृ. २९१.

८४) डोणगावकर नेमचंद, उपरोक्त पृ. ५०.

C) भट्टारक :- इ.स.पू. ५२७ भगवान महावीरांच्या महानिर्वाणानंतर ६२३ वर्षांनी म्हणजे इ.स. ९६ मध्ये आजच्या (वर्तमान) दिल्ली परिसरात जैन धर्म प्रसारासाठी, संघटनासाठी लक्ष्मीसेन पीठाची स्थापना झाली.

याप्रमाणे मद्रास प्रांतातील जैन साधूंनी याच परिसरात भट्टारक पीठाची स्थापना केली. पुढे भट्टारक पीठे भारतभर निर्माण झाली. ही परंपरा आजही उत्तर भारतापेक्षा दक्षिण भारतात ही परंपरा आजही सुरु आहे. नांदणी, कोल्हापूर, कारंजा, श्रवणबेळगोळ, हुम्मच, मुंडबिद्री, कारकल, सिहंनगदे, कनकगिरी येथे ही पीठे टिकून होती.

यात चंद्रसेन, आर्यनंदी, वीरसेन, निसेन, गुणभद्र, लोकसेन अशी या परंपरेतील प्राचीन नामावली दिसून येते.

एकोणिसाव्या शतकात होत असलेल्या धार्मिक आणि सामाजिक पुनरुज्जीवनवादी चळवळीत सर्व धर्माप्रमाणे जैन धर्मातही भट्टारकांनी सुधारणा घडवून आणल्या.

८५) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. ३०३.

८६) तत्रैव, पृ. ३०४.

८७) तत्रैव, पृ. ३०५.

८८) तत्रैव, पृ. ३०६.

८९) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. ३१२.

९०) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Nagpur District, Bombay, 1966, P. 766.

९१) तत्रैव, पृ. ३१२.

९२) तत्रैव, पृ. ३१२.

९३) तत्रैव, पृ. ३१४.

९४) तत्रैव, पृ. ३१४.

९५) शहा रजनी, उपरोक्त पृ. १६४.

९६) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Nagpur District, Bombay, 1966, P. 766.

९७) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Osmanabad District, Bombay, 1976, P. 799.

९८) पाठक अरुणचंद्र, मराठवाडा एक शोध, सुमेरु प्रकाशन डोंबिवली, २००९, पृ. ११४.

९९) सुतार अ. मा., प्राचीन महाराष्ट्रातील जैन धर्म, दक्षिण भारत जैन सभा ग्रंथ प्रकाशन सांगली, १९९०, पृ. ४४.

१००) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. २५३.

१०१) दोशी विजयकुमार, श्री अतिशयक्षेत्र तेर, माहिती पुस्तिका, २०००, पृ. ३.

१०२) तत्रैव, पृ. २५४.

१०३) तत्रैव, पृ. २८६.

१०४) तत्रैव, पृ. २८७.

१०५) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Parbhani District, Bombay, 1967, P. 717.

१०६) पाटणी मोतीलाल, श्री नेमिनाथ दिगंबर जैन अतिशयक्षेत्र नवागड, माहिती पुस्तिका, २००८, पृ. ४.

१०७) तत्रैव, पृ. ५.

१०८) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. २८०.

१०९) तत्रैव, पृ. २८०.

११०) जैन एम. सी., कचनेर दर्शन, अमृत प्रकाशन औरंगाबाद, १९९४, पृ. २०.

१११) तत्रैव, पृ. २१.

११२) पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशयक्षेत्र, माहिती पुस्तिका जटवाडा, साहुजी कन्स्लटंट प्रकाशन औरंगाबाद, २००५, पृ. २.

११३) तत्रैव, पृ. ३.

११४) तत्रैव, पृ. ४.

११५) संस्कार प्रचार मासिका पत्रिका, सिद्धांत सौभाग्य ग्रंथमाला इंदौर, २००८, पृ. ३.

११६) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Aurangabad District, Bombay, 1977, P. 1034.

११७) संस्कार प्रचार मासिका पत्रिका, उपरोक्त पृ. ५.

११८) तत्रैव, पृ. ६.

११९) तत्रैव, पृ. ६.

१२०) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Amravati District, Bombay, 1968, P. 968.

१२१) गिललकर विजय, अमरावती जिल्ह्याला लाभलेला ऐतिहासिक जैन वारसा, सुमेरु प्रकाशन डोंबिवली, २००२, पृ. १२.

१२२) पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर सावरगाव, माहिती पुस्तिका, १९७२, पृ. ४.

१२३) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Osmanabad District, Bombay, 1976, P. 796.

१२४) शहा रजनी, उपरोक्त पृ. १५१.

१२५) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. २२०.

१२६) अज्ञात ले, माझी तीर्थवंदना, स्व. मातोश्री चतुराबाई जैन ग्रंथ ट्रस्ट उस्मानाबाद, पृ. ९०.

१२७) शहा रजनी, उपरोक्त पृ. १६३.

१२८) नरेश कासलीवाल, नंदिश्वर दिगंबर जैन अतिशयक्षेत्र पंचालेश्वर, माहिती पुस्तिका, वर्धमान प्रकाशन परभरणी, २००८, पृ. ६.

१२९) शहा रजनी, उपरोक्त पृ. १६९.

१३०) जैन अनुपम, दिगंबर जैन तीर्थक्षेत्र निर्देशिका समिती प्रकाशन इंदौर, पृ. ४०.

१३१) महाराष्ट्रातील दिगंबर क्षेत्र, मांगी-तुंगी प्रकाशन नाशिक, २०००, पृ. ५.

१३२) शहा रजनी, उपरोक्त पृ. १६८.

१३३) श्री कल्पतरु पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, माहिती पुस्तिका केसापूरी, २००४, पृ. ३.

१३४) तत्रैव, पृ. ४.

१३५) शहा रजनी, उपरोक्त पृ. ४.

१३६) जैन बलभद्र, उपरोक्त पृ.  .

१३७) तत्रैव, पृ.

१३८) तत्रैव, पृ.

१३९) पाटील माया, पुरातत्त्व एक पर्यालोचन, सुविधा प्रकाशन सोलापूर, २००१, पृ. ४०.

१४०) तत्रैव, पृ. ४१.

१४१) तत्रैव, पृ. ४२.

१४२) जैन बलभद्र, उपरोक्त पृ. २७३.

१४३) तत्रैव, पृ. २७३.

१४४) महाराष्ट्र राज्य गॅझिटिअर, स्थापत्य व कला, महाराष्ट्र शासन मुंबई, २००८, पृ. १२०.

१४५) तत्रैव, पृ. १२१.

# प्रकरण - चौथे

## जैन स्थापत्य आणि शिल्पकला

४.१ भारतातील मंदिर स्थापत्याची सुरुवात आणि जैन मंदिरे.

४.२ महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्याची सुरुवात आणि जैन मंदिरे.

- ४.२.१ वीट मंदिरे
- ४.२.२ वेसर मंदिरे
- ४.२.३ भूमिज मंदिरे
- ४.२.४ फासना शिखर मंदिरे
- ४.२.५ हेमाडपंती मंदिरे

४.३ मंदिराचे प्रमुख अंग.

४.४ महाराष्ट्रातील जैन लयन, स्थापत्य.

- ४.४.१ वेरूळ
- ४.४.२ खरोसा लेणी
- ४.४.३ अंकाई - टंकाई लेणी
- ४.४.४ यादव काळातील लेणी
- ४.४.५ चामर लेणी
- ४.४.६ अंजनेरी
- ४.४.७ माहिदे
- ४.४.८ भामेर
- ४.४.९ पाटणे

४.५ जैन शिल्पकला आणि मूर्तीकला.

- ४.५.१ मूर्तीकला
- ४.५.२ तीर्थंकर मूर्तीची वैशिष्ट्ये
- ४.५.३ जैन देव आणि देवता
- ४.५.४ मानस्तंभ

४.६ महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांवरील स्थापत्य, मूर्तीकला आणि शिल्पकलेची वैशिष्ट्ये.

४.६.१ जिनालय

४.६.२ मानस्तंभ

४.६.३ गुहा मंदिर

४.६.४ अभिलेख

४.६.५ तीर्थंकर मूर्ती

४.६.६ शासन - देवतांच्या मूर्ती

- संदर्भ ग्रंथ.

# प्रकरण - चौथे

## जैन स्थापत्य आणि शिल्पकला

जगभरात सर्व धर्मामध्ये धार्मिक वास्तूंचे अस्तित्त्व दिसून येते. भारतीय संस्कृतीच्या वैशिष्ट्यांपैकी मंदिर स्थापत्य हे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. प्रत्येक धर्मात या वास्तूला वेगवेगळी नावे असली तरी उद्‌देश मात्र एकच आहे, तो म्हणजे आध्यात्मिक प्रगती होय.

पुराणे, सूत्र, अर्थशास्त्र या प्राचीन ग्रंथात मंदिरासाठी देवालय, देवायतन, देवकुल, देवग्रह असे शब्द आले आहेत. जेंव्हा वास्तुशास्त्राची प्रगती झाली तेव्हा मंदिरासाठी प्रासाद हा शब्द अधिकतम वापरला जाऊ लागला. उत्तरेत प्रासाद तर दक्षिणेत मंदिरासाठी विमान शब्द वापरला जाऊ लागला.

धार्मिक वास्तुंचे वर्गीकरण केल्यास मंदिरे किंवा देवालये ही महत्त्वपूर्ण ठरतात. देवालय म्हणजे देवाचे घर या स्वरुपातील वास्तु होय. सामान्यपणे देवाची मूर्ती यात विराजमान असते. मंदिरात नैवैद्य, मनोरंजनासाठी नृत्य, नाट्य, गायन, शेजघर या सुविधा देवासाठी केल्या जातात. पितरांच्या पूजनातून आलेला 'स्मृती मंदिर' हा धार्मिक वास्तुंचा दुसरा प्रकार होय. इजिप्तचे पिरॅमिड, भारतातल्या स्तुप, समाध्या, छत्र्या या सर्वांचा समावेश स्मृती मंदिरात होतो. तिसरा प्रकार म्हणजे सार्वजनिक 'प्रार्थनास्थान'. या ठिकाणी एकत्र प्रार्थना केली जाते. चर्च, मस्जिद यांचा समावेश ही प्रार्थनास्थान या प्रकारात होतो. मंदिर, स्तुप, चर्च, मस्जिद या धार्मिक वास्तूंच्या स्थापत्य शैलीतही लक्षणीय फरक असल्याचे जाणवते. हिंदू व जैन धार्मिक वास्तुंमध्ये मंदिरांना अतिशय महत्त्व आहे.[१]

मंदिर हे भारतीय जीवनाचे महत्त्वपूर्ण घटक असून मंदिर स्थापत्य व मूर्तीकला हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण लक्षण आहे. मंदिराचा भाग इंच

ना इंच शिल्पाकृतींनी युक्त असतो व त्याला वेगवेगळी नावे आहेत. तसेच मंदिर व मूर्तीवरुन तेथील भौतिक प्रगती व आध्यात्मिक प्रगती समजते.

'कला' हे मानवी संस्कृतीचे महत्त्वपूर्ण अंग आहे. जी मानवी मनास सुंदर, प्रांजल, तसेच उच्चत्त्व प्राप्त करुन देते. कलात्मकता, आध्यात्मिकता त्या देशाची प्रतिके तर आहेतच सोबत ती तेथील मानवाची मानसिकता दर्शविते, यातूनच त्या देशाच्या संस्कृतीचा विकास होतो. भारतीय कलेत धार्मिक व दार्शनिक मान्यता आढळून येते. तिचा उद्‌देश तेच आहे जे भारतीय जीवनाचे उद्‌देश आहे अर्थात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष होय.[२]

भारतीय कला, स्थापत्य यात मानवी, दैवी शक्तीचे निरुपण असून पशू व पक्षांचा सुलभ समन्वय पाहावयास मिळतो. वृक्ष, फुले, पाने, फळे यांची सजीवता आहे तर विविध अलंकाराने सुंदरता ही वाढविली आहे. सोबतच यात कोमलता आणि कठोरता, कर्कशता आणि निर्मलता, भौतिकता आणि वैराग्यता असे अनेक विरोधी तत्वांचे समन्वय साधलेले आहेत.[३]

म्हणून भारत हा आध्यात्म प्रधान देश आहे असे समजले जाते. येथे दर्शन, भाषा, साहित्य, ललित कला, लोक जीवन हे सर्व आध्यात्मातून प्रेरित झाला आहे. भारतीय संस्कृतीत धार्मिक भावना कोणत्या ना कोणत्या रुपात विद्यमान झालेली आहे. धार्मिक भावनेला मूर्तरुप प्रदान करण्यासाठी मंदिरे आणि मूर्ती निर्माण होऊ लागली. ही मंदिरे, मूर्ती केवळ पूजा स्थळ किंवा पूजनीय वस्तू नसून त्या ऐतिहासिक अन्वेषणात सहयोगी आहेत. म्हणूनच मंदिर आणि मूर्तीना सांस्कृतिक अवशेष म्हणून स्वीकारले आहे.[४]

मंदिर रचना आणि मूर्ती पूजा या दोन्हींचा आरंभ केंव्हा झाला किंवा त्याची प्राचीनता किती मागे जाते, याबाबत संशोधकामध्ये मतभेद आहेत. परंतु मंदिर व मूर्ती पूजा या दोन्ही मौर्य काळापासून अस्तित्त्वात आहेत. प्राचीन धार्मिक ग्रंथातून आणि व्याकरण ग्रंथातून त्याविषयी उल्लेख मिळतात. कौटिल्यानेही आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथात नगराच्या मध्यभागी अपराजिता

(दुर्गा), अप्रतिहत (विष्णु), जयंत (सुब्रह्मण्य-स्कंद), वैजयन्त (इंद्र), शिव, वैभवण (कुबेर) यांची मंदिरे बांधावीत असे सुचविले आहे.[५]

बांधीव वास्तु मंदिराचा सर्व प्रथम पुरावा राजस्थानमधील जयपूर जिल्ह्यातील भारहूत येथे मिळाला. येथील उत्खननात मौर्य काळातील इ.स.पू. तिस-या शतकातील मंदिर स्थापत्याचे पुरातत्त्वीय अवशेष प्राप्त झाले आहेत. या मंदिराचा व्यास ८.२३ मीटर असून या मंदिराचे बांधकाम वीटांनी केले होते. पूर्वाभिमुख असलेल्या या मंदिरात सव्वीस लाकडी खांब होते हे पुरावे मंदिर स्थापत्याची प्रारंभिक अवस्था विशद करतात.[६]

इ.स. पू. पहिल्या शतकापासूनच्या शिलालेखात 'देवयातन' असे उल्लेख आढळतात. परंतु त्याचे स्वरुप कसे होते, याची कल्पना येत नाही. म्हणूनच सध्या अस्तित्त्वात असलेल्या 'मंदिर' या वास्तु प्रकाराची परंपरा गुप्तकाळाच्या सुमारास उगम पावली असावी, असे म्हटले जाते.[७]

इतिहासकालीन पूजेचे मूळ सिंधूसंस्कृतीत मिळते परंतु मंदिर व मूर्ती पूजा अस्तित्त्वात नव्हती. मात्र मौर्य काळ आणि शुंग काळात मंदिरे आढळतात.[८]

माणूसही अन्य प्राण्यांसारखा प्राणीच, फक्त विचारशक्तीमुळे त्याच्यात इतर प्राण्यांहून वेगळेपणा आहे. प्रथम जेंव्हा माणसाने धुंवाधार पाऊस अनुभवला, भाजणारे ऊन किंवा गोठवून टाकणारी थंडी अनुभवली तेव्हा या निसर्ग शक्तींबाबत भीती अनुभवली. कालांतराने हे सारेच उपकारक आहे हे कळले, मग त्याविषयी भक्ती निर्माण झाली. माणसांची अशी कल्पना असते की, जे आवडतं ते जवळ असावं, या कल्पनेतून प्रतिकृती निर्माण केली आणि मग त्या प्रतिकृतीला ऊन, वारा, पाऊस यांच्यापासून जपण्यासाठी त्याभोवती छत घातलं, भिंती उभ्या केल्या, अशा प्रकारे देऊळ (मंदिर) तयार होऊन प्रथम कोनाडा, मग व्हरांडा, असं ते वाढलं गेलं.[९]

म्हणजेच मंदिर संकल्पनेच्या विकासातील सुरुवातीचे मंदिराचे स्वरुप अतिशय साधे होते. जमिनीपेक्षा थोड्या उंच जागी प्रतिमा स्थापन करत व त्याच्या चारही बाजूला वेदिका असत. नंतरच्या काळात वेदिकांवर आच्छादन टाकले जाऊ लागले. अशा प्रकारच्या मंदिराचे हे साधे स्वरुप प्राचीन आहत नाण्यावर पाहावयास मिळते.[१०]

## ४.१ भारतातील मंदिर स्थापत्याची सुरुवात आणि जैन मंदिरे :-

भारतात आढळलेल्या सर्वाधिक प्राचीन मूर्ती बुद्धाच्या व कुषाणकालीन असून त्या गांधार आणि मथुरा शैलीतील आहेत. त्यामुळे मूर्ती पूजा आणि मंदिर स्थापत्य या बाबी भारतात ग्रीकांकडून किंवा भारताच्या वायव्य सरहद्दीलगत नांदणा-या ग्रीकोद्भव संस्कृतीकडून आल्या असाव्यात, असे गृहित धरण्यात आले. मुळ भारतीय धर्मात म्हणजेच वैदिक संस्कृतीत देवांना अग्निमध्ये आहुती दिल्या जात आणि आहुती अग्नी देवांना पोचवतो अशी धारणा होती. त्यामुळे यज्ञविधी हाच पूजेचा एकमेव प्रकार प्रचलित होता. मूर्ती पूजेचे उल्लेख वेदांमध्ये आढळत नाहीत, त्यामुळे देवांच्या मूर्ती बनवणे आणि त्या मूर्तींकरिता वास्तु किंवा मंदिरे बांधणे ही संकल्पनाच वेदविधींना अज्ञात किंवा परकी होती. त्यामुळे आपल्या आचार्यांचे प्रतिनिधित्त्व करणा-या प्रतिकांची किंवा त्यांचे अवशेषांनी युक्त असलेल्या स्तुपासारख्या वास्तुची पूजा करणा-या बौद्ध आणि जैन बांधवांना ती नवीन होती.[११]

धार्मिक वाङ्मय, उत्खननात आढळलेले भौतिक पुरावे, कलाऐतिहासिक प्रतिनिधीत्त्व करणा-या वस्तू आणि पुराणवस्तु इत्यादी साधनांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, इ.स. च्या पहिल्या दोन शतकांत वैदिक, जैन आणि बौद्ध अशा विविध धर्मप्रवाहांना देवांच्या सगुण उपासनेची तीव्र गरज भासली. हिंदू धर्मात ही स्थिती भक्ती आणि अवतार या कल्पनांमध्ये तसेच विष्णू, शिव, बुद्ध व महावीर या सा-यांना समायिक असलेल्या भगवान या संज्ञेने महत्त्वपूर्णपणे विशद झाली आहे. पूजावस्तूचे म्हणजे देवाचे सगुण स्वरुप

कसे असावे किंवा मूर्त स्वरुपात जन्माला आलेल्या भगवान बुद्धाची किंवा महावीरांची मूर्ती कशी असावी, तिची कलात्मक वैशिष्ट्ये काय असावीत हे मात्र स्थानिक कला परंपरेवर अवलंबून होते.[१२]

दगडी फरशीवर किंवा शिलाफलकावर देवमूर्ती व दगडी कठडा असे पहिल्या वहिल्या देववास्तूंचे किंवा मंदिराचे स्वरुप होते. देवमूर्ती आणि सभोवताली दगडी कठडा असलेला शिलाफलक एखाद्या झाडाखाली असत. या शिलाफलकांवर संबंधित देवतेचे वाहन कोरलेले असे. प्राचीन काळात ज्यांची पूजा बहुतेक सर्व ठिकाणी प्रचलित होती ते स्तंभशीर्ष म्हणून कोरलेल्या लांच्छनांच्या स्वरुपात दाखविले जात असत. हे लांच्छ बहुधा त्यांचे वाहन असे. या पूजास्थानाचे वेगळेपण दाखविण्यासाठी व त्यांचे संरक्षण व्हावे यासाठी त्याभोवती दगडी कठडा असे. काही पवित्र वृक्षांचीही पूजा केली जात असे. शिवलिंग किंवा मूर्तीच्या स्वरुपात असलेल्या पूजावास्तूला 'घर' देण्यात येऊ लागले.[१३] मंदिर स्थापत्य विकासाच्या पुढच्या टप्प्यात देवगृहात पूजेचे धार्मिक विधी करण्यासाठी आणि भक्त तसेच प्रत्यक्ष पूजाविधी करणा-या लोकांना एकत्र जमण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध करण्यात आली. परिणामी गर्भगृह आणि मंडप दोहोंच्याही बाहेरुन असलेला प्रदक्षिणापथ यांची निर्मिती झाली, याचे रुपांतर चापाकार मंदिर प्रकारात झाले. हे स्वरुप जाऊन त्याला प्रासाद असे स्वरुप प्राप्त झाले. राजा हा विश्वातील महत्त्वाची कार्ये करणा-या आठ देवांचा पृथ्वीवरील प्रतिनिधी आहे अशी श्रद्धा होती. त्यामुळे जर राजा हा देवाचा प्रतिनिधी असून प्रासादात राहतो तर देवाच्या निवासवास्तूचे स्वरुप अनेक मजली प्रासाद असावे हे ओघानेच आले. देवाची दिनचर्याही राजाशी मिळतीजुळती ठेवण्यात आली. उदा. नगारा वाजविणे, भूपाळ्या म्हणून त्याला उठविणे व रात्री झोपविणे, नैवेद्य दाखविणे, करमणूक करणे.[१४] हे सर्व राजोपचार यथासांग पार पडावेत यासाठी मंदिराच्या रचनेत काही बदल घडून आले. मंडप आणि गर्भगृह यांच्यामध्ये अंतराळाची योजना करण्यात आली

आणि मंडपामध्ये नृत्याकरिता एका रंगमंडपाची भर पडली. गर्भगृहावरील अनेक मजले अभिव्यक्त करणारे शिखर आणि गर्भगृहाच्या प्रवेशद्‌वाराच्या दोन्ही बाजूला द्‌वारपाल किंवा प्रतिहार आले.[१५]

यानंतरच्या विकासात मंदिर खुद्‌द ब्रम्हांडाचेच प्रतिक बनले. इ.स.पू. दहाव्या व अकराव्या शतकात साकारलेल्या या स्वरुपात मंदिर हे गर्भगृहातील देवाचे शरीर मानले गेल्यामुळे मंदिराच्या बाह्य आणि अंतर्भागावर परिवार देवता कोरण्यात आल्या. मंदिर स्थापत्याच्या चौथ्या टप्प्यात मंदिर नगरांचा उदय झाला. यात संपूर्ण नगर मंदिराच्या तटबंदीच्या आत असून मुख्य मंदिर या नगराचे मध्यवर्ती केंद्र बनले. याप्रमाणे संपूर्ण भारतातील मंदिर स्थापत्य विकासाचे टप्पे आहेत.[१६]

यातूनच भारतातील मंदिर स्थापत्यशैलीत नागर, द्रविड व वेसर शैली या वेगवेगळ्या मंदिरशैली पुढे आलेल्या दिसून येतात.

उत्तर भारतात ज्या स्थापत्य शैलीचा पुरस्कार झाला त्याला ‘नागर शैली’ असे म्हणतात. या शैलीतील मंदिर ओळखण्याचे प्राथमिक लक्षण म्हणजे त्याचे शिखर होय. वर निमुळते होत जाणारे, लता, लतिना, उरुशृंगांनीयुक्त, उरोमंजिरीनी व्याप्त आणि ज्याच्या मस्तकावर आमलक आहे असे शिखर पाहिले म्हणजे ती नागरशैली ओळखावी.[१७]

नागर शैलीमध्ये बांधलेल्या मंदिराच्या पायापासून वरपर्यंतच्या अवयवात अधिष्ठान किंवा जगति (यावर संपूर्ण मंदिराचा डोलारा तोलून धरलेला असतो), जंघा (मंदिराच्या भिंती), कपोत (भिंतीच्या वर असलेले दगडी छप्पर), मेखला (कपोतानंतर येणारा छोटा शिखरांचा पट्‌टा), शिखर, शुकनासा किंवा नासी (पोपटाच्या चोचीप्रमाणे शिखरापासून पुढे येणारा गवाक्षाकृती भाग, हा मेखलेच्या वर लगोलग असतो), स्कंध (शिखर जेथे संपते तो आडवा छतासारखा भाग), गल (गळ्याप्रमाणे भाग), आमलक (आवळ्यासारखा भाग), कळस इत्यादी विविध अंगे दिसून येतात.[१८]

दक्षिण भारतात ज्या शैलीचा पुरस्कार झाला तिला 'द्रविड शैली' असे म्हणतात. या शैलीचे मंदिर ओळखण्याची दोन लक्षणे आहेत. ती म्हणजे स्तंभयुक्त भिंती आणि मजल्यावर मजले वाढत जाणारे पण पिरॅमिडसारखे खाली चौकोनी व वर निमुळते होत जाणारे, हारान्तरांनी व्याप्त, शालांनीयुक्त गोपूरे व स्तुपींनी अलंकारित आणि माथ्यावर अष्टकोनी किंवा षट्कोनी अल्पविमानाने सुशोभित असे शिखर होय.[१९]

द्रविड शैलीमध्ये बांधलेल्या मंदिराच्या पायापासून वरपर्यंतच्या अवयवात उपपीठ (जगतीच्या खालील भाग), अधिष्ठान, पादवर्ग (भिंती), प्रस्तर (छप्पर), कंठ (मजला किंवा मजले याला तल असेही म्हणतात), अल्प किंवा क्षुद्रविमान (शिखर), स्तुपी (कळस) इत्यादी वैशिष्ट्ये दिसून येतात.[२०]

जसा काळ बदलत गेला तसा नवनवीन शैलींचा जन्म होत गेला. नागर शैली व द्रविड शैलीचा मिलाफ घडवून जी शैली घडली ती म्हणजे 'वेसर शैली' होय. या वेसर शैलीचे वैशिष्ट्ये म्हणजे नागरशैलीसारखे गोला पण द्रविड शैलीमध्ये पिरॅमिडच्या आकाराचे, मजल्यांनीयुक्त असे शिखर होय. ही वैसर शैली दख्खनच्या व उत्तर कर्नाटकाच्या भागात पुरस्कृत केली गेली.[२१]

भारतातील जैन मंदिरे आपल्या विशिष्ट शैलीने समृद्‌ध असलेली दिसतात. जैन मंदिरे जी आज विद्यमान नाहीत मात्र ज्यांचे अवशेष सापडतात आणि जी विद्यमान आहेत असे दोन भाग आपणास पाडावे लागतात. पहिल्या प्रकारचे सर्वात जुने मंदिर ऐहोळचे मेघुटी मंदिर समजावे लागेल. हे मंदिर महाकवी रविवर्मा याने बनवले आहे.[२२] लंबचतुष्कोणाकाराचे हे मंदिर दोन भागात विभागले गेले आहे. त्यामध्ये गर्भगृह, द्‌वारमंडप आणि स्तंभाची योजना हे वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे दिसून येते.

या मंदिराशिवाय लोहानीपुराजवळ जैन मंदिराचे काही अवशेष दिसतात. मंदिराच्या कामात उपयोगात आलेल्या विटा मौर्यकालीन आहेत असे सिद्‌ध होते. याशिवाय येथे एक मौर्यकालीन चांदीचे नाणे व दोन भंगलेल्या मूर्तीही

सापडल्या आहेत. मेघुटी मंदिरासारखेच मंदिर पट्टदकल येथे आहे, ही मंदिरे द्राविडी शैलीचे आहेत.[२३] हुंमच हे प्राचीन जैन केंद्र असावे असे येथील अनेक मंदिरावरुन दिसते. मंदिरावरील चित्राकृति अभंग राहिल्या नाहीत पण येथे दक्षिण भारतातील शैलीचे उत्तम दर्शन होते, ही मंदिरे अकराव्या शतकातील आहेत. हळेबीड येथील मंदिरातील स्तंभावरील केलोले कोरीव काम प्रेक्षणिय असून बंगालमध्ये पहाडपूर येथील मंदिर विशाल आकाराचे आहे. चार विशाल प्रवेशद्वार, विशाल प्रांगण, तीनशे पन्नास फूट लांबीचे सर्वतोभद्र मंदिर हे सर्व तेथील वैशिष्ट्ये आहेत.[२४] तर मध्यप्रदेशामध्ये देवगढ येथील मंदिराची शिल्पकला विलोभनीय आहे. मंडप, स्तंभ, मानस्तंभ, शिखरे ही त्या मंदिराची सुंदरता वाढवितात आणि मुक्तागिरीचे मंदिर अतिशय आकर्षक तर आहेच परंतु येथील नैसर्गिक सुंदरतेमुळे ते आणखी विलोभनीय असून संपूर्ण भारतात यासारखे स्थळ मिळणार नाही, जिथे प्रकृती सौंदर्याची वास्तुकलेशी इतकी सुंदर साथ आहे.[२५]

राजस्थानमधील राणकपूर, पद्मपुरी, अबू पहाडावरील जैन मंदिर हे जैन कलेचेच नाही तर भारतीय वास्तुकलेचे सर्वोत्कृष्ट उदाहरण असून सौराष्ट्रामध्ये शत्रुंजय क्षेत्रावर जितकी मंदिरे आहेत तितकी कुठेच नाहीत. नेमिनाथ तीर्थंकरांची निर्वाणभूमी गिरनार क्षेत्र येथे शिखर अधिक प्रमाणात आहेत. मंदिरावर एका शिखरांऐवजी अनेक शिखरांचा पूंज निर्माण केले आहे, म्हणजेच शिखर शिखरी हे सुद्धा जैन मंदिराचे वैशिष्ट्य होय.

या मंदिर निर्मितीत नागर, द्रविड आणि वेसर शैलीचा वापर करण्यात आला आहे. हेमाडपंती मंदिराचे ही उत्कृष्ट उदाहरणे जैन मंदिर शैलीत मिळतात. मंदिर निर्माण करताना मानस्तंभाला ही बरेच प्राधान्य दिलेले दिसते. अनेक ठिकाणी उंच, कलापूर्ण मानस्तंभ आढळतात.[२६] परभणी जिल्ह्यामध्ये चारठाणा येथे असाच एक काळ्या पाषाणाचा चाळीस फूट उंचीचा कलापूर्ण

मानस्तंभ असून याचे वैशिष्ट्य असे आहे की, बुडाशी दहा फूट रूंद असलेला हा मानस्तंभ थोडीशी शक्ती लावून हलवल्यास बुडापर्यंत हलताना दिसतो.[२७]

यावरुन असे सिद्ध होते की, भारतातील विविध क्षेत्रात दिसून येणारी जैन मंदिरांची निर्मिती ही कलापूर्ण अशी आहे. त्यात गर्भगृह, मंडप, स्तंभ, मूलनायक प्रतिमा, यक्ष-यक्षिणी, इंद्र, द्वारपाल, शासनदेवता आणि मानस्तंभ असून त्यात विविधता, विशालता, सौंदर्य ही गुणवैशिष्ट्ये पाहावयास मिळतात.

## ४.२ महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्याची सुरुवात आणि जैन मंदिरे :-

मंदिर निर्मितीची चळवळ इ.स. च्या चौथ्या-पाचव्या शतकापासून संपूर्ण भारतभर सुरु झाली ती सतराव्या व अठराव्या शतकापर्यंत वेगात चालू राहिली. या दृष्टिने महाराष्ट्रातील मंदिराचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रातील सर्वात जुनी मंदिरे उस्मानाबाद जिल्ह्यात तेर आणि विदर्भात नागर व मांढळ या ठिकाणी आढळतात, यांचा काळ इ.स. पाचवे ते सातवे शतक असा आहे.

महाराष्ट्रातील मंदिर बांधणीचा काळ मात्र इ.स. चे अकरा ते चौदावे शतक असा आहे. अंबरनाथ, सिन्नर, खिद्रापूर, यवत, अंजनेरी, बलसावे, देवलाण, फलटण, गुरसाळे, खटाव येथील मंदिर प्राचीन समजली जातात. ही मंदिरे हेमाडपंती, नागर व भूमिज शैलीची समजली जातात.[२८] महाराष्ट्रातील मंदिर शैलीमध्ये नागर शैली मंदिरे, वेसर शैली मंदिरे, वीटांनी बांधलेली मंदिरे, भूमिज मंदिरे, प्रस्तर शिखर मंदिरे, फासना शिखर मंदिरे, हेमाडपंती मंदिरे यांचा समावेश होतो.

### ४.२.१ वीट मंदिर :-

काही उत्खननांमध्ये विटांनी बांधलेल्या मंदिराचे अवशेष सापडले आहेत. पैठण येथील उत्खननात सापडलेले मंदिर अवशेष सर्वाधिक उल्लेखनीय आहेत. तथापि या अवशेषांवरुन मंदिराचे फारसे तपशील म्हणजे हे मंदिर कोणत्या देवाचे आणि कोणत्या संप्रदायाचे आहे इत्यादी कळू शकले

नाही. मांढळ, मूलचेरा, तेर, रामटेक, नागरा, वाशिम येथील विटांनी बांधलेल्या मंदिराची चांगले उदाहरणे आहेत.[२९]

४.२.२ वेसर मंदिर :-

महाराष्ट्राच्या चालुक्य, शिलाहार, यादव यांच्या भूप्रदेशातील मंदिरावर या शैलीचा प्रभाव दिसून येतो. महाराष्ट्रात आज फारच थोडी वेसर मंदिरे शिल्लक आहेत. नागर आणि द्रविड शैलीतील वास्तुघटकांच्या विशिष्ट प्रकारच्या संयोगातून इ.स. च्या पहिल्या सहस्त्रकाच्या अखेरीस वेसर शैली उदयाला आली असे दिसते. वेसर शैलीची वास्तुशास्त्रीय वैशिष्ट्ये अशी आहेत. अंतरालाच्या कमानीवर असलेले नृत्य करणा-या शिवाचे शिल्प, त्याच कमानीवर असलेले लक्ष्मीचे शिल्प आणि गर्भगृहाच्या द्‌वारावरील ललाटावर कोरलेल्या सप्त मातृकांच्या मूर्ती, अंतरालाच्या छतावर दाखविण्यात आलेले अष्टदिक्पाल उत्तर चालुक्यकालीन मंदिरात आढळणा-या स्तंभासारखेच मंडपाचे स्तंभ, गर्भगृहाच्या बाह्यांगावर नंतरच्या काळातील कर्नाटक शैलीचे अर्धस्तंभ, या सर्व वैशिष्ट्यांमुळे हे मंदिर अकराव्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थकात दुस-या सेऊणचंद्राचा मुलगा परमदेव याने बांधले असावे असे तज्ञांचे मत आहे.[३०]

४.२.३ भूमिज मंदिर :-

भूमिज शैली ही नागर शैलीची उपशैली असून माळवा भागात भूमिज नागर शैली विकसित झाली. त्याचबरोबर राजस्थान, महाराष्ट्र व गुजरात भागातही ती जाऊन पोहचली. दहाव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत भूमिज शैलीने आपले वेगळेपण टिकवून ठेवले. माळव्याच्या परमार व महाराष्ट्राच्या यादव या राजवंशाच्या आश्रयाने या शाखेचा विकास झाला. आज महाराष्ट्रातील भूमिज मंदिर प्रकारात अंबरनाथ (ठाणे), बलसाणे (धुळे), सिन्नर व झोडगे (नाशिक), खिद्रापूर (कोल्हापूर) इत्यादी उल्लेखनीय मंदिरे आहेत.[३१]

खिद्रापूरचे जैन मंदिर खिद्रापूरच्या कोपेश्वर मंदिरापासून अंदाजे ३०० फूटावर पश्चिम दिशेला एक पूर्णावस्थेतील जैन मंदिर आहे. हे जैन मंदिर ऋषभनाथाचे असून त्याला बस्ती किंवा जिनालय असे म्हणतात. हे जैन मंदिर महामंडलेश्वर गंडरादित्याचे महासामंत लिंबदेवरस याने बांधले आहे. लिंबदेव हा जैन धर्मीय होता, तो नाकिरस राजा आणि चंपकाम्बिका याचा द्विवतीय पुत्र होय.

आजच्या खिद्रापूरच्या जैन मंदिरामध्ये अनेक बदल झाले आहेत. प्राचीन जैन मंदिर अजूनही चांगल्या स्थितीत आहे. त्याच्या भिंतीवरील कला-शिल्पे अजूनही जशास तशीच आहेत. या मंदिराचा मानस्तंभ नव्याने उभारला आहे. प्रत्यक्ष मंदिराच्या प्रवेशद्वारातील कमानी व प्रशस्त सभामंडप ही कामे अलिकडच्या काळात झालेली दिसतात. मात्र या मंदिराचे प्राचीनत्व फार काळजीपूर्वक जपले गेले आहे. येथील कोपेश्वर मंदिर आणि जैन मंदिर हे एकच काळात बांधलेले दिसते. बरीच कला-शिल्पे ही कोपेश्वर मंदिराच्या शिल्पकारांनीच बनविलेली आहेत, हे पाहणीवरुन स्पष्ट दिसते. अनेक देव-देवतांच्या मूर्ती व जैन धर्मीयांच्या पवित्र मानल्या जाणा-या काही तीर्थंकरांच्या मूर्ती येथे स्थापन करण्यात आलेल्या आहेत. गर्भगृहाच्या दरवाजाच्या दोन्ही बाजूला वायूविजनाच्या उद्देशाने दगडी जाळीदार खिडक्या ठेवण्यात आलेल्या आहेत. दरवाजाच्या चौकटीवरील कोरीब काम अत्यंत कलाकुसरीचे आणि देखणे दगडाच्या घडणावळीतील भगवान महावीरांची मूर्ती आकर्षक आणि जीवंत वाटते.

खिद्रापूर जैन मंदिराचे शिखर मजबूत आणि रेखीव, सुबक आणि सुंदर आहे. त्याच्या देवड्यांमधून जैन साधु-महतांच्या मूर्ती आहेत. या खिद्रापूर जैन मंदिराशिवाय कोपेश्वर मंदिराच्या परिसराचा परिचय अपूर्ण राहिला असता हिंदू आणि जैन धर्मीयांतील समरसता ही या जैन मंदिराच्या माध्यमातून त्या वेळच्या शिलाहार राजांनी प्रत्यक्षात उतरविली, त्याला प्रोत्साहन देऊन आर्थिक मदत

केली.[३२] खिद्रापूरचे जैन मंदीर जैन तीर्थक्षेत्रांच्या यादीप्रमाणे तीर्थक्षेत्र नसले तरी एक उत्कृष्ठ रेखीव मंदीर म्हणून याचा येथे उल्लेख घेतला आहे.

४.२.४ फासना शिखर मंदिरे :-

नागर, वेसर आणि भूमिज शिखरांप्रमणेच फांसना हा शिखर प्रकारही महाराष्ट्रात होता. मात्र इतर तीन शिखर प्रकार जसे गर्भगृहावर असतात तसा हा शिखर प्रकार गर्भगृहावर वापरलेला फारसा आढळून येत नाही. फांसना शिखरे ब-याचदा लहान किंवा मोठ्या मंडपावर दिसतात. एका अर्थी इतर शिखर प्रकारांच्या तुलनेत हा अत्यंत साधा आणि मूलभूत स्वरुपाचा शिखर प्रकार आहे. या प्रकारची शिखरे संपूर्ण भारतभर आढळत असल्याने या शिखराचा उल्लेख कोणत्याही प्रांताच्या नावाने न करता फासनाकार शिखर किंवा फासना शिखर असा केला जातो. या प्रकारची शिखरे सर्वत्र आढळण्याचे कारण असे की, हे शिखर सौंदर्यदृष्ट्या फारसे आकर्षक नसले तरी त्याचे निर्माणतंत्र अगदी साधे सुटसुटित असते. त्यांची बाह्यरेषा चौकोनी पाया असलेल्या शंकूसारखी आहे. त्याच्या चारही किंवा दोन्ही बाजूंवर असलेल्या भूमिसमांतर रेषा शिखराच्या कोप-यावर पाकळीच्या आकाराने आणि दर ठराविक अंतरानंतर अर्धवर्तुळाकृती आकाराने खंडीत झालेल्या असतात. एका अर्थी हे शिखर ठराविक अंतराने येणारे ‘तल’ वेगळे दाखविण्यासाठी शालाशिखरे आणि कुटशिखरे असलेले द्राविड शिखर प्रतिकात्मकपणे अभिव्यक्त करणारे आहे आणि या अभिव्यक्तिसाठीच शिखराच्या सरळ भूमिसमांतर रेषा कोप-यांवर पाकळीचे आणि प्रत्येक ठराविक अंतरानंतर अर्धवर्तुळाचे आकार धारण करतात. अशा मंदिरामध्ये पाटणे (जि. जळगाव) येथील हिंदू मंदिर आणि इब्राहिमपूर (ता. चंदगड, जि. कोल्हापूर) येथील जैन मंदिरे उल्लेखनीय आहेत.[३३]

४.२.५ हेमाडपंती मंदिर :-

प्राचीन मंदिराच्या बांधकामाचे वैशिष्ट्य म्हणजे चुन्याच्या साह्याविना किंवा कोणत्याही प्रकारचे सांधीद्रव्य न वापरता मंदिर बांधणीसाठी वेगवेगळ्या आकारात घडविलेले दगड आंतर-आडक पद्धतीने एकमेकांत बसवून ही मंदिरे बांधली गेली. अशा रितीने बांधलेल्या मंदिरांना हेमाडपंती मंदिरे म्हणण्याचा प्रघात आहे.[३४]

लाव्हारसापासून तयार झालेल्या अग्निजन्य खडकाचा बेसॉल्ट हा प्रकार वापरण्यात येतो. मोठ-मोठे दगड एकावर एक रचून चुनेगच्ची शिवाय बांधली गेली आहेत. दगडांच्या दोन रांगा रचून त्यामधील जागा छोट्या छोट्या दगडांनी भरली जाते. काही ठिकाणी दगड घट्ट बसावेत म्हणून त्यात गरम शिसे ओतले जाते, काही ठिकाणी लोखंडी पट्टी वापरली जाते.[३५]

वास्तविक अशी शुष्कसंधी मंदिरे भारतात सर्वत्र आढळतात. इतर प्रांतातील अशा प्रकारच्या मंदिराप्रमाणेच महाराष्ट्रातही ह्या मंदिराची कोणत्या तरी आख्यायिकेतील व्यक्तींशी सांगड घातली गेल्याचे आढळते. अशी सांगड घातली गेलेली व्यक्ती एकतर स्थपती तरी असते किंवा मंदिर बांधणीचा आर्थिक भार उचलणारी आश्रयदात्री तरी असते. कर्नाटकात अशा प्रकारच्या मंदिराची सांगड जक्कणाचार्याशी घातली जाते आणि महाराष्ट्रात अशा मंदिरांना हेमाडपंती संबोधण्यात येते. बहुतांशी भारतात पसरलेल्या स्थापत्य परंपरेची सांगड कोक्कासाशी घालण्यात येते.[३६]

हेमाद्री हा यादव साम्राज्यात 'करणाधीप' पदावर कार्य करीत होता. हेमाद्रीने राजाश्रयाच्या जोरावर अनेक मंदिरे बांधली. खरे तर शुष्कसांधी प्रकारची मंदिरे हेमाडपंती मंदिराच्या उदयापूर्वीही बांधली जात होती. परंतु त्याने या प्रकारच्या मंदिर बांधणी कार्याला बरेच प्रोत्साहन दिले असावे. म्हणूनच कालांतराने हा मंदिर बांधणीचा प्रकार हेमाडपंती या नावाने ओळखला जाऊ लागला असावा.[३७] शिलालेखांचा पुरावा अभ्यासला तर अशा प्रकारची मंदिरे

अकराव्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच बांधण्यात येत होती असे दिसते. पण हेमाद्री किंवा हेमाडपंत हा तेराव्या शतकातला आहे. अर्थातच अकराव्या आणि बाराव्या शतकातील अशा प्रकारच्या शुष्कसांधी प्रस्तर मंदिरांना हेमाडपंती संबोधणे उचित ठरणार नाही.[३८]

महाराष्ट्रात जी जैन मंदिरे आढळतात त्यात हेमाडपंती, नागर, फासना शिखर मंदिर शैलीची पद्धत वापरलेली दिसते. काही ठिकाणी आधुनिक पद्धतीचाही वापर करण्यात आला आहे.[३९] महाराष्ट्रात प्राचीन जैन मंदिरे फार कमी आढळतात परंतु त्यात अंजनेरी, चारठाणा अशी प्राचीन मंदिराची उदाहरणे देता येतील. हेमाडपंती पद्धतीची मंदिर संख्या अधिक आहेत, त्यात सावरगाव, तेर, कुंथलगिरी, पैठण, कोल्हापूर, कुण्डल, मुक्तागिरी, जिंतुर अशी उदाहरणे देता येतील.

महाराष्ट्रातील जैन मंदिरांची वैशिष्ट्ये वेगळी आहेत त्यात शिखर, गर्भगृह, सभामंडप, स्तंभ, मानस्तंभ यांचा समावेश होतो. काही ठिकाणी शिखर-शिखरीची पद्धत आढळून येते तर काही ठिकाणी एकच शिखर आढळून येते. महाराष्ट्रात गुहा मंदिरे ही आढळतात, त्यात धाराशिव, एलोरा, अंजनेरी, गजपंथ यांची उदाहरणे देता येतात.[४०]

## ४.३ मंदिराचे प्रमुख अंग :-

भारतातील व महाराष्ट्रातील मंदिरांचे विविध अंगे आहेत. या विविध अंगांमुळे येथील मंदिर स्थापत्याच्या सौंदर्याचा दर्जा उच्चकोटीचा ठरला आहे.

या मंदिराचा विकास क्रमाक्रमाने झाला आहे, प्रारंभी प्रतिकांच्या भोवती चबुतरा निर्माण केले जात. ऋग्वेदात अशा यज्ञ-सदनाचे विवरण मिळते. मंदिर विकासाच्या दुस-या टप्प्यात पूर्व निर्मित चबुत-याच्या चारी बाजूने वेदिका बनविली गेली. आज प्रारंभिक काळातील बनविलेली मंदिरे अत्यल्प आहेत. जयपूर जवळ बैराठमध्ये इ.स.पू. दोनशे पन्नासमधील मंदिर मिळाले आहे. यावरुन हे ज्ञात होते की, प्रारंभी या मंदिराचे आकार छोटे होते. विटा आणि

लाकडाच्या वापराने अत्यंत साध्या स्वरुपात मंदिर बनविले जात असे. कालांतराने सातव्या शतकापर्यंत मंदिराच्या विकासक्रमांत विशिष्ट आणि व्यवहारिकतेतून बदल घडत गेला. वाढत जाणारी पूजा-विधी, पूजा विधीमधील जटीलता यामुळे मंदिराच्या विविध अंगाच्या निर्माणास व विकासास वेग मिळाले आणि मंदिराच्या रचनेत बदल होऊ लागले.[४१] मंदिराच्या प्रमुख अंगात जगती प्रवेशद्वार, मंडप, गर्भगृह, शिखर, स्कंध, विमान, गोपूरम इत्यादींचा समावेश होतो.

जगती किंवा अधिष्ठान हे दोन फूटापासून पंचविस फूट उंचीपर्यंत मिळतात. यामध्ये वेरुळचे कैलास मंदिर समाविष्ट होते. मंदिराच्या बांधकाम शैलीमध्ये गर्भगृह, मंडप आणि शिखर यांना अत्यंत महत्त्व आहे. गर्भगृहामध्ये देव-देवतांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. देवघराचे प्रवेशद्वार छोट्या आकाराचे असते. सुरुवातीच्या मंदिर निर्माण काळामध्ये शिखराकडे जास्त लक्ष दिलेले दिसून येते. गर्भगृहावरील असलेले शिखर हे आम्लकलश पताकायुक्त क्षेत्राने सुशोभित केले जात. गर्भगृहावर असलेले हे शिखर मानवी आयुष्यात मार्ग दाखविणारे ठरते, त्याचा उद्देशच संसाराच्या स्थूलतेतून ज्ञानाकडे जाण्याचा होता.[४२] गर्भगृहाच्या समोरील बाजूस अथवा गर्भगृहाच्या चोहो बाजूने मंदिराचा मुख्य मंडप असतो. ज्यामुळे मंदिर प्रदिक्षणेस सोपे बनविले जाते. मंडपामध्ये कासवासारख्या काळ्या पाषाणातील मूर्ती बनवून बसविल्या जातात. याचा उपयोग समाजातील लोक सामाजिक व धार्मिक कार्यासाठी याचा वापर करताना दिसून येतात.

मंदिराच्या विविध अंगामध्ये स्कंध, जंघा, शुकनासिका, वरंण्डिका, वेदीबंध, कण्ठ आणि ग्रीवा इत्यादींचा समावेश होत असला तरी मंदिराचे असलेले विमान हे ही तितकेच महत्त्वाचे आहे. गर्भगृहावरील उंच शिखर हे विमान म्हणून प्रसिद्ध असते. दक्षिण भारतामध्ये मंदिर समूहाच्या ठिकाणी गोपूरमला महत्त्वाचे स्थान दिले जाई. गोपूरम म्हणजे मंदिरावरील चारही

बाजूच्या प्रवेशद्‌वारावर बहूमजली असलेले भवन की जे देवी-देवतांच्या वेली-फुलांच्या प्रतिमांनी सजविलेली असते. मंदिराच्या प्रमुख अंगामध्ये पंचायतन शैली ही महत्त्वाची मानली जाते. या शैलीत चारही बाजूने छोटे छोटे मंदिर असत, त्याचे पाच शिखर असत म्हणून याला पंचायतन म्हटले जाते.[४३]

## ४.४ महाराष्ट्रातील जैन लयन स्थापत्य :-

महाराष्ट्रातील जैन लेणी इ.स. च्या पाचव्या शतकापासून सापडतात हे सर्वमान्य असले तरी जैन लयन स्थापत्याची प्राचीनता इ.स. च्या पहिल्या शतकापर्यंत जाते. जैन लयननिर्मिती यादव आणि अगदी सुलतान काळातही चालू राहिली असली तरी तिचा गौरवशाली कालखंड प्रथम वेरुळ येथेच दिसतो. जैनांनी यानंतरच्या काळापर्यंत ह्या स्थापत्य प्रकाराचा अंगिकार केला. नंतरच्या काळातील जैन लयननिर्मितीचे उपक्रम संख्यात्मकदृष्ट्या अगदी थोडे आहेत.[४४]

जैन धर्माची दक्षिणेतील प्राचीनता इ.स. पूर्व तिस-या शतकापर्यंत मागे जाते. जैन परंपरेनुसार चंद्रगुप्त मौर्य हा जैन इतिहासातील सुप्रसिद्‌ध मुनी भद्रबाहुचा शिष्य होता. त्याने आपल्या आयुष्याचा अखेरचा काळ दक्षिण कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथे घालविला. पालित्तय हा आणखी एक सुप्रसिद्‌ध जैन मुनी होय, हा सातवाहनाचा समकालीन होता. पालित्तयाच्या आख्यायिकेनुसार तो सातवाहनाच्या दरबारातील महान ज्योतिर्विद होता आणि त्याच्याकडे आध्यात्मिक विद्या ही होत्या. या प्राचीनतेचे कोणतेही भौतिक पुरावे न आढळल्यामुळे त्या काळी महाराष्ट्रात जैन धर्माचा प्रसार झाला होता हे विद्‌वानांना स्पष्ट करता येत नव्हते. चंद्रगुप्ताची आणि अशोकाचा नातु दशरथ मौर्याची आख्यायिकानुसार जैन धर्माचा महाराष्ट्रात आधीच शिरकाव झाला होता याची साक्ष देते. म्हणूनच पाले येथील साध्या लहान लेण्यात जेंव्हा ‘णमो अरिहंताण’ हा जैन शिलालेख आढळला आणि तेव्हा पुरातत्त्वज्ञांना हा पुरावा मिळाला. या शिलालेखाच्या अक्षरांच्या धाटणीवरुन हा शिलालेख ख्रिस्तपूर्व

पहिल्या शतकातील असावा असे डॉ. सांकलिया व डॉ. शोभना गोखले यांचे मत आहे. त्याचप्रमाणे डाव्या अंगाला छोटा निवासी कक्ष असलेले हे साधे शैलगृह महाराष्ट्रातील सर्वाधिक जुने शैलगृह असण्याची शक्यता आहे.[४५]

४.४.१ वेरुळ :-

ही जैन लेणी औरंगाबाद जिल्ह्यात असून वेरुळ लेणीच्या छोटा कैलास लेण्याच्या वायव्येला एक अर्धवट खोदलेले लेणे आहे. आधी मुखमंडप, त्यामागे दोन बाजूंच्या टोकांना प्रत्येकी एक छोटी खोली असलेला व्हरांडा आणि त्यामागे अपूर्णावस्थेत असलेला मंडप अशी याची रचना आहे. या मंडपामागे गर्भगृह खोदण्याची योजना होती. मुख मंडपावर, व्हरांड्याच्या वरच्या भागावर, मंडपावर जैन देव-देवतांच्या मूर्ती आहेत, मंडपाच्या मध्यभागी 'सर्वतोभद्र प्रतिमा' आहे. या तीन लेण्यांपैकी एक लेणे इंद्रसभा या नावाने, दुसरे लेणे जगन्नाथ सभा या नावाने प्रसिद्ध आहे.[४६]

वेरुळ इंद्रसभेत (लेणे क्रमांक ३२) गोपूर, प्रांगण, मंदिराची प्रतिकृती, हत्ती, स्तंभ, सर्वतोभद्र प्रतिमा ही याची वैशिष्ट्ये आहेत. लेणी दोन मजली आहे, येथील तीर्थंकरांच्या मूर्तीखाली एक शिलालेख असून या शिलालेखावरुन ही मूर्ती शांतिनाथाची आहे असे दिसते. इंद्रसभेच्या वरच्या मजल्यावरील मंदिर संकुल उल्लेखनिय आहे. येथील मंडपाच्या बाजूच्या दोन भिंतीमध्ये असलेल्या देवकोष्टकामध्ये पार्श्वनाथ परीषहाला सामोरा जाणारा आणि बाहुबलीचे महात्म्य दाखविणारा कथा शिल्पपट आहे. व्हरांड्यावर अंबिका आणि सर्वानुभूति यक्ष दाखविला आहे. ही सर्व मूर्तीशिल्पे प्रस्तर शिल्पाचा उत्कृष्ठ नमुना ठरली आहेत. यासोबतच आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे छतावर रंगचित्रे असून त्यात विविध अलंकार चित्रण केले गेले आहे.[४७]

वेरुळ जगन्नाथ सभेत (लेणे क्रमांक ३३) येथे प्रांगणाच्या तिन्ही बाजूस खोदलेले लयन संकुल असून जगन्नाथ सभेच्या खालच्या मजल्यावर दोन छोटी व दोन मोठी लयन मंदिरे आहेत. व्हरांडा व त्यामागे मंडप असा तलविन्यास

आहे. बसलेले तीर्थंकर ही या लेण्यातील मुख्य मूर्ती असून मधोमध असलेल्या देवकोष्ठकात आहे. येथे सर्वानुभूती यक्ष आणि अंबिका, तीर्थंकरांचे दोन पट्ट दाखविले आहेत. व्हरांड्याच्या भिंतीवर पार्श्वनाथ, सर्वानुभूती यक्ष, यक्षी आणि भक्तगण दाखविले आहेत. गर्भगृहाच्या तीन भिंतीवर बैठ्या स्थितीतील तीर्थंकरांच्या मूर्ती असून दोन अर्धस्तंभामधील भिंतभागावर आणि गर्भगृहातील बाजूच्या भिंतीवर मिळून एकूण वीस तीर्थंकरांची मूर्तीशिल्पे आहेत. उपगर्भगृहातील पार्श्वनाथाचे आणि गर्भगृहातील मूलनायकाचे शिल्प जमेस धरले तर ही संख्या बावीस होते. वेरुळ येथील जैन लेण्यांचे तलविन्यास शैव लेण्यांच्या तलविन्यासांशी मिळते जुळते आहेत. याचाच परिणाम म्हणजे पश्चिम भारतातील जैन स्थापत्यकारांची मंदिर संकुल पद्धत आणि चतुर्विशतिपट्टासारखा मूर्तीशास्त्रीय मूर्ती याच काळात विकसित झाली. या जैन लयन संकुलाचा काळ इ.स. चे नववे ते दहावे शतक असा सुचवितात. यातील काही लेण्यांमध्ये असलेल्या शिलालेखांची पुराभिलेखीय वैशिष्ट्ये वरील काल निश्चितीला दुजोरा देतात. अपूर्णावस्थेत असलेल्या लेण्याच्या परिसरातील लेणे क्रमांक ३१ आणि पार्श्वनाथ टेकडीवर कोरलेली लेणी या परिसरात लयन निर्मिती उत्तर चालुक्य काळापासून यादव काळापर्यंत चालू राहिल्याची साक्ष देतात.[४८]

४.४.२ खरोसा लेणी :-

ही लेणी लातूर जिल्ह्यामध्ये असून जांभा येथे दिसणा-या प्रस्तरात ही लेणी खोदलेली आहे, येथे एकूण दहा लेण्या आहेत. त्यापैकी बर्जेसने क्रमांक पाचचे लेणे म्हणून ज्याचे विवरण केलेले आहे ते जैन लेणे आहे. इतर लेणेसमूह हा ब्राम्हणी लयन स्थापत्यात मोडतो. लेणे टेकडीच्या दक्षिण टोकावर असून ७.३२ मीटर रूंद, ५.०३ मीटर खोल आहे. लेण्याच्या मागील भिंतीत बसलेला तीर्थंकर दाखवला आहे. खरोसा येथील अन्य लेण्यांच्या काळावरुन हे लेणे इ.स. च्या नवव्या शतकाच्या उत्तरार्धात खोदले असावे असे दिसते.[४९]

४.४.३ अंकाई - टंकाई लेणी :-

ही लेणी नाशिक जिल्ह्यात असून येथील जोड किल्ल्याच्या दक्षिणेकडील प्रवेशद्‌वाराकडे जाताना सुमारे ९१.४४ मीटर चढणीवर हा लेणीचा समूह लागतो. बर्जेसने पश्चिम भारतातील लेण्यांच्यावर लिखाण केले त्यावेळी या ठिकाणी सात लेण्यांचा समूह असल्याचा उल्लेख केला आहे. मात्र त्यानंतर भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने येथे साफसफाई केली आहे. आज त्याठिकाणी वरच्या रांगेत एकूण आठ व त्याखाली दोन अशा दहा लेण्या आढळतात. या लेण्यांमध्ये आढळणारे शिलालेख व घडीव पाषाणाच्या मूर्ती, त्यांची वैशिष्ट्ये या दृष्टीने परिपूर्ण अभ्यास अद्यापही झालेला नाही. तरी जाणकारांनी केलेला अभ्यास व नागरी शिलालेखातील अक्षर लिपीची धाटणी यावरुन राष्ट्रकूट ते यादव (इ.स. दहावे ते तेरावे शतक) या काळात त्यांची निर्मिती झाली असे दिसते.[५०]

४.४.४ यादव काळातील लेणी :-

यादव काळातही ‘लयन मंदिर’ या स्वरुपातील लयन निर्मिती चालूच राहिली. किंबहुना जैन लेणी यादवांच्या साम्राज्यभर विखुरलेली आढळतात. त्यातील प्रसिद्‌ध उदाहरण म्हणजे वेरुळ येथील पार्श्वनाथ टेकडीवरील राष्ट्रकूट लयन मंदिराच्या परिसरातील लेणे क्रमांक ३१ आणि जळगाव जिल्ह्यातील पाटणे येथील लेणी ही होत. कझिन्सने नाशिक जिल्ह्यातील चामर लेणे, धुळे जिल्ह्यातील भामेर आणि पुणे जिल्ह्यातील बामचंद्र येथे जैन लेणी असल्याचे नमूद केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व डेक्कन कॉलेज पुणे यांनी अलिकडेच केलेल्या संशोधनातून औरंगाबाद जिल्ह्यातील दौलताबाद परिसरातील व देवगिरी किल्ल्याच्या पायथ्याशी असलेली लेणी यादवकालीन असल्याचे निष्पन्न झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनलयाने अलिकडेच केलेल्या संशोधनातून या जैन लेण्यांच्या यादीत नाशिक जिल्ह्यातील चांदवड व अंजनेरी येथील लेणी व धुळे

जिल्ह्यातील शहादा येथील लेण्यांची भर पडली आहे. याप्रमाणे महाराष्ट्रातील निरनिराळ्या जिल्ह्यांमध्ये यादवकालीन जैन लेणी आढळतात.[५१]

४.४.५ चामर लेणे :-

चामर लेणे नाशिक जिल्ह्यात असून नाशिक शहराच्या वायव्येला म्हसरुळ गावाच्या परिसरातील एका टेकडीवर हा लयन समूह आहे. हा चामरलेणे म्हणून ओळखला जातो. या लयन समूहाला दोन लेण्यांमध्ये सर्वसाधारणपणे आढळणा-या सर्वानुभूति प्रतिमा आहेत. यातील एका लेण्यामध्ये सिंहासनावर बसलेला मूलनायक आणि परिकरांमध्ये इतर तेवीस जिन दाखविले आहेत. त्यामुळे या शिल्पाकृतींना चतुर्विंशती पट्टांचे स्वरुप प्राप्त झाले आहे. येथे प्रस्तरात कोरलेली पार्श्वनाथाची महाकाय मूर्तीही आहे. येथील शिल्पशैली लक्षात घेता ही लेणी यादव काळात खोदली गेली असावीत असे दिसते.[५२]

४.४.६ अंजनेरी :-

नाशिक जिल्ह्यातील अंजनेरी टेकडीच्या खोबणीत एक लेणे असून त्यात मुख्य दैवत म्हणून पार्श्वनाथाची मूर्ती आहे. लेणे चौरसाकृती असून त्यात फक्त मंडपाचा समावेश होतो. मंडपाच्या मागील भिंतीत पार्श्वनाथाची पंचतीर्थी मूर्ती आहे. पार्श्वनाथाच्या दुतर्फा प्रत्येक बाजूस पार्श्वनाथाची उभी मूर्ती आहे. जैन लेण्यांमध्ये नेहमी आढळणारे अंबिका, यक्षी आणि सर्वानुभूति यक्ष मंडपाच्या मागील भिंतीत असलेल्या तीर्थंकरयुक्त पार्श्वनाथाच्या दुतर्फा दाखविले आहेत. या लेण्यांतील स्तंभांचा स्तंभघटक्रम, गुजरातमध्ये आढळणा-या पश्चिम भारतीय शिल्पशैलीशी ब-यापैकी साधर्म्य असलेल्या मनुष्याकृती आणि शिल्पशैलीची इतर वैशिष्ट्ये लक्षात घेता आणि त्यातील कोरीव काम इ.स. च्या तेराव्या शतकाच्या अखेरीस करण्यात आले असे दिसते.[५३]

४.४.७ मोहिदे :-

नंदूरबार जिल्ह्यात मोहिदे लेणी असून हा शैलगृह स्थापत्याचा आगळावेगळा नमुना आहे. ही लेणी डोंगरामध्ये खोदलेली नसून मोहिदे गावाजवळून वाहणा-या गोमाई नदीच्या मध्ये पात्रात असलेल्या प्रस्तरामध्ये खोदलेली आहेत. यातील उल्लेखनीय दोन लेणीही इतर शैलगृहांपेक्षा वेगळी आहेत. ही लेणी वरुन खाली खोदण्यात आली. तथापि वेरुळ येथील कैलास लेण्याप्रमाणे नाही, येथील मूर्तीशास्त्रीय स्थलयोजनात चोविस तीर्थंकर, यक्ष-यक्षिनी आणि क्षेत्रपालांसह इतर जैन देवतांचा समावेश होतो.[५४]

४.४.८ भामेर :-

भामेर हे ता. साक्री, जि. धुळे येथे असून भामेर किल्ल्याच्या परिसरात पाच लेणी आहेत. येथे मोठा व्हरांडा, मंडप असून एकमेकांलगत असलेले तीन मंडप अशी या लेण्याची रचना आहे. या लेण्यामध्ये पार्श्वनाथ व जैन मूर्ती आढळतात हे लेणे आज पडझड झालेल्या स्थितीत आहे.[५५]

भामचंद्र महादेव डोंगर - पुणे जिल्ह्यामध्ये चाकणच्या वायव्येला दहा कि.मी. अंतरावर भामचंद्र हा डोंगर आहे. या डोंगरात असलेल्या लेण्यांमध्ये तुकाराम महाराज भजन करण्यास जात असत अशी वंदता आहे. मध्ययुगीन काळात आणि आधुनिक काळात या लेण्याचा ब-यापैकी जीर्णोद्धार झाला आहे. दरवाजाच्या ललाटभागावर कोरलेल्या पट्टामध्ये एक छत्रयुक्त आकृती या बाबीमुळे हे लेणे जैन असल्याचे सूचित करतात.[५६]

४.४.९ पाटणे :-

जळगाव जिल्ह्यातील पाटणे येथे काही लेणी आहेत. यातील एक लेणे नागार्जून कोठडी म्हणून ओळखले जाते. येथे एक मंडप असून मंडपाच्या मागील भिंतीत जिनांची मूर्ती आहे. अशा प्रमाणे तलविन्यास आहे, व्हरांडा दोन स्तंभांवर पेललेला असून या स्तंभावर लसुणाकृती शीर्ष आहेत. मंडपाच्या अंतर्भागात दुस-या बाजूस दोन अनियमित आकाराचे स्तंभ असून त्यावर

सर्वानुभूती यक्ष आणि अंबिका यक्ष कोरली आहे. मंडपाच्या मागील भिंतीत पंचतीर्थी मूर्ती आहे. यात मध्यभागी सिंहासनावर बसलेला मूलनायक असून त्याच्या प्रत्येक बाजूला एक बसलेला आणि एक उभा म्हणजेच एकूण दोन बसलेले आणि उभे तीर्थंकर दाखवले आहेत. परिकरांमध्ये दोन चौरीधारक, मकर तोरणे, छत्रातिछत्र आणि अशोक वृक्षाची पालवी यांचा समावेश होतो. मूलनायकाच्या एका बाजूला आणि मागील भिंतीजवळ आणखी एक जिन मूर्ती आहे. मंडपाच्या दक्षिण भिंतीमध्ये एक उभी वास्तवाकार जिन मूर्ती असून उत्तरेकडील भिंतीत असलेली तीन आणि दक्षिणेकडील भिंतीत असलेल्या एका देवकोष्ठात व मागील भिंतीच्या दक्षिण टोकाजवळ खोदलेल्या अनियमित कक्षात प्रत्येकी एक जीन मूर्ती आहे. मूर्तीशास्त्रीय आणि शिल्पकलेची वैशिष्ट्ये आणि लसुणाकृती शीर्ष यावरुन हे लेणे यादव काळात खोदले गेले असे म्हणतात येईल.[५७]

## ४.५ जैन शिल्पकला आणि मूर्तीकला :-

भारतीय शिल्पकला, मूर्तीकला यावर जैन पद्धतीचा प्रभाव सुद्धा दिसून येतो. जैनांनी अनेक लेणी खोदल्या आहेत. इ.स. पूर्व पाचव्या शतकापासून ही शिल्पकला विकसित झालेली दिसते. यात तीर्थंकरांच्या मूर्ती व धर्म कथा खोदलेल्या दिसतात. मौर्य काळातील दोन प्रस्तर मूर्ती पाटणा जिल्ह्यातील लोहाणीपुरा या गावी सापडल्या आहेत. त्या मूर्तीचा आकार, मुखावरील भावना आणि मूर्तीचा चकचकीतपणा या सर्वात सौंदर्यदृष्टी दिसून येते. भावपूर्ण मूर्तीकलेच्या दृष्टीने याच सर्वात प्राचीन मूर्ती मानल्या जातात.

मोहोंजोदडो आणि हडप्पा येथील उत्खननात सापडलेल्या मूर्तीत आणि या मूर्तीत कला या दृष्टीने बरेच साम्य आहे. हडप्पा येथील नग्न मूर्ती आणि या नग्न मूर्ती एकाच काळातील असाव्यात. कायोत्सर्ग मुद्रेतील साधकाचे सिद्धावस्थेत परिवर्तन व्यक्त करणा-या या मूर्ती शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना

आहे. जैन संस्कृतीवर मोहोंजोदडो आणि हडप्पा काळातील संस्कृतीचा प्रभाव यातून दिसून येतो.[५८]

तीर्थंकरांच्या मूर्ती व्यतिरिक्त इतर मूर्ती नग्न आढळत नाहीत. यावरुन केवळ त्यांचा अभ्यास करुन इ.स.पू. एक हजार वर्षांपासून ते इ.स. च्या पंधराव्या शतकापर्यंत भारतीय मूर्तीकला कशी प्रगत होत गेली याचा आलेख स्पष्ट होतो. भारतीय शिल्पकलेत जैन शिल्पकला एक स्वतंत्र अस्तित्त्व दाखविते हे यातून स्पष्ट होते. बौद्‌ध आणि जैन अनुयायांनी लेणी खोदल्या. इ.स.पू. चौथ्या व दुस-या शतकात खोदलेल्या बिहार येथील लेणी व नंतर ओरिसा, गुजरात, महाराष्ट्र इत्यादी प्रांतातील लेणी शिल्पकलेची प्रगती दाखवितात. जैन लेणी व बौद्‌ध लेणी जवळच आढळतात.

ओरिसा प्रांतातील उदयगिरी व खंडगिरी पर्वतावरील लेणीतून अनेक मुखी सर्प, स्वस्तिक, जैन कथांतील प्रसंग इत्यादी कोरलेले आढळतात. शिल्पकलेचा वारसा प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत पोहोचविण्याचे महान कार्य या लेण्यांच्या माध्यमातून जैन व बौद्‌ध धर्मीयांनी केले. लेण्यांतील राहण्याच्या खोल्या, सभा मंडप अत्यंत थंड व उष्ण वा-यापासून संरक्षण देण्यास योग्य असल्यामुळेच प्रचंड प्रमाणात हे खोदकाम होत गेले.[५९]

प्राचीन काळी लेण्यातून राहण्याची व धर्मोपदेश देण्याची पद्‌धत असल्यामुळे मंदिरे कमी बांधली गेली. जैन साधू श्रावकांच्या घरी जाऊन उपदेश देत, आज सुद्‌धा ही प्रथा आहे. मध्यकाळात मात्र मंदिरे जास्त बांधली गेली, स्तुपकाराचे शिल्पसुद्‌धा जैनांनी खोदले आहे. चौकोनी स्तुपावर जिन प्रतिमांचे शिल्प असते. अशा काही प्लेटसुद्‌धा सापडल्या आहेत, त्यावरुन पाया घालणे, खांब उभे करणे, प्रतिमासाठी मध्य रोखून ठेवणे इत्यादी गोष्टींचे अचूक मार्गदर्शन त्यातून केलेले दिसून येते. तक्षशिला, बिहार, मध्य प्रदेशात असे स्तुप आढळतात.

द्रविडियन वास्तुकलेचा, शिल्पकलेचा प्रभाव जैन मंदिराच्या बांधणीवर दिसून येतो. पर्वतांवर व त्यांच्या उतरणीवर बांधलेल्या देवळात ही दृष्टी दिसून येते. सुंदर शिल्पांनी नटलेल्या भिंती, स्तंभ व शिबीरांतून शिखर अशा प्रकारचे हे शिल्प अत्यंत प्रेक्षणीय वाटते. म्हैसूर प्रांतातील जैन मंदिरे शिल्पकलेने नटलेली आहेत. मंदिराच्या वास्तूला 'वस्ती' म्हटले जाते. त्याशिवाय जैन मूर्तीसाठी अनेक गर्भमंदिरे असतात. शिवाय भव्यमूर्तीचे शिल्पही खोदलेले असते. गोमटेश्वराचे शिल्प भव्यतेच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ आहे तर खजुराहो येथील शिल्प सूक्ष्म खोदकामाच्या दृष्टीने आकर्षक आहे.[६०]

इ.स.च्या बाराव्या-तेराव्या शतकापासून उत्तर भारताच्या पश्चिम विभागात जैन मंदिराचा विकास होत गेला. अबु आणि राजस्थानमधील काही मंदिरे मध्ययुगातील वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून ओळखली जातात. ग्वाल्हेरला पंधराव्या शतकात तयार केलेले एक उत्कृष्ट मंदिर आहे. गुजरातमध्ये सुद्धा अनेक मंदिरे याच काळात बांधली गेली. जैन वास्तुकला भारतातील इतर धर्मांच्या तुलनेत अत्यंत प्रगत वाटते.

जैन मंदिरातून तीर्थंकरांच्या मूर्तीप्रमाणेच पद्मा, अंबा देवींच्या मूर्ती आहेत. चितोडच्या विजय स्तंभासारखे काही स्तंभही जैनांनी बांधले आहेत. गंगा-यमुना या पवित्र नद्यांना स्त्री रुप देऊन त्यावरील कथा जैन मंदिरात काही ठिकाणी खोदलेल्या दिसतात. चोविस तीर्थंकरांच्या चिन्हांची त्यांच्या बैठकीखाली अथवा बाजूला प्रतिकृती केलेली असते त्यांचे रंगही निश्चित असतात.[६१]

### ४.५.१ मूर्तीकला :-

भारतीय मूर्तीकेलचा इतिहास हा भारतीय इतिहासाप्रमाणेच प्राचीन आहे, याचे अवेशष सिंधू घाटीत मिळतात. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही मूर्तीकला विकासाच्या टप्प्यात असलेली दिसते. कलेच्या दृष्टीने हा काळ उत्कर्षकाळ समजला जातो. प्रत्येक कलाकृतीत सजीवता आढळून येते या काळातील मूर्तीकला यौवनावस्थेत आहे. या काळातील लौरियानन्दन गढावर

एक मृतक समाधित नग्न नारीची स्वर्ण प्रतिमा मिळाली आहे. तसेच परखम, बसनगर येथील यक्ष-यक्षिणी आदर्श उदाहरणे आहेत. भारतीय मूर्तीचे स्वतंत्र मूर्ती विज्ञान आहे. सौंदर्य, समाधी कल्पना आणि भाव, बोधकला या दृष्टीने तिला पाहता येते.[६२] प्रतिकांच्या क्षेत्रात मानवाची श्रेष्ठ उपलब्धि म्हणजे मूर्ती कल्पना होय. मानवाने प्रथमतः आपल्या सर्वाधिक प्रिय व्यक्तीस मूर्ती रुपात सादर केले असेल त्यातूनच मूर्ती रुप प्रतिके लोकप्रिय होत गेली. ही प्रतिक सुद्‌धा कालक्रमानुसार शुभ आणि अशुभ रुपात विभक्त होऊ लागली. अशुभ वस्तूस मूर्तरुप प्रतिक देण्यात मानवाला अपमान वाटायला लागले. याच कारणामुळे अनुपयोगी किंवा दुरुपयोगी वस्तूचे प्रतिके मूर्तरुपात बनविले जात नाही, त्याचे मूर्तरुप इतके कलापूर्ण सुबक नसतात.[६३]

मूर्तरुप केवळ उपयोगी, आदरणीय वस्तूचीच बनविण्यात येऊ लागली, त्याची मान्यता सर्वत्र होऊ लागली. मूर्तीस सुंदर, सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात येऊ लागली. प्रेरणा किंवा शक्ति संचाराकरिता सामाईक किंवा दैनिक दर्शन करण्यात येऊ लागले, येथूनच मूर्ती पूजेस सुरुवात झाली. मूर्ती या परिवर्तन, प्रबोधन व अभिसर करतात, सजगता निर्माण व्हावी म्हणून मूर्ती असते.[६४]

भारतात जैन कला आणि पुरातत्त्वाची विपुल सामग्री आहे. ही सामग्री पर्वत आणि नगर यांच्या आसपास विखरुन पडलेली आहे. याचे मूल्यांकन केल्यास काल-क्रम आणि शिल्पाच्या विविधतेवर नक्कीच प्रकाश पडेल. ऐतिहासिक दृष्टीने गुप्तकाल, मध्यकाल आणि उत्तरकाल या कालात विभाजन करु शकतो. गुप्तकालाच्या पूर्वीचा काल प्राग्गुप्तकाल म्हणून ओळखला जातो. याप्रमाणेच जैन शिल्पातील विविधता तीर्थंकर मूर्ती, शासन देवतांच्या मूर्ती, देवायतन (जिनालय), गुहामंदिर, अभिलेख या पाच भागात विभागलेली दिसून येते.[६५]

काही जैन विद्‌वानांच्या मते जैन कलेचा आरंभ सिंधू सभ्यतेपासून झाला आहे. परंतु हे मत जैन संप्रदाय विशेषांतच ग्राह्य मानले आहे. वाङ्मयीन

उल्लेखांच्या आधारावर असे सांगणे शक्य आहे की, महावीरांच्या प्रतिमेचे पूजन त्यांच्या जीवनात सुरु झाले होते. महावीरांची ते असतानाच केलेली प्रतिमा 'जीवंतस्वामि प्रतिमा' म्हणून ओळखली जाते व पुढे अशा प्रकारच्या सर्व प्रतिमा याच नावाने ओळखल्या जाऊ लागल्या.

४.५.२ तीर्थंकर मूर्तीची वैशिष्ट्ये :-

जैन तीर्थंकरांची सर्व प्रथम प्रतिमा बिहारमध्ये लोहानीपुरात मिळाली. प्रारंभिक कुषाणकाळाच्या आयागपट्टावर क्वचित तीर्थंकरांचे स्वरुप दिसते. परंतु शुंगकालीन तीर्थंकरांची स्वतंत्र प्रतिमा दिसत नाही. कुषाणकालीन तीर्थंकर मूर्ती विशेषतः मथुरेत तीर्थंकर प्रतिमांची संख्या जास्त प्रमाणात आढळते. याप्रमाणे भारतात व महाराष्ट्रात आढळणा-या जैन तीर्थंकरांची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.[६६]

१) तीर्थंकर प्रतिमा फक्त दोन स्थितीत असतात, उभ्या किंवा मांडी घालून बसलेल्या. उभ्या स्थितीला खड्गासन किंवा कायोत्सर्ग मुद्रा म्हणतात. दोन्ही पायात चार अंगुले अंतर ठेवून, दोन्ही हात खाली सोडलेले, नासिकाग्र, अर्धोन्मीलित दृष्टी ठेवून उभे राहणे याला खड्गासन किंवा कायोत्सर्ग म्हटले जाते. ऋषभनाथाने उभ्यानेच कायोत्सर्ग केला होता. पद्मासनात बसून दोन्ही पायांना जांघेवर ठेवून त्यावर दोन्ही हात वरती खाली ठेवून म्हणजे डाव्या हातावर उजवा हात ठेवून अंगठे वरच्या बाजूला घेऊन, पोट-छाती आणि नाक ठेवून फार आखडून किंवा अथवा झुकून न बसता सुखासनात बसणे यालाच पद्मासन म्हणतात, याला योगमुद्रा सुद्धा म्हणतात.

२) तीर्थंकरांचे मस्तक मुण्डित असते किंवा अंगुष्ठ मात्र केसाच्या कुरळाने आच्छादित असते, याचे एकाधिक प्रकार आहेत.

३) कान खांद्यापर्यंत लोंबलेले नसतात, गुप्तकालापासून ते खाली लोंबू लागतात.

४) मुखावर विशेष भाव नसतो, असेलच तर हलके स्मित असते.

५) ध्यानमुद्रेत बसलेल्या तीर्थंकरांच्या तळहातावर चक्र आणि तळपायावर त्रिरत्न आणि चक्र दिसते. याशिवाय बोटांच्या पुढच्या पेरांवर श्रीवत्सादी मंगल चिन्हे दिसतात.

६) पुरुषोत्त्मत्त्वाचे लक्षण म्हणून तीर्थंकरांच्या वक्ष स्थलावर श्रीवत्सचिन्ह व भुवयांमध्ये ऊर्णा प्रामुख्याने दिसते.

७) जैन तीर्थंकर व साधू यांच्या प्रतिमा पूर्ण दिगम्बर असतात. फक्त अर्धफाल संप्रदायाचे साधू याला अपवाद आहेत.

८) बसलेल्या तीर्थंकरांचे आसन कधी कधी सिंहाच्या डोक्यावर दिसते, हे त्यांचे चक्रवर्ती पदांचे द्योतक होय.

९) कुषाणकालीन तीर्थंकर प्रतिमेचा एक दुसरा प्रकार म्हणजे 'सर्वतोभद्र' प्रतिमा होय. या प्रतिमेत चार दिशांकडे तोंड करुन उभे असलेले चार तीर्थंकर दाखवतात. बहुतेक यांच्यापैकी एक आदिनाथ आणि दुसरा पार्श्वनाथ असतो. बाकी दोन क्रमाने नेमीनाथ व महावीर असावेत असा तर्क करता येतो. मथुरेच्या प्रारंभिक कुषाणकलेतही मुख्यत्त्वे याच चार जिनांचे अंकन मिळते.

(अ) लांच्छने :-

चोवीस तीर्थंकरांच्या प्रतिमा जवळ जवळ एक सारख्याच असल्यामुळे त्यांची वेगवेगळी ओळख पटण्याचे मुख्य साधन म्हणजे लांच्छन होय. पण लांच्छनाचा प्रारंभ सुरुवातीच्या कलेत झालेला नाही. कुषाणकाळात आदिनाथाची ओळख त्यांच्या खांद्यावर दिसणा-या केसांच्या बटा, पार्श्वनाथाची डोक्यावरची सर्पफणा व नेमिनाथाची त्याच्या आजुबाजूला असलेले वासुदेव आणि बलभद्र ही होती. या चिन्हांव्यतिरिक्त प्रतिमेवर अंकित लेखांत तीर्थंकरांचे नांव असले तरच

ओळख पटणे शक्य असे. अभिलेखांच्या मदतीने मथुरेच्या कुषाण कलेत आतापर्यंत पुढील तीर्थंकरांची ओळख पटली आहे. संभवनाथ, ऋषभनाथ, अरिष्टनेमी, मुनिसुव्रत, वर्धमान, पार्श्वनाथ, शान्तिनाथ, सुमतिनाथ इत्यादी.

गुप्तकाळातही फारशी लांच्छने आलेली नाहीत, पण प्रारंभ मात्र झालेला दिसतो. राजगीर (बिहार) येथून मिळालेल्या नेमिनाथाच्या गुप्तकालीन अभिलिखित प्रतिमेच्या पायशिळेवर त्याचे लांच्छन 'शंख' यांचे दर्शन घडते. श्वेतांबर किंवा दिगंबर वाङ्मयात मात्र लांच्छनाचा उल्लेख सातव्या-आठव्या शतकापर्यंत दिसत नाही.[६७]

(ब) गुप्तकालीन तीर्थंकर प्रतिमा :-

कुषाण काळात तीर्थंकरांच्या मूर्ती मोठ्या प्रमाणावर दिसत असल्या तरी गुप्तकाळात मात्र त्यांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. या मूर्तीमध्ये उर्णाचिन्ह लुप्त झालेले असले तरी मुखावरील छटा ही प्रसन्न अशी दाखवते. कान खांद्यापर्यंत लोंबतात, प्रभामंडळाच्या अलंकरणात विविधता दिसून येते. परिवार देवता मालधारी गंधर्व, चामरधारी सेवक, पूजन सामग्री घेऊन उडणारे देव हे ही तेथे पाहावयास मिळते. गुप्तांच्या उत्तर कालखंडात आठ ग्रह दाखविलेले दिसून येतात. नंतर तो आकडा नऊपर्यंत जातो, तेथे तीर्थंकरांच्या विशिष्ट शासनदेवी आणि यक्ष मात्र दिसत नाहीत.[६८]

(क) कुषाणकालीन इतर जैन प्रतिके :-

- आयागपट्ट :-

तीर्थंकर प्रतिमांची लोकप्रियता वाढण्याच्या अगोदर जैनांचे आवडते पूजन प्रतिक दोन-सव्वा फूट लांबीचा वर्गाकार दगड असे. याच्यावर स्तुप, धर्मचक्र, स्वस्तिक, तीर्थंकर प्रतिमा, त्रिरत्न, अष्टमंगल चिन्हे वगैरे कोरलेली असत. अशा

दगडांवरील लेखांत त्याला आयागपट्ट ही संज्ञा दिली असून तो पूजेकरिता बसविला गेला अशी नोंद आढळते. मथुरेहून असे बरेच आयागपट्ट मिळाले आहेत.कुषाण काळानंतर यांची लोकप्रियता मावळलेली दिसते.[६९]

- स्तुप :-

कोणत्याही मान्य व वंदनीय अशा आचार्यांच्या उत्तरक्रियेनंतर त्याचे अवशिष्ट पाच्चभौतिक अवशेष एका घटांत-धातुकरण्डकांत स्थापन करुन त्यावर छत्राच्या आकाराची 'स्तुप' नावाची वास्तू उभारीत. स्तुप बांधण्याची पद्धत जैन व बौद्ध या दोघांसही मान्य होती. दोघांतही 'स्तुप' हे उपासनेचे प्रत्यक्ष प्रतिक मानले जात असे. बौद्ध धर्मात याला फार मान्यता मिळाली व त्याचे स्तुप भारतभर पसरले. वाङ्मय आणि पुरातत्त्व यांच्या आधारावर असे विधान करणे शक्य आहे की, पूर्वी कोटिकापूर, पावा, पाटणा, कलिंगदेश, पेशावर इत्यादी जागी जैन स्तुप होते. पण त्यापैकी मथुरेच्या स्तुपांइतका सुप्रसिद्ध कोणताच नव्हता. मथुरेला आज ज्या ठिकाणी कंकाली टीला म्हणून जागा आहे त्या ठिकाणी इ. स. च्या सुरुवातीच्या शतकांत एक महास्तुप होता. येथूनच जैन धर्माची प्रारंभिक काळातील हजारो शिल्पे आपल्या हाती लागली आहेत. चैत्यस्तुपाचे वर्णन जंबुदीपण्णत्तीमध्ये विस्ताराने आले आहे. सारनाथ, सांची इत्यादी ठिकाणी जैन स्तुप आहेत.[७०]

- चैत्यवृक्ष :-

बोधिवृक्षाप्रमाणे तीर्थंकरांच्या निमित्ताने काही वृक्षांना पावित्र्य मिळाले, पण येथे बौद्ध धर्मीयांप्रमाणे याचे फार महात्म्य वाढलेले दिसत नाही. त्याचप्रमाणे या वृक्षांत विविधता

दिसत नाही. दक्षिणेत तीर्थंकर प्रतिमेच्या डोक्यावर वृक्ष दाखविण्याची पद्धत होती. उत्तरेत ती काही शिल्पांतच दिसते. सुरुवातीच्या कलेत चैत्यवृक्षाचे अंकन कठड्याने घेरलेल्या एका झाडाच्या रुपात केले जात.[७१]

- चैत्यस्तंभ :-

मथुरेच्या एका शुंगकलाकृतीत जी कंकाली टीला येथूनच मिळाली आहे. चैत्यस्तंभाच्या पूजनांचे दृश्य अंकित आहे. वरच्या टोकावर सिंह असलेला हा खांब कठड्याने आवृत्त आहे व काही मंडळी त्याला प्रदिक्षणा करीत आहेत. अशाच प्रकारचे चैत्यस्तंभ स्तुपाच्या अंगणात उभारले जात. मथुरेहून मिळालेल्या एका आयागपट्टावर स्तुप व त्याच्या जवळचे चैत्यस्तंभ दिसतात. याच स्तंभातून मध्यकाळात 'मानस्तंभा' चा उदय झाला. मानस्तंभाच्या वरच्या टोकांवर सर्वतोभद्र प्रतिमेप्रमाणे चार तीर्थंकर दिसतात.[७२]

(ड) मध्यकाळातील जैन तीर्थंकर प्रतिमा :-

या काळात जरी तीर्थंकरांच्या प्रतिमेत काही फरक झाला नाही. तरी प्रतिमेच्या सजावटीत मात्र कित्येक फरक झालेले आहेत. जैन ग्रंथात सतत त्या अलंकरणादिकांचे उल्लेख आढळतात.[७३]

१) चेदयदुम (चैत्यद्रम) :- तीर्थंकरांच्या मस्तकावर असलेला वृक्ष.

२) पेठ छंदग (पीठ देवच्छन्द) :- प्रभावळीवर असलेल्या एथिका.

३) छत्त (छत्र) :- जिनांच्या मस्तकांवरील छत्र.

४) चामराओ (चामेर) :- तीर्थंकरांच्या आजुबाजूस उभे असलेले चामरधर यक्ष, उत्तर मध्यकाळाच्या विशेषतः दक्षिण भारतीय प्रतिमांत चामर घेतलेले यक्ष न दाखविता नुसत्याच चौ-या दाखवितात.

५) आरुण (आसन) :- जिनांचे मुख्य आसन किंवा सिंहासन.

६) अन्नकरणिज्जं (अन्यकरणीयम्) :- इतर अंलकरणे जसे दोन हरिणांच्या मध्ये ठेवलेले धर्मचक्र, शासनदेव, नवग्रह इत्यादी.

७) देवदुंदुभि :- जिनांच्या छत्रावर एक किंवा एकाधिक देव ढोलके वाजवताना दिसतात.

८) देव, विद्याधर :- छत्राच्या दोन्ही बाजूला हत्तीवर बसलेले इन्द्रादिदेव व आकाशात माळा घेऊन उडणारे विद्याधर मध्यकाळात बरेच दिसतात.

९) यक्ष, शासनदेवी :- तीर्थंकरांच्या आसनांजवळ, पायशिळेवर किंवा इतरत्र त्या तीर्थंकरांची यक्ष व शासनदेवी आढळते पण हे अनिवार्य मात्र नाही.

१०) पंचपरमेष्ठित् :- ब-याचशा तीर्थंकर प्रतिमांत मुख्य जिनाच्या आजुबाजूस चार जिनासारख्या प्रतिमा दिसतात. हे पाच मिळून पंचपरमेष्टि तयार होतो. पंचपरमेष्ठित् म्हणजे अर्हत्, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि साधू यांचा गट होय.

११) दोन हरिणांच्या मध्ये असलेले धर्मचक्र :- मुळचे हे बौद्ध प्रतिक बुद्धाने सारनाथ येथे केलेल्या धर्मचक्र प्रवर्तनाकडे संकेत करते. मध्यकाळात धर्मचक्राच्या साम्यामुळे जैनांनी ही ते स्विकारले.

१२) चतुर्विशतिका किंवा चौवीसी :- सर्व तीर्थंकरांना एकत्र अंकित करणारी प्रतिमा चतुर्विशतिका या नावाने ओळखतात. हिच्या रचनेत साधारणतः आदिनाथमध्ये आणि इतर तेवीस आजुबाजूला असतात. कारीतलाई (जि. जबलपूर, मध्यप्रदेश) येथून कलचूरी काळातील (दहावे-अकरावे शतक) बरीच जैन शिल्पे मिळाली आहेत, त्यात आदिनाथाच्या ऐवजी पार्श्वनाथाला मधोमध दाखविणा-या चतुर्विशतिका आहेत.

१३) लांच्छन :- बहुतेक पायशिळेवर यांचे अंकन करतात.

(इ) मध्यकाळातील जैनोपासनेची इतर प्रतिके :-

मध्यकाळात जैनोपासनेची इतर उल्लेखनीय प्रतिके आढळतात. त्यात अष्टमंगले, सोळा स्वप्ने, नवदेवता, समवशरण प्रतिमांचा समावेश होतो.[७४]

- अष्टमंगले :-

जैन कलेत कुषाण काळापासून अष्टमंगलांचे चित्रण मिळते. यात माशांची जोडी (मीनयुगल), स्वस्तिक, झाकण ठेवलेली भरलेली वाटी (शरावसंपुट), श्रीवस्त, पूर्णघट, फुलांची टोपली, विमान, तिवईसह पोथी.

तिलोयपणति या ग्रंथात ही यादी थोडी निराळी दिसून येते. यामध्ये भृंगार (झारी), कलश, दर्पण, चामर, ध्वज, छत्र, व्यंजन, सुप्रतिष्ठित (आसन) इत्यादींचा समावेश होतो.

- सोळा स्वप्ने :-

जैन मान्यतेप्रमाणे शलाका पुरुषांच्या माता ते गर्भात आले असताना मंगल स्वप्ने पाहतात. शलाका पुरुषाच्या स्तराप्रमाणे त्यांचा आकडा बदलतो. उदा. तीर्थंकर माता सोळा स्वप्ने पाहते तर बलदेवाच्या आईस चारच स्वप्ने दिसतात. तीर्थंकर मातेची सोळा स्वप्ने खालील होत.

ऐरावत हत्ती, बैल, सिंह, देवी, पद्माश्री (गजलक्ष्मी), फुलांच्या दोन माळा, चन्द्र, उगवता सुर्य, कमळांनी भरलेली दोन पूर्ण कुंभ, मीन, मिथून, पुष्करिणी, उसळणारा समुद्र, सिंहासन, विमान, नागेन्द्रभवन, रत्नराशि, निर्धूम अग्नी, जैन मंदिराच्या दारांवर ही सोळा स्वप्ने कोरलेली दिसतात.[७५]

- सिद्धचक्र किंवा नवदेवता :-

पंचपरमेष्टी आणि सम्यक् ज्ञान, सम्यक् दर्शन, सम्यक् चरित्र आणि सम्यक् तप ही चार पदे असे मिळवून हे नवदेवता चक्र तयार करतात. ही चक्रे जैन संघात पूजनार्थ ठेवलेली असतात.

- समवसरण प्रतिमा :-

प्रत्येक तीर्थंकरांची देशना किंवा उपदेश ऐकण्याकरिता एका विशाल स्थलांवर देव, मनुष्य, पशु वगैरे एकत्र होत असतात व चारी

दिशांकडे निर्धारित स्थानांवर बसविलेल्या असतात. उपदेश देणारा जिन सर्वांना समान रुपानेच दिसत असतो. या विशाल स्थळाची रचना म्हणजेच समवसरणाची प्रतिके तयार करुन पूजेत ठेवीत असत. सर्वतोभद्र प्रतिमा आणि दिगंबर संप्रदायात दिसणारे मानस्तंभ हे समवसरणांपासून उचललेले सुलभ असे अभिप्राय आहेत.[७६]

४.५.३ जैन देव आणि देवता :-

तीर्थंकर प्रतिमानंतर त्यांचे यक्ष, शासनदेवी आणि प्रतिमांची ओळख पुढील प्रमाणे करवून घेता येते. कोणताही तीर्थंकर स्वतः कोणत्याही प्रतिमेचे पूजन करीत नाही. मानवी स्वभावाप्रमाणे त्याचे अनुयायीच त्याचे पूजन करु लागतात. जैन देवता संघाचा उगम मूळ तीर्थंकर प्रतिमांपासून झालेला आहे. चोवीस तीर्थंकर आणि प्रत्येकाचा एक यक्ष आणि एक शासनदेवी अशी वाढ होत जाते. श्वेतांबर आणि दिगंबराच्या मतभिन्नतेमुळे त्याचा विस्तार आणखी मोठा होतो. याशिवाय जैन उपास्यांचे एक दुसरेही वर्गीकरण महत्त्वाचे वाटते.[७७]

| | |
|---|---|
| २४ तीर्थंकर | - ऋषभ, अजित, संभव, अभिनंदन, सुमति, पद्मप्रभ, सुपार्श्व, चन्द्रप्रभ, सुविधि, शीतल, श्रेयांस, वासुपूज्य, विमल, अनंत, धर्म, शांति, कुथू, अर, मल्लि, सुव्रत, नमि, नेमि, पार्श्व, महावीर. |
| ९ बलभद्र | - अचल, विजय, भद्र, सुप्रभ, सुदर्शन, आनंद, नन्दन, पद्म, राम. |
| १२ चक्रवर्ती | - भरत, सागर, मधवा, सनत्कुमार, शांति, कुंथ, अरह, सुभौम, प्रद्य, हरिषेण, जयसेन, ब्रम्हदत्त. |
| ९ वासुदेव | - त्रिपृष्ठ, द्विपृष्ठ, स्वयंभू, पुरुषोत्तम, पुरुषसिंह, पुरुषपुण्डरिक, दन्त, नारायण, कृष्ठा. |
| ९ प्रतिवासुदेव | - अश्वग्रीव, तारक, मेरक, मधु, निशुंभ, बाले, प्रल्हाद, रावण, जरासन्ध. |

यात्रमाणे हे एकूण शलाका पुरुष त्रेसष्ट आहेत, यासोबतच नऊ भीमादी नारद, अकरा भीमबली इत्यादी रुद्र, चोवीस बाहुबली वगैर कामदेव, चोवीस प्रत्येक तीर्थंकरांचा पिता, चोवीस प्रत्येक तीर्थंकरांची माता, चौदा प्रतिस्वाति वगैरे कुलकार अशी एकशे सहा देवता पूजनीय मानल्या गेल्या आहेत.[७८]

जैन देवता संघाची वर्गीकरण याप्रमाणे आढळते.




या तिन्ही याद्यांव्यतिरिक्त काही जैन देव व देवींच्या प्रतिमा पाहावयास मिळतात. त्यात मुख्यत्त्वेकरुन सोळा श्रुतदेवी किंवा विद्यादेवी, आठ मातृका, क्षेत्रपाल, भैरव, हरिनेगमेशी, श्रीदेवी किंवा लक्ष्मी या मुख्य होत.[७९]

- नेगमेश किंवा हरिनेगमेशिन :-

बक-याचे तोंड असलेला हा देव देवांच्या पायदळ सेनेचा मुख्य होय. ब्राम्हण जातीची स्त्री देवनंदा हिच्या गर्भातून महावीर वर्धमानाचा भ्रुण संक्रमित करुन क्षत्रिय त्रिशलेच्या गर्भात पोचविण्याचे कार्य नेगमेशाने केले होते, असे जैन परंपरा मानते.

कुषाणकाळी मथुरेच्या क्षेत्रात याची पूजा बरीच प्रचलित असावी. यांच्या लहान व मोठ्या आकाराच्या प्रतिमा मथुरा व लखनऊच्या संग्रहालयात आहेत, याला बक-याचे तोंड असून दोन हात आहेत पण हातात आयुध किंवा वाहन वगैरे विशेष काहीच नसते. कुषाणकाळानंतर मात्र हा देव दिसत नाही, याचे वैशिष्ट्य म्हणजे यांच्या प्रतिमेत अंगा-खांद्यावर लहान मुले दाखविण्यात आली आहेत.[८०]

- रेवती :-

जैन परंपरेप्रमाणे रेवती ही नेगमेशाची शक्ती होय, हिचे तोंड बकरीचे आहे. मथुरा संग्रहालयात असलेल्या प्रतिमेत ही मुल घेतलेली पाहावयास मिळते.

- यक्ष :-

जैनांकडे तीर्थंकरांच्या परिवार देवता म्हणून यक्ष-यक्षिणींना स्थान आहे. यक्षांमध्ये चोवीस यक्ष आहेत, त्यात गोमुख, महायक्ष, त्रिमुख यक्षेश्वर, तुम्बरु, कुसुम, मातंग, विजय, अजित, ब्रम्हा, ईश्वर, कुमार, षण्मुख, पाताळ, किन्नर, गरुड, गंधर्व, रवेन्द्र, कुबेर, वरुण, भुकूटी, गोमेध, पार्श्व, मातंग यांचा समावेश होतो. याचे हात, वर्ण, वाहन, आयुधे यात विविध वैशिष्ट्ये आहेत.

- नारायण आणि बलदेव :-

  तीर्थंकर नेमि आणि अरिष्टनेमी यांच्याबरोबर नारायण आणि बलदेव हे कुषाण काळापासूनच दिसतात. गुप्त काळात व मध्य काळातही ही जोडी अशीच दिसते.

- सरस्वती आणि गजलक्ष्मी :-

  मथुरा येथील कंकाली टील्यातून मिळालेली जैन सरस्वतीची अभिलिखित आणि गजलक्ष्मी प्रतिमा अद्वितीय आहे, कुषाणकालीन ही मूर्ती आहे.[८१]

- चक्रेश्वरी :-

  प्रथम तीर्थंकर ऋषभ यांची ही शासन यक्षी, हिच्या हातात चक्र असल्यामुळे हिला हे नाव प्राप्त झाले. हिचे वाहन गरुड होय, चक्रेश्वरी आणि चक्रेश्वरी विद्या या दोघींची ध्याने बरीच सारखी आहे. फरक इतकाच असतो की, विद्यादेवीच्या चारी हातात चक्रे असतात. चक्रेश्वरीच्या हातात अन्य आयुधे ही दिसतात. ब-याच ठिकाणी चक्रेश्वरी चतुर्भूजच दिसते. पण त्याबरोबरच दोन, सहा, आठ, दहा, बारा, सोळा, वीस भुजापर्यंत चक्रेश्वरी प्रतिमाही पाहण्यात येतात.[८२]

- अंबिका :-

  श्वेतांबराच्या मते, ही तीर्थंकर नेमिनाथांची शासन यक्षी आहे. उत्तर भारतात हिच्या ब-याच प्रतिमा मिळतात. लक्षण ग्रंथाप्रमाणे सिंह हिचे वाहन असून आंबा, पाश, मूल आणि अंकुश हिची मुख्य आयुधे होत. प्रत्यक्ष प्रतिमात मात्र हिची द्विभूज आणि चतुर्भूज रुपे दाखविण्यात आली आहेत. ही आंब्याच्या वृक्षाखाली बसलेली असून हिच्या हातात आम्रलुंबी किंवा आंब्याचा झुपका असतो.[८३]

- पद्मावती :-

ही पार्श्वनाथाची शासनदेवी असून हिची एक ओळख म्हणजे डोक्यावरील नागफणा छत्र होय. साधारणपणे ही चतुर्भूज असते. पण दिगंबर परंपरेत हिची सहा आणि चोवीस हाताची ध्याने विद्यमान आहेत.[८४]

- सिद्धायिका :-

शेवटच्या तीर्थंकरांची म्हणजे वर्धमान महावीरांची ही शासनदेवी चतुर्भूज असून सिंहावर बसलेली आहे पण मूल मात्र हिच्याजवळ दिसून येत नाही.[८५]

- क्षेत्रपाल :-

अकराव्या शतकामध्ये क्षेत्रपाल याचा जैन देवसमुहात समावेश झाला. क्षेत्रपाल हा उभय संप्रदायांना मान्य आहे, काळा वर्ण, वाकडे दात, भयंकर मुखाकृती, बर्बर केश, पायात खडावा आणि हातात मुद्गर, डमरु, अंकुश आणि कुत्रा असणे ही त्याची लक्षणे होत. आचार दिनकर वीस हाताच्या क्षेत्रपालाचा उल्लेख करतो इतरत्रही त्यांचे उल्लेख आढळतात. कुत्रा आणि मुद्गर या त्याच्या फार जवळच्या वस्तू होत.[८६]

- श्रुत देवता :-

सरस्वतीच्या प्रतिमेचा वर उल्लेख झालाच आहे. श्रुतदेवींचाही विद्येशी संबंध असतो. माण्डू येथे याची प्रतिमा उपलब्ध झाली आहे. ज्यावर एका श्रुतदेवीचे चित्र जरी आता खंडितावस्थेत असले तरी तिच्या वर उचललेल्या डाव्या हातातील पुस्तक ती विद्या देवता असल्याचे पुरेसे प्रमाण आहे. पण याही पेक्षा विशेष म्हणजे तिच्या भोवताली जी

कमलदले काढलेली आहेत, त्यात सुत्रकृताडग्, समवायडग् वगैरे ग्रंथाचा पदसंख्येपूर्वक नामोल्लेख केलेला आहे.[८७]

- सवस्त्र तीर्थंकर प्रतिमा :-

साधारणपणे सर्वत्र तीर्थंकर प्रतिमा दिगंबर म्हणजे पूर्ण नग्न असतात पण त्याला काही संप्रदायात अपवाद आहेत. सुमारे दहाव्या शतकातीलच मध्य भारतातून मिळालेली एक चतुर्विशतिका प्रतिमेत आदिनाथ तलम पण व्यवस्थित वस्त्र परिधान केलेले आहे. मध्य भारतातूनच मिळालेली सुमारे बाराव्या शतकाची आदिनाथाचीच सवस्त्र प्रतिमा सुरिखच्या संग्रहालयात आहे.[८८]

- आदि मिथुन किंवा जुगलिया :-

सृष्टीला चालू करणा-या आदि मिथुनाचा मान प्रत्येक धर्मात आहे. उत्तरेत अशा कित्येक प्रतिमा मिळाल्या आहेत, ज्यात एका वृक्षाखाली एक जोडपे सुखासनात बसले आहे, खाली मुले खेळत आहेत, झाडावर काही ठिकाणी घोरपडी सारखा एखादा प्राणी चढत आहे आणि झाडाच्या वर लहानसे जिनबिम्ब ही विद्यमान आहे, हे जोडपे 'जुगलिया' अर्थात आदि युगल या नावाने ओळखले जाते.[८९]

### ४.५.४ मानस्तंभ :-

भारतात जैन मंदिरासमोर विशाल स्तंभ स्थापन करण्याची परंपरा आहे. दक्षिण भारतात यांची संख्या जास्त आढळते. प्राचीन ग्रंथाच्या आधारे यात किर्तीस्तंभ (उदा. चित्तोड), मानस्तंभ (उदा. देवगढ) असे दोन प्रकार आढळतात.

या स्तंभावर बौद्ध परंपरा, अशोक स्तंभाचाही प्रभाव दिसून येतो. याचा सर्वात वरील भाग शिखराप्रमाणे असतो तर वरील कप्प्यात चतुर्मुख जिन

प्रतिमा असते. यात बरेच कप्पे ही असतात, त्यावर जिन मूर्ती, यक्ष-यक्षिणी, लेख अंकित केलेले आढळून येतात.

चैत्यस्तंभातूनच मध्यकाळात 'मानस्तंभा' चा उदय झाला. मानस्तंभाच्या वरच्या टोकांवर सर्वतोभद्र प्रतिमेप्रमाणे चार तीर्थंकर दिसतात. याची निर्मिती प्रथम मथुरेत शक, कुषाण काळात झाली. यावर अशोक स्तंभाचा प्रभाव दिसतो. सर्वाधिक प्राचीन मानस्तंभ मथुरा, देवगढ येथे उपलब्ध होताात. एकावर एक तीन पीठीका (अधिष्ठान) त्यावर स्तंभदंड उभारलेले असते. त्याच्या चोहो बाजूस देवकुलिका अंकित असते, सर्वात वर लघुशिखर असते. हा स्तंभ चौकोन, अष्टकोन असतो हा मानस्तंभ एक किंवा वेगवेगळया दगडांपासून बनविलेला असतो.[१०]

## ४.६ महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांवरील स्थापत्य, मूर्तीकला आणि शिल्पकलेची वैशिष्ट्ये :-

४.६.१ जिनालय :-

महाराष्ट्रात जिनालय फारच कमी आहेत, जी काही जिनालये आज अस्तित्त्वात आहेत त्यांचा जीर्णोद्धार झाला आहे.[११] अंजनेरी येथील जैन मंदिर प्राचीन असून आज सुद्धा जीर्ण दशेत उभे आहे. येथील पार्श्वनाथ जैन मंदिर एक हजार वर्षे प्राचीन असून येथील नेमिनाथ मंदिर आणि महालक्ष्मी मंदिर एकाच कालातील आहेत. भगवज्जिन सेनाचार्यांनी षट्खंडागम या ग्रंथाची लेखन समाप्ती येथेच मंदिरात बसून केली आहे. षट्खंडाची समाप्ती संवत् ७५९ (इ. स. ८३७) मध्ये केली आहे. त्यामुळे हे मंदिर नवव्या शतकातील आहे हे सिद्ध होते. तेरचे मंदिर हेमाडपंती आहे, हे मंदिर दहाव्या शतकातील आहे. शिरपूर मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. काटी सावरगाव येथील हेमाडपंती मंदिर आज ही चांगल्या अवस्थेत जतन केले आहे. या जिनालयांमध्ये तळघरातील व भुयारातील मंदिरे सुद्धा आहेत. दहीगाव, पैठण, औरंगाबाद, जिंतुर, शिरपूर,

कारंजा, मुक्तागिरी येथे तळघरात व भुयारात तीर्थंकर प्रतिमा आहेत.[९२] नंदीश्वर जिनालय सुद्धा जिनायतनचे एक रुपच आहे. बाहुबली, पंचालेश्वर येथे नंदीश्वर द्वीपाची बावन्न जिनालयांचे लघुरुपात स्थापना केली आहे. ही जिनालये पितळेची अथवा पाषाणाची बनविण्याची प्रथा आहे.

सहस्त्रकुट जिनालयात भगवंताच्या एक हजार आठ मूर्ती असतात, या पाषाणाच्या किंवा धातूच्या असतात. दहिगावमध्ये संवत् १६६५ मधील सहस्त्रकुट मंदिर आहे. कोल्हापुरात पितळेचे शिखराकार सहस्त्रकुट जिनालय आहे. पैठण, औरंगाबाद येथे पितळेचे सहस्त्रकुट जिनालय आहे. जिंतुर येथे पितळेचे दोन सहस्त्रकुट जिनालय संवत् १५४१ मधील आहेत. यातील एक मंदिर लोकाकार असून दुसरे शिखराकार आहे. ही दोन्ही मंदिरे पाच फूट उंचीची आहेत, कारंजा येथे बलात्कारगण मंदिरात दोन सहस्त्रकुट चैत्यालय आहेत.

४.६.२ मानस्तंभ :-

मानस्तंभ जिनालयाचा एक भागच मानला जातो. चारठाणा, गजपंथ, दहीगाव, बाहुबली, कारंजा, कुंडल, सावरगाव, पैठण, कुंथलगिरी, मुक्तागिरी येथे विशाल मानस्तंभ आहेत.[९३]

४.६.३ गुहा मंदिर :-

धाराशिव, वेरुळ, मांगी-तुंगी, गजपंथ, अंजनेरी, जिंतुर, दहीगाव, औरंगाबाद येथे गुहा मंदिरे आहेत. ही सर्व मंदिरे सातव्या-आठव्या शतकातील किंवा त्यापूर्वीच्या काळातील आहेत. धाराशिव, वेरुळ गुहा मंदिर सातव्या-आठव्या शतकातील, मांगी-तुंगी गुहा मंदिर इ.स. च्या सुरुवातीच्या काळातील आहे. अंजनेरी, गजपंथ येथील गुहा मंदिर आठव्या-नवव्या शतकातील आहेत. जिंतुरच्या चंद्रगुहेचा उल्लेख प्राकृत भक्तीपाठात असून हा भक्तीपाठ कुंदकुंदाचार्यांनी बनविला आहे. औरंगाबादची निपट निरंजन गुहासुद्धा सातव्या-आठव्या शतकातील आहे. हे गुहा मंदिर बौद्ध आणि जैन यांचे संयुक्त

मंदिर आहे. येथे दोन्ही धर्माच्या मूर्ती असून कुंडलची गुहा दहाव्या शतकातील असून येथील कलिकुंड पार्श्वनाथ मंदिरात मूर्तीवर संवत् ९६४ चा लेख आहे. त्यामुळे या लेणी इ.स. च्या काळात निर्माण झाल्या असाव्यात. अशा प्रकारे ही गुहा मंदिरे इ.स. पूर्व काळापासून ते बाराव्या शतकापर्यंत निर्माण झालेली आहेत.[९४]

यातील काही लेणी नैसर्गिक आहेत, परंतु काही काळानंतर त्याचे जीर्णोद्धार केला गेला आहे. अशा लेणी मांगी-तुंगी, गजपंथ लेणी होत, या सर्व लेणींमध्ये आकाराने आणि विशालतेने तसेच कलाकुसरीने धाराशिव, वेरुळ लेणी सर्वात सुंदर आहेत. कलेच्या दृष्टीने वेरुळच्या इंद्रसभा लेणी, जगन्नाथ लेणी, छोटा कैलाश लेणी अद्वितीय आहेत. येथील सर्व स्तंभ अलंकृत आहेत, काही स्तंभावर तीर्थंकर आणि साधूंच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. काही स्तंभावर लोकजीवन चितारले आहे. नृत्यांगना चपलतेने नृत्य करीत आहेत तर कोणी वाद्य संगीतात तल्लीन झालेत, काही ठिकाणी एकटीच नर्तकी नृत्य करण्यात गुंग झाली आहे. ही सर्व दृश्ये पाहून त्यातून स्त्रियांचे अल्लड तारुण्य दिसते. खरोखरच शिल्पकाराने या युवतींचे सौंदर्य आणि यौवन रेखताना आपली कला, आपले नैपुण्य आणि आपली कल्पना यांचा खूपच सुंदरपणे वापर केला आहे, यामुळेच या लेणी प्रेक्षणीय झाल्या आहेत.

वेरुळ व मांगी-तुंगीच्या लेणीत कलेच्या दृष्टीने फारसे साम्य नाही, परंतु तीर्थंकर आणि शासनदेवतांच्या बरोबरच साधूंच्या मूर्ती रेखांकित केल्या आहेत. मांगी-तुंगी लेणीमध्ये शेकड्याने साधूंच्या मूर्ती कोरल्या आहेत तर वेरुळ येथे शासनदेवतांच्या मूर्ती अधिक संख्येने आहेत, बाकीच्या ठिकाणच्या लेणीत फक्त तीर्थंकरांच्याच मूर्ती कोरलेल्या आहेत. धाराशिव येथील लेणी पूजा आणि साधूंच्या ध्यानासाठी खास बनविल्या आहेत तर वेरुळ येथील लेणी कलाविष्कारासाठी प्रसिद्ध आहेत.[९५]

४.६.४ अभिलेख :-

अभिलेखांचे अनेक प्रकार आहेत यात ताम्रपत्र, मूर्तीलेख, शिलालेख याचा समावेश होतो. फक्त कुंडल येथेच ताम्रलेख मिळाले आहेत. हे ताम्रपट दसलाड नावाच्या व्यक्तीच्या घरात मिळाले असून त्यांची संख्या तीन होती. पहिले ताम्रपट राष्ट्रकुट नरेश गोविंद तृतीय याने दिलेल्या दानासंबंधी होता. दुसरा ताम्रपट पुलकेशीचा पणतु विजयादित्याने दिलेल्या दानासंबंधी असून तिसरा ताम्रपट शक संवत् १२१० मध्ये कदंबवंशी मयुरवर्माने जैनाचार्य श्रीपालजीचे शिष्य गुणपालजी यांना मंदिरासाठी एक गाव दान दिल्यासंबंधीचा उल्लेख असलेला आहे. हे ताम्रपट ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. मूर्तीलेख तर सर्व क्षेत्रांवर मिळतात, फार प्राचीन मूर्तीवर मात्र हे लेख नाहीत, अशा मूर्ती चतुर्थकालीन समजल्या जातात. खरे तर मूर्तीचा पाषाण आणि त्याच्या रचना शैलीच्या आधारावर मूर्तीचा काल ठरविला जातो आणि तोच योग्य मानला जातो. मुक्तागिरी येथील मंदिर समूहातील सात नंबरच्या मंदिरात संवत् ९०४ मधील आणि कुंडल येथे संवत् ९६४ चा मूर्तीलेख हा प्राचीन आहे. या प्रांतांमध्ये शिलालेखांची संख्या कमी आहे, कोल्हापूर येथील शिलालेख ही महत्त्वाचे आहे. येथील पार्श्वनाथ मंदिरात दोन शिलालेख सापडतात. एक तीन फूट सहा इंच उंच व दोन फूट पाच इंच रूंद असून जाड पाषाणावर कोरला आहे यात एकतीस ओळी रेखाटलेल्या आहेत. दुसरा शिलालेख तीन फूट एक इंच लांब व रूंद पाषाणावर कोरला असून यावर शक संवत् १०६५ आणि १०७३ मध्ये शिलाहार नरेशांनी मंदिरांना दिलेल्या दानाचा उल्लेख आहे. अंजनेरी येथे जैन मंदिरात बाराव्या शतकातील शिलालेख आहे.[९६] हा शिलालेख दुस-या सेऊणचंद्राच्या काळातील इ.स.च्या अकराव्या शतकातील आहे. या शिलालेखामध्ये जैन मंदिराला दान दिल्याचा उल्लेख आहे. जिंतुर, कोल्हापूर, टाकळी, वाई, भाळवण येथे ही जैन शिलालेख आहेत.

४.६.५ तीर्थंकर मूर्ती :-

महाराष्ट्रामध्ये जैन तीर्थंकरांच्या मूर्ती पद्‌मासन, अर्धपद्‌मासन, खड्‌गासन या तीन आसनात मिळतात.[९७] खड्‌गासनाच्या संख्येच्या तुलनेत पद्‌मासन, अर्धपद्‌मासनातील मूर्ती अधिक संख्येने आहेत. अर्धपद्‌मासनातील मूर्ती धाराशिव, वेरुळ, जिंतुर, शिरपूर येथे आहेत. सर्वात उंच खड्‌गासनातील मूर्ती पोदनपूर (मुंबई) येथे आहे, येथे आदिनाथाच्या मूर्तीची उंची एकतीस फूट असून भरताची एकोणतीस फूट आणि बाहुबलीची एकोणतीस फूट उंचीची मूर्ती आहे.

कुंभोज (बाहुबली) येथील बाहुबलीची मूर्ती अठ्‌ठावीस फूट उंचीची आहे. कोल्हापूरमध्ये अठ्‌ठावीस फूट उंचीची आदिनाथाची मूर्ती आहे. कुंथलगिरीमध्ये अठरा फूट उंचीची मूर्ती आहे. वेरुळ येथे पार्श्‍वनाथ आणि बाहुबलीची बारा फूट उंचीची मूर्ती आहे. वेरुळ येथे पद्‌मासनातील पार्श्‍वनाथाची मूर्ती सोळा फूट उंचीची आहे. या मूर्त्यांमध्ये त्रिमूर्तीका किंवा रत्नत्रय मूर्ती, सर्वतोभद्रिका, चैत्य, चौबीसी पट्‌ट हे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.[९८]

या मूर्त्यांमध्ये आदिनाथ, चंद्रप्रभु, नेमिनाथ, पार्श्‍वनाथ, महावीर यांच्या मूर्ती सर्वाधिक आहेत. आदिनाथांची जटायुक्त मूर्ती सर्वत्र मिळते, परंतु इतर तीर्थंकरांची सुद्‌धा जटायुक्त मूर्ती मिळतात. पार्श्‍वनाथाची सात, नऊ, अकरा, तेरा नागफणा छत्र असलेली मूर्ती मिळते. पार्श्‍वनाथ मूर्तीची येथे विविध नावे ही मिळतात. विघ्नहर पार्श्वनाथ, कलिकुंड पार्श्‍वनाथ, झरी पार्श्‍वनाथ, गिरी पार्श्वनाथ, अंतरिक्ष पार्श्वनाथ इत्यादी. भातुकलीमधील आदिनाथाच्या मूर्तीचे वैशिष्ट्य म्हणजे मूर्तीच्या हात आणि पायांची बोटे परस्पर चिटकलेली नसून ती स्वतंत्र स्पष्ट दिसतात.

जिंतुर येथे पार्श्वनाथाची मूर्ती ही बाहुबली प्रमाणे खड्‌गासनातील असून अंगावर वेली चढलेल्या आहेत तर डोक्यावर सर्प फणा आहे. शिरपूर येथील पार्श्‍वनाथाची मूर्ती ही तीन फूट आठ इंच उंचीची असून आणि दोन फूट आठ

इंच जाड असलेली आहे. डोक्यावर सप्तफणा छत्र आहे, परंतु ती केवळ थोड्या आधारावर तोल सांभाळून आहे. याच प्रकारची पार्श्वनाथाची मूर्ती जितुरमध्ये असून ती पाच फूट दहा इंच उंचीची चार फूट पाच इंच जाडीची मूर्ती एका कोप-यावर थोड्याशा आधारावर अधर आहे तर पैठण, कारंजा, तेर येथील प्रतिमा वाळूच्या आहेत.[९९] धाराशिव लेण्यामधील पार्श्वनाथ मूर्तींची प्रतिष्ठा जैन साहित्याच्या आधारानुसार करकंडू राजाने केली असे सांगितले जाते. पुरातत्त्व अंदाजानुसार या मूर्ती सातव्या-आठव्या शतकातील मानल्या जातात.

वेरुळ आणि औरंगाबाद लेण्यांचा काळ सुद्धा हाच मानला जातो. तेर आणि धाराशिव येथील मूर्ती समकालीन मानल्या जातात. गजपंथ आणि चांदवड येथील मूर्तीमध्ये साम्य दिसून येते तर मांगी-तुंगी पर्वतावरील गुहा मूर्ती या प्राचीन असून या इ.स. च्या पहिल्या शतकातील मानल्या जातात. मांगी-तुंगी येथील मूर्ती ज्या काळी निर्माण झाल्या, त्या काळी मूर्ती कलेचा विकास झालेला नव्हता. त्यामुळे मांगी-तुंगी येथील मूर्तीपेक्षा गजपंथ, अंजनेरी, वेरुळ या ठिकाणच्या मूर्ती अधिक सुबक व आकर्षक आहेत.[१००]

- इ.स. नऊ ते बाराव्या शतकातील मूर्ती :-

इ.स. नऊ ते बाराव्या शतकातील काही मूर्ती या कुंडल, अंजनेरी, कोल्हापूर, शिरपूर, मुक्तागिरी येथे सापडल्या आहेत, यामध्ये कुंडल येथील पार्श्वनाथाच्या मूर्तीवर संवत् ९६४ असे कोरलेले आहे. अंजनेरी येथे बाराव्या शतकातील शिलालेख मिळाला आहे, याच काळातील मूर्तीही आहेत. कोल्हापूर येथे बाराव्या शतकातील मानस्तंभ मूर्ती आहेत. शिरपूर पवली आणि अंतरिक्ष पार्श्वनाथ मंदिरात दहाव्या शतकातील अनेक मूर्ती आहेत.[१०१] मुक्तागिरी मंदिर समूहातील मंदिर क्रमांक ७, १०, १५, १८, २६, ४५, ४६, ४८ येथील अनेक मूर्ती नवव्या ते अकराव्या शतकातील आहेत तर मंदिर क्रमांक ७ मध्ये

नेमिनाथाच्या मूर्तीवर संवत् ९०४ असा उल्लेख आहे. मंदिर क्रमांक १० हे ऐल राजा श्रीपाल याने बनविले आहे. यावरुन ही मूर्ती दहाव्या शतकातील आहे. बाकी इतर मूर्ती या काळाच्या आसपासच्या जवळच्या आहेत. या क्षेत्रावर विखुरलेल्या मूर्ती दहाव्या व बाराव्या शतकातील आहेत.[१०२]

- उत्तरकालीन जैन मूर्ती :-

बाराव्या शतकानंतरही अनेक ठिकाणी जैन मूर्ती निर्माण झाल्याचा उल्लेख सापडतो, त्यामध्ये वेरुळ (संवत् ११५६), औरंगाबाद (संवत् १२७२ - १३४५), जिंतुर (इ. स. १२३३), कारंजा (संवत् १२७२), बाठौणा रामनाथ (संवत् १४५७), भातुकली (इ. स. १२३१), शिरपूर (संवत् १४५७) इत्यादींचा समावेश होतो.[१०३]

४.६.६ शासन-देवतांच्या मूर्ती :-

यक्षांमध्ये गोमेद, धरणेंद्र आणि मातंग यक्षाच्या मूर्ती सर्वात अधिक दिसून येतात. काही ठिकाणी गोमुख यक्षाची मूर्ती सुद्धा पाहण्यास मिळते. अंबिका, पद्मावती, ज्वालामालिनी, चक्रेश्वरी, सिद्धायिका यक्षिणी यांच्या मूर्ती अधिक संख्येने आहेत. यात अंबिका आणि पद्मावती यांच्या मूर्ती जास्तीत जास्त असून यक्षांच्या मूर्ती या दोन भुजा असलेल्या आहेत. परंतु यक्षिणींच्या मूर्ती षोडशभूजा, द्वादशभूजा, चतुर्भूजा आहेत. बाहुबली क्षेत्रावर सोळा भूजा असलेली ज्वालामालिनी आणि चतुर्भूजा पद्मावती असून वेरुळ येथे द्वादशभूजी मूर्ती आहे. कुंडल, जिंतुर येथे चतुर्भूजी देवीच्या मूर्ती आहेत. या मूर्ती पाषाण आणि धातूच्या आहेत. वेरुळ येथील यक्ष-यक्षिणींच्या मूर्ती विशेष असून विशाल आहेत.[१०४]

अंबिकाच्या डोक्यावर किंवा हातात आम्रस्तबक असून कडेवर बालक आहे. सर्वसाधारणपणे यक्ष-यक्षिणी मूर्तीच्या डोक्यावर तीर्थंकरांची मूर्ती असते. परंतु वेरुळ येथील मूर्ती स्वतंत्र व भव्य आहेत. त्यांच्यासोबत तीर्थंकर मूर्ती

नाहीत, या सर्वच ठिकाणच्या मूर्ती अतिशय कलापूर्ण, शिल्पकलेचा उत्तम नमुना असून कमनीय, सुंदर आहेत.

या यक्ष-यक्षिणींच्या मूर्ती बरोबरच काही ठिकाणी सरस्वतीची मूर्ती उपलब्ध आहेत. धाराशिव येथे लेणीत सरस्वती देवीची शामवर्णाची प्रतिमा आहे. ही मूर्ती अर्धपद्मसनात असून खांद्याच्या साह्याने वीणा ठेवली आहे. डाव्या हाताने ही वीणा वाजवत असून उजवा हात वर मुद्रेत आहे. राजनापूर येथे मिळालेली सरस्वतीची मूर्ती नागपूर संग्रहालयात आहे. ही देवी ललितासनात असून हंस वाहनावर आहे. हंसाच्या चोचीत सात मण्यांची माला आहे, ही माला सात तत्त्वांचे प्रतिकच आहे. हंसवाहिनी सरस्वतीची एक सुंदर मनोहारी पाषाणमूर्ती बोरगाव येथे आहे. वेरुळ येथील लेणी क्रमांक तीस आणि गुहा मंदिराच्या बाहेरील भिंतीवर एका बाजूला द्वादशभूजी इंद्र नृत्यमुद्रेत आहे. इंद्राने अनेक अलंकार धारण केले आहेत, त्याच्या भूजेवर देवी नृत्य करीत आहेत, काही देव वाद्य वाजवत आहेत. भिंतीच्या दुस-या भागात इंद्र चतुर्भूजी असून नृत्यमुद्रेत आहे. येथे दाराच्या पार्श्वभागात दोन्ही बाजूला विशाल आकाराचे द्वारपाल असून विशाल गदा घेऊन उभे आहेत. कलात्मक दृष्टीने जर पाहिले तर या भागातील सर्वात प्राचीन शासन देवतांच्या मूर्ती धाराशिव आणि वेरुळ लेणीतील असून यांचा निर्माणकाल सातव्या-आठव्या शतकातील आहे.[१०५]

या प्रकरणात जैन स्थापत्य आणि शिल्पकलेची माहिती मिळते. यासाठी भारतातील मंदिर स्थापत्याची सुरुवात आणि जैन मंदिरे तसेच महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्याची सुरुवात आणि जैन मंदिरे या घटकाद्वारे मंदिर स्थापत्य आणि भारतातील व महाराष्ट्रातील जैन मंदिराची ओळख होते. ही मंदिरे वीट मंदिरे, वेसर मंदिरे, भूमिज मंदिरे, फासना शिखर मंदिरे या वेगवेगळ्या शैलीची असलेली दिसतात, तसेच ही मंदिरे स्कंध, जंघा, शुकनासिका, वरंण्डिका,

वेदीबंध, शिखर, गर्भग्रह, सभामंडप, प्रदक्षिणा पथ, अधिष्ठान, कण्ठ आणि ग्रीवा या विविध अंगानीयुक्त असलेल्या दिसतात.

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात लयन स्थापत्य ही आढळते, त्यात वैशिष्ट्यपूर्ण जैन लयन स्थापत्येही आहेत त्याची ओळख होते. महाराष्ट्रात महत्त्वाची जैन लयन स्थापत्य म्हणून वेरुळ, खरोसा लेणी, अंकाई टंकाई लेणी, यादव काळातील लेणी, चामर लेणी, अंजनेरी लेणी, मोहिदे लेणी, भामर लेणी, पाटणे लेणी याचीही थोडक्यात माहिती येथे मिळते.

जैन शिल्पकला व मूर्तीकला यांचेही स्वतंत्र वैशिष्ट्ये दिसून येतात. याची सविस्तर चर्चा येथे केली आहे. जैन मूर्ती, त्यांची वैशिष्ट्ये, प्रकार, मूर्तीवरील चिन्ह, आजूबाजूच्या प्रतिकात्मक व बोधात्मक प्रतिमा व चिन्ह, विविध जैन देव-देवता त्यांची वैशिष्ट्ये ही येथे समजून येण्यास मदत होते. तसेच एकूणच महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांवरील स्थापत्य, मूर्तीकला आणि शिल्पकलेची वैशिष्ट्ये येथे सांगितली आहेत.

यात जिनालय, मानस्तंभ, गुहा मंदिर, अभिलेख, तीर्थंकर मूर्ती, शासन देवतांच्या मूर्ती याची सविस्तर माहिती दिलेली आहे. यामुळे संपूर्ण जैन स्थापत्य व मंदिर, मूर्ती, शिल्पकलेचे ज्ञान होते.

- **संदर्भ सूची**


१) हाके रोहिणी, खिद्रापूर मंदिराचे स्थापत्य आणि वैशिष्ट्ये, अप्रकाशित एम. फिल प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २०१०, पृ. ३३.

२) पाण्डे गोविंदचंद्र, भारतीय कला और संस्कृती, राका प्रकाशन इलाहाबाद, १९९५, पृ. ५.

३) जैन तीर्थवंदना, भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमेटी मुखपत्र, ऑक्टोंबर २००८, पृ. ६.

४) जैन भागचंद्र, देवगढ की जैनकला, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन दिल्ली, १९७४, पृ. ४७.

५) हाके रोहिणी, उपरोक्त पृ. ३४.

६) तत्रैव, पृ. ३५.

७) नुलकर सत्यव्रत, कुडलचे वास्तुशिल्प वैभव, विजय प्रकाशन सोलापूर, २००४, पृ. ३४.

८) तत्रैव, पृ. ३५.

९) जोशी य. गो., प्रसाद मासिक, अकरावा लेख, २०१४, पृ. ४२.

१०) हाके रोहिणी, उपरोक्त पृ. ३५.

११) जामखेडकर अ. प्र., स्थापत्य व कला (खंड-१ भाग-२) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन मुंबई, २००८, पृ. ९७.

१२) तत्रैव, पृ. ९७.

१३) तत्रैव, पृ. ९८.

१४) तत्रैव, पृ. ९८.

१५) तत्रैव, पृ. ९९.

१६) तत्रैव, पृ. ९९.

१७) नुलकर सत्यव्रत, उपरोक्त पृ. ३४.

१८) प्रभुदेसाई योगेश, कोल्हापूरातील मंदिर संपदा, अक्षर दाहन प्रकाशन कोल्हापूर, २०११, पृ. १८.

१९) तत्रैव, पृ. १८.

२०) तत्रैव, पृ. १९.

२१) तत्रैव, पृ. १९.

२२) शहा सुमतिबाई, पूर्णार्घ्य, जैन ज्ञानकोष सोलापूर, १९७०, पृ. ८०४.

२३) तत्रैव, पृ. ८०४.

२४) तत्रैव, पृ. ८०४.

२५) तत्रैव, पृ. ८०४.

२६) तत्रैव, पृ. ८०५.

२७) तत्रैव, पृ. ८०५.

२८) नुलकर सत्यव्रत, उपरोक्त पृ. ३४.

२९) जामखेडकर अ. प्र., उपरोक्त पृ. १००.

३०) तत्रैव, पृ. १३०.

३१) हाके रोहिणी, उपरोक्त पृ. ३६.

३२) कळसेकर टी. एस., महाराष्ट्राचे खजुराहो खिद्रापूर, काळशेखर प्रकाशन, पुणे १९७७, पृ. ६०.

३३) जामखेडकर अ. प्र., उपरोक्त पृ. १५१.

३४) तत्रैव, पृ. ११४.

३५) नुलकर सत्यव्रत, उपरोक्त पृ. ३४.

३६) हाके रोहिणी, उपरोक्त पृ. ३७.

३७) जामखेडकर अ. प्र., उपरोक्त पृ. ११४.

३८) तत्रैव, पृ. ११५.

३९) काला अरुणा, आचार्य जिनसेनांचे आदि-महापुराण, निर्मल प्रकाशन नांदेड, २००१, पृ. ११.

४०) तत्रैव, पृ. ११.

४१) नटाणी प्रकाश नारायण, भारतीय कला के विविध आयाम, महेश बुक प्रकाशन जयपूर, २००६, पृ. १२.

४२) तत्रैव, पृ. १२.

४३) तत्रैव, पृ. १३.

४४) जामखेडकर अ. प्र., उपरोक्त पृ. ८१.

४५) तत्रैव, पृ. ८५.

४६) तत्रैव, पृ. ८७.

४७) तत्रैव, पृ. ८७.

४८) तत्रैव, पृ. ८८.

४९) तत्रैव, पृ. ९१.

५०) जामखेडकर अ. प्र., उपरोक्त पृ. ९१.

५१) तत्रैव, पृ. ९३.

५२) तत्रैव, पृ. ९५.

५३) तत्रैव, पृ. ९५.

५४) तत्रैव, पृ. ९६.

५५) तत्रैव, पृ. ९६.

५६) जामखेडकर अ. प्र., उपरोक्त पृ. ९६.

५७) तत्रैव, पृ. ९५.

५८) नतालिया गुसेवा, जैन धर्म उगम व विकास, शब्दपीठ प्रकाशन कल्याण, १९७६, पृ. १०६.

५९) तत्रैव, पृ. १०७.

६०) तत्रैव, पृ. १०८.

६१) तत्रैव, पृ. १०९.

६२) नटाणी प्रकाश, उपरोक्त पृ. ७८.

६३) जैन भागचंद्र, उपरोक्त पृ. १०५.

६४) जोशी य. गो., उपरोक्त पृ. ४५.

६५) शहा रजनी, भारतातील दिगंबर जैन तीर्थ, जीवराज ग्रंथमाला प्रकाशन सोलापूर, पृ. १९.

६६) दैनिक संचार सोलापूर, २८ ऑगस्ट २०११, पृ. ४.

६७) जोशी नि. पु., भारतीय मूर्तीशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर, १९७९, पृ. ३३८.

६८) तत्रैव, पृ. ३३८.

६९) तत्रैव, पृ. ३३९.

७०) शहा सुमतिबाई, उपरोक्त पृ. ८०२.

७१) जोशी नि. पु., उपरोक्त पृ. ३४०.

७२) तत्रैव, पृ. ३४०.

७३) तत्रैव, पृ. ३४१.

७४) तत्रैव, पृ. ३४१.

७५) तत्रैव, पृ. ३४२.

७६) जोशी नि. पु., उपरोक्त पृ. ३४३.

७७) तत्रैव, पृ. ३४४.

७८) तत्रैव, पृ. ३४५.

७९) तत्रैव, पृ. ३४६.

८०) तत्रैव, पृ. ३४७.

८१) तत्रैव, पृ. ४८.

८२) तत्रैव, पृ. ४८.

८३) तिवारी मारुतीनंदन आणि कमल गिरी, मध्यकालीन भारतीय प्रतिमालक्षण, विश्वविद्यालय प्रकाशन वाराणसी, १९९७, पृ. २९३.

८४) तत्रैव, पृ. २९४.

८५) तत्रैव, पृ. ३०१.

८६) तत्रैव, पृ. ३१६.

८७) जोशी नि. पु., उपरोक्त पृ. ३५२.

८८) तत्रैव, पृ. ३५२.

८९) तत्रैव, पृ. ३५३.

९०) जैन भागचंद्र, उपरोक्त पृ. ६३.

९१) शहा रजनी, उपरोक्त पृ. २६.

९२) तत्रैव, पृ. २७.

९३) तत्रैव, पृ. २७.

९४) तत्रैव, पृ. २७.

९५) तत्रैव, पृ. २८.

९६) तत्रैव, पृ. २९.

९७) जैन बलभद्र, भारत के दिगंबर जैन तीर्थ, भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमेटी मुंबई, १९७८, पृ. १३.

९८) तत्रैव, पृ. १३.

९९) तत्रैव, पृ. १३.

१००) तत्रैव, पृ. १४.

१०१) तत्रैव, पृ. १४.

१०२) तत्रैव, पृ. १५.

१०३) तत्रैव, पृ. १५.

१०४) शहा रजनी, उपरोक्त पृ. ३०.

१०५) तत्रैव, पृ. ३०.

# उपसंहार

# प्रकरण - पाचवे

## उपसंहार

मागील चार प्रकरणांतून जैन धर्माची ओळख, जैन तीर्थक्षेत्रे आणि जैन स्थापत्य कला आणि शिल्पकलेचा अभ्यास केलेला आहे. जैन तीर्थक्षेत्राच्या अभ्यासातून जैन धर्म, जैन संस्कृती, सण-उत्सवाची माहिती सोबतच जैन तीर्थक्षेत्रांचा ऐतिहासिक आढावा घेतलेला आहे. या मुद्यांना अनुसरुन संशोधनाचे फलिते मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

जैन धर्माचा प्रसार महाराष्ट्राप्रमाणेच भारताच्या इतर भागातही झाला. या धर्माचे मूळ स्वरुप व इतिहासातील संदर्भावरुन महाराष्ट्रातील जैन समाजामध्ये परंपरागतरित्या चोवीस तीर्थंकरांविषयीची स्विकृती आढळते. चोवीसावे तीर्थंकर वर्धमान महावीरांना सर्वमान्यता दिसते. त्यांनी जैन विचारधारेत सुसूत्रता आणली म्हणून त्यांना जैन धर्माचे प्रवर्तकही मानले जाते.

जैन धर्म प्रसाराचे अनेक उपाय तत्कालीन धर्मप्रमुख व धर्मानुयायांनी केलेले दिसतात. प्रत्येक धर्माच्या अनुयायांना आपल्या धर्मासाठी काही तरी भव्यदिव्य करावे असे वाटत असते. या भावनेतूनच जैन धर्माची मंदिरे व शैलगुंफा निर्माण झाल्या. यातील अनेक स्थाने जगभर प्रसिद्‌ध असून या प्रसिद्‌ध स्थानाविषयी जैन व जैनेतर समाजात धार्मिक व पर्यटन स्थळे म्हणून या ठिकाणांना महत्त्वाचे स्थान असलेले दिसते.

मानवी जीवनात धार्मिक स्थळे, तीर्थक्षेत्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही देवालाये सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाची भूमिका बजावतात. सामाजिक रुढी, परंपरांचा वारसा जपून ठेवण्याचे कार्य ही धार्मिक स्थळे करीत आहेत. धार्मिक स्थळांच्या माध्यमातून धार्मिक सण, उत्सव, भजने, कीर्तन, प्रवचने आयोजित केली जातात. त्यामुळे वाङ्मयीन व कलात्मक मूल्यांचे जतन तर होतेच पण आचार - विचारांचे व संस्कृतीचे अभिसरण ही घडून येते.

याच ठिकाणी मानव आपल्या विचारातील अलौकिक शक्तीचे मूर्त स्वरुप पाहण्याचा प्रयत्न करतो. विविध स्वरुपात पूजा-अर्चा करुन मनुष्य आपले हित साधताना दिसतो. या विविध उपासनेसाठी मानवाने धार्मिक स्थळे, तीर्थक्षेत्रे निर्माण केलेली दिसतात.

महाराष्ट्रामध्ये इतर धर्माप्रमाणे जैन धर्माचे अस्तित्त्व असून येथे जैन तीर्थक्षेत्रे मोठ्या प्रमाणात आढळून येतात. या तीर्थक्षेत्रांची संख्या चौतीस असून यात सिद्धक्षेत्रे, अतिशयक्षेत्रे, कलाक्षेत्रे असे प्रकार पाहावयास मिळतात. महाराष्ट्रात एकही कल्याणकक्षेत्र पाहावयास मिळत नाही. ही तीर्थक्षेत्रे जैन धर्माच्या सर्व पंथ व जातीमध्ये आदरणीय असून त्यामुळे ते या तीर्थक्षेत्रांना सतत भेटी देताना दिसतात. ही तीर्थक्षोत्रे महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेली अशी आहेत. आजपर्यंत या जैन तीर्थक्षेत्रांचा संशोधनात्मक दृष्टीने अभ्यास केलेला नाही. म्हणून मी महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्राचा ऐतिहासिक आढावा हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

या प्रबंधातील पहिले प्रकरण प्रास्ताविक असे असून त्यात भारतातील धर्माचे महत्त्व, जैन धर्माची, जैन तीर्थक्षेत्रांची ओळख करुन दिलेले आहे. सोबतच संशोधन पद्धती, स्वरुप, नियोजनाचा आराखडा सादर करण्यात आला आहे.

प्रकरण दोन जैन धर्म असे असून त्यात धर्म संकल्पना, जैन धर्माचा उदय, प्राचीनता, स्वरुप, प्रसार आणि योगदानाची सविस्तर माहिती दिली आहे. यातून जैन धर्माचे सखोल ज्ञान होऊन भारतीय समाजात जैन धर्माचे स्थान महत्त्वाचे असलेले दिसते.

प्रकरण तीन जैन तीर्थक्षेत्रे असे असून यात तीर्थक्षेत्रांची ओळख करुन महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांची माहिती सांगितलेली आहे. या तीर्थक्षेत्रांची सिद्धक्षेत्र, अतिशयक्षेत्र, कलाक्षेत्र या वैशिष्ट्यांची ओळख करुन एकूण चौतीस तीर्थक्षेत्रांची सविस्तर माहिती येथे सांगितली आहे. या तीर्थक्षेत्रांची निर्मिती कशी झाली, मंदिराची बांधकाम पद्धत, मूर्तीचे स्वरुप, पूजा-अर्चा, यात्रा, उत्सव, नित्यपूजा इत्यादींचा यात

समावेश केला आहे. या तीर्थक्षेत्रांवरील गुरुकुल, विद्यालये, ग्रंथालये, प्रकाशने, विविध समारंभातून वैचारिक अभिसरण घडून आल्याचे दिसते.

प्रकरण चार जैन स्थापत्य आणि शिल्पकला असे असून त्यात भारतातील मंदिर स्थापत्याची सुरुवात आणि जैन मंदिरे, महाराष्ट्रातील मंदिर स्थापत्याची सुरुवात आणि जैन मंदिरे, मंदिराचे प्रमुख अंग, महाराष्ट्रातील जैन लयन स्थापत्य, जैन शिल्पकला आणि मूर्तीकला, महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांवरील स्थापत्य, मूर्तीकला आणि शिल्पकलेची वैशिष्ट्ये या घटकांच्या आधारे महाराष्ट्रातील स्थापत्य व शिल्पकलेत विविधता, प्राचीनता, काळानुसार होत जाणारे बदल हे गुणधर्म आढळतात व आपली स्वतंत्र ओळख जपताना दिसतात.

**निष्कर्ष :-**

माझ्या प्रबंधातील पहिले उद्दिष्ट जैन धर्माची प्राचीनता व त्याचे स्वरुप समजून घेणे असून त्यानुसार निष्कर्षाची पुढील प्रमाणे मांडणी करण्यात आली आहे.

जैन धर्माच्या प्राचीनतेच्या अभ्यास करताना अनेक विद्वानांची मते अभ्यासास मिळाली. त्यानुसार जैन धर्माची प्राचीनता, सिंधू संस्कृतीशी, वैदिक संस्कृतीशी जोडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. मौर्य साम्राज्यापासून मोगल साम्राज्यांपर्यंत जैन धर्माच्या संबंधित विविध माहिती अभ्यासास मिळाली. हा धर्म वैदिक काळाच्या शेवटी इ.स.पूर्व एक हजाराच्या आसपास ऋषभनाथ यांनी प्रवर्तविलेला असून आर्यपूर्व किंवा आर्यकालीन द्रविडी संस्कृती इतका प्राचीन होता अशीही मते मांडलेली दिसून येतात.

या धर्माची परंपरा व प्राचीनता सांगत असताना चोवीस तीर्थंकरांचा आधार घेतला असली तरी तेवीसावे तीर्थंकरांच्या अगोदरच्या तीर्थंकरांबाबत निःसंशय स्वरुपाचा ऐतिहासिक पुरावा प्रतिपादन करीत नाही. पार्श्वनाथ आणि महावीर हे तेवीसावे आणि चोवीसावे तीर्थंकर मात्र ऐतिहासिक व्यक्ती असल्याचे सिद्ध झाले आहे. भगवान महावीर जैन धर्माचे प्रवर्तक होऊन गेले त्याप्रमाणे भगवान पार्श्वनाथ ही ऐतिहासिक व्यक्ती होऊन गेली. त्यांनी जैन धर्माचा प्रभावी प्रचार व प्रसार केला होता. हे सिद्ध झाल्याने साहजिकच जैन धर्माचा उदय किंवा प्राचीनता इ.स.पूर्व आठव्या

शतकापर्यंत नेण्यास मान्यता मिळाली आहे तर जैन धर्माच्या स्वरुपाविषयी अशी माहिती मिळते की, चोवीस तीर्थंकर हे जैन धर्माचे केंद्रबिंदू असून त्यांनी सांगितलेले तत्वज्ञान हे जैन धर्मग्रंथ समजले जाणारे 'आगम' यात समाविष्ठ केले गेले आहे. जैन तत्वज्ञान स्वतंत्र असून त्यावर इतर कोणत्याच धर्मांचा प्रभाव दिसून येत नाही. त्यातील पंचमहाव्रते, अहिंसा, स्याद्वाद, कर्मवाद या श्रेष्ठ मूल्यांची उदाहरणे देता येतील. याचे पालन जैन धर्मगुरु व अनुयायी करताना दिसतात. सोबतच चोवीस तीर्थंकर, चोवीस प्रतिके, णमोकार मंत्र, जैन मुनी, आचार्य, भट्टारकांचे स्थान उच्च आहे. आजही जैन धर्मगुरुंमध्ये सल्लेखना व्रत दिसून येते. जैन धर्माचे संस्कार, सण, उत्सव, व्रत-उपवास यामध्ये विविधता आढळून येते तर नियमांमध्ये वैज्ञानिकता दिसून येते. कालांतराने या धर्मामध्येही विविध पंथ, जाती निर्माण झालेल्या मला पाहावयास मिळाल्या.

संशोधनाचे दुसरे उद्दिष्ट जैन तीर्थक्षेत्रांची ठळक वैशिष्ट्ये अधोरेखित करणे असून त्यानुसार पुढील निष्कर्षाची मांडणी करण्यात आली आहे. जैन तीर्थक्षेत्रे प्राचीन आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यात तीर्थक्षेत्रांवरील मंदिरे, मूलनायकाची मूर्ती, इतर जैन प्रतिमा, प्रतिके व मूर्ती, मानस्तंभ, जैन मुनींची व्यवस्था, लेणी समुह, तीर्थक्षेत्रांवरील देवस्थान समितीमार्फत चालविले जाणारे विविध प्रकल्प, प्रकाशने, धर्मशाळा, गुरुकुल, विद्यालये, ग्रंथालये, वसतिगृहे, वार्षिक उत्सव, ऐतिहासिक घटना, दानपत्रे (तामपत्र), शिलालेख, वीरगळ, तसेच तीर्थक्षेत्रांविषयी असलेल्या आख्यायिका इत्यादींचा समावेश होतो.

महाराष्ट्रातील काही जैन तीर्थक्षेत्रे लोकवस्तीत (गावात) तर काही तीर्थक्षेत्र दूर निसर्गसंपन्न ठिकाणी व उंच टेकडीवर उभारलेली आहेत. काही तीर्थक्षेत्रांवर एकच मंदिर दिसते तर काही तीर्थक्षेत्रांवर मंदिर समुह पाहावयास मिळतो. या मंदिरामध्ये वेगवेगळ्या तीर्थंकरांच्या मूर्ती स्थापन केलेल्या दिसतात. ही मंदिरे भव्य व प्राचीन असून त्यात गर्भगृह, अंतराळ, सभामंडप, शिखर इत्यादी घटकांचा समावेश होतो. या मंदिराचे स्तंभ, प्रवेशद्वार, छत, मुखमंडप, शिखर, मानस्तंभ नक्षीकामाने सुशोभित केलेली दिसतात. मंदिराच्या शिखरावरही छोटे मंदिर दिसते. त्यात रत्नत्रय किंवा

तीर्थंकरांची मूर्ती स्थापन केलेली दिसते. ही मंदिरे काळा पाषाण, विटा, लाकडी वस्तूपासून उभारलेली दिसतात. मंदिर प्रकारात हेमाडपंती मंदिर प्रकार हा अधिक प्रमाणात पाहावयास मिळतो. परंतु कालांतराने गरजेनुसार मंदिरांचा जिर्णोद्धार केलेला दिसतो. काही तीर्थक्षेत्रांवर आधुनिक मंदिरे उभारलेली आहेत तर काही तीर्थक्षेत्रांवर काचमंदिरे पाहावयास मिळतात. या मंदिरास तटबंदी व भव्य मुख्यप्रवेशद्वारही आढळून आले आहे.

तीर्थक्षेत्रांवरील मंदिराच्या वेदीवर मूलनायकाची मूर्ती स्थापन केलेली दिसते. ही तीर्थंकर मूर्ती असून ती पद्मासनस्थ ध्यानमुद्रेतील आहे. इतर मूर्ती श्वेत व श्यामवर्ण पाषाणापासून तर काही वाळूपासून बनविलेल्या दिसतात. या मूर्ती भव्य असून त्या लांच्छन, चमरेंद्र, दुंदभीवादक, इंद्र, यक्ष-यक्षी, छत्रत्रयी, विविध प्राणी, सिंहासन यांनी सुशोभित केलेल्या दिसतात.

महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्रांवरील तीर्थंकर मूर्त्यांमध्ये आदिनाथ, शातिनाथ, मुनिसुव्रतनाथ, चंद्रप्रभू, पार्श्वनाथ, महावीरांच्या प्रामुख्याने मूर्ती आढळतात. यापैकी पार्श्वनाथाच्या मूर्ती जास्त प्रमाणात दिसतात. या मूर्ती लहान व भव्य असून पार्श्वनाथाच्या डोक्यावर पाच, सात, नऊ, अकरा, तेरा नागफणा असलेले छत्र पाहावयास मिळते. येथे पार्श्वनाथाची वेगवेगळी नावे ही ऐकण्यास मिळतात त्यात कलिकुंड पार्श्वनाथ, गिरी पार्श्वनाथ, झरी पार्श्वनाथ, अंतरिक्ष पार्श्वनाथ, चिंतामणी पार्श्वनाथ, विघ्नहर पार्श्वनाथ इत्यादींचा समावेश होतो. जैन परंपरेच्या मतानुसार महाराष्ट्राच्या भूप्रदेशावर पार्श्वनाथाचा विहार झाला होता असेही सांगितले जाते.

या तीर्थंकरांच्या मूर्ती आकर्षक असून त्यांच्या चेह-यावर विरक्तता, शांततेचा भाव पाहावयास मिळतो तर काही मूर्तींच्या छातीवर श्रीवत्स चिन्ह दिसते तर काही मूर्तींच्या छातीवर श्रीवत्स चिन्ह दिसत नाही. मूर्तींच्या कानाच्या ठेवणीत ही फरक आढळतो म्हणजेच काळानुसार मूर्ती कलेत जो बदल होत गेला तो बदल या मूर्तींमध्ये ही दिसून येतो. या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी एक हजार वर्षापूर्वीच्या प्राचीन मूर्ती पाहावयास मिळतात. काही मूर्तींवर लेख कोरलेले आहेत त्यावरुन या मूर्तींचा काळ

ठरविण्यास मदत होते. मूर्तीवरील वर्षाच्या उल्लेखात विक्रम संवत्, शक, शक संवत् या कालगणनेचा जास्त वापर झालेला दिसतो.

तीर्थंकरांच्या मूर्तीसोबत पद्मावती, अंबिका, ज्वालामालिनी, सरस्वती या शासन देवता ही पाहावयास मिळतात. या देवी मूर्ती चार, सहा, आठ हात असलेल्या विविध अलंकार युक्त असून सोबतच मंदिरांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण क्षेत्रपालांच्या मूर्तीही आहेत. मंदिराच्या परिसरात चौबीसी तीर्थंकरांच्या पद्मासन व खड्गासनातील पाषाण मूर्ती व चरण चिन्ह पाहावयास मिळतो तर काही मंदिरात शिलालेख, वीरगळ तर काही तीर्थक्षेत्रांवर समवशरण मंदिर ही आढळून आले. मंदिरासमोर काळ्या, पांढ-या, लाल दगडापासून बनविलेले लहान-मोठे कलाकुसरीनी सुशोभित केलेली मानस्तंभ आहेत.

मुक्तागिरी येथे शांतिनाथांचे तर तेर आणि कुंडल येथे महावीरांचे समवशरण आले होते असे या क्षेत्रांवर सांगितले जाते. यामुळे या तीर्थक्षेत्रांची प्राचीनता समजण्यास मदत होते. या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी विशेष उत्सव, धार्मिक समारंभावेळी जैन धर्मगुरु मार्गदर्शन करतात व या समारंभावेळी प्रमुख राजकीय व्यक्तींना आमंत्रित केलेले असते.

प्रत्येक तीर्थक्षेत्रांवर नेमणूक केलेल्या पंडिताकडून नित्यपूजा केली जाते. वर्षभर विविध उत्सव व वार्षिक उत्सवही साजरे केले जातात. वार्षिक उत्सवात काही ठिकाणी पालखी मिरवणूक तर काही ठिकाणी रथ मिरवणूक काढली जाते. या उत्सवात जैन - जैनत्तरांचाही समावेश असतो. प्रत्येक तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी यात्रेकरूंना राहण्या-जेवण्याच्या सोयीसाठी धर्मशाळा उभारलेल्या असून येथे यात्रेकरूंची उत्तमरित्या राहण्याची व जेवणाची सोय केली जाते.

आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तीर्थक्षेत्र ठिकाणी चालवली जाणारी गुरुकुल, विद्यालय पद्धती होय. कुंभोज (बाहुबली), कुंथलगिरी, पैठण, कचनेर, नवागड अशा तीर्थक्षेत्रांवर गुरुकुलाच्या माध्यमातून शैक्षणिक सेवा दिली जाते. याठिकाणी मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेतात. म्हणजेच आजच्या काळात सुद्धा ही तीर्थक्षेत्रे प्राचीन भारताच्या शिक्षण पद्धतीचे वैशिष्ट्य असणारे गुरुकुल पद्धती आजही

जतन करीत आहेत. या विद्यार्थ्यांना वसतिगृहामार्फत राहण्याची व जेवणाच्या सुविधा दिल्या जातात. सोबतच याठिकाणी असलेल्या ग्रंथालयामध्ये यातून विविध भाषेतील, जैन ग्रंथ, साहित्य, तत्वज्ञान सांगणारी पुस्तके जतन केलेली आहेत.

कुंभोज (बाहुबली) या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी जैन संशोधन केंद्र असून तेथून विविध ग्रंथ, मासिके प्रकाशित होताना दिसतात तर प्रत्येक तीर्थक्षेत्रा ठिकाणी देवस्थान समिती स्थापन केलेल्या आहेत. या देवस्थान समितीमार्फत तीर्थक्षेत्रांचे व्यवस्थापन केले जाते. ही तीर्थक्षेत्रे पर्यावरणाचे संरक्षण करताना दिसतात. कारण ही तीर्थक्षेत्रे निसर्गसंपन्न आणि उंच पहाडांवर असून पर्यावरण, पशु व वृक्ष संवर्धन करतात.

या सर्व वैशिष्ट्यांमुळे येथे येणा-यांची संख्या मोठी असल्याने ही जैन तीर्थक्षेत्रे पर्यटनाचा एक भाग बनली आहेत. यामध्ये बाहुबली व कुंथलगिरी येथे येणा-या पर्यटकांची संख्या जास्त आहेत. ब-याच तीर्थक्षेत्रांवर लेणी समूह पाहावयास मिळतो तर काही लेणी समूह जैन कलाक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असून वेरुळ, धाराशिव, औरंगाबाद, अंजनेरी येथील लेणी समूह जैन धर्माच्या प्राचीनतेची साक्ष देतात. या लेणी सातव्या, आठव्या व नवव्या शतकातील असून महत्त्वाच्या आहेत.

अलिकडील काळात या तीर्थक्षेत्रांचे आधुनिक स्वरुप दिसत असले तरी ही तीर्थक्षेत्रे सुमारे एक हजार वर्षापूर्वीची प्राचीन अशी आहेत. मुक्तागिरी येथील जैन मंदिर बिंबीसार या राजाने स्थापन केल्याचे माहिती मिळते. या तीर्थक्षेत्रांच्या प्राचीनतेविषयी येथील मूर्तीवरील लेख, शिलालेख, ताम्रपत्र माहिती सांगतात तर काही तीर्थक्षेत्राचा उल्लेख जैन कवी, भट्टारकांच्या काव्य, साहित्य रचनेत आलेला दिसतो.

संशोधनाचे तिसरे उद्दिष्ट हे जैन धर्म प्रचार व प्रसारातील तीर्थक्षेत्रांचे महत्त्व सांगणे असून त्यानुसार पुढील निष्कर्ष समोर आले आहेत.

प्रत्येक धर्माची तीर्थक्षेत्रे ही त्या धर्माची प्रचार व प्रसार करणारी ठिकाणे आहेत. याप्रमाणे जैन तीर्थक्षेत्रे सुद्धा धर्म प्रचार व प्रसार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. ही तीर्थक्षेत्र जैन धर्माचे प्रतिनिधीत्त्व करत असून येथे असलेली भव्य स्थापत्ये, मूर्ती धर्माच्या तत्वज्ञानातून प्रभावित झालेल्या दिसतात तर जैन कलाक्षेत्र

म्हणून प्रसिद्ध असणा-या लेणी समूहातून तीर्थंकरांच्या जीवनाविषयी माहिती मिळते. त्यातून विविध जैन कथांचा परिचयही होतो व जैन स्थापत्याची ओळख होते. मूर्ती पूजेपासून ते देवस्थान समितीमार्फत होणा-या व्यवस्थापनेच्या नियमातून जैन धर्माच्या नियमांचा बोध होतो. येथे होणा-या धार्मिक समारंभातून व वार्षिक उत्सवातून, मिरवणूकीतून समाजाला जैन धर्माची ओळख सांगण्यास निश्चितच मदत होताना दिसते.

या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी विविध भाषेतील प्राचीन जैन साहित्य व ग्रंथाचा मोठ्या प्रमाणात संग्रह जपून ठेवलेला आहे. बरेच संशोधक, जैन धर्म जिज्ञासू त्याचा अभ्यासासाठी उपयोग करताना दिसतात. त्यातून जैन धर्माचे सखोल ज्ञान होताना दिसते. काही ठिकाणी या साहित्यातून मानवी जीवन कल्याणासाठी उपयुक्त असणारी मूल्ये, विविध प्रकाशने, मासिके प्रसिद्ध केली जातात. यामुळे निश्चितच या माध्यमातून जैन धर्माचा प्रसार झालेला दिसून येतो.

भारतभ्रमण करणारे अनेक जैन मुनी प्रवासादरम्यान विविध तीर्थक्षेत्रांना भेटी देतात. त्यावेळी त्यांच्या प्रवचनातून जैन धर्माची तत्वे समाजापर्यंत पोहचविल्या जातात तर काही तीर्थक्षेत्रांमध्ये जैन धर्माचा प्रचार व प्रसार करणारी भट्टारक पीठांच्या गाद्या असलेल्या दिसून येतात. या गाद्यांवरुन परंपरेनुसार भट्टारकांचे जैन धर्माचा प्रचार, प्रसार व विविध सुधारणांसाठी मार्गदर्शन होताना दिसते. हे भट्टारक सतत भ्रमण करीत असताना प्रवासादरम्यान येणारी तीर्थक्षेत्रे, मंदिरे, जैन कुटुंबास ते भेटी देऊन मार्गदर्शन करतात. त्यामुळे जैन धर्माचा प्रसार होण्यास निश्चितच वेग प्राप्त झाला आहे.

तीर्थक्षेत्रांवरील मोठ्या धार्मिक सोहळ्यासाठी लोकप्रतिनिधी सुद्धा हजर राहतात. यामुळे शासनाचे लक्ष तीर्थक्षेत्रांकडे वळवण्याचाही प्रयत्न केला जातो. याचाच परिणाम म्हणून जैन तीर्थक्षेत्रांना पर्यटन स्थळे म्हणून मान्यता मिळत आहे. पर्यटन स्थळांमुळे या क्षेत्रांकडे येणा-यांची संख्या वाढली असून जैनतरांनाही जैन संस्कृतीची ओळख करवून देण्यास निश्चित मदत होताना पाहावयास मिळते आहे.

संशोधनाच्या चौथ्या उद्दिष्टानुसार पर्यटनाची क्षेत्रे म्हणून जैन तीर्थक्षेत्रांचा अभ्यास करणे असून यानुसार पुढील निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

महाराष्ट्रातील काही जैनतीर्थ ही घनदाट वृक्षांचे आच्छादन असलेल्या पहाडावर, निसर्गसंपन्न परिसरात असून तेथे मोकळे प्रांगण, ध्यानधारण, पूजाविधी, समारंभासाठी असलेले सभागृह, पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहांची सुविधा, सुख-सोयींनीयुक्त राहण्यासाठी असलेली धर्मशाळा, जेवण्याची व्यवस्था, पूजा कार्यक्रम व दैनंदिन लागणा-या आवश्यक वस्तूच्या खरेदीसाठी असलेली दुकाने, हस्तकलाकुसरीची वस्तू, चवदार खाद्य पदार्थ, पुस्तकालये, दूरध्वनीची व्यवस्था, तीर्थक्षेत्रांवर जाण्यासाठी चांगले रस्ते अशा विविध वैशिष्ट्यांनीयुक्त आहेत. या जैन तीर्थक्षेत्रांना इतर धर्मातील लोकही बहूसंख्येने हजेरी लावतात. एवढेच नव्हे तर दैनंदिन व वार्षिक उत्सवाच्या वेळी त्या त्या ठिकाणी असणारे सर्व जाती-धर्माचे लोक पालखी मिरवणूक व रथ मिरवणूकीत मोठ्या संख्येने सहभागी होऊन धार्मिक, राष्ट्रीय एकात्मता जपण्याचा प्रयत्न करतात.

वेरुळ, अंजनेरी, चांदवड, औरंगाबाद, धाराशिव, गजपंथ, मांगी-तुंगी येथील प्राचीन जैन शिल्पकलेची उत्कृष्ठ उदाहरणे असलेली लेणी समूह, मंदिरे, मंदिरातील स्तंभ, शिखरावरील सुंदर नक्षीकाम, विविध पाषाणातील भावसदृश, सजीव वाटणारी मूर्तीकला, विविध भाषेतील, पांडु लिपीतील ग्रंथ साहित्याच्या संग्रहामुळे, ताम्रपट, शिलालेखावरील संदर्भामुळे ऐतिहासिक क्षेत्र म्हणून प्रसिद्धीस आलेल्या या क्षेत्रास संशोधक व या सर्व वैशिष्ट्यांमध्ये आवड असणारी लोक याठिकाणी येताना दिसतात. त्यातूनच मोठ्या प्रमाणावर वैचारिक मंथन होताना दिसून येते.

प्राचीन भारतीय शिक्षणाचे वैशिष्ट्य असलेली गुरुकुल पद्धत, बाहुबली, कुंथलगिरी अशा तीर्थक्षेत्रांवर ज्ञान देण्याचे कार्य करीत आहेत. ब-याच तीर्थक्षेत्रांमार्फत शैक्षणिक संस्था चालविल्या जातात. या गुरुकुल व विद्यालयात विविध अंगी शिक्षण उपलब्ध असल्याने विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात संख्या पाहावयास मिळते. यामुळे ही क्षेत्रे शैक्षणिक केंद्र म्हणून प्रसिद्धीस आली असून यातून मोठ्या प्रमाणावर ज्ञानार्जन

होताना दिसत आहे. म्हणजेच ही तीर्थक्षेत्रे केवळ धर्मपीठेच नव्हे तर ज्ञानपीठेही आहेत असे म्हणता येते.

ही तीर्थक्षेत्रे विविध वृक्ष, वन संपत्तींनीयुक्त असून येथील पहाडांच्या आजुबाजूस, पहाडांवर वृक्ष संवर्धन होताना दिसते. यासोबतच ही क्षेत्रे 'अहिंसा भूमी' म्हणून ही प्रसिद्ध आहेत. त्यामुळे पर्यावरण अभ्यासक या क्षेत्रांना मोठ्या प्रमाणावर भेटी देतात इत्यादी सर्व वैशिष्ट्यांमुळे ही तीर्थक्षेत्रे धार्मिक, ऐतिहासिक, शैक्षणिक व पर्यावरण पर्यटनाची केंद्रे बनलेली दिसतात. एवढेच नव्हे तर या तीर्थक्षेत्रांमुळे धार्मिक, वैचारिक, सामाजिक, राष्ट्रीय एकात्मता, शैक्षणिक आणि आर्थिक अभिसरण घडून येत असल्याचे दिसून आले.

संशोधनाच्या पाचव्या उद्दिष्टानुसार पर्यटनाच्या दृष्टिकोनातून जैन तीर्थक्षेत्रांचा सामाजिक जीवनावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे असून यानुसार पुढील निष्कर्ष आलेली आहेत.

महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रांवर स्त्री-पुरुषांना समान स्थान असलेले दिसते. स्त्रियांही पुरुषाबरोबर सर्व पूजाविधींमध्ये सहभागी होतात. या तीर्थक्षेत्रांना सर्व धर्मातील आणि जातीतील लोक भेटी देतात व पूजाविधी, उत्सव, मिरवणूकीत सहभागी होतात. म्हणजेच धार्मिक पर्यटनाच्या दृष्टिकोनातून येथे धार्मिक, सामाजिक समन्वय साधलेला दिसून येतो. या तीर्थक्षेत्रांवर तत्कालीन घटनांचे परिणाम दिसून येतात.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या काही पाऊलखुणाही या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दिसून येतात. गजपंथ आणि मांगी-तुंगी याठिकाणी स्वातंत्र्याच्या काळात काही संघटना उभा करुन त्या संघटनांनी स्वातंत्र्य चळवळीत आपला सहभाग नोंदविल्याचाही उल्लेख आढळतो.

या तीर्थक्षेत्रांच्या माध्यमातून अहिंसा, सत्य, अपरिग्रह, शांतता, सहकार्य, समानता या तत्वांची ओळख होऊन त्याचा प्रभाव तेथील जनजीवनावर होताना दिसतो. या तीर्थक्षेत्रांमुळे त्या परिसरातील समाजामध्ये मांसाहाराचे महत्त्व कमी होऊन शाकाहाराचे महत्त्व पोहचलेले दिसते. तीर्थक्षेत्राठिकाणी असलेली शांतता, स्वच्छता

यामुळे मानवी मनाला सुख-आनंदाची अनुभूती होऊन आपल्या समाजात, घरात, कुटुंबात अशी शांतता, स्वच्छता पाळण्याची जाणीव तीर्थक्षेत्राच्या भेटीतून समाजातील लोकांना होताना दिसते.

तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असलेल्या प्राणी, पक्षी व वृक्षराजी इत्यादींच्या दर्शनामुळे मिळालेल्या सुखद अनुभूतीतून पर्यावरणाचे आपल्या जीवनातील महत्त्व समजण्यास मदत होते. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी होणारी पूजाविधी व धार्मिक कार्यक्रमातून दान करण्याची, सेवा करण्याची सवय लागते. मानवाला त्यातून मनःशांती प्राप्त होते.

जैन तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असणा-या जैन गुरूंच्या जीवन जगण्याच्या पद्धतीवरुन, प्रवचनातून मानवाला आपल्या जीवनातील विरक्तता, साधेपणा अंगीकाराची जाणीव होते. त्याठिकाणी असणारे भित्तीफलक, चिन्ह, प्रतिके मानवाला आपल्या जीवनात सुख मिळण्यासाठी, जीवनाचा अर्थ समजावण्यासाठी प्रभावी ठरत आहे. विविध श्लोक संदेश, गाईचे दुध पिणारे वाघाचे पिल्लू, गाईचे वासरु वाघाचे दूध पिताना दिसणारे प्रतिक मानवाला खूप मोठा संदेश देताना दिसते. या संदेशामुळे मानवी स्वभावातील क्रूरता, राग, द्वेष, हिंसा कमी होऊन शांतता, सहकार्य, अहिंसा या गुणाचा वाढ होताना दिसतो.

तीर्थक्षेत्रांवर असणा-या मूलनायकाच्या जीवनाविषयी असलेल्या कथासुद्धा मानवी समाजाला बोध देतात. कुंथलगिरी येथील कूलभूषण देशभूषण यांच्या जीवनाची कथा समाजाला चरित्र संवर्धनाची ओळख करुन देते.

जैन तीर्थक्षेत्रे समाज जीवनावर धार्मिक, सामाजिक समन्वय, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण जाणीव, नैतिकता, अहिंसेसारखी आदर्श मूल्ये यांच्या जपणुकीस व संवर्धनास कारणीभूत ठरत आहेत.

संशोधनाचे सहावे उद्दिष्ट जैन तीर्थक्षेत्रांमुळे आर्थिक परिस्थितीत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे. यानुसार पुढील निष्कर्ष आलेली आहेत.

महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी होणारी वाहतूक, भोजनालय, राहण्याच्या सोयी, पूजा साहित्यांची, पुस्तकांची होणारी विक्री, दूरध्वनी, उत्सवातील

प्रदर्शनातून होणारी विक्री, हस्तकलाकुसरीच्या साहित्याच्या विक्रीतून, ट्रस्टीवरील अधिकारी, कामगारांच्या वेतनातून, पुजा-याच्या वेतनातून, गुरुकुल, विद्यालय शिक्षक-कर्मचा-यांच्या वेतनातून, वसतिगृहातून, धर्मशाळेतून मोठी आर्थिक उलाढाल होताना दिसते. वरील घटकाना मोठ्या प्रमाणावर अर्थप्राप्ती झाल्याने त्यांचा जीवन जगण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

तीर्थक्षेत्रांना भेटी देणारे हजारो यात्रेकरु तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी चढावा आणि दान करतात. तेथे विविध गरजेनुसार, खरेदीतून आर्थिक देवाण-घेवाण होते. काही तीर्थक्षेत्रांवर मंदिर समितीमार्फत पतसंस्था, बँका ही चालविल्या जातात. काही तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी नवीन मंदिर व मूर्ती स्थापन केल्या जातात, त्यातून स्थापत्यकार, मूर्तीकारांना आपले कौशल्य दाखविण्या सोबतच रोजगाराची संधी उपलब्ध होते. म्हणजेच विविध कारणांतून या तीर्थक्षेत्राच्या माध्यमातून कला-कौशल्य दाखविण्याच्या संधी सोबतच रोजगार प्राप्त होत आहे. तसेच गरजूंना काम उपलब्ध झाले आहे. वरील सर्व घटकांचा विचार केला असता जैन तीर्थक्षेत्रामुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर आर्थिक अभिसरण होत असल्याचे दिसून आले.

ही तीर्थक्षेत्रे विविध वैशिष्ट्यांमुळे आकर्षणाचे केंद्र असले तरी तेथे पुढील उपाययोजना केल्या तर नक्कीच येथे येणा-यांच्या संख्येत वाढ होईल व जैन तीर्थक्षेत्रांचे महत्त्व वाढेल.

## :: सूचना (उपाययोजना) ::

१) तीर्थक्षेत्रापर्यंत पोहचण्यासाठी वाहतुकीच्या व्यवस्थेत वाढ केली पाहिजे.

२) तीर्थक्षेत्रांची, तेथील विविध वैशिष्ट्यांची प्रसिद्धी केली जावी.

३) तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी असणा-या सुविधांमध्ये वाढ केली जावी.

४) तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी बाग-बगीचा, संग्रहालये, बोटींग, खेळ, गायन-संगीत इत्यादी कार्यक्रमाची सोय केली जावी.

५) दुर्लक्षित असलेल्या तीर्थक्षेत्रांवर सेवा-सुविधा पुरवाव्यात व त्याची योग्य ती देखभाल करण्यात यावी.

६) जुन्या मंदिराचा गरजेनुसार जिर्णोद्धार करावा, परंतु त्या स्थापत्याची प्राचीनता, अस्सलपणा यास इजा पोहचू नये याची काळजी घ्यावी.

७) काच मंदिरामुळे मंदिराचे प्राचीनत्त्व, स्थापत्यशैली व कलाकुसरीची, नक्षीकामाची सुंदरता नष्ट होताना दिसते. तेव्हा आधुनिकीकरणासोबत या बाबीचे सुद्धा जतन करावे.

८) प्रत्येक तीर्थक्षेत्रांवर तेथील उत्सव, समारंभावेळी इतर धर्मियांचा लोकसहभाग आणखी वाढविण्याचा प्रयत्न व्हावा.

९) स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय असावी.

१०) मंदिरामार्फत अनाथालये चालविली जावीत.

११) तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा पार पाडले जावेत.

१२) तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करुन पर्यावरण रक्षणाचा प्रयत्न केला जावा.

१३) तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी अन्नछत्रे चालविली जावीत.

१४) तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मंदिर समितीची ग्रंथालये असावीत.

१५) ऐतासिक दस्तऐवज, कागदपत्रे, ताम्रपट, शिलालेख याची व्यवस्थितपणे देखभाल अथवा जतन करण्यात यावे.

१६) तीर्थक्षेत्रांना भेटी देणा-या जैन मुनींची नोंद ठेवण्यात यावी.

# संदर्भ ग्रंथ सूची


## प्राथमिक साधने

१) शिलालेख - शिरपूर, जिंतुर, वेरुळ.

२) मंदिर (स्थापत्य) - सावरगाव, तेर, मुक्तागिरी, अंजनेरी.

३) लयन स्थापत्य - वेरुळ लेणी, धाराशिव लेणी, औरंगाबाद लेणी, चांदवड लेणी, चामर लेणी, अंजनेरी लेणी.

४) मूर्ती - जिंतुर, मांगी-तुंगी, मुक्तागिरी, तेर, कारंजा, शिरपूर, कुंभोज.

५) मुलाखती -

  १) पंडित शशिकांत, पुजारी, महावीर मंदिर, अणदूर.

  २) शहा रजनी, भारतातील दिगंबर जैन तीर्थक्षेत्रांचे अभ्यासक, पुणे.

  ३) वर्णे दीपक, ट्रस्टी सदस्य, कलिकुंड पार्श्वनाथ मंदिर, कुंडल.

  ४) शास्त्री महावीर, जैन धर्म संशोधक, बाहुबली (कुंभोज) तीर्थक्षेत्र, कोल्हापूर.

  ५) मोहरे बाहुबली, पुजारी, पार्श्वनाथ मंदिर, सावरगाव.

  ६) कासलीवाल प्रमोदकुमार, ट्रस्टी अध्यक्ष, चिंतामणी पार्श्वनाथ मंदिर, कचनेर.

  ७) पांडे वर्धमानजी, ट्रस्टी अध्यक्ष, पार्श्वनाथ मंदिर, वेरुळ.

  ८) जैन राजेश, ट्रस्टी सदस्य, सुपार्श्वनाथ मंदिर, कौडण्यपूर.

  ९) काला देवेंद्र, ट्रस्टी सदस्य, पार्श्वनाथ मंदिर, जटवाडा.

  १०) जैन ललितकुमार, प्रबंधक, शांतिनाथ मंदिर, रामटेक.

## दुय्यम साधने

१) तीर्थक्षेत्र ठिकाणी प्रसिद्ध केलेली माहिती पुस्तिका.

१. पैठण २. कचनेर ३. नवागड ४. पंचालेश्वर ५. सावरगाव

६. जिंतुर ७. कुंभोज ८. कुंथलगिरी ९. तेर १०. कुंडल.

२)	विविध ग्रंथातील आख्यायिका -

१.	शहा रजनी, भारतातील दिगंबर जैन तीर्थक्षेत्रे, जीवराज जैन ग्रंथमाला सोलापूर, २०००.

२.	जैन बलभद्र, भारत के जैन तीर्थ, चतुर्थ भाग, भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटी मुंबई, १९७८.

## संदर्भ ग्रंथ

### मराठी


१)	अन्नदाते श्रेणीक, जैन एतिहासिक भाग-१ व भाग-२, सुमेरु प्रकाशन डोंबिवली, २००२.

२)	अभयमती आर्यिका, जैन संस्कृती शतक, जैन शोधसाहित्य प्रकाशन नागपूर, १९८५.

३)	अज्ञात ले., माझी तीर्थवंदना, स्व. मातोश्री चतुरबाई जैन ग्रंथ ट्रस्ट उस्मानाबाद (वर्षाचा उल्लेख नाही).

४)	अक्कोळे सुभाषचंद्र, महाराष्ट्रातील जैन धर्म व साहित्य परंपरा, अनेकांत शोधपीठ बाहुबली, १९९२.

५)	आखाडे श्यामराव, अनेकांत आणि स्याद्वाद, जैन सभा प्रकाशन, १९१९.

६)	आंबेडकर बाबासाहेब, बुद्ध आणि त्यांचा धम्म, सद्धम्मादित्य प्रकाशन वर्धा, २००६.

७)	आचार्य विद्यानंद महाराज, मराठी अनुवादक धन्यकुमार जैन, अहिंसा प्रसारक ट्रस्ट प्रकाशक मुंबई, १९८१.

८)	उमाठे विद्याधर, संजीवन पत्रावली, श्री जैन संस्कृती संरक्षक संघ सोलापूर, १९८१.

९)	उपाध्ये धनपाल, कुंथलगिरी महात्म्य, लक्ष्मीसेन दिगंबर जैन ग्रंथमाला कोल्हापूर, १८९०.

१०) काणे पा. वा. (अनु.), धर्मशास्त्राचा इतिहास, यशवंत आबाजी भट्ट, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई, १९८०.

११) काला अरुणा रविन्द्र, आचार्य जिनसेनांचे आदि-महापुराण, निर्मल प्रकाशन नांदेड, २००१.

१२) काला अरुणा रविन्द्र, आचार्य जिनसेनांचे आदि-महापुराण, निर्मल प्रकाशन नांदेड, २००१.

१३) कुलकर्णी पी. के., भारतातील धर्म, विद्याभारती प्रकाशन लातूर, २००१.

१४) कुलकर्णी पी. के., भारतातील धर्म, विद्याभारती प्रकाशन लातूर, २००१.

१५) कुमार देवेन्द्र, चोविस तीर्थंकर, भारत जैन महामंडळ प्रकाशन मुंबई, १९७४.

१६) कोसंबी धर्मानंद, पार्श्वनाथचा चातुर्याम धर्म, कौशल्य प्रकाशन औरंगाबाद, २०१०.

१७) खंडगिरी उदयगिरी, दिगंबर जैन सिद्धक्षेत्र कटक, १९८२.

१८) गंगवाल हुकूमचंद, मांगी-तुंगी माहिती पुस्तिका प्रकाशन नाशिक, १९९०.

१९) गुसेवा नतालिया, डी. जी. पी. कुलकर्णी, जैनधर्म उगम व विकास, शब्दपीठ प्रकाशन कल्याण (मुंबई), १९७६.

२०) गोखले स. न., पुराभिलेख, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे (वर्षाचा उल्लेख नाही).

२१) ढणाल जे. डी., जैन धर्म व इतिहास, बा. भु. पाटील ग्रंथ प्रकाशन मंडळ सांगली, १९८७.

२२) चक्रवर्ती सिद्धांत, जिन पूजा-जीन मंदिर, वीर निर्वाण ग्रंथ प्रकाशन समिती इंदौर, १९८२.

२३) घुगरे सुर्यकांत, वीरशैव व इतर धर्म आणि समाज, राजहंस प्रेस कोल्हापूर, २०००.

२४) चौगुले पुरंदर भाऊ, सल्लेखना, अनेकान्त शोधपीठ बाहूबली (कुंभोज), २००९.

२५) जैन सुमेरचंद, वैज्ञानिक जैन धर्म, स्वयंभू प्रकाशन सोलापूर, १९९९.

२६) जैन नंदलाल, अहिंसा परमोधर्म, हिराचंद नेमचंद जोशी प्रकाशन सोलापूर, १९७८.

२७) जैन धमरचंद, प्रागैतिहासिक जैन परंपरा, भारत जैन महामंडळ, प्रकाशन मुंबई, १९७५.

२८) जैन अनुपम, दिगंबर जैन तीर्थ निर्देशिका, समिती प्रकाशन इन्दौर (वर्षाचा उल्लेख नाही).

२९) जैन कामता प्रसाद, गिरनार गौरव, श्री गिरनार प्रकाशन अलीगंज (एटा), २०११.

३०) जैन नेमिनाथ साहुजी, औरंगाबाद, दौलताबाद, वेरुळ, अजिंठा ज्ञान, जैना पब्लिशिंग कंपनी दिल्ली, २००४.

३१) जैन सुमेरचंद, जिनतत्वामाला भाग-१ व २, श्री स्वयंभू प्रकाशन सोलापूर, १९९७.

३२) जैन लीलावती, जिनतत्वमाला भाग-३, श्री स्वयंभू प्रकाशन सोलापूर, १९९६.

३३) जैन सुभाष, जैन तीर्थवंदना, अखिल भारत वर्षीय दिगंबर जैन परिषद प्रकाशन दिल्ली, १९८१.

३४) जैन शेखरचंद्र, ओळख जैन धर्माची, जीवराज जैन ग्रंथमाला सोलापूर.

३५) जोशी ज. वा., धर्माचे तत्वज्ञान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९७५.

३६) जोशी नि. पू., भारतीय मूर्तीशास्त्र, कल्पना प्रिटींग प्रेस नागपूर, १९७९.

३७) जोशी महादेवशास्त्री, तीर्थरुप महाराष्ट्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९७५.

३८) जोशी नी. पु., भारतीय मूर्तिशास्त्र, कल्पना प्रिटींग प्रेस नागपूर, १९७९.

३९) डांगे सिंधू, जैन धर्म आणि तत्त्वज्ञान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २०१३.

४०) तिवारी मारुतिनन्दन, गिरि कमल, मध्यकालीन भारतीय प्रतिमा लक्षण, विश्वविद्यालय प्रकाशन वाराणसी, १९९७.

४१) पाटील तानाजी, माझे पर्यटन, सांज प्रकाशन सोलापूर, २०११.

४२) पाटील पद्मजा, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, दक्षिण भारत जैनसभा सांगली, २००६.

४३) पाटील माया, पुरातत्व : एक पर्यालोचन, सुविद्या प्रकाशन सोलापूर, २०११.

४४) पाटसकर भाग्यश्री, महाराष्ट्रातील मंदिर शैली, डायमंड पब्लिकेशन पुणे, (वर्षाचा उल्लेख नाही).

४५) पाटील बी. के., तीर्थवंदना, २००८.

४६) पाठक अरुणचंद्र शं., मराठवाडा : एक शोध, सुमेरु प्रकाशन डोंबिवली, २००९.

४७) प्रभूदेसाई योगेश, कोल्हापूरातील मंदिरसंपदा, अक्षरदाहन प्रकाशन कोल्हापूर, २०११.

४८) फडके जयंत शामराव, आपली संस्कृती : सण, उत्सव व प्रतिके, अक्षरलेणे प्रकाशन सोलापूर, २०११.

४९) भद्रबाहु विजय, जैन धर्म, श्री विश्वकल्याण प्रकाशन महेसाणा, १९८४.

५०) मगदुम आप्पाभाऊ, जैन धर्माची ओळख, श्री वीरग्रंथमाला प्रकाशन सांगली, १९४०.

५१) मंगुडकर मा. प., महाराष्ट्र व जैन संस्कृती, महाराष्ट्र जैन सांस्कृतिक मंडळ पुणे, १९९८.

५२) माटे मधुकर श्रीपाद, प्राचीन भारतीय कला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९७४.

५३) रावजी वाङ्मय प्रदीप, तीर्थंकरांची प्राचीनता, जैन साहित्य सेवा मंडळ, अपूर्व प्रकाशन मुंबई, १९५०.

५४) रावजी वाङ्मय प्रदीप, तीर्थंकरांची प्राचीनता, जैन साहित्य सेवा मंडळ, अपूर्व प्रकाशन मुंबई, १९५०.

५५) वैद्य म. वा. सर्वधर्म परिचय, धर्म सेवाश्रम प्रकाशन रत्नागिरी, १९८७.

५६) शहा प्रेमचंद, जैन धर्म (वर्षाचा उल्लेख नाही).

५७) शहा आणि वागदरीकर, जैन संस्कृती (वर्षाचा उल्लेख नाही).

५८) शेणोलीकर आणि देशपांडे, महाराष्ट्राचा सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, के सागर प्रकाशन पुणे, २००६.

५९) शिंदे महर्षी विठ्ठल रामजी, धर्म जीवन व तत्वज्ञान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २००१.

६०) शहा मयूरा, कुंथलगिरी, वालचंद संघवी प्रकाशन सोलापूर, १९९०.

६१) शहा नलिनी, यात्रा, सुरस प्रकाशन कोल्हापूर, १९९४.

६२) शहा रजनी विजयकुमार, भारतातील दिगंबर जैन तीर्थ, भाग १, २, ३, ४, जीवराज जैन ग्रंथमाला सोलापूर, २०००.

६३) शहा सुमतिबाई, पूर्णार्ध्य, पूर्णार्ध्य प्रकाशन, पी. एस. विद्यापीठ ट्रस्ट सोलापूर, १९७०.

६४) शास्त्री देवेन्द्र मुनी, जैन धर्म श्रावक धर्म, भारत जैन महामंडल प्रकाशन मुंबई, १९७५.

६५) शहा रजनी विजयकुमार, हुमड जैन इतिहास व धर्म, अथुर्नाप्रकाशन पुणे, २०११.

६६) शहा रजनी विजयकुमार, सल्लेखना व्रत, प्रकाशक शहा परिवार बारामती, २०००.

६७) शास्त्री वर्धमान पार्श्वनाथ, श्री आदिनाथ जैन मंदिर, मंदिर समिती प्रकाशन सोलापूर, १९४९.

६८) संगवे विलास, जैन संस्कृती-परंपरा व प्रभाव, अनेकांत शोधपीठ प्रकाशन बाहुबली (कोल्हापूर), १९९१.

६९) सरोटे श्याम, हिंदू ऐक्यासाठी धर्ममंथन, हर्षल प्रकाशन औरंगाबाद, २००६.

७०) संगवे विलास, दक्षिण भारत जैन सभेचा इतिहास, अनेकान्त शोधपीठ बाहुबली (कोल्हापूर), १९७६.

७१) सुतार अ. मा., प्राचीन महाराष्ट्रातील जैन धर्म, बा. भु. पाटील ग्रंथ प्रकाशन मंडळ सांगली, १९९०.

७२) नुलकर सत्यव्रत, कुडलचे वास्तुशिल्प वैभव, विजय प्रकाशन सोलापूर, २०१४.

७३) हाडोळे सी. जे., जैन धर्माची प्राचीनता, जैन साहित्य प्रकाशन सोलापूर, १९९८.

**हिंदी**

१) अभयमती आर्यिका, श्री जैन संस्कृती, श्री बुंदेलखंड स्याद्वाद परिषद, मडावरा, ललितपूर उत्तर प्रदेश, १९८०.

२) आग्रेकर मनोहर, नेमगिरी पूजा और इतिहास, नेमगिरी प्रकाशन जिंतुर, २०००.

३) अग्रवाल वासुदेवशरण, जैन साहित्य का इतिहास, इंडॉलॉजी कॉलेज काशी, १९९५.

४) आचार्य विद्यानंद, धन्यकुमार जैन, जैन धर्म की ऐतिहासिकता, अहिंसा प्रसारक ट्रस्ट मुंबई, २००६.

५) कीर्तीजी पार्श्व, विश्व धर्म की रुपरेखा, गुलाबचंद वालचंद डुडु प्रकाशन फलटण, १९७३.

६) चंदा रामप्रसाद, मॉडर्न रिव्ह्यु ऑफ जैन प्रकाशन कलकत्ता, १९३२.

७) जैन हिरालाल आणि उपाध्याय आ. ने., महावीर युग आणि जीवन दर्शन, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन दिल्ली, १६६७.

८) जैन प्रेमसागर, भरत और भारत, दिगंबर जैन कॉलेज प्रबंध समिती मेरठ, १९९८.

९) जैन नेमिचंद, भारतीय संस्कृती को जैन अवदाता, हरिभैय्या प्रकाशन मध्यप्रदेश, १९८६.

१०) जैन लालचंद, जैन वाड्मय मे सिद्धक्षेत्र, जैन साहित्य प्रकाशन सोलापूर, १९६७.

११) जैन नाथुराम डोंगरिया, जैन धर्म विश्वधर्म, कुंद-कुंद ज्ञानपीठ प्रकाशन इंदौर, १९९८.

१२) जैन प्रियंकर यशवंत, धर्म विरोध नही आत्महित का साधन है, वंदना प्रकाशन अटावर, १९९२.

१३) जैन कामता प्रसाद, दिगंबरत्व और दिगंबर मुनी, दिगंबर जैन सर्वोदय तीर्थ प्रकाशन मध्यप्रदेश, १९७५.

१४) जैन नीलम और जैन कुमार, दिगंबर साधु नग्न क्यो ? एवमं केशलोच्छं का कारण ? जैन संघ प्रकाशन इंदौर, १९९१.

१५) जैन बलभद्र, जैन धर्म का प्राचीन इतिहास भाग-१ व भाग-२, मेसर्स श्रीचन चावलेवाल प्रकाशन दिल्ली, १९७५.

१६) जैन प्रेमसुमन, जैन धर्म की सांस्कृतिक विरासत, जैन संघ समिती प्रकाशन दिल्ली, २००५.

१७) जैन बलभद्र, जैन धर्म का प्राचीन इतिहास, केशरीचंद्र प्रकाशन दिल्ली, १९८०.

१८) जैन बलभद्र, भारत के जैन तीर्थ, चतुर्थ भाग, भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटी मुंबई, १९७८.

१९) जैन सौडिया, जैन सिध्दान्त कौमुदी, जैन प्रिन्टिग प्रेस बिकानेर, १९२५.

२०) जैन हरिलाल, करकंडचरिउ, भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन दिल्ली, १९४४.

२१) जैन हिरालाल, करकंडचरिउ, कारंजा जैन पब्लिकेशन सोसायटी कारंजा, १९३४.

२२) दिवाकर सुमेरुचंद्र, धर्म और पुण्य कि मीमांसा, वर्धमान प्रकाशन सोलापूर, १९८०.

२३) देव विक्रम सुरेश, जैन धर्म की रुपरेषा, श्री लुब्धिसुरीश्वरजी स्मारक संस्कृती केंद्र प्रार्थना समाज मुंबई, १९७२.

२४) नथमल श्री मुनि, ध्यान और कार्यात्सर्ग, भारत जैन महामण्डल प्रकाशन मुंबई, १९७५.

२५) नाटाणी प्रकाश नारायण, भारतीय कला के विविध आयाम, महेश बुक डेपो जयपूर, २००६.

२६) नंदी रमेंद्रनाथ, प्राचीन भारत में धर्म के सामाजिक आधार ग्रंथशिल्पी दिल्ली, २००८.

२७) पाण्डे गोविंदचन्द्र, भारतीय कला और संस्कृति, राका प्रकाशन इलाहाबाद, १९९५.

२८) प्रेमी नाथूराम, जैन साहित्य और इतिहास, हिन्दी ग्रन्थ रत्नाकर कार्यालय हरिबाग, मुंबई, १९४२.

२९) प्रियदर्शनी श्री, जैन रामायण (अनुवादक), परमार रंजन, हर्षा प्रकाशन मुंबई, २०००.

३०) भट्टसिद्धेश्वर, मानव की सेवा में विश्व के प्रमुख धर्म, विद्यानिधी प्रकाशन दिल्ली, २००९.

३१) भद्रबाहु विजय, जैन धर्म की, श्री विश्वकल्याण प्रकाशन महेसाणा, १९८४.

३२) भगवानदीन महात्मा, जैन संस्कृति का व्यापक रुप, भारत जैन महामण्डल प्रकाशन मुंबई, १९७४.

३३) भावे विनोबा, जैन धर्म मेरी दृष्टि में, भारत जैन महामण्डल मुंबई, १९७४.

३४) भारत के दिगंबर जैन तीर्थ, भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटी हरिबाग, मुंबई, १९७४.

३५) महाजन धर्मवीर कमलेश्वर, सामाजिक अनुसंधान की पंक्तियाँ, विवेक प्रकाशन दिल्ली, २००८.

३६) महेन्द्रकुमार न्यायाचार्य, जैन दर्शन, गणेशप्रसाद वर्णी जैन ग्रंथमाला काशी, १९५५.

३७) मुनि कान्तिसागर, श्रमण संस्कृति और कला, मध्यप्रदेश जैन युवक सभा प्रकाशन जबलपूर, १९५२.

३८) मुख्तार जुगलकिशोर, जैन ग्रंथ प्रशस्ति-संग्रह, वीरसेवा मंदिर दरियागंज दिल्ली, १९५४.

३९) मुख्तार जुगलकिशोर, जैन साहित्य और इतिहास, श्रीवीर शासन संघ कलकत्ता, १९५६.

४०) रांका रिषभदास, धर्म जीवन जीने की कला, सयाजी उबखित मेमोरियल ट्रस्ट प्रकाशन मुंबई, १९७६.

४१) रांका रिषभदास, जैन धर्म की व्यापकता, भारत जैन महामण्डल प्रकाशन मुंबई, १९७५.

४२) रुपचन्द्र मुनि श्री, महावीर मार्क्स और गांधी, भारत जैन महामण्डल प्रकाशन मुंबई, १९८५.

४३) लोखंडे कुलभूषण, जैन स्त्रोत साहित्य का आलोचनात्मक अध्ययन, दिव्यध्वनि प्रकाशन सोलापूर, १९९७.

४४) शहा जयवंतलाल, जैन धर्म के मौलिक सिद्धांत, श्री स्थानकवासी जैन धार्मिक शिक्षण शिबीर जोधपूर, १९००.

४५) शास्त्री परमानंद, जैन धर्म का प्राचीन इतिहास, जैन साहित्य प्रकाशन जयपूर, १९६५.

४६) शास्त्री परमानंद, जैन धर्म का प्राचीन इतिहास, राजापूर प्रकाशन दिल्ली, खण्ड-१, खण्ड-२, १९९०.

४७) शास्त्री कैलाशचंद्र, जैन धर्म, जिवराज जैन ग्रंथमाला सोलापूर, १९४८.

४८) शुक्ल रामचंद्र (मराठी अनुवादक), मॅगेस्थनीज का भारतवर्षीय वर्णन, इतिहास प्रकाशन समिती काशी, १९०५.

४९) सरलसागरजी, नग्नत्व समीक्षा, डॉ. प्रकाशचंदजी सोधिया प्रकाशन मध्यप्रदेश, १९९५.

५०) सांगलीकर महावीर, महाराष्ट्र का जैन समाज, जैन फ्रेंडस पुणे, १९८८.

५१) सैनी अजय, सम्पूर्ण भारत के सांस्कृतिक पर्यटन स्थळ, हरवसं लाल एण्ड सन्स् प्रकाशन दिल्ली, २०१०.

५२) श्रीवास्तव के. सी., प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृति, युनायइटेड बुक डेपो मुंबई, २००९.

५३) श्री. श्री. रविशंकर, भारतीय प्रतिकों का ज्ञान, व्यक्तिविकास केंद्र, बेंगलोर, २०००.

**इंग्रजी**

1) Bhattacharya Harisatya, Reals in the Jaina Metaphysics, The Seth Santhi Das Khetsy Charitable Trust Bombay, 1966.

2) Doshi Sarya, Masterpieces of Painting, Marg Publications, Bombay, Tata Press Bombay, 1985.

3) John Lea, Tourism and Development in the Third World, Routledge Publication USA, 1988.

4) Kalghatgi T. G., Jain View of Life, Jain Samskrti Samraksaka Samgha Solapur, 1969.

5) Patil Padmaja A., Splendour of Jainism in Southern India, Printing by Superintendent Shivaji University Press Kolhapur, 2010.

6) Padmarajiah, Jain kkTheories of Reality kand Knowledge, Jain Sahitya Vikas Mandal Bombay, 1963.

7) Ramchandran T. N., Harappa and Jainism, Printed by Kunda-Kunda Bharati Prakashan Delshi, 1987.

8) Rajesh Singh, Piligrimage Tourism, Sonali Publications New Delhi, 2011.

9) Roy A. K., A History of Jainas, Geetanjali Publication New Delhi, 1984.

10) Sangve Vilas, The Jaina Path of Ahimsa, Anekant Shodhpith Bhaoubali (Kolhapur), 1991.

11) Sangve Vilas, Aspects of Jaina Religion, Anekant Shodhpith Bhaoubali (Kolhapur), 1990.

12) Shivram Muti C., Panorama of Jain Art, The Times of India New Delhi, 1983.

13) Stevenson Sinclair, The Religious Quest of India, The Heart of Jainism, Humphrey Milphord Oxford University Press London, 1915.

14) Songani K. C., Ethical Doctrines in Jainism, Jivaraja Jain Granthmala Solaur, 1967.

15) Tripathi Preeti, Art and Architecture of India, Navyug Publishers New Delhi, 2009.

16) Thomas Walsh, Adventure Tourishm, Discovery Publishing House Pvt. Ltd. New Delhi, 2011.

**<u>Government Gazetteer</u> :-**

1) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Kolhapur District, Bombay, 1960.

2) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Jalgaon District, Bombay, 1962.

3) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Nagpur District, Bombay, 1966.

4) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Osmanabad District, Bombay, 1966.

5) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Mumbai District, Bombay, 1967.

6) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, History (Part-1 – Ancient Period), Bombay, 1967.

7) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Parbhani District, Bombay, 1967.

8) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Amravati District, Bombay, 1968.

9) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Sangli District, Bombay, 1968.

10) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Beed District, Bombay, 1969.

11) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Wardha District, Bombay, 1974.

12) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Nasik District, Bombay, 1975.

13) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Solapur District, Bombay, 1977.

14) Maharahstra Stae Gazetteers, Government of Maharashtra, Aurangabad District, Bombay, 1976.

**<u>नियतकालिके / मासिके / जर्नल</u>**

१) प्राचीन तीर्थ जिर्णोद्धार, भारतवर्षीय जैन तीर्थ संरक्षिणी महासभा प्रकाशन लखनौ, २००७.

२) जैन तीर्थवंदना, भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमिटी मुंबई, २००७.

३) प्रसाद प्रकाशन पुणे, २०१४.

४) सन्मती, श्री बाहुबली ब्रह्मचर्याश्रमाचे मुखपत्र, बाहुबली, २०१४.

५) जैन बोधक, जैन बोधक प्रकाशन सोलापूर, २०१४.

**<u>दैनिक वृत्तपत्रे</u>**

१) दैनिक संचार, २८ ऑगस्ट, २०११, सोलापूर.

२) दैनिक लोकसत्ता, रविवार, २६ जानेवारी २०१४, पुणे.

३) दैनिक सकाळ, गुरुवार, २ एप्रिल २०१५, पुणे.

४) दैनिक संचार, गुरुवार, २ एप्रिल २०१५, सोलापूर.

५)	दैनिक दिव्य मराठी, गुरुवार, २ एप्रिल २०१५, सोलापूर.

६)	Sunday Times, Sunday, 29th March 2015, Pune.

**कोशवाङ्मय**

१)	जोशी तर्कतीर्थ, लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य साहित्य संशोधन मंडळ मुंबई.

२)	जोशी प. म., भारतीय संस्कृतीकोश, भारतीय संस्कृतीकोश मंडळ पुणे, खंड- ४, ६, ७.

३)	शहा सुमतिबाई (संपा), पूर्णार्घ्य, जैन ज्ञानकोश, श्राविका संस्था सोलापूर, १९९९.

**संकेतस्थळ**

1)	http.//www.digambarjainteerth.com. (10th June 2015)

2)	http.//www.digjainmahasabha.org. (15th July 2015)

3)	http.//www.jaingranth.com. (20th July 2015)

4)	http.//www.jaintirtth.com. (10th Oct. 2015)

5)	http.//www.jaindharmchinha.com (15th Oct. 2015)

# परिशिष्ट क्रमांक - १

## नकाशा क्रमांक १

### जैन धर्मियांची प्रदेशवार टक्केवारीनुसार विभागणी (सन १९९१)



<u>परिशिष्ट क्रमांक - २</u>

<u>नकाशा क्रमांक २</u>

## भारतातील जैन तीर्थक्षेत्रे



# परिशिष्ट क्रमांक - ३

## नकाशा क्रमांक ३

## महाराष्ट्रातील जैन तीर्थक्षेत्रे



# परिशिष्ट क्रमांक - ४

## शिरपूर मंदिराच्या द्‌वारावरील दोन शिलालेख :-

| | | |
|---|---|---|
| पहिले शिलालेख | - | शाक ९०९ ..... पंच ..... मूलसंघे .... भट्‌टारक श्री जि .... न... रा.... रा..... मति श्री भूपालभूप श्री पार्श्वनाथ बिं. .... श्री. ..... न .... तिष्ठित .... राज .... श्रीपाल इह श्रीरायतनं । |
| दुसरे शिलालेख | - | स .... १३३८ वैशाख सुदि ..... श्री मालवस्थ ठः रामल पौत्र ठः भोज पुत्र अमर (कुल) समुत्पन्न संघपति ठः श्री जगसिंहेन अन्तरिक्ष श्री पार्श्व थ निजकुल षटवड वंश ... राज ... । |

# परिशिष्ट क्रमांक - ५

## शिरपूर मंदिरातील मूर्ती आणि स्तंभावरील लेख :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | नेमिनाथ भगवान | - | संवत् १७२७ मार्गशीर्ष सुदी तीन शुक्ल श्री काष्ठासंघे माथूरगच्छे पुष्करगणे श्री लोहाचार्यान्वये भट्टारक श्री लक्ष्मीसेनाम्नाये भट्टारक श्री गुणभद्रोपदेशात् ... ज्ञातीय, इक्ष्वाकुवंशे उपरोत पाबायक गोत्रे स. क तस्यात्मज स. वासुदेव तस्यात्मज ... इदं बिम्ब प्रणमति । |
| २) | भगवान पार्श्वनाथ | - | संवत् १७५४ वैशाख सुदी तेरा शुक्रवार काष्ठासंघे ...... प्रतिष्ठा । |
| ३) | भगवान पार्श्वनाथ | - | शके १९५१ फाल्गुन सुदी द्वितीया सेनगणे भ. सोमसेन उपदेशात् श्रीपुर नगरे प्रतिष्ठा । |
| ४) | भगवान पार्श्वनाथ | - | स्वस्ति श्री संवत् १८११ माघ शुक्ला दहा कुन्दकुन्दाम्नाये गुरु ज्ञानसेन उपदेशात् आदिनाथ तत्पुत्र पासोवा सडतवाल (पुत्र) कृपाल जन्मनिमित्ते श्रीपूर नगरे अंतरिक्ष पार्श्वनाथ पवली जिनालय जीर्णोद्धार कृत्य प्रतिष्ठितमिर्द बिम्ब । |
| ५) | पाषाण स्तंभ | - | श्री अंतरिक्ष नमः गुरु कुन्दकुन्द नमः संवत् १८११ माघ सुदी दहा आदिनाथ पुत्र पासोवा सडतवाल ..... पुत्र कृपाला जमे देऊंल उद्धार केले । |

## परिशिष्ट क्रमांक - ६

**जिंतुर येथील पार्श्वनाथ मूर्ती वरील लेख** :-

" शक १५३० फाल्गुन शुद्ध पाच मूलसंघे बलात्कारगणे कुन्दकुन्दाचार्य - परम्परागत भट्टारक धर्मचंद्र तत्पट्टे भट्टारक श्री धर्मभूषण तत्पट्टे भट्टारक श्री देवेन्द्रकीर्ती तत्पट्टे भट्टारक श्री कुमुदचन्द्राचार्य भट्टारक धर्मचंद्र उपदेाात् बघ्नेरवालज्ञातीय सुरागोत्रे संघवी श्री जसाशाह भार्या संघवी श्री कोण्डाई तस्य पुत्र ९ एतेषां मध्ये संघवी श्री वीर सा भार्या घालावी तस्य पुत्रत्रय संघवी श्री अनन्तसा भार्या गंगाई संघवी सातूसा भार्या रतनभाई संघाधिपति श्री नेमासा भार्या जयवाई नित्यं प्रणमति । "

## परिशिष्ट क्रमांक - ७

**वेरुळ येथील पार्श्वनाथ मूर्तीच्या चरण चिन्हांवरील लेख :-**

''स्वस्ति श्री शके ११५६ जय संवछरे फाल्गुन सुध तृतीय बुध श्रीर्धनापूर जभा ..... जनि राणुगि : । ''

तत्पुत्रो महालुगि : स्वर्णवल्लभो जगतोप्यभूत् ।। १ ।।

ताभ्यां बभूवश्चत्वारा : पुत्राश्चक्रेश्वरादाय : ।

मुख्यश्चक्रेश्वरस्तेषु दान धर्म गुणोत्तर : ।। २ ।।

चैत्यं श्री पार्श्वनाथस्य गिरौ चारणसेविते ।

चक्रेश्वरो सृजद्दानाद्घृताहुचि च कर्मणां ।। ३ ।।

बहुनि विम्बानि जिनेश्वराणां महानि तेनैव विरच्य सवर्त : ।।

श्री चरणाद्रिर्गमित : सुतीर्थतां कैलाशभूभृद् भरतेन यद्वत् ।। ४ ।।

धर्मकमूर्ति : स्थिरशुद्धदृष्टि : हृघो सतीवल्लभकल्पवृक्ष : ।

उत्पद्यते निर्मलधर्मपालश्चक्रेश्वर : पंचमचक्रपाणि : ।। ५ ।।

<u>परिशिष्ट क्रमांक - ८</u>

<u>छायाचित्र क्रमांक १</u>



मांगी-तुंगी तीर्थक्षेत्राचे दृश्य

छायाचित्र क्रमांक २



मांगी-तुंगी येथील पार्श्वनाथ मंदिराचे शिखर

<u>छायाचित्र क्रमांक ३</u>



मांगी-तुंगी (मांगी पर्वत) गुफा नंबर ४ मधील जैन साधूंच्या प्राचीन मूर्ती



मांगी-तुंगी (तुंगी पर्वत) रामचंद्र गुफेतील राम, हनुमान
आणि सुग्रीव यांची मूर्ती

## छायाचित्र क्रमांक ४



गजपंथ पहाडावरील पार्श्वनाथाची दहा फूट उंचीची मूर्ती



गजपंथ पहाडावरील तीर्थंकरांची मूर्ती

<u>छायाचित्र क्रमांक ५</u>



कुंथलगिरी मंदिराचे प्रवेशद्वार



कुंथलगिरीचे विहंगम दृश्य



कुलभूषण देशभूषण भगवान




निजाम सरकारकडून प्राप्त
सनद कोरलेला शिलालेख

## छायाचित्र क्रमांक ६



कुंडल येथील कलिकुंड पार्श्वनाथाची मूर्ती





कुंडल येथील गिरी पार्श्वनाथ आणि पद्मावतीची मूर्ती

छायाचित्र क्रमांक ७



मुक्तागिरी मंदिराचे विहंगम दृश्य

छायाचित्र क्रमांक ८



**कुंभोज येथील बाहुबलीची मूर्ती**

<u>छायाचित्र क्रमांक ९</u>

जिंतुर येथे उत्खननात सापडलेल्या मूर्ती



गुफा क्र. १-भ. बाहुबली



गुफा क्र. २-भ. आदिनाथ



गुफा क्र. ३-भ. शांतिनाथ



गुफा क्र. ४-भ. नेमिनाथ

## छायाचित्र क्रमांक १०

## जिंतुर येथे उत्खननात सापडलेल्या मूर्ती



गुफा क्र. ५-भ. पार्श्वनाथ



गुफा क्र. ६-भ. महावीर



गुफा क्र. ७-भ. नंदीश्वर

## छायाचित्र क्रमांक ११



शिरपूर येथील अंतरिक्ष पार्श्वनाथाची मूर्ती



शिरपूर येथील चिंतामणी पार्श्वनाथाची मूर्ती

छायाचित्र क्रमांक १२



कारंजा येथील सुपार्श्वनाथाची मूर्ती

छायाचित्र क्रमांक १३



कारंजा येथील शासन देवता पद्मावतीची मूर्ती



कारंजा येथील शासन देवता अंबिकेची मूर्ती

छायाचित्र क्रमांक १४



कारंजा मंदिराच्या छताचे दृश्य



कारंजा येथील कपड्यावरील ऐरावत हत्तीचे पेंटिंग

<u>छायाचित्र क्रमांक १५</u>



रामटेक मंदिराचे दृश्य



रामटेक येथील शांतिनाथाची तेरा फूट उंचीची भव्य मूर्ती

छायाचित्र क्रमांक १६



तेर येथील भगवान महावीर यांची मूर्ती



तेर येथील जैन मंदिर परिसर



मंदिराजवळील प्रसिद्ध विहिर

छायाचित्र क्रमांक १७



शिरड-शहापूर येथील तीर्थंकर मल्लिनाथाची भव्य मूर्ती

छायाचित्र क्रमांक १८



नवागड येथील तीर्थंकर नेमिनाथाची मूर्ती



नवागड येथील तीर्थंकर नेमिनाथ मंदिर परिसर

छायाचित्र क्रमांक १९



कचनेर येथील पार्श्वनाथाची मूर्ती



कोठाळा येथील पार्श्वनाथाची मूर्ती

<u>छायाचित्र क्रमांक २०</u>



जटवाडा येथील पार्श्वनाथाची मूर्ती



जटवाडा येथे उत्खननात सापडलेल्या मूर्ती

छायाचित्र क्रमांक २१



पैठण येथील मुनिसुव्रतनाथाची मूर्ती



पैठण येथील उत्खननात प्राप्त झालेली
आदिनाथ भगवान यांची मूर्ती

छायाचित्र क्रमांक २२



बाढौणा रामनाथ येथील तीर्थंकर आदिनाथाची मूर्ती



भातुकली येथील तीर्थंकर आदिनाथाची मूर्ती

<u>छायाचित्र क्रमांक २३</u>



सावरगाव येथील भगवान पार्श्वनाथांची मूर्ती



सावरगाव येथील मंदिर



मंदिराच्या पाठीमागील बाजू





मंदिराच्या गाभा-यातील कोरीव स्तंभ

<u>छायाचित्र क्रमांक २४</u>



सावरगाव येथील मानस्तंभाचे दृश्य

छायाचित्र क्रमांक २५



आष्टा-कासार येथील पार्श्वनाथाची मूर्ती



केसापुरी येथील पार्श्वनाथाची मूर्ती

छायाचित्र क्रमांक २६



पंचालेश्वर येथील पार्श्वनाथाची मूर्ती



पोदनपूर येथील तीर्थंकरांच्या भव्य मूर्ती

<u>छायाचित्र क्रमांक २७</u>

वेरुळ लेणी येथील दृश्य



भगवान बाहुबली



भगवान पार्श्वनाथ



सिंहवाहिनी अंबिका



मानस्तंभ

<u>छायाचित्र क्रमांक २८</u>



वेरुळ लेणी येथील सोळा फूट उंचीची पार्श्वनाथाची मूर्ती

## छायाचित्र क्रमांक २९

## धाराशिव लेणी येथील दृश्य



भगवान पार्श्वनाथ








छायाचित्र क्रमांक ३०



औरंगाबाद लेणी (निपटरंजन गुफा) येथील
तीर्थंकर नेमिनाथाची सहा फूट उंचीची भव्य मूर्ती

## छायाचित्र क्रमांक ३१







अंजनेरी येथील जैन मंदिर समूह

<u>छायाचित्र क्रमांक ३२</u>





चारठाणा येथील आकर्षक मानस्तंभ    कुंथलगिरी येथील आकर्षक मानस्तंभ

<u>छायाचित्र क्रमांक ३३</u>



जैन धर्म ध्वज




जैन धर्म चिन्ह

<u>छायाचित्र क्रमांक ३४</u>






**जैन तीर्थक्षेत्रांवर आढळणारी अहिंसेची प्रतिक**

## छायाचित्र क्रमांक ३५






**जैन तीर्थक्षेत्रांवर आढळणारी चरण चिन्ह**

## छायाचित्र क्रमांक ३६






**जैन धर्म अभ्यासकांच्या मुलाखती घेतानाचे छायाचित्र**

# परिशिष्ट क्रमांक - ९

## प्रश्नावली

१) मुलाखत देणा-याचे पूर्ण नाव व पत्ता

२) मुलाखतीची दिनांक व वेळ

३) हे तीर्थक्षेत्र स्थळ कोणत्या तीर्थंकराचे आहे? गर्भगृहातील मूर्तीचे स्वरुप कसे आहे?

४) तीर्थक्षेत्र स्थापन करण्यामागचा उद्‌देश काय होता ?

५) तीर्थक्षेत्रे कोणी व कोणाच्या काळात बांधले ?

६) तीर्थक्षेत्र निर्मितीमध्ये समाजातील कोणकोणत्या व्यक्तींचे महत्त्वाचो योगदान राहिले आहे ?

७) धार्मिक स्थळांचा जिर्णोद्‌धार कोणी व केंव्हा केला आहे ? त्यासाठी समाजातील लोकांचे आर्थिक सहकार्य मिळाले का ?

८) तीर्थक्षेत्राची एकूण जागा किती आहे ?

९) तीर्थक्षेत्राचे व्यवस्थापन करण्यासाठी देवस्थान समिती आहे का ? या समितीचा कारभार कशा प्रकारे चालतो ?

१०) तीर्थक्षेत्राची बांधकाम शैली कोणत्या प्रकारची आहे ?

११) नित्य पूजा-अर्चेसाठी पुजारी इत्यादींच्या नेमणूका कशा प्रकारे केल्या जातात ? तसेच त्यांना दिल्या जाणा-या मानधनाचे स्वरुप कसे आहे ?

१२) नित्य पूजा-अर्चेची पद्‌धती, नैवद्याचे स्वरुप, तसेच भक्तांना दिल्या जाणा-या प्रसादाचे स्वरुप कसे आहे ?

१३) धार्मिक स्थळाच्या माध्यमातून कोणकोणते वार्षिक उत्सव व सण साजरे होतात?

१४) उत्सवाच्या वेळी कोणकोणत्या धर्मातील व प्रांतातील लोक सहभागी होतात ?

१५) सरकारी अनुदान मिळते काय ? असल्यास ते कोणत्या प्रकारचे ? सध्या ते चालू आहे काय ?

१६) देणगीदाराकडून मिळालेल्या देणग्यांचे स्वरुप कसे आहे ?

१७) आजपर्यंत कोणकोणत्या सत्पुरुषांनी जैन तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या आहेत ?

१८) धार्मिक उत्सवाप्रसंगी महिलांचा सहभाग असतो काय ?

१९) धार्मिक स्थळांच्या अनुषंगाने धर्मा-धर्मात संघर्ष घडून आले आहेत काय? संघर्ष घडून आले असल्यास त्याची कारणे.

२०) धार्मिक स्थळांच्या माध्यमातून सामाजिक कार्य केले जाते काय ?

२१) नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जैन तीर्थक्षेत्रांच्या माध्यमातून कोणत्या प्रकारचे सहाय्य केले जाते ?

# परिशिष्ट क्रमांक - १०

## मुलाखती घेतलेल्या व्यक्तींची नांवे

१) शास्त्री सुजाता, जैन अभ्यासक, सोलापूर.

२) पाटील पद्मजा, जैन संशोधक, महावीर अभ्यासन केंद्र, कोल्हापूर विद्यापीठ, कोल्हापूर.

३) शास्त्री महावीर, जैन धर्म संशोधक, वालचंद महाविद्यालय, सोलापूर.

४) जैन राजेश, ट्रस्ट सदस्य, सुपार्श्वनाथ जैन मंदिर, कौडण्यपूर.

५) देशमाने राजेश, ट्रस्टी मंत्री, कल्पतरु पार्श्वनाथ जैन मंदिर, केसापुरी.

६) काला देवेंद्र, ट्रस्टी सदस्य, पार्श्वनाथ जैन मंदिर, जटवाडा.

७) दोशी सी. आर., ट्रस्टी सदस्य, महावीर मंदिर, दहिगाव.

८) पहाडे प्रदीपकुमार, ट्रस्टी मंत्री, जैन सिद्धक्षेत्र, गजपंथ.

९) जैन सुरजमल, ट्रस्ट प्रबंधक, जैन सिद्धक्षेत्र, मांगी-तुंगी.

१०) देशमाने संजय, ट्रस्टी मंत्री, जैन अतिशयक्षेत्र, तेर.

११) भस्मे एस., ट्रस्टी मंत्री, जैन अतिशयक्षेत्र, आष्टा कासार.

१२) ठोले भरतकुमार, महामंत्री, जैन अतिशयक्षेत्र, कचनेर.

१३) जोहारापूरकर देवचंद, ट्रस्टी प्रबंधक, जैन अतिशयक्षेत्र, कारंजा लाड.

१४) दोशी सी. आर., ट्रस्टी प्रबंधक, जैन अतिशयक्षेत्र, महावीर मंदिर, दहिगांव.

१५) दोशी जयकुमार जीवराज, ट्रस्टी मंत्री, जैन अतिशयक्षेत्र, अकलुज.

१६) गंगवाल पन्नालाल, ट्रस्टी मंत्री, जैन अतिशयक्षेत्र, वेरुळ.

१७) अंबरकर राजेंद्र, ट्रस्टी प्रबंधक, जैन अतिशयक्षेत्र, वेरुळ.

१८) शहा विद्याचंद्र, ट्रस्टी अध्यक्ष, जैन सिद्धक्षेत्र, कुंडल.

१९) संघवी बालचंद, ट्रस्टी अध्यक्ष, जैन सिद्धक्षेत्र, कुंथलगिरी.

२०) संघवी बालचंद, ट्रस्टी मंत्री, जैन सिद्धक्षेत्र, कुंथलगिरी.

२१) कलमकर मनोहर, ट्रस्टी अध्यक्ष, जैन सिद्धक्षेत्र, जिंतुर.

२२) गोरे बंसीलाल, ट्रस्टी प्रबंधक, जैन सिद्‌धक्षेत्र, जिंतुर.

२३) गंगवाल श्रीपाल, ट्रस्टी अध्यक्ष, जैन सिद्‌धक्षेत्र, पांचालेश्वर.

२४) बुबणे किशोर, ट्रस्टी प्रबंधक, जैन अतिशक्षेत्र, तेर.

२५) धुमाळ बाबुराव, जैन अभ्यासक, सोलापूर.